# योगेश्वरी



शब्दांकन

नीलिमा जोशी



मी काळाप्रमाणे बदलतो.

आजच्या काळात प्रेमाची, आपुलकीची, भक्तिची, श्रद्धेची व कर्तव्याची फारच गरज आहे.

कर्तव्यामध्ये मला पहा, प्रेमाने मला जिंका, श्रद्धेने मला आपलासा करून घ्या, विश्वासाने माझ्याजवळ या.

या तत्त्वांचा उपयोग केला तर ओंकाराची जागृती व्हायला फारच मदत होणार आहे.

माझा मदतीचा हात आपल्याला लाभावा असे वाटत असेल तर कर्तव्याला विसरू नका आणि कर्तव्य करीत असताना प्रेमाने करा. म्हणजे माझा कृपाशिर्वाद सतत आपणास मिळत राहील.

या, वरील सर्व गोष्टींतच मी आहे. याची पूर्ण जाणीव ठेवा, म्हणजेच तुम्हाला तुमच्यातील ओंकाराची जाणीव होईल.

।। ॐ नमो भगवते वासुदेवाय ।।

।। ॐ महानशक्ती देवताय नमः ।।

# योगेश्वरी



संकलन आणि शब्दांकन

**सौ. नीलिमा जयंत जोशी**

# योगेश्वरी

संकलन आणि शब्दांकन

**सौ. नीलिमा जयंत जोशी**

८६, अनुभूती अपार्टमेंटस्

मित्रमंडळ कॉलनी, पुणे ९

९९२१८२८४१८/९९२३०११८९४

**संपादन : श्रीमती नीलिमा शिकारखाने**

पुणे. फोन नं.: ९८९०५०८०९१/९२८४४९११६८

**आवृत्ती पहिली :**

**१० फेब्रुवारी २०१९**

**(प. पू. ताईंची पुण्यतिथी)**

**प्रकाशक © : सौ. नीलिमा जयंत जोशी**

**मुखपृष्ठ : सौ. सुप्रिया जोगदेव**

**अक्षरजुळणी : सौ. राजश्री जाधव**

**मुद्रक : पिक्सो प्रिंटर्स, कसबा पेठ, पुणे ४११ ०११**

**खाजगी वितरणासाठी मुद्रित व प्रकाशित**

# अर्पण पत्रिका



जन्म : २९ मे १९३४
निर्वाण : १० फेब्रुवारी २००३

जन्मोजन्मी माझा हात धरून मला
जीवन-विद्या देणाऱ्या माझ्या सद्गुरू
प.पू. लीलाताई कर्वे यांचे चरणी
ही भावसेवा अत्यंत कृतज्ञतापूर्वक
समर्पित करते.

।। गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वर:
गुरु: साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नम: ।।

# आशीर्वचन

।।श्रीगुरु:शरणम्।।

''मुकुंदा, तुझ्या मुरलीचे सूर साऱ्या विश्वाला चैतन्य देऊ देत.''

* प. पू. श्री ताईमहाराज कर्वे, बदलापूर यांचे चरित्र भक्तिभावाने, परमश्रद्धेने, सौ. नीलिमा जोशी, पुणे यांनी लिहिले आहे. भाषेचा फुलोरा न फुलविता, सहज, सोप्या भाषेत, रम्य शैलीत, त्यांनी ते साकार केलं आहे. सर्वसामान्य भाविक वाचकाला ते आवडेल.

* श्री ताईमहाराज कृष्णमय झाल्या होत्या. त्यांनी त्यांच्या लाडक्या गोपाळाला घरोघर नेलं. बालमुकुंदाच्या गोकुळात, देश-विदेशातील गोप, गोपी लीलया सामील झाले. फार मोठं विश्वकुटुंब, योगेश्वर श्रीकृष्णाने निर्माण केलं!

ह्या चरित्रनिर्मितीच्या कार्यांत ज्यांचे ज्यांचे सौ. नीलिमाताईंना साहाय्य लाभलं त्या सर्वांना देवकीनंदनाची अखंड कृपा लाभो, ही परमकृपाळू यदुश्रेष्ठाच्या पावन चरणी प्रार्थना करतो आणि म्हणतो,

''मुकुंदा, तुझ्या मुरलीचे सूर (अथांग, निरपेक्ष प्रेम, सहृदयता, प्रसन्नता, मंगलमयता, परिपूर्ण आनंदमय अवस्था, चातुर्य, उद्योगप्रीयता आदि दैवी गुण)

साऱ्या विश्वाला चैतन्य देऊ देत.''

कळावे, शेष श्रीकृपा

विनीत

आनंदस्वामी

२२/१४ डी, झावबावाडी,
ठाकुरद्वार, मुंबई ४०००० २
मो.९६१९७६१९५९

।। श्रीगुरुःशरणम् ।।

## लीला कृष्णाची

ज्याच्या चरणाकमलातून उद्भवलेली भागवत गंगा भारतामध्ये हजारो वर्षे हजारो भक्तांना पावन करीत आली आहे; नारद, प्रल्हाद, उद्धव इ. तीर्थे जिच्या काठावर प्राचीन काळापासून आहेत तर संत ज्ञानदेवादि संतानी जिचा तीर समृद्ध केला ती भक्तिगंगा आजही किती जोमाने दुथडी भरून वाहत आहे हे ब्रह्मलीन/कृष्णभक्त लीला कर्वे यांच्या या स्मृतिचित्रांवरून लक्षात येईल. सौ. नीलिमा जोशी यांना जे अनुभवायला मिळाले, त्यांना जो सहवास घडला त्याचे वस्तुनिष्ठ चित्रण असणारे हे चरित्र अगदी गुरुचरित्रासारखे आनंद प्रसन्नता व पावनता असणारे झाले आहे.

आत्मचरित्रात्मक चरित्र -

म्हटले तर हे चरित्र आहे, त्यात लेखकाचा (संकलकाचा) 'मी' कोठेही नाही, त्यांनी तटस्थपणे चरित्रनायिकेच्या जीवनाचे, सांगोपांग चित्रण केले आहे. त्यांत लीलाताईंच्या जन्मापासून महानिर्वाण येथपर्यंतची भावचित्रे, क्षणचित्रे आहेत. भक्ती हे सुद्धा विज्ञानच कसे आहे ते जर कोणाला जाणायचे असेल तर त्याने ही सर्व स्मृतिचित्रे आवर्जून वाचावीत. चरित्र या वाङ्मय प्रकारात श्रेष्ठ मूल्य सत्य हे आहे. वस्तुनिष्ठा त्यात अपेक्षित असते. सौ. नीलिमांनी कोठेही कल्पित असे काही लिहिले नाही, भावसौंदर्य व सत्यप्रतिपादन हातात हात घालून यात आहेत. त्यामुळे एका अर्थाने तर हे आत्मचरित्र आहे. चरित्रनायिका लीलाताई यांच्या मुखातून व त्यांच्या स्वकीयांच्या मुखातून हे प्रकटले आहे. त्यात ना अभिनिवेश ना आत्मप्रदर्शन, ना कोठे गाऱ्हाणे ना वंदना!

सगुण भक्तीचे सुरेख दर्शन!

देवाची ओढ, भेटीची उत्कटता, आशा व निराशा, खरे की खोटे

असे मनाचे संभ्रम हे ज्यांच्या जीवनात कधी आलेच नाहीत अशा अनन्य भक्ताची ही कहाणी आहे! सलोकता, समीपता इ. पायऱ्या वगळून जणू सायुज्य पदवीला बालवयात पोहोचलेल्या बालिकेचे रूपांतर 'ताई' या साध्वीत कसकसे घडत गेले याचा हा चित्रपट आहे. संशय, अश्रद्धा यांना कोठे वावच नाही पण व्यवहाराला सोडून, तर्काला छेद देऊन कोठे काही घडलेच नाही असे लीलाताईंचे समग्र वर्तन व त्यात त्यांना आणि त्यांच्या परिवाराला जे वस्तुनिष्ठ अनुभव आले त्याचा हा लेखाजोखा आहे. बुद्धिप्रामाण्यवादी किंवा निर्गुणाचा अधिकार नसलेल्या जिज्ञासूंचे डोळे उघडले जावेत इतके परखड भक्तिमार्गातले सत्यरूप कथन हे मराठीत प्रथमच म्हणावे लागेल. यात चरित्रनायिकेने जे जे स्वत: पाहिले, अनुभवले व सहवासातल्या व्यक्तींना जो अनुभव त्यांनी दिला याचे (आत्म)कथन आहे पण कोठेही फाजील विनय वा स्वत:चा मोठेपणा आलेला नाही.

कित्येक सुशिक्षित जन 'त्या' अलौकिक शक्तीला मानतात; पण त्याची साथ तेथेच सोडून व्यवहारी बनतात. संतांच्या अनुभवांकडे पाहण्याची त्यांची दृष्टीही विकृत बनते. संताचे अनुभव हे त्यांना मनाचे खेळ किंवा Mental projection वाटतात. पण संसारात येणारा, रोजच्या जीवनात येणारा हा देवाचा अनुभव ते नाकारतात. या सर्व संशयजालातून शुद्ध भक्ती व परमार्थ ज्या 'ताईंनी' दिला त्याचे दर्शन प्रस्तुत पुस्तिकेत चांगल्या रीतीने घडते.

स्वत:ला बाजूला ठेवून व कोणताही भाबडेपणा न आणता हे सौ. नीलिमा जोशींनी केलेले लेखन मराठी सारस्वतात मोलाची वाङ्मय सेवा ठरेल.

एकदा सुरुवात केली की ते संपेपर्यंत पुस्तक खाली ठेवू नये अशी वाचकाच्या मनाची पकड या निवेदनात आहे. त्यात सुबोधपणा व प्रसन्नता जागोजाग आहेत.

डॉ. प्रभाकर नारायण दीक्षित

'आशीर्वाद' बंगला
लक्ष्मीनगर, डेक्कन चौकाजवळ,
ता. फलटण, जि. सातारा ४१५५२३

# मनोगत

मला जर कोणी विचारलं, ''तुझ्या आयुष्यातला सुवर्णक्षण कोणता?'', तर मी अंत:करणापासून सांगेन, की १९८५ साली सर्वप्रथम मी जेव्हा बदलापूरला, कृष्णकुटीरमध्ये गुरुमाउली आणि कृष्णाला भेटले तोच माझा आयुष्यातला सुवर्णक्षण! खरंतर मी देवभोळी वगैरे अजिबात नाही. माहेरचं वातावरण म्हणजे माणसातला देव बघायला शिका आणि काही समाजहिताची कामे करत त्याचीच पूजा करा असं शिकविणारे. पण त्या दिवशी मात्र, बदलापूरला त्या मनमोहनासमोर उभी राहिल्यावर, ऊर इतका भरून आला की डोळ्यातून सारखं पाणी येऊ लागलं. वृत्ती अगदी अनावर झाल्या. माझीच मला विलक्षण लाज वाटू लागली की हे काय चाललं आहे? उगाच काय नसता दिखाऊपणा करायचा? पण मला त्या अश्रुधारा आवरताच येत नव्हत्या. ताईंनी अत्यंत मायेने माझ्याकडे बघितलं व म्हणाल्या, ''अगं, पाणी देऊ का? बस इथे. तुला प्रसाद देते हं.'' असं म्हणून त्या आत गेल्या.

मी आपली डोळे पुसत 'त्या' कृष्णाला जणू हृदयी साठवून घेत होते. कृष्ण म्हणजे आकर्षण कसं असतं, त्याची जाणीव त्या वेळेस कृष्णाने करून दिली. पुढे एका जाणकार साधकांनी सांगितलं, ''अहो तुम्हाला तुमचं ठिकाण सापडलं आहे. म्हणूनच ऊर्मी अशा अनावर येऊन डोळ्यावाटे बाहेर पडल्या. एकच सांगतो, आयुष्यभर आता 'हे' चरण सोडू नका. हेच तुमचं सद्गुरुस्थान आहे.'' जणू त्यांच्या तोंडून कृष्णच बोलला. त्याचा अनुभव मी आज ह्या क्षणाला पण घेत आहे.

प्रथम कृष्ण बोलतो म्हणजे काय, कसे ह्या कुतूहलापोटी तेथे गेलेली मी पहिल्याच वेळी कृष्णकुटीरमधला 'तो' कृष्ण, त्या वात्सल्यमूर्ती ताई,

तेथील सात्विक, प्रेमळ वातावरण ह्या सगळ्या सगळ्याच्याच प्रेमात पडले. पुढे कधी प्रश्न विचारायला, तर कधी सहजच, तर कधी कोणा मित्रमंडळींना कृष्णाची ओळख करून देण्यासाठी म्हणून वारंवार बदलापूरला जाऊ लागले. असं करता करता बारा वर्षे गेली. १९९७ साली कृष्णाने भारतात सामूहिक उपासनेसाठी म्हणून श्रीकृष्णलीला केंद्राची स्थापन करायला सुरुवात केली. त्या निमित्ताने ताईंचे अनेकदा पुण्याला येणं झालं. तेव्हापासून मात्र श्रीकृष्णाचे गारूड म्हणजे काय आहे त्याचा अनुभव घेऊ लागले, तो आजतागायत घेत आहे.

माझ्याही नकळत ताईंनी माझा हात आपल्या हातााात धरून या भक्तिमार्गावरून मला पावलं टाकायला कसं शिकवलं, ते मलाही कळलं नाही. त्यांनी समोर बसवून कधी प्रवचन दिलं का, कधी असंच वागा, असा आग्रह धरला का, कधी रागावून, दटावून बोलल्या का? तर अजिबात नाही! आई कशी आपल्या लहानग्याला जसा पेलेल, रुचेल, पचेल तसा छोटा छोटा घास घेऊन, काऊ-चिऊच्या गोष्टी सांगत, अत्यंत प्रेमाने जेवण भरवते. तसं या भक्तीच्या प्रांगणात, ताईंनी श्रद्धा, विश्वास, भक्ती, कृष्णप्रेम, गुरुप्रेम, गुरुसेवा, गुरुकार्य, खरा धर्म, खरी पूजा या साऱ्या साऱ्याचा अर्थ अनेक प्रसंगातून उलगडून दाखविला. आपल्या आयुष्याचं सोनं करायचे असेल तर त्यासाठी आापण कसं वागायला पाहिजे, खऱ्या परमाार्थाची सुरुवात आपल्या घरापासून, कुटुंबापासूनच करायला पाहिजे हे दाखवून, प्रत्यक्ष आचरणात आणून, पटवून दिले. खरं समाधान, खरी शांती ही प्रत्येक जण मिळवू शकतो, त्यासाठी काय करणे आवश्यक आहे, हे त्या सतत अनेक उदाहरणातून, अनुभवातून सांगत होत्या. त्या अनुरोधाने त्यांच्या कार्याचं स्वरूपही बदलत गेलं.

ताईंचा जीवनपट पाहिला तर साधारणपणे बालपण, शिक्षण नोकरी हा पहिला टप्पा, पुढे लग्न, संसार, नोकरी जोडीला गीतेचा प्रचार व प्रसार, व भक्तांना व्यावहारिक व पारमार्थिक मार्गदर्शन हा दुसरा टप्पा. त्यांच्या निवृत्तीनंतर तिसरा टप्पा, सतत ध्यान, धारणा, भ्रमण करून केलेलं कार्य, सामुदायिक उपासनेसाठी केलेली श्रीकृष्णलीला केंद्राची योजना, पुढे

शक्तीच्या आराधनेसाठी केलेली विश्वजननीची स्थापना, ते करत असतानाच घेतलेली समाधी!

ह्या प्रत्येक कालखंडात, कृष्णाने वेळोवेळी करवून घेतलेली उपासना, साधना, ध्यान, ते करत असताना कृष्णाला दिलेली वचनं त्या वचनांचे अत्यंत निष्ठेनं, समर्पण भावानं, कष्टांची, प्राणांची पर्वा न करता केलेलं पालन हे सारं आठवले की मन अत्यंत आदराने भरून येते.

त्यांच्या समाधिनंतर मनाला छंदच लागला की त्यांनी सांगितलेले अनुभव, त्यांच्याबरोबर घालवलेले अनेक क्षण हे परत परत आठवून, त्या आपल्याला त्यातून काही देत आहेत का? शिकवत आहेत का? ते आपण त्यांच्या अपेक्षेप्रमाणे समजून घेऊ शकलो का? त्याचा आपल्या दैनंदिन जीवनात वागताना परिणाम होतोय का? खरी गुरुसेवा आपल्याकडून घडावी असं वाटत असेल तर आपल्या वृत्तीत, स्वभावात, वागण्यात, नातेसंबंधात, जो बदल व्हावा असं आपल्या गुरुंना अपेक्षित आहे तो बदल करण्याचा निदान प्रयत्न तरी आपण करत आहोत का? असे अनेक विचार फेर धरू लागतात आणि अंतर्मुख व्हायला होतं. त्यातून एक जाणीव मात्र प्रकर्षाने झाली की आठवणींच्या अनुभवांच्या, अनुभूतींच्या रूपानं जो अनमोल ठेवा, कृष्णानं अनेक कृष्णभक्तांकडे दिलेला आहे त्याचे एकत्रिकरण, संकलन करायला पाहिजे. तो ठेवा ताईंच्या लाडक्या यंग जनरेशनकडे सुपुर्द करायला पाहिजे. ती पण गुरुसेवाच होईल.

असा विचार करून २९ मे २०१६ रोजी कृष्णाला प्रार्थना केली, 'तू म्हणतोस की कार्य म्हणजे कोणा एकाचे असूच शकत नाही, त्याला दहा हात लागल्याशिवाय ते आकाराला येऊ शकत नाही. तसे हे संकलनाचे कार्य तू अनेक कृष्णभक्तांना प्रेरणा देऊन आमच्याकडून करवून घे. आम्हा सर्वांना गुरुसेवेची संधी दे' खरोखरच अनेक कृष्णभक्तांचा उत्स्फूर्त सहभाग मिळून, त्याला आज हे पुस्तक स्वरूप आलं आहे. हे करत असताना गुरुतत्त्व हे एकच असते व कोणतेही काम हे निव्वळ त्यांच्याच प्रेरणेने होत असते याचाही अनुभव आला.

संकलनाच्या कामाला सुरुवात केली आणि मुंबईहून प.पू. आनंदस्वामींचा फोन आला. (आनंदस्वामी म्हणजे प. पू. श्रीवासुदेवानंद सरस्वती (टेंब्ये) स्वामी महाराज, माणगाव आणि स्वामी समर्थ अक्कलकोट ह्यांचे कृपांकित, अंतरंग शिष्य) ''तुम्ही ताई महाराज बदलापूर, यांच्या आठवणींचे संकलन करत आहात. त्यासाठी अनेक भक्तांच्या मुलाखती घेणार आहात. मला महाराजांचा (टेंब्येस्वामी) आदेश आहे, की तिला मुलाखतीसाठी म्हणून एक प्रश्नावली करून दे. त्याप्रमाणे नंतर त्यांचं आशीर्वाद व प्रश्नांची यादी असलेलं पत्र आलं व कामाला गती आली.

पुढे प्रुफ तपासणीसाठी एक प्रत काढली. एक दिवस श्री गोंदवलेकर महाराजांचे अनुग्रहित साधक श्री. विनीत जोशी यांचा फोन आला व त्यांनी सांगितले ''दोनच दिवसापूर्वी तुमच्या घरून परत येताना महाराजांनी मला विचारले की पुस्तकाची प्रत तुला दिली का?'' ''त्यांनी पुस्तकाविषयी मला काहीही सांगितलं नाही. म्हणून विचारायचा संकोच वाटतो.'' मी सांगितलं. त्यावर महाराज म्हणाले, ''लवकरच ती प्रत तुझ्याकडे येईल.'' दोनच दिवसांनी आनंदस्वामींचा फोन आला आणि ते विचारू लागले की नीलिमाच्या पुस्तकाचे काम कोठपर्यंत आले? ''बाबा, मला खरंच माहीत नाही.'' त्यावर आनंदस्वामी म्हणाले, ''तू आपणहून त्यांना विचार की काही मदत हवी आहे का? ती तिथे एकटी लढत आहे, तू जेवढी मदत करता येईल तेवढी कर.'' ताई म्हणून मी आज तुम्हाला फोन केला. कृपया मला ती प्रत द्यावी. माझ्याकडून होईल ती सर्व मदत मी करेन.''

नंतर श्री. जोशी माझ्याकडून ती प्रत घेऊन गेले. दुसऱ्याच दिवशी त्यांना गोंदवल्याला जायचे होते. तेव्हा पहाटे ३ वाजता अचानक जाग येऊन ती प्रत गोंदवल्यास घेऊन येण्याची प्रेरणा श्री महाराजांनी त्यांना दिली. त्याप्रमाणे ते गोंदवल्यास ती प्रत घेऊन गेले व महाराजांच्या समाधिवर आणि धाकट्या रामाच्या मंदिरात महाराजांनी प्रत्यक्ष वापरलेल्या पादुकांवर ती ठेवून आणली. अशा रीतीने या पुस्तकात प. पू. टेंब्येस्वामी महाराज व प. पू. गोंदवलेकर महाराज यांचे आशीर्वाद मिळाले.

यावरून एक मात्र जाणवलं, असं संकलन व्हावं ही साक्षात श्रीकृष्णाचीच इच्छा आहे. सर्व संत, अधिकारी साधक ही त्याचीच रूपं आहेत आणि त्यांचं चरित्र गायन ही श्रीकृष्णाचीच सेवा आहे. अशा सेवेची संधी त्याने आपल्याला (सर्व कृष्णभक्तांना) दिलेली आहे. हे पुस्तक हा त्यातला एक छोटासा भाग आहे. संकलनाचं हे काम सतत चालू ठेवून, वेळोवेळी कृष्ण जशी प्रेरणा देईल, तसतसे पुस्तके, ऑडिओ क्लिप, ई-बुक वगैरे स्वरूपात या आठवणींचे, शिकवणुकीचे जतन करून, तो ठेवा पुढील पिढ्यांकडे सुपुर्द करायचा प्रामाणिक प्रयत्न आपण करू.

त्यासाठी सर्वांना एक नम्र विनंती की ज्यांना आपल्या आठवणी, अनुभव, फोटो, ऑडिओ-व्हीडिओ टेप्स्, ताईंचे लिखित आशीर्वाद (ताई कधी कधी त्यांच्या डायरीची पानं-प्रसाद म्हणून द्यायच्या - त्यांची कॉपी) असं जे काही साहित्य या सेवेसाठी कृष्णचरणी रुजू करायचे असेल त्यांनी तसं कळवावं.

या पुस्तकाला चरित्र म्हणण्याचं धाडस मी करणार नाही. एकतर या आठवणी म्हणजे ताईंच्या जीवनपटाच्या हिमनगाचं वर दिसणारं टोक आहे. तसंच संतांचा चरित्रलेखक जन्मास यावा लागतो. कारण असं लेखन करणं हे वेगळं व सूक्ष्मदृष्टीचं काम आहे. ते कष्टाबरोबरच कृपेनेच साध्य होऊ शकतं. फारतर मी असं म्हणेन की पुढे होणाऱ्या समग्र चरित्र लेखनाला या संकलनाचा उपयोग होऊ शकेल. त्या सेवेतला हा माझा खारीचा वाटा ठरेल. लेखनाचा, साहित्याचा काहीही पूर्वानुभव नसताना हे जे काही घडले आहे ती निव्वळ कृष्णकृपाच आहे.

प. पू. ताईंचा परिचय नसणाऱ्या वाचकांसाठी काही गोष्टींचा खुलासा करणे आवश्यक आहे असं वाटतं.

१) ॐ महानशक्ती देवताय नम: आणि लक्ष्मी देवी महामाये... हे दोनही मंत्र, तसंच ॐ नमो भगवते वासुदेवाय या मंत्राचा अर्थ, हे ताईंना कृष्णाने ध्यानात जसे सांगितले आहेत तसेच इथे दिलेले आहेत.

२) कृष्णभक्तांच्या मनात ताई आणि कृष्ण असा द्वैतभाव नसेच, त्यामुळे पाद्यपूजा करताना, ताई पूर्णपणे ध्यानात असत व त्यांची पाद्यपूजा केली जात असे.

दरवेळेस कृष्ण सांगेल त्याप्रमााणे ताई ध्यान करत असत. म्हणजे बसून डोळे मिटून, डोळे उघडे ठेवून, कधी उभ्याने तर कधी कर्पूर होम करत तर कधी निजूनही. बाहेर प्रवासात असताना .... नजर फिरवून पण ध्यान चालू असे. समुद्रकिनाऱ्यावर बसून समुद्राकडे बघत त्याच्या अथांगपणावर पण त्या ध्यान करत असत. आणि ध्यान करत असताना बरोबर असलेल्या भक्तांनी त्यांचे नेहमीचे व्यवहार खाणं, पिणं, गप्पा, हास्यविनोद हे सर्व काही विनासंकोच चालू ठेवावं असा त्यांचा आग्रह असे. अनेकदा त्या बोलता बोलता गाढ ध्यानात जात असत व ही अवस्था कित्येकदा खूप वेळापर्यंत टिकायची. कृष्णाने त्यांना अनेकदा 'मेल्यासारखे' पडून ध्यान करायला सांगितले होते.

३) बोलत असताना, ताई कधी कधी कृष्ण भावात जाऊन बोलत असत. तेव्हा बरेचदा ताई पुल्लींगी शब्द वापरत असत.

जसे आपण एकमेकांशी बोलतो, तसा ताईंचा संवाद कृष्ण आणि नवदुर्गेशी चालत असे.

ताई नेहमी सांगायच्या 'मी कृष्णभक्तांच्या प्रेमावर जगते. माझा खजिना म्हणजे कृष्णभक्तांचे प्रेम, तोच माझा अलौकिक ठेवा. कृष्णभक्तांचं प्रेम, गीता आणि कृष्ण यांच्याशिवाय माझं असं दुसरं काहीही नाही. अशा अनन्य भक्त असलेल्या आपल्या सद्गुरू प. पू. ताईंना मनोभावे वंदन करून आम्हा सर्व भक्तांची सेवा कृष्णचरणी रुजू करून घ्यावी अशी प्रार्थना करते.

सौ. नीलिमा जोशी

।।ॐ नमो भगवते वासुदेवाय।।

।।ॐ महानशक्ती देवताय नम:।।

।।श्रीकृष्णार्पणमस्तू।।

# ऋणनिर्देश

मला ह्या संकलनासाठी प्रेरणा, संधी, बुद्धी, मती आणि ताकद देणाऱ्या परब्रह्माची आणि गुरुमाउली ताईंची मी अत्यंत ऋणी आहे.

गुरुतत्व एकच आहे तुम्ही व्यक्तीच्या मागे लागू नका. या कृष्णवचनाची जणू प्रचिती आली. प. पू. टेंब्येस्वामी महाराज कृपांकित आनंदस्वामी (बाबा), गुळवणी महाराजांचे अधिकारी सत्‌शिष्य पू. दीक्षित सर, शंकर महाराज कृपांकित प. पू. अम्मा (बाबा) पटेल आणि शैलेश काका पटेल, ज्येष्ठ आणि श्रेष्ठ देवीभक्त, प. पू. सुरेशभाऊ जोशी, तसेच ज्यांच्या माध्यमातून प. पू. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांचे मार्गदर्शन मला लाभले ते श्री. विनीत जोशी या सर्वांनी वेळोवेळी मार्गदर्शन करून हे लिखाण माझ्याकडून करून घेतले. त्या सर्वांना मी अंत:करणापासून वंदन करून त्या सर्वांनी असेच त्यांच्या कृपेच्या छायेत मला ठेवावं अशी प्रार्थना करते.

साताऱ्यातील तत्वज्ञ संत प. पू. डॉ. सुहास पेठे काका यांच्या अनेक उत्तमोत्तम पुस्तकातून त्यांचा सत्संग आणि मार्गदर्शन सतत मिळत असतं. तसंच त्यांची स्वरचित मानसपूजा आणि ताईंसाठी खास रचलेली एक श्लोकी मानसपूजा आपल्या या पुस्तकात समाविष्ट करण्यास परवानगी दिली. या सर्वांबद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी आहे.

मला माणसातला देव बघायला ज्यांनी स्वत:च्या वागणुकीतून शिकविलं, निव्वळ त्यांच्या पुण्याईनेच मला सद्‌गुरूंचा लाभ होऊन गुरूकृपा लाभली, ते माझे वडील कै. दिनकर नारायण बोडस आणि आई श्रीमती विद्या दिनकर बोडस, यांच्या ऋणात जन्मोजन्मी राहायला मला आवडेल.

ताईंच्या या आठवणींना पुस्तक रूपाने मूर्त स्वरूप येण्यात अनेक कृष्णभक्तांचे साहाय्य, पुढाकार, प्रेम लाभलं आहे. त्यात सर्व कर्वे कुटुंबीय म्हणजे श्री. नंदा (मुरलीधर) व सौ. रेश्मा कर्वे, श्री. संतोष (मुन्ना) व सौ. पुष्पलता कर्वे, श्री. संतोष व सौ. वैभवी श्रॉफ आणि श्री. रमेश व सौ. रश्मी नारकर काका काकी यांचा सिंहाचा वाटा आहे त्यांचेही मन:पूर्वक आभार.

ताईंच्या अमेरिका दौऱ्यातल्या सत्संगाचे व्हीडिओ रेकॉर्डींग अत्यंत परिश्रमपूर्वक उपलब्ध करून देणारे श्री. नारायणकाका व सौ. आशाताई देशपांडे यांचे मी अंत:करणापासून आभार मानते.

तसेच वेळोवेळी मला प्रोत्साहित करत मदतीचा हात देणारे कृष्णभक्त श्रीमती विभावरी शेंडे, सौ. अनिता व श्री. विलास दामले आणि सौ. रेखा गोडबोले ह्यांचे आभार न मानता त्यांच्या प्रेमात आणि ऋणातच राहायला मला आवडेल.

अत्यंत व्यस्त वेळापत्रकातून सतत वेळ काढून संपादनाचे काम अत्यंत आत्मीयतेने करणाऱ्या नीलिमाताई शिकारखाने यांचेही मी आभार मानते.

तसेच डीटीपी करणाऱ्या सौ. राजश्री जाधव, मुद्रित शोधन करणाऱ्या श्रीमती प्रितीताई केतकर आणि श्रीमती माधवीताई कोल्हटकर अत्यंत समर्पक मुखपृष्ठ करणारे सौ. सुप्रिया जोगदेव आणि मुद्रक पिक्सो प्रिंटर्स ह्यांचीही मी आभारी आहे.

ताई नेहमी सांगायच्या की, कार्य म्हटले की ते कोण्या एकाचं नसतंच. त्याला दहा हात लागल्याशिवाय त्याला कार्याचं स्वरूप येत नाही. हे वचन सार्थ ठरवणारे व अनंत प्रकारे मदत करणारे अनेक कृष्णभक्त ज्यांनी अत्यंत आत्मीयतेने आठवणी, पुस्तकं, फोटो, सीडीज्, उपलब्ध करून दिल्या, त्या सर्वांची मी आभारी आहे.

या सगळ्या प्रकल्पात मला हरघडी साथ देणारे माझे सर्व कुटुंबीय यांच्याही ऋणातच राहणं मी पसंत करेन.

अनवधानाने कोणाचा उल्लेख करावयाचा राहून गेला असल्यास त्यांची मी क्षमा मागते.

कृष्णा गुरुमाऊली, आम्हा सर्वांना सतत तुमच्या चरणाशी ठेवा, तुमचे कृपाछत्र सतत आम्हाला लाभो, अशी सर्वांसाठी, सर्वांच्या वतीने प्रार्थना करते.

।।ॐ नमो भगवते वासुदेवाय।।

।।ॐ महानशक्ती देवताय नम:।।

सौ. नीलिमा जोशी



गीतापठणाबद्दल केलेले कौतुक





अंदमान येथील यंग जनरेशनकडून करून
घेतलेली पाद्यपूजा

# ।। ताईंचे हस्ताक्षर ।।

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥ 18/8/93

अमेरिकेला कामासाठी १९९० साली आलो. आणि माझ्या बऱ्या-
च भक्तांना भेटून गेलो. १२ मे १९९० माझ्या आगमनाची
तारीख आणि १७ जुलै १९९० कार्य संपून परत जाण्याची तारीख
होती. त्याचवेळी मी निश्चित ठरवले होते की, मी परत तीन
वर्षांनी येईन, माझ्या भक्तांना भेटेन. आणि त्यांच्यासाठी
एक योजना आखून जाईन त्याप्रमाणे आज १८ ऑगस्ट
१९९३ मी एक केन्द्र स्थापन करण्याचें निश्चित ठरवलें
ती वेळही निश्चित केली आणि सकाळी बरोबर १० ते
११ च्या दरम्यान माझ्या "श्रीकृष्ण लीला केन्द्र" याचा
पाया घातला. पहिले केन्द्र मस्कत, दुसरे केन्द्र सौंदलगा
आणि तिसरें केन्द्र ओंटेरिओला म्हणजे कॅलिफोर्नियाला
स्थापन केले. हे जेव्हा मी करतो त्यावेळेला मला माझ्या
भक्तांसाठी याची अत्यंत गरज असते. कारण तुम्ही
ऐकत असताना "एकीचे बळ फार मोठे असते" हे वाक्य
अनेक वेळा ऐकले असेल तसेच Union is strength
हेही अनेक वेळा घोकले असाल त्याचप्रमाणे सामुदायि-
क प्रार्थनेलाही तितकेच की बहुना त्याहून जास्त
महत्व असते. आणि ह्या उद्देशाने तुम्ही एकत्र येता
त्या उद्देशाला पुष्कळच बळकटी येते. आज आत्ता ती
ह्या कलीची येणाऱ्या काळाची गरजच झाली आहे.
कारण त्याशिवाय आपल्याला आनंदाने, उत्साहाने,
प्रेमाने वावरता येणार नाही. प्रत्येकाला आपुलकी,
प्रेम, समंजसपणा, नम्रता व सचोटी ह्या गोष्टींची
फार गरज असते. आणि ती गरज आपल्याला मान-
वता धर्मातूनच मिळवता येते. आज सर्व काही मिळते
आहे परंतु मानवता धर्म मिळणे फारच कठीण झाले आहे
आपला मूळ धर्म मानवता तो हळूहळू लोप पावला जात
आहे आणि इतर धर्मांचे मात्र हळूहळू जाळे पसरून
यातून हेवे दावे निर्माण होऊन विनाशाकडे माणसा-
ची वृत्ती झुकत चालली आहे. तो कल थांबवण्यासाठी
आतांपासूनच जर प्रयत्न झाला नाही तर दिवसें
दिवस काळाची पावले जड, कठोर पडणार आहेत

## ।। ताईंचा ध्यानस्थ अवस्थेमधील लिखित जप ।।











विविध भावमुद्रा

ॐ

निसर्गरम्य गोव्याच्या दक्षिणभागात असणारे नितांत सुंदर गाव 'मंगेशी'. तेथे श्री रघुनाथ व सौ. लक्ष्मीबाई शेणवी हे अत्यंत सच्छील, हरिभक्तपरायण असे जोडपे राहत होते. मंगेशाच्या कृपाछत्राखाली आपला छोटासा खानावळीचा व्यवसाय सांभाळून मंगेशाची व नवदुर्गेची मन:पूर्वक सेवा करणारे आणि त्यातच आनंद मानणारे असे भोळे-भाबडे जीव. त्यांच्या आनंदाला किंचित् चिंतेची एक किनार मात्र होती. लक्ष्मीबाईंची मुले जगत नव्हती.

एके दिवशी एक नवल घडले. लक्ष्मीबाई अत्यंत आनंदित होऊन झोपेतून उठल्या आणि सांगू लागल्या, 'अहो, ऐकलंत का? आज मला नवदुर्गेने दृष्टांत दिला. तिने सांगितले की, ऐक, आता तुझ्या पोटी जन्माला येणारे मूल हे मोठे ईश्वरी कार्य करणार आहे. तुम्ही त्यासाठी सप्तशतीचे पाठ करा.'

'अगं, कसला दृष्टांत आणि कसलं काय? म्हणतात नं मनी वसे ते स्वप्नी दिसे! तसं झालं असेल. सारखे मुलाचेच विचार डोक्यात असतात नं, म्हणून पडलं असेल झालं स्वप्न!'

'अहो, असं काय म्हणता? इतके दिवस कधी नाही स्वप्न पडले. ठीक आहे तुमचा विश्वास नाही नं, तर आपण पाकळी लावून कौल घेऊ. मग पाठाचे ठरवू, मग तर चालेल नं?'

'हो, हे ठीक बोललीस.' दुसऱ्या दिवशी दोघे मंदिरात गेले. त्यांनी प्रार्थना केली आणि कौल लावला. देवाने पण अनुकूल कौल दिला. लक्ष्मीबाईंच्या चित्तवृत्ती अगदी फुलून आल्या. अत्यंत मनोभावे त्यांनी देवाला प्रार्थना केली, 'देवा आत्ताच संकल्प करतो, आमच्याकडून तू सर्व सेवा करून घे.'

गुरुजींना सांगून पाठही करून झाले आणि थोड्याच दिवसात लक्ष्मीबाईंकडे बाळाची चाहूल लागली. दोघेही अगदी खूश झाले. एकीकडे सगळे नीट निभावेल ना म्हणून काळजी पण वाटत होती; पण त्याचबरोबर हे मूल जन्माला यावे ही देवाचीच इच्छा आहे ही खात्री पण होती. त्यामुळे दोघेही सर्व भार देवावर सोपवून करता येईल तेवढी उपासना आणि सेवा मात्र मनापासून करत होते.

अखेर तो सोनियाचा दिवस उजाडला. २९ मे १९३४ला लक्ष्मीबाईंनी एका गोजिरवाण्या कन्येला जन्म दिला. आत्याबाई बाळंतपण करायला आल्या होत्या. त्या म्हणाल्या, 'अगं, मला वाटतं शेजारच्या मथूच्या ओटीत आपण बाळाला घालू या. आधीचे अनुभव काही चांगले नाहीत नं! आता तरी बाळाची तब्येत उत्तम राहू देत.'

त्याप्रमाणे नवजात बाळाला मथूच्या ओट्यात घातले. बाळ दिसांमासी वाढू लागले. घरभर रांगू बागडू लागले, शेजारच्या मथूकडून पण भरपूर कोड-कौतुक करून घेऊ लागले. दिवस अगदी आनंदात जात होते.

मात्र हा आनंद दैवाला पाहवला नाही आणि अल्पशा आजाराचे निमित्त होऊन रघुनाथराव ह्या दोघींना पोरके करून देवाघरी गेले. लक्ष्मीबाईंवर तर जणू आभाळच कोसळले. एकीकडे पैशाची चणचण व दुसरीकडे हा छोटासा जीव. 'सगळं कसं खंबीरपणे पेलणार?' या विवंचनेत असतानाच जणू देवानीच धाडल्याप्रमाणे बालविधवा आत्याबाई मदतीला धावल्या. दोघींनी मिळून पुन्हा खानावळीचा व्यवसाय घरच्याघरीच चालू करायचा ठरवले. यात्रेकरूंची राहण्या-जेवण्याची सोय करायची आणि प्रपंच चालवायचा. दोघीही कंबर कसून कामाला लागल्या.

आज मामींच्या (लक्ष्मीबाईंच्या) घरी सत्यनारायणाची पूजा होती. गुरुजींची पूजा झाली आणि कथेला सुरुवात झाली. इतका वेळ सारखी इकडे तिकडे करणारी बाया आता मात्र तेथे जवळच येऊन बसली. गुरुजींनी कौतुकाने विचारले, 'तुझे नाव काय बाळ?' 'बाया', 'बाया?' आत्याबाई म्हणाल्या, 'अहो गुरुजी, मुलीचे बारसे केले नाही तर नाव तरी कसे ठेवणार? आम्ही आपले तिला बायाच म्हणतो बरं!' 'असं करा आत्याबाई आजपासून तिला तुम्ही लीलावती या नावानेच हाक मारायला सुरुवात करा. सत्यनारायणाच्या कथेत पण हेच नाव आहे. एवढी छोटीशी असून किती मन लावून कथा ऐकली बघा.'' लक्ष्मीबाईंना (मामी) आणि आत्याबाईंना गुरुजींचा हा विचार अगदी मनापासून पटला आणि ही मुलगी बायाची लीला झाली.

इकडे बाळाच्या बाळलीला दिवसामाजी वाढू लागल्या. गोरीगोमटी, गोजिरवाणी अशी ही लीला मंगेशीत सगळ्यांचीच लाडकी! शेजारपाजारचे लोक, येणारे-जाणारे सर्वच तिच्याशी खेळायला, तिचे लाड, कौतुक करायला उत्सुक असायचे. पण तिला मात्र मंगेशाच्या देवळात जाण्याचे विलक्षण वेड होते. घरातून पटकन कधी देवळात जायची पत्ताच लागायचा नाही. आई, आत्या हाका मारून मारून थकून जायच्या. देवळात दररोज संध्याकाळी आरती, कीर्तन वगैरे असे. आई, आत्या येवोत ना येवोत ही छोटुकली मात्र तिथे हजर असायचीच.

एकदा तीन साधू मंगेशीच्या देवळात आले. त्यांचे तीन दिवस कीर्तन होते. पहिल्या दिवशी कीर्तनाच्या वेळेस छोटी लीला अगदी पहिल्या रांगेतच बसली होती. कीर्तनकारांची पद्धत म्हणजे आरतीच्या वेळेस तीन वेलदोडे आणि अजून काहीतरी प्रसाद ते देवाला अर्पण करायचे. त्याप्रमाणे आरती झाल्यावर त्यांनी लीलाला पुढे बोलावून प्रसादाचा वेलदोडा दिला आणि सांगितले, 'बाळा हा असाच तोंडात घाल हं! सालपण काढू नकोस.' दुसऱ्या दिवशीचे कीर्तन झाले. ते साधू कालच्या मुलीला शोधू लागले. सांगू लागले, 'तिला प्रसाद दिल्याशिवाय कोणालाही प्रसाद नाही देता येणार. कीर्तनाची सांगता होणार नाही. कोठे आहे ती बाळ. आणा बरं बोलावून तिला.' जणू तिच्यात त्यांना सगुणरूप देवीचे, शक्तीचे अस्तित्व जाणवले होते. शेवटी एका शेजाऱ्याने दमून भागून झोपी गेलेल्या लीलेला कडेवर उचलून आणले प्रसाद घ्यायला.

या लहानगीचे पण वैशिष्ट्य असे होते की कोणीही साधू-संत, कीर्तनकार देवळात आले, की ही त्यांना आग्रह करून आपल्या घरी घेऊन येत असे. ते पण तितक्याच कौतुकाने येत असत. आई मात्र त्यावर भारीच चिडायची. घरात साधा चहा द्यायलासुद्धा सामान असेल ह्याची खात्री नसायची. दुधाची तर चणचणच असायची. वेळप्रसंगी अगदी नारळाचे दूध काढून त्यांचा चहा करून द्यायला लागायचा.

आई, आत्याकडे बसायला येणाऱ्या बायकांचा अनुभव असा की, लीला जे सहज बोलून जायची त्याप्रमाणे पुढे तसेच घडत असे. आई कधी कधी वैतागाने म्हणतही असे 'थांबा हं, आधी हिला बाहेर खेळायला पाठवते. मगच काय ते बोला. नाहीतर ही काही बाही नको ते बोलून जायची.'

त्यांच्या शेजारी एक चित्रे नावाचे ज्योतिषी राहायचे. ते मात्र लक्ष्मीबाईंना कायम म्हणत की, 'मामी तिचा रागराग करू नका. मोठेपणी तिच्या दारापुढे गाड्या झुलतील.' त्यावेळेस मात्र आई त्यांना सात्त्विक संतापाने म्हणायची, 'अरे गाड्या झुलतील काय? पहिली जी गाडी असेल नं, त्या गाडीवर नाक आपटून तू जीव दे बरं का. तू हे असलं बोलतोस आणि ती अजून अजून खोडसाळपणा करत राहते.'

असेच दिवस चालले होते, बघता बघता लीला सात वर्षांची झाली. अशीच एकदा ती संध्याकाळच्या आरतीला देवळात गेली होती. आरती संपता संपता अचानक विजेच्या कडकडाटासह पाऊस सुरू झाला. सर्वत्र काळोख भरून राहिला होता. लोकही भराभर निघून गेले. काळोखात छोट्या लीलाकडे कोणाचेही लक्ष गेले नाही. आता मात्र या छोटीला खूप भीती वाटू लागली. देवळाच्या दाराजवळ येऊन तेथूनच आई, आत्याला हाका मारू लागली. पण बहुधा पावसाच्या आवाजात त्या हाका कोणाच्या

कानापर्यंत पोहोचल्याच नसाव्यात. थोड्या वेळाने जीव मुठीत धरून जोरजोराने आई आत्याला हाका मारत, धावत धावत, धडपडत कशीबशी लीला घरी येऊन पोहोचली. आई आत्या वाटच बघत होत्या. हिला काही रडू आवरेना. रडत रडत म्हणू लागली की, 'तुम्ही आला का नाहीत मला न्यायला? मला किती भीती वाटत होती!' त्यावर वैतागाने लक्ष्मीबाई म्हणाल्या, 'बरे झाले. चांगली खोड मोडली. ऊठसूट सारखे मंदिरात जायचे. जा, कपडे बदल, जेवून घे आणि झोप आता.' 'मला नाही जेवायचे.' रुसक्या आवाजात लीलाने उत्तर दिले आणि कपडे बदलून रडत रडतच झोपी गेली.

दुसऱ्या दिवसाची प्रसन्न सकाळ. अवेळी आलेल्या पावसाने वातावरणात एक अनोखा सुगंध दरवळत राहिला होता. लीला अगदी हसत हसतच उठली. धावत धावत जाऊन आईला बिलगली. 'आई ग, एक गंमत सांगू?' 'अगं सकाळी सकाळी कसल्या गंमती सांगतेस, जा बरं तोंड धुऊन ये.' 'अगं, तसं नाही. खरंच गंमत सांगते तुला. काल किनई, माझ्या स्वप्नात नवदुर्गा आली. अगदी आपल्या गाभाऱ्यातून खाली उतरून पुढे आली. मला आपल्या जवळ घेतले आणि सांगू लागली की, 'बाळ आजपासून मी तुझी आई हं. तुझी पूर्ण जबाबदारी माझी. तुला काय हवं-नको ते सगळं मला सांग हं.' बघ आई, तू मला मंदिरात जाण्यावरून सारखी रागावतेस नं. आता किनई मी तुझ्याकडे काही मागणारच नाही जा. देईल माझी नवदुर्गा आई सगळंच मला.'

लक्ष्मीबाई आपल्या लेकीच्या ह्या सहज आविर्भावाकडे चकित होऊन बघतच राहिल्या. किती निरागसपणे सांगतेय, सगळी माया जणू दाटून आली. पुढे आल्या, तिला मिठीत घेतले आणि म्हणाल्या, 'अगदी बरे झाले बरं बाळा. मला आता काही काळजी नको बरं तुझी. आईने जणू माझे गाऱ्हाणेच ऐकले हं. हे बघ, जा हे दोन पैसे घे आणि चाफ्याची फुलं आणून देवीला वेणी घाल हं.' आपल्या छोट्याशा मुठीत दोन पैसे घेऊन लीला बाहेर धावली फुलं आणायला.

फुलं आणून आत्याबाईंकडून छानशी वेणी करून घेतली आणि त्या दोघींना घेऊन माजघरातल्या देवीच्या फोटोजवळ आली. फोटोवर वेणी घातली. आणि प्रार्थना करू लागली. 'नवदुर्गाआई, वेणीचा स्वीकार कर हं.' आणि काय आश्चर्य, लक्ष्मीबाई आणि आत्याच्या कानावर स्पष्ट आवाज आला, ''स्वीकारली गं तुझी वेणी.'' त्यांचा त्यांच्या कानावर विश्वास बसेना. पुढे होऊन बघतात तर काय, त्या वेणीवर चांगले दोनतीन लांबसडक केस अडकलेले दिसत होते. लक्ष्मीबाईंना आता मात्र भावनावेग आवरेना. त्या लीलाला जवळ घेत म्हणाल्या,'वन्सं, आज मात्र आपण पटापटा आवरून, छानसा नैवेद्य करून नवदुर्गेला, मडकईला जाऊनच येऊ या हं.'

लीलाच्या घरी वरच्या मजल्यावर, मामा दळवी म्हणून कृष्णभक्त आजोबा साधना करण्यासाठी म्हणून येऊन राहिले होते. ते वरच्या मजल्यावर राहत असत. दिवसभर जप, जाप्य, वाचन, साधना असं काही ना काही त्यांचं चालू असे. छोट्या लीलाला भारी कुतूहल वाटायचे. कधीकधी त्यांच्या खोलीतून बोलल्यासारखे आवाजही यायचे. त्यांच्या शिवाय तर दुसरे कोणी नसायचे. मग हे बोलतात तरी कोणाशी? ते भविष्यपण बघत असत. त्यामुळे ते विचारायला पण त्यांच्याकडे लोक येत असत. कधी कधी मात्र ते लीलाला सांगायचे की, 'लीला. आता मी साधनेला बसणार आहे. कोणी माझ्याकडे आले तर त्यांना सांग, मामा घरात नाहीयेत हं.' तिला गंमतच वाटायची, की खरं बोल सांगणारे मामा आत्ता मात्र चक्क खोटं बोलायला सांगताहेत. तिला कळायचेच नाही. शेवटी एके दिवशी तिने हट्टच धरला, 'मामा तुम्ही दार लावून काय करता? कोणाशी बोलता? कोणाची भक्ती करता?' 'अगं, अगं, किती प्रश्न विचारशील? मी नं कृष्णाची भक्ती करतो, कृष्णाशी बोलत असतो बरं का लीला.' 'अहो मामा, मग कधी नेमका तुमचा कृष्णच आला आणि मी त्याला खोटंच सांगितलं की तुम्ही घरात नाही तर मग तो माझ्याशीच बोलत बसेल. बघा हं. चालेल तुम्हाला?' जणू भविष्यात घडणाऱ्या घटनांची नांदीच भगवंत लीलाच्या तोंडून वदवत होते.

सकाळपासूनच लीलाच्या डोक्यात काही तरी चक्रे फिरत होती. सारखी वर जाऊन बघून येत होती. पण त्या दिवशी मामांचे दार बंदच होते. शेवटी जेवणाच्या वेळेस मामांनी दार उघडले आणि लक्ष्मीबाईंना आवाज दिला की, 'मी जेवायला येऊ का?' तो आवाज ऐकला मात्र, लीला भराभर जिना चढून वर गेली आणि मामांना म्हणू लागली, 'मामा, आज मात्र मला तुम्ही कृष्ण दाखवाच. मला पण त्याला भेटायचंच आहे. असा कसा हो फक्त तुम्हालाच भेटून जातो? मला पण भेटेल नं?' 'हो बरं बाळ. निश्चित भेटेल. पण त्यासाठी मात्र खूप अभ्यास करावा लागेल, भक्ती करावी लागेल. साधना करावी लागेल.' 'छे! असलं काही नाही, मी किती छोटी आहे. मला माहीत आहे तुम्ही सांगितलं तर तो लगेच मला जरूर भेटेल. मामा सांगा नं त्याला मला भेटायला. गोकुळात कसा तो त्याच्या मित्र-मंडळींबरोबर राहायचा. सांगणार ना तुम्ही त्याला.' लीलाचे लडिवाळ आर्जव चालूच होते. मामा तिची समजूत घालायला म्हणाले, 'बरं लीला तो भेटेल तुला. मला सांगितलं नं की मी तुला सांगेन हं.' 'अं, असं नाही. मामा, मला फसवू नका हं. मी तुमची लाडकी नं, तर मग सांगा नं तुमच्या कृष्णाला मला आजच भेट म्हणून.' लीला काही आपला हट्ट सोडेना. शेवटी मामांनी डोळे

मिटले, दोन मिनिटे कृष्णाचे चिंतन केले आणि सांगितले की, 'ठीक आहे लीला, मी सांगतो तसं उद्या कर. म्हणजे कृष्ण आल्याची तुला खूण पटवून देईन. उद्या ह्या खोलीत पाट मांड. त्यावर रिकामा ग्लास ठेव. तू मात्र खाली उभी राहा. त्याची खूण म्हणून पाटावरच्या ग्लासमध्ये तुला दूध भरलेले मिळेल. पण हे तुझे माझे गुपित. आत्तापासून कोणाला सांगू नकोस हं बाळा.'

लीला अत्यानंदाने उड्या मारत निघून गेली. मामा तिच्याकडे डोळे भरून पाहत कृष्णाला प्रार्थना करत होते, 'कृष्णा ह्या चिमण्या जिवाचा हट्ट पुरव रे बाबा.'

लीला आज अगदी शहाण्यासारखी वागत होती. कोणत्याही खोड्या नाहीत, आरडाओरडा नाही. आई आत्या नवलच करत होत्या. मध्येच ती डोळे मिटून काहीतरी पुटपूटत होती. खुदूकन हसत होती. संध्याकाळ झाली. तिने लवकर लवकर जेवून घेतले आणि आईला सांगितले, 'आई, मी झोपायला जाते गं. मला लवकर उठव हं.' लक्ष्मीबाई पुटपुटल्या, आज सूर्य कुठे उगवला होता काय माहीत? या बाळाला झालंय तरी काय?

दुसऱ्या दिवशी लीला सकाळी लवकरच उठली. पटापट शहाण्यासारखे सगळे आवरून घेतले, आंघोळ केली, छानसा फ्रॉक घातला आणि धावत धावत वर गेली. 'मामा, मामा, मी आलेय बरं का. मला सांगा पाट कोठे मांडू ते.'

मामा गडबडूनच गेले. मनातल्या मनात कृष्णाला म्हणू लागले, 'कृष्णा, दया कर, छोट्या जिवाचा हिरमोड करू नकोस. माझी लाज राख हं.' असं म्हणत म्हणत त्या दोघांनी सर्व तयारी केली. पाट मांडला, रांगोळी घातली, एक ग्लास ठेवला. मामा तिला म्हणाले की, 'तू आता खाली जा आणि वाट बघ हं.' 'असं नाही हं मामा, मला नाही फसवायचं. मी नाही एकटी जाणार तुम्हीपण खाली यायला पाहिजे.' 'बरं बेटा, चल मीही खाली येतो.' असं म्हणून दोघेही खाली अंगणात येऊन बसले. मामा कृष्णाच्या काही गोष्टी लीलाला सांगत होते. एवढ्यात एक छोटं वासरू दुडक्या चालीनं फाटकाच्या आत आलं. सरळ समोरच्या जिन्यावरून वर गेले आणि मिनिटभरातच खाली येऊन बाहेर निघून गेले. मामा स्तिमित झाले. लीलाला म्हणू लागले, 'लीला, पटकन वर जा, बघ काय झाले ते.' लक्ष्मीबाई व आत्यांना हाका मारू लागले. लक्ष्मीबाई स्वयंपाकघरातून हात पुसतच बाहेर आल्या. म्हणू लागल्या, 'काय बाई तरी, मामा अहो झालं तरी काय? असे वाघ मागे लागल्याप्रमाणे ओरडताय का?' 'काय नवल घडले! वहिनी काय सांगू, नवल घडलंय. माझी आणि लीलाची प्रार्थना कृष्णाने ऐकली बघा.' तोपर्यंत आत्याबाई पोहोचल्या. तेवढ्यात वरून धाड धाड जिना उतरून लीला

ओरडतच आली, 'मामा खरंच मला कृष्णाने दुधाचा प्रसाद दिला. ग्लास दुधाने पूर्ण भरला होता. मी पिऊनच आले.'

लक्ष्मीबाई आणि आत्यांना मामांनी सगळी हकिकत सांगितली. लक्ष्मीबाई हात जोडत म्हणाल्या, 'भगवंता, माझा दृष्टांत खरा होणार असं दिसतंय रे बाबा. सांभाळ माझ्या लीलेला.'

त्यानंतर लीलेचा खोडसाळपणा कमी होऊ लागला. ती मामांना अनेक प्रश्न विचारू लागली. 'मला साधना सांगा, मी काय करू, तुम्ही काय करता?' तिच्या प्रश्नांना उत्तरे देता देता मामा शेवटी कृष्णाला प्रार्थना करत, 'भगवंता तूच तिचे शंकानिरसन कर रे बाबा.'

लीला माजघरात कितीतरी वेळ शांत बसू लागली. कधी डोळे मिटून बसायची. कधी खोल विचारात गढलेली दिसायची, तर कधी स्वत:शीच खुदकन हसत असायची. आई, आत्याला एकीकडे तिचा वांडपणा कमी झाल्याने बरे वाटत होते, पण हे वागणे बघून काळजी पण वाटायची. मामा मात्र त्या दोघींनाही सांगत होते, 'तुम्ही काळजी करू नका. भगवंत तिची काळजी घेत आहेत. ते सर्व योग्य त्या गोष्टी घडवतीलच ह्यावर विश्वास ठेवा.'

आज लक्ष्मीबाई रोजच्याप्रमाणे लीलाला उठवायला खोलीत आल्या. बघतात तर काय सगळं आवरून ही आपली माजघरात खिडकीसमोरचा भाग शेणाने सारवते आहे. 'अगं बाया काय चाललंय सकाळीसकाळी?' नुसतीच मान हलवत लीलाने खूण केली, गप्प राहा म्हणून. लक्ष्मीबाई म्हणाल्या, 'काय करावं बाई, भारीच छंदिष्ट होत चाललीय.' तिने जमीन छान सारवून घेतली. छोटीशी रांगोळी घालून त्यावर पाट ठेवला आणि हात जोडून वाट बघत बसली. पाचदहा मिनिटे गेली. खिडकीतून एक तेजाचा गोळा आत येताना दिसला. न राहवून लीला तो हातात घेण्यासाठी पुढे झेपावली इतक्यात घनगंभीर आवाज आला, ''स्पर्श करू नकोस, सहन होणार नाही.'' लीलाने झट्दिशी हात मागे घेतले आणि अनिमिष नेत्रांनी त्याकडे बघत राहिली. एक क्षणभर तो गोळा पाटावर टेकला आणि परत खिडकीच्या दिशेने जाऊ लागला. थोड्या वेळाने खिडकीबाहेर जाऊन अदृश्य झाला. त्या पाटावर मात्र बासरी वाजवणाऱ्या कृष्णाच्या पाऊलखुणा उमटल्या. एक पाऊल पूर्ण व दुसऱ्या पायाच्या चवड्याचे चिन्ह उमटलेले दिसले. लीलाने सगळ्यांना भराभर हाक मारून बोलावून घेतले, 'आई, आत्या, मामा, बघा तरी. कृष्ण येऊन गेला बरं का. त्याने त्याचा शब्द खरा केला.'

***

ॐ

मंगेशाच्या देवळात एक दिवस एक कीर्तनकार आले होते. त्यांनी सांगितले, 'जीवनात शिक्षणाला फारच महत्त्व आहे. तुम्ही जर शिक्षणाची कास धरलीत तर जीवनामधली सगळी ध्येयं गाठू शकता.' लीला हे ऐकायला तेथे हजर होती. तिला त्यांचे बोलणे मनापासून पटले. तिने मनाशी निश्चय केला. कसंही करून आपण सातवी पास व्हायचे आणि पुढेही खूप शिकायचे. पण हे सांगणार तरी कोणाला? लक्ष्मीबाई आणि आत्या आधीच परिस्थितीमुळे वैतागलेल्या. मग अजून कोणाला सांगणार? शेवटी लीलाने विचार केला आणि सरळ स्वत:च हेडसरांना भेटायला गेली आणि सांगू लागली की, 'सर मला सातवीच्या परीक्षेस बसायचे आहे.' सरांना लीलाच्या घरची परिस्थिती, त्यात तिचा खोडकरपणा हे सगळेच माहीत असल्याने ते म्हणाले, 'हे बघ लीला सातवीची परीक्षा सोपी नाही. तुझे आत्तापर्यंतचे मार्क्स पण फार उत्तम नाहीत. तुला जर परीक्षेला बसायचे असेल तर मी एक गणित देतो ते बरोबर सोडवलेस तरच तू फॉर्म भर.' त्यांनी गणित दिले. लीलाने सोडवायचा प्रयत्न केला पण ते तिला काही जमले नाही. सरांनी सुटकेचा नि:श्वास टाकला. पण लीला काय अशी हार मानणारी होती? ती अनेक तऱ्हेने सरांना पटवून द्यायला लागली की, सातवीची परीक्षा पास होणे हे तिच्या दृष्टीने किती महत्त्वाचे आहे आणि त्यासाठी ती निश्चित अभ्यास करेल. मात्र सर काही ऐकेनात. शेवटी ती कृष्णाला शरण जाऊन म्हणाली, 'कृष्णा, तूच बुद्धिदाता आहेस नं. सरांना हो म्हणायची बुद्धी दे नं.' असं म्हणून ती पुन्हा सरांकडे गेली. होना करता करता शेवटी एकदाची सरांनी परवानगी दिली. 'अभ्यास करून पास व्हायची जबाबदारी तुझी हं,' असं बजावायला मात्र ते विसरले नाहीत.

घरी येऊन ती आई, आत्याला आनंदाने सांगू लागली, 'सरांनी परवानगी दिली बरं का. आता मी परीक्षा देणार.' आई म्हणाली, 'एवढी आत्ता नाचतेयस, खरंचच चांगला अभ्यास कर आणि पास होऊन दाखव. उगाच पैसा आणि वेळ वाया घालवू नकोस.'

लीला झटून अभ्यासाला लागली. परीक्षा झाली. सुटी लागली. नेहमीसारखे अनेक यात्रेकरू मंगेशीला यायला लागले. दरवर्षीप्रमाणे बेळगावचे सराफ हेरेकरसुद्धा

त्यांच्या कुटुंबियांबरोबर आले होते. ते जेवणासाठी लक्ष्मीबाईंकडेच येत असत. त्यांच्या मुलांबरोबर लीला खूप खेळत असे. या हेरेकरांच्या सुना काय करायच्या, समुद्रस्नानाला जाताना लीलाला बरोबर घेऊन जायच्या. आपल्या अंगाखांद्यावरचे सर्व दागिने त्या लीलाच्या अंगावर घालून तिला काठावर बसवायच्या. जणू परमेश्वर लीलाची दागिन्यांची हौस भागवून घेत होता. ह्यापैकी एका सुनेला छोटा मुलगा होता. त्याला तर बायाचा (लीलाचा) फारच लळा लागला. त्याला सारखी बाया जवळ लागायची. असं होता होता सुटी संपत आली आणि परीक्षेच्या निकालाचा दिवस जवळ येऊन ठेपला.

पहाटे पहाटे लीलाला एक स्वप्न पडले. मंगेशीच्या पायऱ्यावर एक साधू उभा होता. त्याने तिला जवळ बोलावले व हातावर तीर्थ दिले आणि विचारलं, ‘कसं लागलं?’ लीला म्हणाली, ‘तीर्थासारखे.’ पुन्हा घे म्हणाला. पुन्हा विचारले, ‘कसं लागलं?’ ‘अगदी साखरेसारखे गोड लागले.’ लीला बोलली. त्यावर हसून त्यांनी लीलाला सांगितले, ‘बाळ, तुझा रिझल्टपण असाच गोड लागेल हं.’ आणि ते तेथून निघून गेले.

पुढे दोनतीन दिवसांनी जेव्हा रिझल्ट लागला तेव्हां सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. लीला सर्व मुलात दुसरी आली होती.

लीला अगदी खूश झाली आणि आता आईच्या आणि आत्याच्या मागे लागली की मला पुढे शिकायचे आहे. मला मुंबईला पाठवा. त्या दोघीही हैराण झाल्या. मुंबई इतकी लांब, तेथे ना कोणी ओळखीचे ना पाळखीचे. एकट्या मुलीला कसे पाठवणार अचानक? एके दिवशी बेळगावचे हेरेकर दर्शनाला आले. त्यांना बायाचा रिझल्ट कळला आणि आता तिला शिक्षणासाठी मुंबईला जायचे आहे हे पण कळले. ते लक्ष्मीबाईंना म्हणू लागले, ‘मामी खरं सांगू का, आमचा छोट्यापण बायाची खूप आठवण काढत असतो. तिला शिकायचं आहे नं, तर मुंबईपेक्षा सरळ आमच्याकडे पाठवा. बेळगावला ती आमच्याकडेच राहील आणि पुढचे शिक्षण पण होईल. बाकी खर्चाची वगैरे तुम्ही काहीच काळजी करू नका. आमच्या मुलांप्रमाणेच लीलाचे पण सगळे होऊन जाईल.’ लक्ष्मीबाईंना वाटलं हेरेकरांच्या तोंडून देवच बोलला. लीलाच्या मनाची ओढ मात्र मुंबईला होती. शेवटी पाकळी लावून विचारले. उत्तर आले बेळगावला हेरेकरांकडे जायचे.

मंगेशीसारख्या एका खेड्याबाहेर कधीच न गेलेल्या लीलाच्या आयुष्याने एक नवे वळण घेतले.

हेरेकर कुटुंबियांनी लीलाला खरोखरच अगदी आपल्या घरातीलच एक असावी अशी वागणूक दिली. त्यांचा सराफीचा व्यवसाय होता. ते दुकानातून परत येताना

काही जोखमीचा माल, रोख रक्कम याचे एक गाठोडेच करून घरी आणीत. त्यांचा लीलावर इतका विश्वास होता की, ते गाठोडे लीलाच्याच हाती देत असत. मग ते ती आत कपाटात नेऊन ठेवत असे. बेळगावला लीलाचे मुख्य काम म्हणजे शाळेत जाणे आणि त्या लहानशा मुलाबरोबर खेळणे हेच असे. हेरेकर कुटूंबीय, शाळेतले गुरुजन ह्यांच्या मदतीने लीलेचे अकरावीपर्यंतचे शिक्षण पार पडले. लीला शाळेत अभ्यासात, गाण्यात, वक्तृत्वात सतत पुढे असे.

उत्तम मार्कांनी अकरावी पास झाल्यावर शिक्षणाची आवड असल्याने लीलाला कॉलेजमध्ये जायची स्वप्ने पडू लागली. हेरेकरांच्या मोठ्या मुलाने तिला सांगितले, 'लीला, तुला मी कॉलेजमध्ये ग्रंथपालाची नोकरी मिळवून देतो. म्हणजे तुला तीस रुपये पगार मिळेल, नादारी पण मिळेल आणि तुझे शिक्षण तू पूर्ण करू शकशील.' असं बोलणं चाललेलं असताना त्यांचा धाकटा भाऊ तेथे आला. तोही चर्चेत सहभागी होऊन बोलला, 'मग लीला, काय ठरले?' थोडा विचार करून पुढे म्हणाला, 'अरे अण्णा, कितीतरी पदवीधर लोक नोकरीविना आहेत. मला तर वाटतं, लीलाने ट्रेनिंग कॉलेजमध्ये नाव घालावे व वर्षभराचा कोर्स पूर्ण करून शिक्षिकेची नोकरी करून आई व आत्याची जबाबदारी घ्यावी. म्हणजे त्यांचेही कष्ट लवकर संपतील.' लीलाला तो विचार पटला. जणू कृष्णानेच तिला कर्तव्याची जाणीव करून दिली. तिने ट्रेनिंग कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. प्रसिद्ध कवयित्री इंदिराबाई संत या त्यावेळी मुख्याध्यापिका होत्या. त्यांचा पण लीलावर अत्यंत लोभ होता. हे शिक्षण पूर्ण करण्यात हेरेकरांबरोबरच संतबाईंचा देखील मोठा वाटा होता.

ट्रेनिंग कॉलेजात नाव घातल्यावर आत्याबाईंनी बेळगावात लीलासोबत राहावे व तेथे बिऱ्हाड करावे असे सर्वानुमते ठरले. त्याप्रमाणे आत्याबाई बेळगावात आल्या. हेरेकरांचे एक नातेवाईक गिंडेबाबा ह्यांचे कॉलेजजवळच वडगावात घर होते. हेरेकरांच्या सांगण्यावरून त्यांनी आपल्या घरातील दोन खोल्या ह्या दोघींना वापरायला दिल्या. बेळगावला आल्यापासून लीलाचे मंगेशाचे, नवदुर्गा आणि कृष्णाचे सतत चिंतन चालू होते. त्यालाच आपण फार तर ध्यान म्हणू. तिला मंगेशीचे देऊळ, ते वातावरण, दैवी सुगंध असे सर्व काही सतत आठवत असे. त्यातच आई, आत्यांकडून ऐकलेला तिच्या जन्माच्या आधीचा दृष्टांत आणि त्यानंतर घडत गेलेल्या एकेक गोष्टी आठवून तिला आश्चर्य वाटायचे. जाणीव व्हायची की तिच्या आयुष्यात घडत असलेल्या गोष्टी म्हणजे तिचा पित्यासमान मंगेश व आई नवदुर्गा यांनी केलेली मदतच आहे. जणू ती मदत

देऊन ते तिच्या आयुष्याला आकार देत होते. तिला घडवत होते. तिला वाटत होते की तिचे काम म्हणजे त्यांनी सांगितलेल्या, दाखवलेल्या मार्गावरून सचोटीने चालत राहणे.

बेळगावात एक साने म्हणून पुस्तकाचे दुकानदार होते. अचानक एके दिवशी ते लीलाच्या बिऱ्हाडी आले आणि म्हणू लागले, 'अहो, मी ही गीतेची पुस्तके आणली आहेत. कालपासून असं सारखं वाटत होते की तुमच्याकडे ही आणून द्यावी आणि तुम्ही ती लोकांना वाटावीत.' लीलाला नवलच वाटले, ओळखीचे ना पाळखीचे हे गृहस्थ त्यांना असं का वाटावं? तिने आत्याकडे बघितले. आत्या म्हणाल्या की, 'सानेकाका, ठीक आहे. ठेवा ती पुस्तके. बघू काय करायचे ते. ही कोणाला नेऊन देणार ती?' 'अहो, ते मला पण माहीत नाही,' सान्यांनी प्रामाणिकपणे सांगितले.

लीलाला पण मनापासून वाटायला लागले की खरंच शेजारपाजारच्या गावात जाऊन आपण गीतेचा प्रसार आणि प्रचार करावा ही कृष्णाचीच इच्छा दिसते आहे. नाहीतर माझ्यासारख्या नादारीवर शिक्षण घेणाऱ्या मुलीकडे गीतेची पुस्तके घ्यायला पैसे तरी कोठून येणार? नेमकी तीच अडचण सान्यांना प्रेरणा देऊन त्याने (कृष्णाने) दूर केलेली दिसते आहे, असा विचार करून लीलाने आसपासच्या भागात जाऊन गीता-वाटपाचे काम सुरू केले. जणू कृष्णकार्याचा श्रीगणेशाच झाला होता.

२७ नोव्हेंबर १९५१. आज सकाळपासूनच लीलाला काहीशी हुरहुर लागली होती. काहीतरी वेगळेपण जाणवत होते. कधी अतिशय भावविभोर व्हायला होत होते, तर मध्येच काही करू नये, शांत एका जागी बसून कृष्णाचे सतत चिंतन करावे असे वाटत होते. न राहवून शेवटी ती देवाजवळ गेली, दिवा लावला, नमस्कार केला आणि डोळे मिटून शांतपणे बसली. तिला आतून जाणवायला लागले की परमात्मा तिच्याशी काही संवाद साधू बघतो आहे. प्रथम तिला तो मंगेशाच्या रूपात दिसला. मग हळूहळू तो कृष्णाच्या रूपात दिसला. मग म्हणाला, 'ताई इकडे ये. मला तुला काही दाखवायचे आहे.' असे म्हणून त्याने लीलाला खोल खोल अशा एका गुहेत नेले आणि सांगितले की, ''हे पाहा, हे माझे खरे रूप. हात लावून बघ.'' आणि तिने हात लावून बघितले तर काय तेथे 'ॐकार' होता. आणि 'ॐकार' दिसल्याबरोबर लीला त्याला मंगेशाच्या रूपात बघत असल्याने अगदी भारावून गेली. तिने त्याला नमस्कार केला. त्यावर कृष्ण बोलू लागला, ''ताई, तुझा नमस्कार मी स्वीकारला. मला तुझ्यामार्फत कार्य करायचे आहे. मला तू वचन दे, की मी सांगेन त्याप्रमाणे तंतोतंत वागेन.'' त्याप्रमाणे लीलाने त्याला वचन दिले. कृष्ण म्हणाला, ''ताई, आज मी तुला ताई म्हटले त्यामुळे माझे सर्व

भक्त तुला ताई म्हणूनच ओळखतील. तुला सर्व जगभर फिरून कार्य करायचे आहे आणि त्याची सुरुवात १९९० साली तुला अमेरिकेत नेऊन मी करणार आहे.''

हळूहळू लीला भानावर आली. डोळ्याला अखंड अश्रूंच्या धारा लागल्या आहेत. गोरापान चेहरा एका अलौकिक अशा तेजाने उजळून जणू सुवर्णकांतीचा झाला आहे. असंच देवासमोर बसून त्याच्या अस्तित्वाचा आनंद घेत राहावा अशी भावना होते आहे. इतक्यात आत्याचा आवाज कानावर आला, 'लीला अगं आज किती वेळ पूजा चाललीय? कॉलेजात जायचे नाही का?' गडबडीने उठत, डोळे पुसत लीला म्हणाली, 'अगोबाई, खरंच गं आत्या, मला उशीरच झालाय. पटकन आवरते आणि निघतेच मी.' त्या भावसमाधीतून बाहेरच येऊ नये, कोणाशी बोलू नये, आपलं आपल्यातच मस्त राहून आनंद लुटावा असं वाटत होतं. तिला आनंद कसा व्यक्त करावा हेच समजत नव्हते. ती आपली गुपचूप उठली आणि आवरायला लागली. आत्या तिच्याकडे बघतच राहिली. आजची लीला काही वेगळीच आहे. चेहरा काय तेजस्वी आणि आनंदी दिसतो आहे. आमचीच का ही लीला? बघावे ते एकेक नवलच. ते साने काय येतात, गीतेची पुस्तके काय देतात, हिची ही अवस्था काय होते, वहिनी जे म्हणत असते ईश्वराचा वरदहस्त ह्या मुलीवर आहे, ते खरेच म्हणायचे.

आज आषाढी एकादशी. आत्याचा, लीलाचा उपवास. आत्या बघायला गेली, तर डब्यात सगळा खडखडाट. काहीच सामान नाही. पैसे बघायला गेली तर ते पण पुरेसे नाहीत. आत्याने लीलाला विचारले, 'लीला, मला वाटतं आज आपण निर्जळी एकादशी करावी अशी श्रीकृष्णाची इच्छा दिसतेय.' 'बघू गं आत्या, त्याची इच्छा असेल ते घडेल,' असे म्हणत लीलाने गीतापारायणाला सुरुवात केली. पारायण करत असताना अचानक पुस्तकावर तिला एक हात दिसायला लागला आणि आवाज आला ''गीतेत दोन रुपये ठेवलेत ते घे'' ती इकडेतिकडे बघायला लागली. आपण ऐकले ते खरेच आहे का? बघू या तरी, असे वाटून तिने गीतेची पाने उलटायला सुरुवात केली आणि काय आश्चर्य, खरोखरच तेथे एक दोन रुपयाची नोट होती. तो काळ असा होता की दोन रुपयांना पण चांगलीच किंमत होती. तिने मोठ्याने आवाज दिला, 'आत्या, हे घे दोन रुपये.' आत्या आत येत म्हणू लागली, 'अगं ठेवले तरी कुठे होतेस, मला तर नाही दिसले ते.' 'अगं माझ्याकडे नव्हतेच, पण मला ताई म्हणणाऱ्या माझ्या भावाने दिलेत बरं का. आता तुला काय काय फराळाचे जिन्नस आणायचेत ते आण; आणि आत्या, माझ्या कृष्णाला नेवैद्याला मात्र काहीतरी छानसे गोड आण बरं का.' आत्या

प्रश्नांकित चेहरा करून, 'काय बाई ह्या पोरीचे सांगणे. काय बोलत असते, तिचे तिला तरी समजते का नाही कोण जाणे?' असे म्हणत म्हणत हातात पिशवी घेऊन सामान आणायला गेल्या आणि लीला परत गीतावाचनात मग्न झाली.

ते दिवस गोवामुक्ती संग्रामाचे होते. ना गोव्यातून भारतात काही गोष्टी पाठवता येत होत्या ना गोव्यातल्या लोकांना भारतातून मदत करता येत होती. लक्ष्मीबाई एकट्या मंगेशीला आणि आत्या व लीला वडगावला, अशा राहत होत्या. लीलाला आईची अतिशय काळजी वाटू लागली. आईला कोण मदत करत असेल? आता तर यात्रेकरू पण येत नसतील. त्यामुळे आईला पैसे कसे मिळणार. घराचे असे काय उत्पन्न. खायला--प्यायला तरी पुरेसे आहे का? जाऊन यावे तर जाण्यावर बंदी. काही वस्तू, पैसे पाठवण्यावर बंदी. लीलाला काही सुचेनासे झाले. आत्या पण अत्यंत काळजीत पडली. आत्या म्हणाली, 'लीला अगं तू तरी कृष्णाकडे प्रार्थना कर गं.' आता हळूहळू आत्याची पण खात्री पटू लागली होती की लीलाने प्रार्थना केली तर त्याला फळ लगेचच येते.

लीलाने पण कृष्णाला साकडे घातले,'कृष्णा, अरे तुझ्याशिवाय आमचे कोण आहे? माय-बाप, भाऊ, सखा सर्व काही तूच आहेस. आईच्या मदतीला धाव नं!' कृष्णाचे उत्तर आले, ''काही काळजी करू नकोस, आईची सर्व जबाबदारी माझी. पण माझी एक अट आहे, तुझ्याकडे येणारा प्रत्येक माणूस दोन घास खाऊन, पाणी पिऊनच गेला पाहिजे; त्याशिवाय जाता कामा नये. तसे वचन देत असशील तर आईची सर्व जबाबदारी माझी.'' लीलाला नाही म्हणणे शक्य होते का? कारण कृष्णाला दिलेल्या वचनाप्रमाणे त्याच्या शब्दाबाहेर  जायचे नाही असा तिचा पक्का निश्चयच झाला होता ना.

तिकडे गोव्यात, ज्या लोकांचे नातेवाईक भारतात आहेत आणि ज्यांना आता भारतातून काहीही मदत मिळू शकणार नाही, अशा लोकांच्या याद्या तयार करून त्यांना कवळे मठाधिपतीतर्फे महिना रोख रकमेच्या स्वरूपात मदत मिळणार असे घोषित झाले. माणशी दहा रुपये अशी मदत ठरली. त्याप्रमाणे एक तारखेला लक्ष्मीबाईंना वीस रुपये मिळाले. लोकांना आश्चर्य वाटले. लक्ष्मीबाई तर एकट्याच. त्यांना का वीस रुपये? काहींनी मठात तक्रारीपण केल्या, पण त्या स्वामींनी सांगितले, एकदा त्या आदेशावर सह्या झाल्या आहेत. आता त्यात बदल होणार नाही. वर्षभर हे असेच मिळणार. कृष्णाच्या इच्छेपुढे कोण काय करू शकणार? त्या वीस रुपयामध्ये लक्ष्मीबाईंचा महिन्याभराचा पूर्ण खर्च भागत होता.

ज्यांच्या घरात आत्याबाई आणि लीला बेळगावमध्ये राहत असत ते गिंडेबाबा नेहमी लीलाची चेष्टा करायचे. ते दरवर्षी वारीला जात आणि सतत ज्ञानेश्वरी वाचत. ते एकेदिवशी अगदी गंभीर चेहरा करून बसले होते. वारीची वेळ तर जवळ आली होती, पण अजून पैशाची सोय काही झाली नव्हती. कसं जायचं वारीला ह्या चिंतेत होते. हे बघून लीला म्हणाली, 'काय झालं बाबा? काळजी का करताय?' 'अगं लीला, मला तर वारीला जायचंय आणि पैशाची काही सोय होत नाहीये. काय गं, तू कृष्णाला सांगशील का? करेल का तुझा कृष्ण माझं एवढं काम?'

'बाबा, असं काय करता, तुम्ही तर ज्ञानेश्वरी वाचणारे, वारीला जाणारे. तुम्हाला तर माहीतच आहे की मनापासून प्रार्थना केली, त्याच्यावर विश्वास ठेवला तर तो निश्चितच आपल्या पाठीशी उभा राहतो.'

'अगं, मग सांग न त्यालाच माझ्यातर्फे, की सोय कर म्हणून.' लीला म्हणाली, 'हरकत नाही बाबा. आपण प्रार्थना करू.'

बाबांनी नेहमीप्रमाणे रात्री ज्ञानेश्वरी वाचली, पेटीत ठेवली, कुलूप घातले व निजायला गेले. इकडे कृष्णाने पहाटे लीलाला उठवले आणि सांगू लागला, ''जा, त्याला सांग तुझ्या ज्ञानेश्वरीत पैसे ठेवले आहेत. ते घे आणि वारीला जा.''

सकाळी उठल्या उठल्या लीला धावत धावत बाबांकडे गेली आणि सांगू लागली, 'बाबा तुमची सोय कृष्णाने केली. तुमच्या ज्ञानेश्वरीतले पैसे घ्या आणि वारीला जा.'

ते आश्चर्याने बघतच राहिले. घाईघाईने किल्ली आणून पेटीतील ज्ञानेश्वरी काढली आणि बघतात तर काय खरंचंच त्यात आवश्यक तेवढे पैसे ठेवलेले होते. त्यांना भावनावेग आवरेना. रडत रडतच ते म्हणू लागले, 'अगं लीला, खरंचच तुझ्या कृष्णाने पैसे दिले गं. आमचे भाग्य आहे, तू आमच्या इथे राहायला आलीस.'

पुढे ते वारी करून आले. त्यानंतर त्यांच्या चिंचेच्या झाडाचा सौदा मनासारखा झाला आणि त्यांच्याकडे पैसे आले. ते पैसे घेऊन ते लीलाकडे गेले आणि तिला सांगू लागले, 'लीला, हे घे पैसे.' 'बाबा मला कशासाठी देता? तुम्हाला कृष्णाने दिले होते, ते त्याचे त्यालाच परत द्या नं.' 'असं म्हणतेस', असं म्हणून बाबांनी त्या रात्री ते पैसे ज्ञानेश्वरीवर ठेवून पेटीला कुलूप घातले. प्रार्थना केली. दुसरे दिवशी उठून पाहतात तो किल्ली त्यांच्या कनवटीला, कुलूप उघडले तर पैसे गायब. जसे आले होते तसे गेले. कृष्णाचीच किमया.

पुढे काही दिवसांनी लीलाचा ट्रेनिंग कॉलेजच्या परीक्षेचा निकाल उत्तम लागला आणि कृष्णाने तिला सांगितले की, ''तुला खानापूरला नोकरी देतो.'' कृष्णाच्या सांगण्याप्रमाणे खरोखरच खानापूरच्या सरकारी शाळेत लीलाला नोकरी लागली. तारीख होती २५ ऑगस्ट १९५६. लीला आता मिळवती झाली. आई आत्याची जबाबदारी पेलायला समर्थ झाली. जणू कृष्णकृपेचे एक नवे पर्व सुरू झाले.

खानापूरच्या शाळेत काम सुरू करून तीनचार दिवसच झाले होते. शाळेत वार्षिक इन्स्पेक्शन सुरू झाले. त्याचे मुख्य होते चाटेसाहेब. ते लीलाताईंच्या वर्गावर आले आणि मुलांना गणिताचे, शास्त्राचे असे एक एक प्रश्न विचारू लागले. मुलांना काही उत्तरे देता आली नाहीत. त्यांचा पारा एकदम चढला. ते रागावून ओरडायला लागले, की काय करता काय तुम्ही? काहीच कसे येत नाही मुलांना? लीलाताई परत परत सांगत होत्या, 'सर मी तीनचार दिवसांपूर्वीच आले आहे. आता हळूहळू सगळी तयारी करून घेईन.' पण त्यांचा पारा काही केल्या खाली येईच ना. ते आपले ओरडतच राहीले.

अचानक लीलाताई कृष्णभावात जाऊन त्यांना बोलू लागल्या, ''अरे नुसता ओला पंचा लावून देवपूजा केलीस म्हणजे काय पूजा झाली? माणसात देव बघायला शीक. ही एवढी परत परत सांगतेय, तिचे काहीच ऐकून न घेता नुसता आरडाओरडा काय करतोयस?'' मुख्याध्यापिका वागळेबाई आवाज ऐकून धावतच आल्या. म्हणाल्या, 'अहो बाई, काय झालं? चाटेसाहेबांना असं काय बोलताय?' तेवढ्यात स्वत: चाटेसाहेबांनी त्यांना थांबवले व म्हणाले, 'बोलू द्या त्यांना.' असे म्हणून ते शांत उभे राहिले. लीलाताईं पण त्यांचे सर्व बोलणे पूर्ण करून तडक बाहेर चालत्या झाल्या. तोपर्यंत खरंतर शाळेत लीलाताईंच्याबद्दल कोणालाच काही कल्पना नव्हती. चाटेसाहेब मात्र विचारात पडले. त्यांनी बाईंना निरोप पाठवला, की मी संध्याकाळी तुमच्याकडे भेटायला येतो. ते पण देव मानणारे होते. लीलाताईंचे बोलणे त्यांच्या मनाला भिडले आणि त्यांना जाणवले हे काहीतरी वेगळे, अलौकिक आहे.

संध्याकाळी ते लीलाताईंकडे पोहोचले. इतर बोलणे झाल्यावर कृष्णाने त्यांना अचानक सांगितले, ''अरे, तुला मुलगा निश्चित होईल. हेच तुला विचारायचे होते ना?'' ते चकित होऊन नमस्कारासाठी खाली वाकले. हळूहळू एकेका प्रसंगातून लीलाताईंचे कृष्णकार्य, त्यांचा कृष्णभाव हा लोकांना जाणवू लागला. न कळत शेणवीबाईंच्या ताई झाल्या. प्रत्येकाला असे वाटू लागले की शेणवीबाईंच्या कानावर

एखादी गोष्ट घातली, त्यांनी आपल्यासाठी प्रार्थना केली की त्या सांगतील तशा गोष्टी घडतात. कधी कधी त्या असंही सांगत की काम अवघड आहे. त्याचाही प्रत्यय प्रत्यक्षात ते काम होताना अनेक अडचणी उभ्या राहून येऊ लागला. लोकांना 'त्या' उत्तराची प्रचिती येऊ लागली. त्यामुळे श्रीकृष्णाच्या अस्तित्वावर लोकांचा विश्वास बसू लागला. जसजसा विश्वास दृढ होऊ लागला, श्रीकृष्णावरची श्रद्धा वाढू लागली, तसतशी लोकांची खात्री पटू लागली की शेणवीबाईंच्या मार्फत मिळणारी उत्तरे ही श्रीकृष्णाचीच असतात आणि त्याप्रमाणेच सर्व काही घडते. ह्या जाणिवेतून लोकांची ओढ वाढू लागली. कित्येक लोक प्रश्न विचारायला, दर्शनाला शेणवीबाईंच्या घरी येऊ लागले.

गीतेचा प्रसार आणि लोकांना कृष्ण सांगेल तसे मार्गदर्शन करणे असे लीलाताईंचे कृष्णकार्य आता सुरू झाले होते. एकदा कृष्णाने त्यांना सांगितले, ''माझा एक भक्त मोठ्या अक्षरातली गीता शोधतोय, ती त्याला नेऊन दे.'' 'बरं कृष्णा. काय भक्ताचे नाव.' ''नाव नाही सांगत. अनगोळला जा. ते गृहस्थ वयस्क आहेत.'' आता फक्त वयस्क गृहस्थ ह्या वर्णनावरून कसं त्यांना शोधणार? पण लीलाताईंनी कृष्णाचे नाव घेतले. अनगोळला पोहोचल्या. तेथे एका दुकानात चौकशी केली. दुकानदार म्हणू लागला की, 'अहो नुसते वयस्क गृहस्थ आणि देवभक्त, असं कसं सांगणार. कितीतरी देवदेव करणारी म्हातारी माणसे आहेत.' तेवढ्यात कृष्ण म्हणाला, ''ताई, पोस्टात जा.'' 'बरं.' असे म्हणून त्या पोस्टात गेल्या तेव्हा तेथे कळले की अशी माणसे बरीच आहेत. 'पण, आमचे पोस्टमास्तर आहेत त्यांच्याकडे तुम्ही जा.' त्याप्रमाणे ताई करंदीकर- आजोबा नावाचे निवृत्त पोस्टमास्तर होते त्यांच्याकडे गेल्या व विचारू लागल्या 'आजोबा, तुम्हाला मोठ्या अक्षरातील गीता पाहिजे आहे का?' त्यांना कळेना, ते म्हणाले, 'कोण तुम्ही? कोठून आलात? तुम्हाला कसे कळले?' 'मला कृष्णाने पाठविले आहे. ही गीता द्यायला मी आलेय,' असं म्हणत ताईंनी ती गीतेची प्रत त्यांना दिली. ती उघडून पाहताक्षणी ते मोठ्याने म्हणाले, 'कृष्णा, धन्य आहेस रे. गेले सहा महिने ह्या पुस्तकाच्या शोधात होतो. किती रे तू भक्तवत्सल आहेस!' तेव्हापासून करंदीकरआजोबा लीलाताईंकडे जाऊ लागले, सल्ला घेऊ लागले. पुढे काही दिवसांनी कृष्ण म्हणाला, ''आपल्याला अनगोळला जायला पाहिजे. तो माझी वाट बघतोय.'' कृष्णआदेशाप्रमाणे त्या करंदीकर आजोबांकडे पोहोचल्या. पाहतात तर ते अतिशय आजारी होते. डॉक्टरांचे म्हणणे होते त्यांना दवाखान्यात हलवा. कृष्णाने त्यांना सांगितले,

''दवाखान्यात जायची गरज नाही. दोनतीन दिवसांत तू माझ्याकडे येणार. त्याआधी तुला तुझी काही कामं करायची तर करून घे.'' त्याप्रमाणे त्यांनी त्यांचे मृत्युपत्र करून घेतले व दोनचार दिवसातच त्यांना देवाज्ञा झाली. हे करंदीकरआजोबा (ताईंना) लीलाला मीराबाई म्हणायचे. त्यांनी 'गोपीज लव्ह फॅार श्रीकृष्ण' हे पुस्तक मुद्दाम लीलाताईंना त्यांच्या कृष्णभक्तीसाठी म्हणून भेट दिले होते.

लीलाताईंची बदली खानापूरहून चिकोडी या गावी झाली. त्या तेथे पोहोचण्याच्या आधीच त्यांचे कृष्णकार्य, गीताप्रसार वगैरे हकिकती तिथे पोहोचल्या होत्या. त्यामुळे थोड्याच दिवसांत त्या शेणवीबाईंच्या ताई कधी झाल्या, हे त्या लोकांना किंवा लीलाताईंना कोणालाच कळले नाही. ताई ज्याप्रमाणे शाळेत मुलांच्या, सहकाऱ्यांच्या आवडत्या शिक्षिका होत्या त्याचप्रमाणे गावातल्या लोकांच्या अडचणीत त्यांच्या मागे उभे राहणाऱ्या ताईपण होत्या. कृष्णाकडून मार्गदर्शन घ्यायला लोक येत असत. संध्याकाळी नित्यनेमाने आरती पण होत असे. लोकांच्या अडचणी, त्यांना वेळोवेळी कृष्णाने केलेले मार्गदर्शन ह्या सगळ्यातून कृष्ण जणू ताईंना घडवत होता. त्याला जे अपेक्षित कार्य करवून घ्यायचे होते त्यासाठी कृष्णाने एखादी गोष्ट करायला सांगितली असता, 'व्यावहारिक दृष्ट्या ती गोष्ट करणे कठीण आहे,' असे ताईने सांगितल्यावर कृष्ण ताबडतोब आठवण करून द्यायचा, ''ताई, तू मला वचन दिले आहेस नं, की मी तुझा शब्द तंतोतंत पाळेन म्हणून. मग आता ही शंका का?'' त्यावर ताईही तत्परतेने उत्तर देत, 'नाही रे राजा, चुकलंच माझं. तू सांगशील तेच करणार हं मी.'

***

ॐ

लीलाताईंची खरं तर लग्न करायची इच्छाच नव्हती. आयुष्यभर असंच झोकून देत कृष्णकार्य करत राहावं असंच त्यांना वाटत असे. पण जनरीतीप्रमाणे आपल्या बायाने लग्न करून, संसार करावा असं आईला आणि आत्याला मात्र मनापासून वाटत असे. एकदा ताई ध्यानात बसल्या असताना कृष्णाने त्यांना सांगितले, ''ताई, आज मला दूधसाखरेचा नेवैद्य दाखव आणि हे बघ, हे तुझे होणारे यजमान''. ताई चकित होऊन म्हणाल्या, 'कृष्णा, काय रे हे? हे सगळे करायलाच पाहिजे का? मला आपलं तू सांगशील ते काम आणि माझी शाळा, एवढेच करावे असे वाटते.' ''नाही ताई, असं नाही चालणार. लग्न, संसार करूनही देवकार्य कसं करता येतं, याचा प्रत्यय अनेक संतांनी दिला. तसाच आदर्श माझ्या भक्तांसमोर तुला ठेवायचा आहे.'' कृष्णाचेच शब्द ते! त्याच्या योजनेप्रमाणे एक एक गोष्ट घडत गेली. नागपूरचे श्री. विनायक रामकृष्ण कर्वे मुंबईला राहत होते. श्री. कर्वे पण अत्यंत नेकीने, सचोटीने वागणारे, धार्मिकवृत्तीचे असे होते. त्यांच्याशी १५ एप्रिल १९६३ रोजी ताईंचे लग्न झाले. कौतुकाची गोष्ट म्हणजे हृषिकेशच्या स्वामी शिवानंदांचे आशीर्वादपर पत्र आणि अक्षता आल्या होत्या. त्यात त्यांनी लिहिले होते की, तुमचा जोडा लक्ष्मीनारायणासारखा आहे. तुम्हाला सुख, शांती लाभून तुमच्या हातून देवकार्य घडू दे.

लग्नानंतर काही वर्षे हे दोघेही दादरला रंगारी चाळीत राहत होते. काही दिवसांनी त्या मालकाने जागा सोडण्यास सांगितले. त्यामुळे जागेचा शोध सुरू झाला. श्रीमती ताई फडके यांचेकडे एक खोली भाड्याने द्यायची होती. त्या जागेत ते दोघे राहू लागले. तेथे ताईंची पुढची वाटचाल सुरू झाली. एके दिवशी ताई फडक्यांनी लीलाताईंना बोलावले आणि सांगू लागल्या, 'लीला, तुम्हालाच ही जागा का दिली, त्यालापण एक कारण आहे. अगं तुम्ही प्रथम जागा बघून गेलात नं, त्या दिवशी रात्री मला स्वप्न पडले. एक परकरपोलका घातलेली छोटी मुलगी स्वप्नात आली. म्हणू लागली, ''अगं मी येते येते म्हणते आणि तू मला जेवायला देणार नाही म्हणतेस?'' (त्यांनी त्या जागेत स्वयंपाक करता येणार नाही असे सांगितले होते) असं स्वप्न ओळीने तीन शुक्रवारी

पडत होते. म्हणून शेवटी तुम्हालाच जागा आणि स्वयंपाक करायला परवानगी दिली.' ताई म्हणतात, 'काय भाग्यवान फडकेताई, तुम्हाला साक्षात नवदुर्गेने दृष्टांत देऊन माझी सोय केली.'

आजपर्यंतचा लीलाताईंचा मंगेशी ते मुंबई व्हाया बेळगाव हा प्रवास बघितला तर ठिकठिकाणी, वेळोवेळी नवदुर्गा आणि कृष्ण मिळून त्यांच्या मदतीसाठी कशी माणसे उभी करत होते, अडचणीचे निवारण करत होते हे सहज समजून येते.

लग्नानंतर ताई आणि कर्वे एकदा संध्याकाळी चौपाटीवर फिरायला गेले होते. इतक्यात चतुर्भुज, पीतांबरधारी हाती शंख, चक्र, गदा, पद्म असलेला असा श्रीकृष्ण साक्षात् त्यांच्या डोळ्यासमोर दिसायला लागला आणि गोडसं हसून बोलायला लागला, ''मला नं तुमच्याकडे जन्म घ्यायचा आहे; पण लक्षात ठेवा माझ्या जन्मानंतरची साडेतीन वर्षे अत्यंत कष्टाची कठीण जातील. कदाचित नोकरीही जाण्याची वेळ येईल. पण परिस्थितीवर थोडेही रागावलात, चिडलात तर मात्र मला अजिबात चालणार नाही, मग मात्र मी तेथे क्षणभरही थांबणार नाही. निघून जाईन! बघा दोघं मिळून विचार करून मला सांगा. मी परत आठ दिवसांनी येईन.'' हे ऐकून कर्वे अत्यंत भारावून गेले आणि म्हणू लागले, 'अगं लीला माझी, कोणत्या जन्मातली इतकी पुण्याई आहे म्हणून आपले लग्न झाले आणि मलाही तुझ्याबरोबर कृष्णकार्य करायची संधी मिळाली! आपण काहीही कष्ट सहन करू, पण कृष्णाला आपल्याकडे जरूर जरूर ये म्हणून सांगू.' ताईंनी पण हसून, प्रसन्नचित्ताने संमती दिली. त्याप्रमाणे त्यांनी कृष्णाला वचन दिले.

बायाचे लग्न झाल्यावर लक्ष्मीबाई आणि आत्याबाई पुन्हा मंगेशीच्या घरी राहायला लागल्या. मे महिन्यात मंगेशीच्या देवळात अतिरुद्र पूजा होती. त्यासाठी ठिकठिकाणचे, अगदी काशीपासूनचे पौरोहित्य करणारे विद्वान शास्त्री-पंडित आलेले होते. त्याचप्रमाणे गौड सारस्वत ब्राह्मण संघाचे मठाधिपती पण आलेले होते. सारी मंगेशीच जणू त्या रुद्रपूजेच्या तयारीत व्यग्र होती. इकडे मुंबईत ताईंना कृष्णाने सांगितले, ''ताई सोनं, मोती, पोवळं अशा एकंदर पाच वस्तू बरोबर घे. तू आणि बाबा ताबडतोब मंगेशीला जा. रुद्रपूजेच्या आधी तुम्ही तिकडे पोहोचा. त्याची अत्यंत आवश्यकता आहे. दोघांचेही कौतुक असे की त्यांनी कृष्णाला एका शब्दानेही विचारले नाही, की कशासाठी जायचे. ते सकाळी सकाळी मंगेशीला पोहोचले. आईला आणि आत्याला अतिशय आनंद झाला. थोड्याच वेळात लक्ष्मीबाईंना श्वास घ्यायला त्रास जाणवू लागला. त्या म्हणाल्या, 'मी थोडा वेळ पडतं.' कृष्ण म्हणाला, ''ताई, तू शेजारी बस. आई माझ्याकडे यायला निघाली आहे. तिच्या तोंडात आपण आणलेल्या

वस्तू ठेव आणि प्रार्थना कर.'' एवढे सांगेपर्यंतच लक्ष्मीबाईंची प्राणज्योत अत्यंत शांतपणे श्रीकृष्णात विलीन झाली. कोणत्याही प्रकारचा त्रास न होता. कृष्णाने जणू त्यांचा शेवटचा दिन गोड करून दिला. त्यांचे भाग्य पण एवढे मोठे की त्यांच्या समाजाचे प्रमुख मठाधिपतीपण तेव्हा हजर होते. त्यांच्या साक्षीने, त्यांच्या मृत्यूनंतरचे सर्व धार्मिक विधी यथासांग पार पाडले गेले. लक्ष्मीबाईंशी मंगेशीच्या सगळ्या लोकांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यामुळे सगळा गावच शोकाकुल झाला. लीलाताई सांगतात, आईने दिलेली तीन तत्त्वे म्हणजे माझी सर्वांत मोठी इस्टेट आहे. ती अशी-,

१) तुझ्या दारात दिसणारा चपलांचा ढीग ही तुझी संपत्ती समज. माणसं जोड.

२) मीठ नसेल तर अळणी खा, पण कुणाच्या दारात हात पसरायला जाऊ नकोस.

३) घरी पेज खाल्लीस तर श्रीखंड खाल्याची तृप्ती चेहऱ्यावर ठेव.

ताईंच्या चेहऱ्यावरचं तृप्त समाधान आणि वृत्तीतील अविचल शांती जशी कृष्ण-प्रेरणेत आहे तशीच आईच्या ह्या शिकवणीतसुद्धा आहे.

सगळे दिवस आटोपल्यावर ताई आणि कर्वे आत्यांना त्यांच्याबरोबर मुंबईला येण्यासाठी हरप्रकारे सुचवू लागले. त्यावर आत्याबाईंचे आपले एकच उत्तर, 'अहो, लवकरच नातवंडाची खबर द्या. त्याच्यासाठी मग मुंबईला निश्चित येईन हं बाया. आता मात्र हट्ट करू नका. मी आपली इथेच बरी आहे. मंगेशाची सेवा तरी घडेल माझ्या हातून.' जड अंत:करणाने शेवटी आत्याचे म्हणणे मान्य करून ते दोघे मुंबईला परतले.

मुंबईत आल्यावर दररोज नोकरीचा शोध करणे, कृष्ण सांगेल तशी तशी उपासना करणे आणि होता होईल तो दुसऱ्यांना मदत करणे. असा ताईंचा दिनक्रम सुरू झाला. एक दिवस कृष्ण ताईंना म्हणाला, ''ताई, आपण पंधरा वर्षांनी आपल्या घरी राहायला जायचं हं'' आणि ध्यानात एक जागा पण दाखविली- ''ताई, आता मी तुझ्याकडे येणार. मी गोरा गोमटा नाजुकसा असेन हं.'' आणि खरोखरच थोड्याच दिवसांत बाळाची चाहूल उभयतांना लागली. ताईंनी आनंदाने आत्याला बातमी कळवली आणि सांगितले, 'आता मात्र आम्ही तुझे काही ऐकणार नाही. तुला मुंबईला यावेच लागेल.' 'हो गं बाया, अगदी निश्चित येईन बरं. लक्ष्मीवहिनी असत्या तर दोघींपैकी एकजण आलो असतो. पण आता मलाच सगळ्या गोष्टी लक्ष घालून निभावून नेल्या पाहिजेत. मी आत्तापासूनच हळूहळू तयारीला लागते. जपून राहा हं बाया.' ताई मनाशीच हसल्या आणि म्हणाल्या, 'अगं आत्या, कृष्ण तर पाठीशी आहे आणि साक्षात् तोच

पोटी येतो आहे नं. मग काळजीचे गं काय कारण?' तेवढ्यात कृष्ण म्हणाला, ''ताई, अगं माझ्या जन्मानंतर एकोणिसाव्या दिवशी आत्या माझ्याकडे येईल.'' 'काय? कृष्णा, काय रे असं? आधीच वडील अगदी दीड वर्षांची असताना गेले. गेल्याच वर्षी आई पण गेली आणि तिच्या पाठोपाठ आता आत्या पण? कृष्णा, मला वाटतं माझं पूर्ण जीवनच फक्त तुझ्या आधारावरच आहे. तूच माझं सर्वस्व, आई, वडील, सगे-सोयरे भाऊ. सर्व काही तूच आहेस रे. तुझी इच्छा मला शिरसावंद्य आहे.'

आता ताईंना सारखं वाटू लागलं की एकदातरी नवदुर्गेच्या, मंगेशाच्या पाया पडून यावे. त्याप्रमाणे ते दोघेही घरी मंगेशीला आले. तेथून येताना आत्यापण त्यांच्याबरोबर मुंबईला येणार होत्या. त्यांना म्हापशाला पोहोचेपर्यंत रात्र झाली. विचार केला की पुढे जाण्यापेक्षा आता इथेच मुक्काम करावा आणि उद्या सकाळी पुढे जाऊ. राहण्यासाठी किती ठिकाणी शोधाशोध केली, पण कोठेच जागा मिळेना, काही सोय होईना. जवळच एक पोलीसचौकी होती. कर्वे तेथे चौकशीला गेले. ताईंची अवघडलेली अवस्था, वयस्क आत्याबाई असे सर्व सांगून त्यांना विचारू लागले, 'कोणाकडे काही सोय होऊ शकेल का?' 'साहेब, आता इतक्या रात्री कुठे सोय करणार? हवं तर इथेच शेजारी एक रूम खाली आहे तेथे थांबा रात्रभर. चहा कॉफी काहीतरी देतो.' तेवढ्यात कृष्ण म्हणाला, ''शेवटी पोलीस चौकीत आलो आपण'' कृष्णजन्माच्या आधीचा कारावासही जणू त्यात दाखवून दिला.

तिकडून आल्यावर एकदा कृष्ण बाबांना (कर्वे यांना) म्हणाला, ''बाबा, मी जन्माला एकीकडे येईन आणि लगेच दुसरीकडे जाईन, तुम्ही काही घाबरू नका.''

कृष्ण ज्या ज्या गोष्टी सांगत होता त्या त्या गोष्टीचा पडताळा नंतरच्या काळात येत असे.

२५ ऑगस्ट १९६५ रोजी नंदाचा जन्म झाला. थोड्या वेळाने दवाखान्यातला नर्सबाई ताईंना विचारू लागल्या, 'अहो, तुमच्याबरोबर लाल जरीकाठी पातळ नेसलेल्या कोण बाई आल्या होत्या. तुमची सुटका होईपर्यंत त्या इथेच बसलेल्या होत्या.' 'छे हो, कोणीच आलं नव्हतं असं माझ्याबरोबर.' मग ताईंना जाणवले, की ही नवदुर्गाचं असणार. त्या नर्सबाईचे केवढे भाग्य की तिला साक्षात् देवीचे दर्शन झाले.

त्यांची डिलिव्हरी झाल्यानंतर थोड्या वेळाने ताईंना गंभीर त्रास होऊ लागला. त्यामुळे डॉक्टरांनी त्यांना आणि बाळाला दुसऱ्या मोठ्या हॉस्पिटलमध्ये हलवले. तेथे डॉक्टरांनी ताईंची तब्येत पाहिली आणि कर्व्यांना ते म्हणू लागले, 'अहो तुमच्या माणसांना

बोलवायचे असेल तर बोलवून घ्या. मला बाईंची तब्येत गंभीर वाटतेय.' हे ताईंनी ऐकताक्षणी त्या डोळे उघडून म्हणाल्या, 'काही कोणाला सांगू नका, साक्षात् नवदुर्गा आणि कृष्ण बरोबर आहेत. थोड्या वेळाने माझ्या तब्येतीला उतार पडेल. तुम्ही शांत राहा.' खरोखरच थोड्या वेळाने, ताईंना बरे वाटू लागले. कृष्णाने जे सांगितले होते, ''मी जन्म एके ठिकाणी घेईन आणि लगेच दुसऱ्या ठिकाणी जावे लागेल,'' ते पण अशा रीतीने खरे झाले.

कृष्ण एका एका प्रसंगातून ताईंना कसं शिकवत, घडवत होता त्यांचं प्रत्यंतर ताई आणि बाबांना वारंवार येत होते.

ताई हॉस्पिटलमध्ये असताना, जेवण तिथले होते, पण चहा नाष्टा घरून यायचा. एके दिवशी शेजारच्या बाईंना भेटायला एकजण आली होती, तिने विचारले, 'कसे असते हो इथले जेवण?' ताई म्हणाल्या, 'जेवण चांगलं असतं हो, पण तिखट मात्र असतं.'

दुसरा दिवस उजाडला. शेजारच्या ज्या बाई नाष्टा पाठवत होत्या, त्यांचा गॅस संपला. बाबांना अचानक काही ऑफिसचे काम निघाले म्हणून तेही येऊ शकले नाहीत. ताईंचा जीव भुकेने कासावीस झाला. ग्लानीने त्यांचा डोळा लागला. तेवढ्यात नेहमीप्रमाणे हॉस्पिटलच्या बाई जेवण घेऊन आल्या. ताईचा डोळा लागलेला पाहून त्या ताट तसेच झाकून ठेवून निघून गेल्या. थोड्या वेळाने ताई जेवणाची वेळ झाली म्हणून उठल्या आणि ताट घेऊ लागल्या. बघतात तर काय, त्या अन्नावर एक झुरळ फिरत होते. त्यांनी ते ताट तसेच बाजूला सारले. ते खाणे शक्यच नव्हते. इतक्यात कृष्ण म्हणाला, ''ताई मी केलेल्या सोयीला नावे ठेवलेली मला अजिबात आवडले नाही म्हणून आज असे झाले.'' त्यावर ताई कळवळून म्हणाल्या, 'नाही रे राजा, माझा नावं ठेवायचा उद्देश अजिबात नव्हता; पण ठीक आहे आजपासून मी एक धडा मात्र शिकले की माझ्यापुढे जो काय ओला, सुका घास येतो तो तुझा प्रसादच असतो. आणि म्हणूनच कृष्णा, ह्यापुढे कधीच, कोणत्याही अन्नाला मी नावे ठेवणार नाही. ते पूर्णब्रह्म म्हणूनच खाईन.' अशा अनेकविध प्रसंगातून कृष्ण ताईंना त्यांच्या भावी कार्यासाठी जणू घडवत होता.

नंदा आज एकोणीस दिवसांचा झाला. आज १२ सप्टेंबर, ताईंच्या पोटात धस्स झाले. खरोखरच त्या दिवशी कृष्णाने सांगितल्याप्रमाणे अगदी अचानक काहीही त्रास न होता, आत्यांना देवाज्ञा झाली. कृष्णाचे प्रत्येक बोल खरे होत होते याची सतत प्रचिती येत होती.

दोनच दिवसांनी कृष्ण ताईंना म्हणाला, ''आता मला थांबता येणार नाही. अंधेरीला जायलाच पाहिजे. अमुक अमुक माणसाला सांग की आज तुम्ही ज्या कागदपत्रांवर सह्या करणार आहात, त्या अजिबात करू नका. नाहीतर फसवणूक होईल.'' ताई विचारात पडल्या, इतके छोटे बाळ कोणाजवळ ठेवणार? पण त्यांनी विचार केला कृष्णाचा शब्द आहे तो पाळलाच पाहिजे. शेवटी कामवाल्या बाईंना सांगितले. त्यांच्याजवळ छोट्या नंदाला ठेवून अंधेरीला जाऊन निरोप सांगून आल्या. त्यांना आठवण झाली की कृष्णाने त्यांना आधीच सांगितले होते की १९६५ पासून मी आदेश द्यायला सुरुवात करेन. त्या आणि बाबा संध्याकाळी कृष्णासमोर उभे राहिले आणि प्रार्थना करू लागले, 'कृष्णा परब्रह्मा, तू सांगितल्याप्रमाणे आदेश द्यायला सुरुवात झालेली दिसतेय. ते तू आमच्याकडून निभावून पण घे. तशी शक्ती, संधी, मती तू आम्हाला दे. तूच आदेश देणारा आणि तूच निभावून नेणारा. आमच्या दृष्टीने कृष्णा सर्व काही तू, तू आणि तूच आहेस.'

नंदा दिसामाशी वाढू लागला, खेळूबागडू लागला. कर्व्यांना त्यांचा एक ऑफिसर अत्यंत त्रास देऊ लागला आणि नोकरी जाते की काय इथपर्यंत वेळ आली. त्या सगळ्या धक्क्याने ते आजारी पडले. बिनपगारी रजा असल्याने घरी कधी कधी पैसे पण नसत. साठवलेल्या पैशावर गुजराण चालली होती.

ताईंनी घरभाडे थकल्यावर घरमालकाला सर्व परिस्थिती सांगितली. ते म्हणाले, 'तुम्ही काळजी करू नका. कर्वे बरे होतील. ते कामावर जायला लागले की जमेल तसे भाडे द्या.'

दूधवाल्या भैयानं पण त्यांना सांगितले 'छोटा बाबा घरमें है। साब अच्छे होने के बाद उन्हीसे पूरा पैसा ले लुंगा।'

ताईंना, बाबांना कृष्णाच्या सांगण्याची आठवण झाली. साडेतीन वर्षे अत्यंत कठीण जातील. पण त्या दोघांचाही विश्वास होता की घरमालक, दूधवाला भैय्या अशा अनेकांच्या रूपाने, कृष्ण, नवदुर्गा त्यांच्या पाठीशी सतत उभे राहत होते.

त्यानंतर एकदा ताईंच्या सासूबाईंना स्वप्न पडले. एक परकर पोलका घातलेली मुलगी स्वप्नात आली आणि म्हणू लागली, 'आजी मला बाई शिकवतील का? मला शिकवणीला यायचं आहे.' त्या म्हणाल्या, 'हो शिकवेल ती.' आणि त्या जाग्या झाल्या. त्याच दिवशी दुपारी शाळेतल्या सर्व्हिससाठी मुलाखतीला बोलावल्याचे पत्र आले. जणू त्या मुलीच्या रूपात नवदुर्गा ताईंच्या मदतीला धावून आली.

ऑर्डिनन्स फॅक्टरीच्या शाळेत ताईंचे सिलेक्शन झाले आणि त्यांची नोकरी सुरू झाली. थोडेच दिवसात अंबरनाथला फॅक्टरीच्या क्वार्टर्समध्ये त्यांना राहायला जागापण मिळाली. ते सर्वजण आता अंबरनाथला राहू लागले. घरकाम, लहान मूल, शाळेचे काम आणि कृष्णाच्या आदेशाप्रमाणे लोकांना मार्गदर्शन करणे, मदत करणे असा दिनक्रम आता सुरू झाला.

एकदा रात्री साडेअकरा वाजता, ताईंना कृष्णाने उठवले आणि म्हणू लागला, ''ताई, आता आपण त्या अंबरनाथच्या भक्ताकडे जाऊन येऊ चल.'' एवढ्या रात्रीचे कसे जायचे म्हणून त्यांनी विचारले, 'कृष्णा, सकाळी लवकर जाऊ या का?' ''नको ताई, बाबांना उठव आणि लगेचच जाऊ.'' आम्ही दोघेही बाहेर पडलो, रस्त्याच्या कोपऱ्यापर्यंत आलो, तर ज्यांच्याकडे जायचे होते त्यांचीच गाडी येताना दिसली. एका मोठ्या कंपनीत ते अधिकारी होते आणि कृष्णभक्त होते. त्यांची गाडी अडवून कृष्णने ती परत त्यांच्या घरी घ्यायला लावली. खरंतर इतक्या रात्री ह्या दोघांना पाहून त्यांना आश्चर्यच वाटले होते. त्यात त्यांनी गाडी फिरवून घरी घ्यायला लावल्याने ते थोडे घाबरलेच. घरी येऊन बघतात तर काय त्यांची बायको रडत होती. कारण कंपनीत काही वादावादी झाली म्हणून चिडून हे महाशय जीव द्यायला निघाले होते. त्या म्हणाल्या, 'कृष्णा, आज निव्वळ तुझ्यामुळेच हे घरी आले. माझ्या कातडीचे जोडे करून जरी तुझ्या पायात घातले तरी हे ऋण फिटणार नाही. कृष्णा, असाच आमच्या पाठीशी राहा रे बाबा.'

अशा पद्धतीने ताई आणि बाबा कृष्णाच्या अर्ध्या वचनात राहून तो सांगेल तेव्हा सांगेल ती आर्थिक, शारीरिक, मानसिक सर्व प्रकारची मदत त्याच्या भक्तांना करत होते. ३ ऑक्टोबर १९६९, ताईंच्या दुसऱ्या मुलाचा, संतोषचा जन्म झाला. संतोष पंधरा दिवसांचा असेल, तेव्हा अचानक बाबांच्या पोटात अत्यंत दुखायला लागले. काही केल्या पोटदुखी थांबेचना. शेवटी त्यांना केईएम हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. तेथल्या डॉक्टरांनी निदान करून ताबडतोब पोटाचे ऑपरेशन करायला लागेल असे सांगितले. त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी ऑपरेशन होते. ताई हॉस्पिटलमध्ये जाण्यासाठी म्हणून स्टेशनवर आल्या. बघतात तर काय, त्यांना समोरच्या गाडीतून बाबा उतरताना दिसले. त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. असं कसं झाले, काय झालं, या काळजीने त्यांना विचारू लागल्या. ते म्हणाले, 'आता ठीक आहे. आपण प्रथम घरी जाऊ. मग तुला सगळं सांगतो.'

त्याप्रमाणे ते घरी आले. ते सांगू लागले, 'अगं आज सकाळी नवदुर्गा माझ्या खोलीत आली. माझ्या पोटात जिथे दुखत होतं त्या भागाला पाय लावून जोरात दाबले आणि म्हणाली, तुला काहीही झालेले नाही. काहीही त्रास होणार नाही. तू पहिला उठ, डॉक्टरांना भेट आणि त्यांना सांग मला घरी सोडा. मी माझ्या जबाबदारीवर घरी जातोय असे सांग. त्याप्रमाणे मी केले आणि निघालो. खरंच सांगतो. आता मला काहीच त्रास होत नाहीये. नवदुर्गेने माझे दुखणे पूर्णपणे बरे केले आहे.'

एक दिवस कृष्णाने ताईंना सांगितले, ''ताई, मी तुझी परीक्षा घेणार आहे.'' त्यावर ताई हसून म्हणाल्या, 'अरे कृष्णा, परीक्षा घेणाराही तूच, त्यात पास करणाराही तूच, काय तुला हवे ते तू करून घे. मी कायमच तयार आहे.'

ही मुलं तेव्हा लहान होती. शाळा सकाळची होती. त्या शाळेतून घरी आल्या. कृष्णाने सांगितले, ''ताई आज मला बाजरीची भाकरी पाहिजे.'' घरात बघितले तर पीठ नव्हते. दुकानात जाऊन त्यांनी बाजरी आणली, निवडून दळून आणली आणि भाकरी करायला घेतल्या. तोवर कृष्ण म्हणाला की, ''अगं मला मेथीची भाजी पण पाहिजे.'' ताईंनी नंदाला पाठवले आणि मेथीची भाजी आणवली. निवडून भाजी केली. आता मुलांना वाढणार तेवढ्यात कृष्ण म्हणाला, ''ताई, तू मुलांना नको वाढत बसू. आपल्याला अंबरनाथ स्टेशनला जायचे आहे. लवकर डबा भर. तेथे गाडीत माझा एक भक्त बसलेला आहे, त्याला हा डबा द्यायचा आहे.'' 'बरं कृष्णा' असं ताईंनी सांगितले. आणि डबा भरून ताई निघाल्या त्यावर कृष्ण म्हणाला की, ''ताई रिक्षा नको हं, आपण पायीच जाऊ या.'' ठीक आहे असं म्हणून ताई भराभर स्टेशनच्या दिशेने चालू लागल्या. चालता चालता पायाला ठेच लागली. पायातून रक्त यायला लागले; पण तशाच त्या पुढे स्टेशनपर्यंत गेल्या. स्टेशनात एक गाडी थांबलेली होती. कृष्णाला त्यांनी विचारले, 'कृष्णा, कोणत्या डब्यात तुझा भक्त असेल?' ''ते नाही माहीत, तू आपली सगळे डबे बघ. तो दिसला की सांगतो.'' सगळी गाडी पालथी घालून झाली. भक्ताचा काहीच पत्ता नाही. 'कृष्णा, अरे तुझा तो भक्त आहे तरी कोण?' ''अगं. मज्जा केली तुझी. माझा भक्त गाडीत आहेच कोठे?'' 'मग, आता काय करायचं?' ''समोर बघ तो पुंगीवाला आहे नं, त्याच्याकडून पुंगी घे आणि प्लॅटफॉर्मवरून ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत तू ती पुंगी वाजवत वाजवत जायचंस. आहे तयारी?'' 'अरे कृष्णा, तू सांगितलं आणि मी ऐकले नाही असं कधीतरी शक्य आहे का? ही निघाले बघ,' असं

म्हणून ताई एका हातात डबा व दुसऱ्या हातात पुंगी धरून ती वाजवत वाजवत प्लॅटफॉर्मभर फिरल्या. पुढे म्हणाल्या, 'आता काय करायचं?' ''आता घरी जायचं, पण चालत चालत हं.''

अशा रीतीने अखेर ताई घरी परतल्या. घरी आल्या आल्या कृष्णाने सांगितले, ''ताई, आज माझ्या परीक्षेत तू खरी पास झालीस. मी सांगितलेली प्रत्येक गोष्ट न चिडता, न प्रतिप्रश्न करता, न संकोच बाळगता, एक शिक्षिका असूनही समाजात अशी कशी वावरू असाही विचार न करता, केवळ माझी आज्ञा म्हणून केलीस. शाब्बास ताई, शाब्बास! अगदी लहानपणी तू जे कबूल केलं होतंस त्याचप्रमाणे तू तंतोतंत वागते आहेस. म्हणूनच ताई, तू माझ्या अत्यंत लाडक्या भक्तांपैकी एक आहेस.''

ताईंना वैभवीच्या वेळेस दिवस असतानाची एक हकिकत. तो दिवस एकादशीचा होता. कृष्णाने सांगितल्याप्रमाणे ताई ध्यान करत होत्या. कृष्णाने ताईंना ध्यानातच विचारलं, ''ताई, तुला बाळ बघायचं आहे का?'' ताई 'हो' म्हणताच, त्याने पोटातून बाळ काढले आणि ताईंच्या हातात दिले. ताई बघतच राहिल्या. नकळत एक हात पोटावर फिरवून पाहिला तर पोट अगदी सपाट लागले. कृष्ण म्हणाला ''बघितलं?'' 'हो कृष्णा.' तर ''दे'' म्हणून पुन्हा कृष्णाने ते पोटात ठेवले. आता पोटावरून हात फिरवला तर पुन्हा पोट पहिल्यासारखे झालेले. यात एक अक्षरही अतिशयोक्ती नाही. कृष्णाने जे बाळ दाखवले तसेच बाळ जन्माला आले. त्याचे नावही कृष्णाने ठेवले. तीच वैभवी!

वैभवीच्या जन्माच्या वेळी (१० मे १९७१) सकाळी कृष्ण ताईंना म्हणाला, ''ताई, आज आपल्याकडे कधी न आलेला पाहुणा येणार आहे. सकाळी बाराच्या आत मला बुडबुड घाल हं.'' त्याप्रमाणे त्यांनी कृष्णाला अंघोळ घातली. तेवढ्यात कृष्ण म्हणाला, ''ताई, मी तुला एक तुळशीचं पान देतो. मी सांगेन तेव्हा तू ते तोंडात टाक ते खाऊन व्हायच्या आत बाळाचा जन्म झालेला असेल. त्यावेळेस तुझ्याजवळ फक्त मीच असेन.'' तेवढ्यात ताईंना बरे वाटेनासे झाले. त्यामुळे बाबा त्यांना घेऊन दवाखान्यात गेले. डॉक्टरांनी तपासल्यावर त्या म्हणाल्या, 'कर्वे तुम्ही घरी गेलात तरी चालेल, अजून वेळ आहे' असं म्हणत डॉक्टर पण जिना उतरल्या. तेवढ्यात कृष्ण म्हणाला, ''ते तुळशीचे पान तोंडात टाक आणि चावून चावून खा.'' तोंडातले पान संपते न संपते तोच बाळाच्या रडण्याचा आवाज आला. तो ऐकून डॉक्टर पण धावतच वर आल्या आणि म्हणू लागल्या, 'कर्वेबाई, तुम्ही फसवलत हं आम्हाला! अहो तुमची

डिलीव्हरी झालीय असं तुमच्या चेहऱ्याकडे बघून अजिबात वाटत नाहीये. तुम्ही दुसऱ्याच कोणाला भेटायला आला आहात असंच वाटतंय हो.' डॉक्टर कौतुकाने म्हणत होत्या. ताई म्हणाल्या, 'अहो, ही तर सगळी कृष्णाची किमया. सतत माझ्याबरोबर होता नं तो. त्यानेच मला काहीही कष्ट होऊ दिले नाही.'

अशा प्रकारे एकीकडे ताईबाबांचा संसार, नोकरी आणि कृष्णकार्य चालू होते. ज्याप्रमाणे कृष्णाचे आदेश येत, तसे त्या त्या भक्तांच्याकडे जाऊन तो आदेश पोचवायचे काम ताई करत होत्या. ध्यानात कृष्ण त्यांना तो भक्त, त्याचे नाव, राहण्याचे ठिकाण आणि त्याला देण्याचा आदेश असं सर्व काही सांगत असे. त्याप्रमाणे लगेचच ताई एकट्या किंवा बाबांच्या मदतीने तो आदेश कृष्णभक्तापर्यंत पोहोचवण्याचे काम त्वरित करत. आपल्याला कल्पना आहेच की, आत्ताच्या काळात मुंबईसारख्या ठिकाणी अनोळखी बाईला घरात घेणे खरं तर अशक्य कोटीतील गोष्ट. मात्र आजपर्यंत ताई जेथे जेथे गेल्या, त्या प्रत्येकाने ताईंचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. पुढे ताई त्यांना आपल्या शाळेचा पत्ता, घरचा पत्ता, पूर्ण नाव वगैरे माहिती देऊन ठेवत असत. शंका आल्यास वा भेटायचे असेल तर तुम्ही ह्या पत्त्यावर मला भेटू शकता असंही सांगत. पूर्वअनुमती न घेता कितीतरी अनोळखी घरी किंवा ऑफिसमध्ये जाऊन कृष्णाचा जो काही आदेश असेल तो सांगून येत. कोणीही त्यांना कधी प्रतिबंध केला नाही की अडवले नाही. सारी कृष्णाचीच किमया.

ताई सांगत असत की, त्यांच्यासाठी कृष्णाचा नियम असा होता की घरी येणारा कोणीही कृष्णभक्त नाराज होता कामा नये. समजा कुलूप लावून बाहेर पडल्यावर रस्त्यावरून जाताना कोणी भक्त आलेला दिसला तर परत मागे फिरून दार उघडून त्याला दर्शन द्यायचे व प्रसाद किंवा निदान पाणी तरी द्यायचे. कृष्ण नेहमीच सांगतो, माझा भक्त मला प्राणापेक्षाही प्रिय असतो.

***

ॐ

वैभवीच्या जन्माच्या वेळेसच कृष्णाने सांगितले होते की, सातआठ वर्षांत आपण आपल्या घरी राहायला जाणार. त्याप्रमाणे १९७७ साली एका भक्ताने कृष्णाला बदलापूरमध्ये मंदिर बांधण्यासाठी एक छोटा प्लॉट देऊ केला. कृष्ण नेहमी सांगायचा की मी माझ्या भक्ताची सेवा स्वीकारताना फार विचार करून योग्य असेल तरच त्या सेवेचा स्वीकार करतो. त्या भक्ताच्या आग्रहाप्रमाणे तो प्लॉट स्वीकारण्यासाठी कृष्णाने मान्यता दिली. ते सर्व काही करण्यासाठी काही कागदपत्रे करण्याची आवश्यकता होती. त्या कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी अंबरनाथ ग्रामपंचायतीच्या ऑफिसमध्ये ताई आणि बाबा गेले. सरकारी ऑफिसच्या पद्धतीप्रमाणे, आधी त्यांना हे पेपर्स पाहिजेत, इतका वेळ लागतो, आत्ता सद्या होणार नाहीत अशा अनेक गोष्टी सांगितल्या गेल्या आणि अगदी शेवटी सांगितले, 'तुम्हाला पाच द्यावे लागतील.' एवढे पैसे देणे त्यांना शक्यच नव्हते. ताई म्हणाल्या 'अहो, पाच रुपयेच मागतायत नं, तर देऊन टाका नं.' बाबा म्हणाले, 'अग लीला, तू ठीक आहेस नं. पाच रुपये कोठचे, ते पाचशे मागत आहेत.' असं ते बोलत असताना ऑफिसमधून एक माणूस धावतच आला, 'अहो कर्वे तुम्ही का? तुम्हाला ताबडतोब आत बोलवले आहे.' त्याप्रमाणे ते दोघेही आत गेले. तिथला माणूस म्हणाला, 'बघू बरे तुमची कागदपत्रे. हं, ठीक आहे. बसा दहा पंधरा मिनिटांत सगळं होऊन जाईल.' आता आश्चर्यचकित होण्याची पाळी ताई आणि बाबांची होती. नंतर चौकशी केल्यावर कळले की वरच्या ऑफिसमधून मोठ्या साहेबांचा फोन आला होता की, कर्वे यांचे काम ताबडतोब करून द्या; आणि अवघ्या अर्ध्या तासात, पाच रुपयेसुद्धा न घेता सर्व कागदपत्रे रीतसर करून घेऊन ताई बाबा बाहेर पडले. बुद्धिदाता कृष्णानेच चाव्या फिरवल्या असाव्यात.

आता प्लॉट तर ताईंच्या नावे झाला, पण कृष्णाची अट अशी होती की भक्तांकडे किंवा ओळखीच्या माणसास घरबांधणीचे काम द्यायचे नाही. त्यामुळे शेवटी चौकशी करून एक जगताप नावाचे कॉन्ट्रक्टर होते, त्यांच्याकडे काम द्यायचे ठरले. कृष्णाने त्याच्या काही अटी सांगितल्या होत्या. मंदिराचा हॉल बारा बाय पंधरा ह्याच मापाचा

असेल. घर बांधताना जेवढ्या अगदी आवश्यक गोष्टी आहेत, तेवढ्याच करायच्या. ताई आणि बाबांच्याकडून जेवढी पैशाची सोय होईल, त्यातच घर बांधायचे. त्यासाठी दुसऱ्या कोणाकडूनही मदत घ्यायची नाही. म्हणून ताई-बाबांनी हिशोब केला तेव्हा सोसायटी, प्रॉव्हिडंड फंड आणि साठलेले सर्व मिळून २०,०००/- पर्यंत रक्कम जात होती. त्याप्रमाणे जगताप ह्यांना प्लॅन करायला सांगितले. जगतापांना ताई, कृष्ण, त्यांचे कार्य ह्या सर्वांबद्दल कळल्यावर त्यांनी एक सुरेख डिझाईन केले आणि ताईबाबांना दाखवायला घेऊन आले. डिझाईन तर सुरेखच होते. बाबांनी विचारले, 'अहो, याचे एस्टीमेट काय?' जगताप म्हणाले ८०,०००/- रुपये. ताई आणि बाबा दोघेही एकमेकांकडे बघू लागले. म्हणू लागले, 'अरे बापरे, अहो जगताप एवढे आमचे बजेटच नाही. आम्ही फक्त २०,०००/- पर्यंत खर्च करू शकतो. त्याप्रमाणे तुम्ही मंदिर पंधरा बाय बाराचे आणि त्याला जोडून एक स्वयंपाकघर, एक खोली आणि टॉयलेट ब्लॉक एवढाच प्लॅन करून आणा.' जगताप चकितच झाले. त्यांच्या माहितीप्रमाणे कर्वे यांचेकडे इतकी बडी बडी भक्त मंडळी येत असत की हे मंदिर बांधत आहेत म्हटल्यावर, खर्च करायला कितीतरी  भक्त उभे राहतील असे सर्वांना वाटत होते. पण ताईबाबांचा आग्रह बघून ते म्हणाले, 'ठीक आहे, मी पुन्हा दुसरा प्लॅन काढून आणतो.'

तीनचार दिवसांनी ताईंनी सांगितल्याप्रमाणे त्यांनी अगदी साधासा प्लॅन काढून आणला. तेवढ्यात अगदी पॉश कपड्यातली तीन माणसे आली. दाराशी गाडी थांबवून आत आली. नमस्कार झाला. नंतर ते विचारू लागले की आपण कृष्णमंदिर बांधत आहात, त्यासाठी आम्हाला काही सेवा करायची आहे तर आपण हे चेक स्वीकारावे. ताईंनी चेक्स हातात घेतले आणि पाहिले तर तिन्ही कोरे होते. रक्कम घातली नव्हती. ते म्हणू लागले, 'रक्कम मुद्दाम घातलेली नाही. आपल्याला काय योग्य वाटेल ती घाला. आमचे काहीही बजेट नाही. तुम्ही म्हणाल ते.' 'बरं. कृष्ण काय म्हणेल तसे करू.' तीनही चेक्स कृष्णाच्याजवळ ठेवले. क्षणभर डोळे मिटून ध्यान केले आणि हसल्या. हातात पेन घेतले, प्रत्येक चेकवर छानसा ॐ काढून तीनही चेक्स त्यांना परत दिले आणि सांगितले, 'कृष्णाकडे तुमची भावना पोहोचली.' ते तिघं आणि जगताप थक्क होऊन बघतच राहिले. थोड्या वेळाने ती माणसे प्रसाद घेऊन उठली. ताई सांगतात, 'त्यानंतर मी त्यांना कधीही आलेले बघितले नाही.' जगतापही उठले. त्यांनी कृष्णाला नमस्कार केला आणि म्हणाले, 'कृष्णा, तुम्ही सांगितलेल्या बजेटमध्येच घर बांधायचा आटोकाट प्रयत्न करेन. तुम्हीच ते माझ्याकडून करवून घ्या.'

कृष्णाची ही पद्धतच होती, प्रत्यक्ष उदाहरणातूनच काय ते शिकवण्याची.

जागेची कागदपत्रे ९ एप्रिल १९७७ रोजी झाली होती. त्यानंतर बाबांनी अनेकदा कृष्णाला विचारले, 'आपण बदलापूरला जाऊन येऊ नं.' कृष्ण म्हणाला, ''नाही बाबा. ताई नाही येणार!'' असं करता करता २१ मेला मात्र कृष्णाने सांगितले, ''बाबा, आज आपण ताईसकट सगळे बदलापूरच्या जागेवर जाऊन येऊ या. मला तेथे फिरून ध्यान करायचे आहे.'' त्याप्रमाणे ते जाऊनही आले. मध्ये काही दिवस गेले. त्यानंतर एकदा असेच बाबा एकटेच गेले होते. आल्या आल्या ते सांगू लागले, 'अगं लीला, कृष्ण फिरला नं प्लॉटवर, काय आश्चर्य बघ. पूर्ण जागेवर अनेक तुळशी आणि रुईची रोपे आली आहेत.' जणू कृष्णाने त्याचे अस्तित्वच तेथे प्रकट केले होते.

घराचा प्लॅन पास झाला. थोडीफार कामं सुरू करण्याइतपत पैशाची पण सोय झाली आणि कृष्णाने सांगितले, ''मंदिराच्या भूमिपूजनाची तारीख १७ डिसेंबर १९७७. भूमिपूजनाला काय करायचे ते पण सांगतो. चांदीची तुळशीची पाने आणायची, ती राघवेंद्रस्वामींच्या समाधीला लावून आणायची. तीच पाने खड्डा खणून प्लॉटमध्ये घालायची की झाले भूमिपूजन.'' आता आली का पंचाईत. ताईबाबांनी आजपर्यंत राघवेंद्रस्वामींचे नाव पण ऐकलेले नव्हते, तर त्यांची समाधी कोठे आहे हे कसे माहीत असणार? आत्तापर्यंतच्या अनुभवाप्रमाणे बाबा म्हणाले की, 'लीला तुळशीची पाने आणून ठेवू. मग कृष्ण बघेल पुढचे काय ते.' त्याप्रमाणे त्यांनी पाने आणून कृष्णाजवळ ठेवली. त्याच दिवशी अंबरनाथला राहणारा एक मुलगा आला आणि सांगू लागला, 'ताई, उद्या मी मंत्रालयाला चाललो आहे. राघवेंद्रस्वामींच्या दर्शनाला. तेही थोर कृष्णभक्त होते. म्हणून कृष्णाला नमस्कार करूनच जावे अशा विचाराने नमस्कार करायला आलो आहे.' 'बरं झालं बाबा, अरे, कृष्णाचे पण तुझ्याकडे काम आहे बरं का.' कृष्णाचे काय काम असावे असं वाटून तो भांभावलाच. ताईंनी कृष्णाजवळची तुळशीची पाने उचलून त्याला दिली आणि सांगितले, 'अरे, ही त्या समाधीवर ठेवून आण. मंदिराच्या भूमिपूजनासाठी कृष्णाला ती हवी आहेत.' कृष्णाचे काहीतरी काम करता येणार असं वाटून तो अत्यंत आनंदित झाला व पाने घेऊन गेला. दोन दिवसांनी तो परत आला. म्हणाला, ''ताई, काय नवल घडले आहे बघा. जाताना माझी गाडी लेट झाली त्यामुळे मी उशीरा मंदिरात पोहोचलो. तेव्हा मंदिर बंद झाले होते. ते मंदिर सोवळे, ओवळे, वेळा, शिस्त याबाबतीत अगदी कडक आहे. मला तर फारच वाईट वाटू लागले. आपल्याला कृष्णाचे एवढेसुद्धा काम करता येऊ नये! काय म्हणावे या नशिबाला? मी तेथेच थांबलो होतो. तेवढ्यात तेथे एक म्हातारेसे गृहस्थ आले.

पांढरेशुभ्र कपडे घातलेले आणि मला विचारू लागले की, ‘असे इथे का बसलात?’ मला यायला उशीर झाला. मी तर बाहेरून नमस्कार केला, पण माझ्याकडे ही तुळशीची पाने आहेत, ती मला समाधीवर ठेवून आणायला सांगितली आहेत आमच्या ताईंनी. ‘हो का? द्या बरं पानं इकडे.’ मी त्यांना पाने दिली. ते दरवाजा उघडून आत गेले. थोड्या वेळाने आतून येऊन त्यांनी मला पाने परत दिली आणि सांगितले, ‘समाधिवर ठेवून आणली आहेत आणि हा प्रसाद.’ मी अगदी खूश झालो. हातात घेतलेली पाने आणि प्रसाद डोळ्याला लावून नमस्कार केला. पुन्हा ती व्यवस्थित ठेवली आणि त्या गृहस्थांना निदान नमस्कार करून दक्षिणा द्यावी म्हणून बघू लागलो, तर आसपास कोणीच नव्हते. पण प्रसादाची पुडी तर माझ्याजवळ होती. म्हणजे तो काही दृष्टिभ्रम नव्हता.’’

अशा रीतीने तुळशीची पाने घालून भूमिपूजन झाले आणि बांधकामाला सुरुवात झाली. तीनचार महिन्यात घर बरेचसे दिसायला लागल्यावर सगळे म्हणू लागले, ‘काय हे बांधकाम? ना कपाट ना कोनाडा. असं का केलंत?’ त्यावर ताई म्हणाल्या, ‘कृष्णाने सांगितले की ह्याला घर म्हणू नका. हे आहे ‘कृष्ण-कुटीर.’ माझ्या गरिबातल्या गरीब भक्तासाठी बांधलेले! थोडे दिवसांनी कृष्णाने सांगितले की, कृष्ण-कुटीरच्या उद्घाटनाची तारीख २५ ते २७ ऑगस्ट १९७८. तीन दिवस माझ्या साऱ्या भक्तांना बोलवायचे. तसं घराचं काम पूर्ण झाले नव्हते. पण बाबांचा कटाक्ष होता की कृष्णाने सांगितलेल्या तारखेलाच उद्घाटन करायचे.

घराचे वीटकाम जवळ जवळ पूर्ण होत आले होते तेव्हाची गोष्ट. एके दिवशी जगताप सांगत आले, ‘ताई, अहो चमत्कार झाला, आत कामासाठी लागणाऱ्या विटा तीनचार ठिकाणी रचून ठेवल्या आहेत. आज कामगार त्या वापरण्यासाठी उचलायला गेले, तर बाहेरच्या हॉलमध्ये एका बाजूला ठेवलेल्या विटांवर स्पष्टपणे मोठा ओम् दिसला. कामगारांना सांगून ठेवले आहे, की येथील विटा कोणीही उचलू नका. ताईंनी क्षणभर डोळे मिटले. ध्यानस्थ झाल्या. थोड्या वेळाने सांगू लागल्या, अहो जगताप, कृष्ण सांगतोय’, ‘‘त्या मंदिरातले माझे स्थान तेथे आहे. जेव्हा मूर्ती घडेल तेव्हा तेथे माझी प्रतिष्ठापना करायची आहे.’’

जगतापांना हा सगळा चमत्कारच वाटत होता. ताई म्हणाल्या, ‘अहो, ह्याला चमत्कार समजू नका. कृष्णाने त्याच्या अस्तित्वाची आपल्याला पटेल, समजेल अशी ती खूण दिली आहे. ॐकार हे त्याचे मूळ रूप आहे.’ नंतर त्याच जागेवर कृष्णमूर्तीची प्रतिष्ठापना झाली.

ताईनी कृष्णाला विचारले, 'कृष्णा, तू सांगितल्याप्रमाणे सगळ्यांना बोलावणी केली आहेत. तयारी काय काय करायची, ''दोन किलो भेंडी आणा आणि बाकी डाळ, तांदूळ आणा.'' 'अरे, गोड काय करायचे?' ''सांगतो तुला.'' दोन दिवस आधी ताई शाळेत गेलेल्या असताना एक माणूस आला. सातशे लाडूचे बॉक्स देऊन गेला. शेजारच्या बाई विचारत होत्या, 'अहो, कोणाकडून आलात तुम्ही? किती पैसे द्यायचे?' काही बोलायला तयार नाही. म्हणाला, ''मी ताईंकडून घेईन.'' त्यानंतर ना तो माणूस कधी आला ना लाडवाचे पैसे कोणी मागितले. ताईंनी कितीजणांना विचारले, प्रत्येकजण सांगे, 'अहो, आम्ही पाठवले तर तुम्हाला सांगणार नाही का?' त्याचप्रमाणे पंचवीस तारखेला दोन किलो भेंडीची भाजी आलेल्या सगळ्या मंडळींना सारखीच वाढूनही पुरली. त्याचप्रमाणे लाडू पण पुरले. एक कमी नाही का जास्त नाही.

घराचे काम पूर्ण झालेले नव्हते तरी कृष्णाने तीन दिवस ताई आणि बाबांना तेथे राहायला सांगितले होते. बाबा सांगतात, 'दारं, खिडक्या नसलेल्या घरात आम्ही अगदी निश्चिंतपणे राहिलो. कृष्ण आमच्या बरोबर होता नं.'

थोडे दिवसांनी राहिलेली कामे पूर्ण करून जगताप सांगायला आले. बाबांनी हिशोब विचारला. ते बिचारे संकोचाने म्हणायला लागले, 'कर्वे, तुमचे बजेट २०,०००/-रु. चे होते मला पूर्ण कल्पना आहे. पण तुम्ही कोणालाही बांधलेले घर दाखवा आणि खर्च विचारा. २५,०००/- रु. सर्व मिळून झाले आहेत. तुम्ही कृष्णाला विचारा आणि मला तसे द्या.' कृष्णाने सांगितले, ''हे बघ, हे ठीक आहे. पण पहिले २०,०००/- रु. घे आणि ताई आणि बाबा दर महिन्याला काही ठराविक रक्कम देतील आणि वर्ष दीड वर्षात तुमचे सगळे पैसे फेडतील. आहे कबूल?'' 'हो कृष्णा, तुझ्या शब्दाबाहेर आम्ही नाही.'

मंदिर तर बांधून झाले. अनेक भक्तांना वाटत होते की, आपणच मूर्ती द्यावी. खूप जणांनी तशी कृष्णाकडे प्रार्थनापण केली. पण कृष्णाने निक्षून सांगितले, ''इथे मी माझ्या गरिबातल्या गरीब भक्तासाठी उभा आहे. मला कोणाकडूनच मूर्ती स्वीकारता येणार नाही. माझा एक गरीब मूर्तिकार भक्त आहे. त्याने मूर्ती दिली तर कृष्ण-कुटीरला मूर्ती असेल नाहीतर मूर्ती नसणार.''

त्याप्रमाणे एक दिवस ध्यानात कृष्णाने ताईंना तो मूर्तिकार, त्याचे घर, तेथे जायचा मार्ग वगैरे सर्व काही दाखवले. मग ताई एकट्याच त्या मूर्तिकाराकडे परळला गेल्या. एका झोपडीबाहेर तो माणूस बाहुल्यांचे चेहरे बनवत होता. ताई त्याच्याजवळ जाऊन उभ्या राहिल्या. तो म्हणाला, 'या ताई. काय पाहिजे?' ''अरे मी काही खास

कामासाठी तुझ्याकडे आलोय. मला मानाने आत घे.'' त्याला काय ओळख पटली कोणास ठाऊक. झटकन उठून नमस्कार करत म्हणाला, 'ये कृष्णा, आत ये.' कृष्ण आत गेला आणि सांगू लागला, ''अरे, तुला पुन्हा एक संधी देतोय. मागच्या वेळेस तुला कळस रंगवायला सांगितला होता ते काम अर्धवट सोडून आलास. त्यामुळे बघ कोठे होतास तो कोठे आलास. आता एकदाच सांगतो, मला कृष्णकुटीरसाठी मूर्ती पाहिजे. तू दिलीस तरच कृष्णकुटीरसाठी मूर्ती येईल.'' त्याला अतिशय गहिवरून आले. तो हात जोडून म्हणू लागला, 'कृष्णा घडवतो रे. माझे महत्‌भाग्य म्हणून कृष्णकुटीरसाठी मूर्ती घडवण्याचे कार्य मला लाभतेय.'

पुढे थोड्या दिवसांनी तो मूर्तिकार बदलापूरला आला व ताईंना विचारू लागला, 'ताई, मूर्ती कशी करू?' तत्काळ कृष्ण म्हणाला, ''अरे, मूर्तीचे काम मी तुला करायला सांगितले आहे. ताईला अजिबात विचारू नको. तिचा काही संबंध नाही. तुला जसा मी सुरेख, सुंदर दिसतो तशीच सुंदर सुरेख मूर्ती घडव.''

त्या मूर्तिकाराने सर्व साहित्याची जमवाजमव केली आणि मूर्ती साच्यात घातली. अचानक तो आजारी पडला. केईएम्‌मध्ये एकवीस दिवस ॲडमिट होता. त्यानंतर तो घरी आला. साच्यातली मूर्ती वेळेत न काढल्याने निश्चित ती कोरडी पडून वाया गेलेली असणार असे वाटून त्याने तो साचा उलगडला आणि काय आश्चर्य? त्या मूर्तीत अजून चांगलाच ओलावा होता. अजूनही त्यातून उत्तम मूर्ती घडू शकणार होती. त्याने ती साच्यातून अलगद वेगळी करून अत्यंत देखणी, लोभस अशी मूर्ती तयार केली.

आता ती मूर्ती परळहून बदलापूरपर्यंत आणायची होती. अनेक भक्त म्हणाले, 'आमच्या गाडीतून नेऊ या.' कृष्णाने सांगितले, ''मी आता सामाजिक कार्यासाठी उभा राहणार आहे. त्यामुळे खाजगी गाडीतून मला येता येणार नाही. मी पब्लीक ट्रान्स्पोर्ट म्हणजे रेल्वेनेच येणार.'' तेव्हा खरंतर बदलापूरसाठी एकच गाडी होती. पण कोणत्याही प्रकारचा विशेष त्रास न होता ती मूर्ती कृष्णकुटीरमध्ये रेल्वेनेच आणली गेली.

कृष्णकुटीरमध्ये ता. ६ जून १९७९ रोजी दुपारी दोन ते तीन ह्या वेळेत ह्या मूर्तीची स्थापना झाली. त्यानंतर एकदा हे मूर्तीकार बदलापूरला आले होते. ते कृष्णाला विचारू लागले, की अरे कृष्णा, तुझ्या सांगण्यावरून हे मी अत्यंत मंगल काम करत असताना मी आजारी कसा काय पडलो, तेही इतका की एकवीस दिवस दवाखान्यात राहायला लागले. कृष्ण म्हणाला, ''अरे ह्या मूर्तीत साक्षात माझा अंश आहे. त्याचे तेज पेलायला तुझ्या शरीरात तेवढे सामर्थ्य हवे नं. ते सामर्थ्य ह्या आजारात मी तुला

दिले आणि मगच मूर्ती घडविली गेली.'' आजही ती मूर्ती बघताना त्या मूर्तीच्या साक्षित्वाची प्रचिती आपणास येते.

कृष्णकुटीरच्या वास्तूशांतीच्या दिवशी कृष्णाने ताईंना त्यांच्या बांगड्या आणि मंगळसूत्र काढून एका कलशात ठेवायला सांगितले. ताईंच्या आईने हा कलश दिलेला होता. एक दिवस कृष्णाने हा कलश एका भक्ताला दिला आणि सात वर्षे त्याची आराधना, पूजा करायला सांगितली. अट एकच, सात वर्षांनंतर कलश परत कृष्णकुटीरमध्ये आणून द्यायचा. त्याप्रमाणे सात वर्षांनंतर तो कलश त्या भक्ताने ताईंना आणून दिला. कृष्णाने त्यातले दागिने त्यालाच प्रसाद म्हणून देऊन टाकले. पुन्हा आराधनेसाठी दुसऱ्या भक्ताला तो कलश दिला आणि सांगितले हा तुला संरक्षण देईल. त्याप्रमाणे तिसऱ्यांदा कृष्णाने तो एका कृष्णभक्ताला पुन्हा आराधनेसाठी दिला व सांगितले एकदा तरी तो मडकईला नेऊन आण. ताई सांगतात, 'त्या कलशात काय आहे माहीत नाही पण त्याची आराधना करणाऱ्यांना मात्र त्याचे संरक्षण मिळते. त्यांची संकटे दूर होतात एवढे मात्र खरे.'

हळूहळू कृष्णकुटीरमध्ये अनेक भक्त येऊ लागले. कृष्णाचे सान्निध्य, मार्गदर्शन मिळवू लागले. ताई आणि बाबा ह्यांचा स्वभाव खूपच प्रेमळ, पटकन समोरच्या माणसांना आपलंसं करून घेणारा होता. त्यामुळे शेजारपाजारची अनेक कुटुंबे कृष्णकुटीरमध्ये येऊ लागली. काहींना तर सकाळ संध्याकाळ येऊन गेल्याशिवाय चैनच पडत नसे. आसपासची जी मुले येत, त्यांच्यात आणि स्वत:च्या मुलांच्यात ताई आणि बाबांनी कधीच फरक केला नाही. कृष्णकुटीर हे जणू सगळ्यांच्या हक्काचे विसाव्याचे स्थान झाले होते.

श्रीकृष्णाच्या प्रत्येक शब्दात, प्रत्येक कृतीत अर्थ भरलेला असतो. आपल्याला मात्र त्या वेळी काहीच कळत नाही. काही काळ गेला की त्याचा अर्थ उलगडतो. ताई सांगत होत्या की, एके दिवशी त्या मुंबईला एका कृष्णभक्ताकडे गेल्या होत्या. श्रीकृष्णाने त्या भक्ताला सांगितले, ''अरे मला एक समई आण. कारण यापुढे ताईला दीपस्तंभाप्रमाणे काम करावे लागणार आहे.'' याचा अर्थ कोणालाच काही कळला नाही, पण त्या भक्ताने मात्र एक समई आणून कृष्णाला अर्पण केली.

अलीकडे कृष्ण, बाबांकडे सारखा अंगठ्या मागायचा. पहिल्यांदा मागितली तर छान सोन्याची आणली. तेव्हा ताईंची परिस्थिती म्हणजे दोघेही नोकरी करत होते व खर्च पण करत होते. पुन्हा अंगठी मागितल्यावर ताई गमतीने कृष्णाला म्हणाल्या,

'कृष्णा, सारख्या सारख्या अंगठ्या कशा आणणार? माझ्या शाळेजवळ खोट्या पण छान अंगठ्या मिळतात. त्यातली एखादी तुला आणू का?' त्यावर पटकन गंभीर होत कृष्ण बोलला, ''ती खोटी नको, मला सोन्याचीच, पण छान पाहिजे.'' पुढे कृष्ण म्हणाला, ''बाबा, ताईला तुला शून्यात बघायला लागणार म्हणून मी सारख्या अंगठ्या मागतो. अरे आपला नंदा २४व्या वर्षी राजबिंडा दिसणार.'' ह्या प्रसंगानंतर सुमारे चारपाच अंगठ्या आणून झाल्या. त्या अंगठ्या तो कोणा कोणा भक्तांना देत असे.

एका कृष्णभक्ताला मोठे प्रमोशन मिळाले होते. त्यासाठी त्यांनी नवदुर्गेसाठी म्हणून छान साडी, बांगड्या, वेणी अशी ओटी आणली होती. त्या दिवशी ताईंना अंबरनाथला एका भक्ताकडे ध्यानाला जायचे होते. कृष्णाने ताईला बोलावले आणि म्हणाला की, ''ताई, आज ही ओटी वगैरे सर्व काही तू वापर आणि मग आपण ध्यानाला जाऊ.'' त्याप्रमाणे ताई ती साडी नेसल्या. त्यांनी बांगड्या घातल्या, फुलांची वेणी घातली आणि त्या भक्ताकडे ध्यानाला गेल्या. तेथून निघाल्यावर कृष्ण म्हणाला, ''ताई, आता आपण विजूताईकडे जाऊ. त्या अंबरनाथलाच राहतात.'' तेथे गेल्या गेल्या कृष्णाने विजूताईंना सांगितले, ''विजूताई, ताईला छानशी कॉफी दे. ताई पुन्हा तुझ्याकडे अशी येणार नाही.'' कृष्ण काय म्हणतोय, विजूताईंना उलगडलेच नाही. त्या म्हणाल्या, 'बरं कृष्णा. मी पटकन छानशी कॉफी करते हं.' कॉफी घेऊन ताई बदलापूरला आल्या. तो वार होता शुक्रवार. घरी आल्यावर कृष्ण म्हणाला, ''ताई, ही साडी हिला दे.'' त्याचप्रमाणे बांगड्या, वेणी असं सर्व ओटीचं साहित्य कोणाकोणाला प्रसादाचे म्हणून दिले. विजूताईंना प्रसाद देताना कृष्णाने सांगितले, ''उद्या माझे बाबा जाणार.'' विजूताई विचारू लागल्या, 'ताई, तुम्ही उद्या कोठे जाणार आहात का? हा तर म्हणतोय, उद्या बाबा जाणार म्हणून.' 'नाही हो विजूताई, मला काहीच कल्पना नाही,' ताईंनी सांगितले. रात्री ताई ध्यानाला बसायच्या आधी कृष्ण म्हणाला, ''ताई, मंगळसूत्र काढून माझ्या पायाशी ठेव.'' ताईंनी विचारले, 'अरे कृष्णा, आता हे काय भलतंच.' त्यावर बाबा म्हणाले, 'जाऊ दे गं लीला, म्हणतोय नं तसं ठेव नं काढून.' 'ठेवते रे बाबा, तुझं न कधी कधी काही कळतच नाही बघ,' असे म्हणत म्हणत ताईंनी गळ्यातले मंगळसूत्र काढून कृष्णाच्या पायाशी ठेवले.

शनिवारी संध्याकाळपर्यंत सगळे ठीक होते; पण रात्री जेवण झाल्यावर मात्र अचानक बाबांना त्रास व्हायला लागला. घरात काही कृष्णभक्त होतेच. त्यांनी घाईघाईने बाबांना गाडीत बसवले आणि हॉस्पिटलमध्ये नेले. पण तेथे जाईपर्यंतच बाबा कृष्णचरणी

विलीन झाले होते. त्यांना कायम वाटायचे की कोणत्याही परिस्थितीत मला हॉस्पिटलमध्ये मृत्यू येऊ नये. त्यांची तीही इच्छा कृष्णाने पूर्ण केली. कृष्णकुटीरला पोरकं करून बाबा आपल्या पुढच्या प्रवासाला गेले. तो दिवस होता २८ मे १९८३.

ताई आणि मुलांवर जणू आभाळच कोसळलं. कृष्ण आणि महानशक्ती यांच्याच आधाराने ताई ह्या प्रसंगामध्ये खंबीरपणे उभ्या राहिल्या.

व्यावहारिक दृष्ट्या बघितले तर त्यांचे सगे-सोयरे म्हणजे कृष्णभक्त. त्यातल्या काहींना कर्वे कुटुंबावरच्या प्रेमामुळेच वाटत होते की, ताईंनी नोकरी करू नये. फक्त कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि कृष्णकार्य करावे. परंतु कृष्णाने निक्षून सांगितले की, ‘‘ताई मी तुझ्या पाठीशी आहे. तू, तुझी ड्यूटी, माझे कार्य, कौटुंबिक जबाबदाऱ्या पूर्णपणे निभावू शकशील. माझा हात धरून पुढे चल. ताई, तुला असे वाटेल की मी बाबांचे आयुष्य का वाढविले नाही? कारण मला तुमची तीनही पाने दिसत असतात. पूर्वजन्म किंवा प्रारब्ध, सध्याचा काळ आणि भविष्यकाळ. त्यामुळे तुमच्या दृष्टीने जे योग्य असते तेच मी प्रत्येकाला देत असतो. मी नियतीच्या नियमात कधीच ढवळाढवळ करत नाही. मीच केलेले नियम मीच मोडून कसे बरे चालेल?’’

आता गोकुळाष्टमी जवळ आली. दोनतीन दिवस आधी कृष्णाने ताईंना सांगितले, ‘‘ताई, आता दर्शनाला येणाऱ्या सर्व भक्तांचे स्वागत तू स्वत: दारात उभे राहून हसून करायचेस. दिवसभरात एकदा जरी डोळ्यात अश्रू आले नं, तर तू नापास.’’

त्याप्रमाणे दिवसभर चालले होते. भक्त येताना गंभीर चेहऱ्याने येत होते. बाबांच्या आठवणींचा भावनावेग आवरता येत नव्हता. पण ताईंना दारात उभे राहिलेले पाहून चकित होत होते. मनात म्हणत होते, ‘संपूर्ण शरणागती म्हणजे काय हे आज आम्ही पाहिले.’ त्याचवेळी ताईंचा कृष्णाशी मनोमन संवाद चालू होता, ‘कृष्णा, माझ्या आयुष्यातला प्रत्येक क्षण न् क्षण हा तुझ्या इच्छेनुसारच येतोय आणि तुझी इच्छा म्हणून प्रत्येक परिस्थितीचा मी शुद्ध मनाने स्वीकार करत आहे.’

***

ॐ

आता नंदा १८ वर्षांचा झाला होता. त्याने आता शिक्षण पुढे चालू ठेवायचे का नोकरी करायची असा प्रश्न पुढे आला. कृष्णाला विचारले, तर त्याने सांगितले की नंदाने नोकरी स्वीकारून प्रथम आपल्या पायावर उभे राहावे. त्याप्रमाणे अर्ज केले. नंदाचा अर्ज ज्या साहेबांकडे गेला होता, त्यांना कोणीतरी सांगितले होते की, नंदाला नोकरीची अजिबात गरज नाहीये. कारण त्यांच्या कृष्णमंदिरात येणारे खूप श्रीमंत कृष्णभक्त आहेत आणि मंदिरात बरेच काही देवासाठी येत असते. त्यामुळे त्याला तशी नोकरीची अजिबात गरज नाही. त्याप्रमाणे त्यांनी त्याच्या अर्जावर तसा शेरा मारून तो फाईलही केला होता.

पण उत्सुकतेपोटी ते बदलापूरच्या एका माणसाबरोबर कृष्णकुटीरमध्ये सकाळीच आले. बरोबर प्रसाद, फळे, फुले घेऊन आले होते. हे कोण आहेत याची कोणाला काही कल्पना नव्हती. तेथे येऊन त्यांनी नमस्कार केला आणि बराच वेळ थांबले. कृष्ण आलेल्या वस्तू, प्रसाद कसं इतर भक्तांना देत होता ते बघत होते. त्यांना जाणवलं की त्यांच्यापर्यंत जी माहिती आली होती, ती चुकीची होती. ते नमस्कार करून प्रसाद घेऊन गेले. पुढे त्यांनी नंदाच्या अर्जावरचा शेरा बदलला व त्याला रीतसर मुलाखतीचे बोलवणे आले.

मुलाखतीला नंदाबरोबर जाण्यासारखे कोणीच नव्हते. ताईंची शाळा, वैभवी, मुन्ना तर लहानच होते आणि नंदा पण वयाने आणि अनुभवाने पण लहानच होता. इतक्यात उल्हासनगरहून एक माणूस आला. त्याला सगळे भैय्या म्हणत होते. तो सांगू लागला, 'नंदा के साथ जाना है ना। ताई, आप बेफिकीर रहिये। मै उसके साथ जाता हूँ। मै सुबह सात बजे आता हूँ।' खरंचच तो मुलाखतीच्या दिवशी सकाळी सातलाच आला. नंदाला घेऊन ऑफिसमध्ये गेला. त्याचं सगळं काम झाल्यावर त्याला कृष्णकुटीरमध्ये घेऊन आला आणि गंमत म्हणजे त्या दिवसानंतर तो पुन्हा कधीही कृष्णकुटीरमध्ये दिसला नाही. ताई म्हणतात, 'दिसणार कसा? कृष्णच त्याच्या रूपात येऊन सगळी सोय करून गेला नं.' पुढे ह्याच ऑफिसमध्ये नंदाला रीतसर नोकरी मिळाली.

एकदा ध्यानात असताना कृष्ण ताईंना म्हणाला, ''ताई, मला उद्याच्या उद्या छान छुमछुम आण. मस्त आवाज येणारे पाहिजेत हं. नुसत्याच साखळ्या नकोत.'' दुसऱ्या दिवशी त्यांनी कृष्णाने सांगितलेल्या किमतीचे वाजणारे पैंजण आणले आणि त्याच्या पायात घातले. घातल्यावर कृष्ण म्हणाला, ''ताई, हे मी का घातले माहिती आहे का तुला?'' 'मला रे काय करायचे आहे माहीत असून? तू सांगितले मी आणले, झालं.' ''ताई, तसं नाही, हे बघ, यापुढची तुझी वाटचाल म्हणजे काट्याकुट्यांनी भरलेल्या डोंगरमाथ्यावरची, खडतर आहे. त्यावरून चालतांना, हा छुमछुम आवाज ऐकताना तुला बरे वाटेल. परब्रह्म आपल्याबरोबरच आहे हे पुन्हा पुन्हा स्पष्टपणे जाणवेल आणि तू क्षणभर तरी आपले त्रास, दुःख, यातना विसरशील. म्हणून मी आज हे पैंजण घातले आहेत.'' त्यावर क्षणाचाही विलंब न लावता ताई म्हणाल्या, 'कृष्णा, या वाटचालीत तू माझ्याबरोबर सतत असणार आहेस ह्याची मला खात्रीच आहे. आजपर्यंतच्या अनुभवातून ते मी शिकले पण आहे. त्यामुळे त्याच्यासाठी मला वेगळ्या विरंगुळ्याची गरज आहे असे वाटत नाही. पण ज्या अर्थी तू हे सांगतो आहेस त्या अर्थी, माझं मानवी मन क्षणभर जरी ही गोष्ट विसरलं, तर तू त्याची आधीच काळजी घेतली आहेस. कृष्णा, किती सतत तू माझ्यासाठी करत असतोस. तू मला आपली ताई म्हणून माझ्या जीवनाचे सोने केले आहेस.'

आता ताईंचा 'एकला चलो रे' असा कालखंड सुरू झाला. त्या नेहमीच सांगत, 'मी एकटी मात्र कधीच नव्हते आणि नाही. कायम नवदुर्गा माझ्या मार्गातील अडचणी दूर करते आणि कृष्ण परमात्मा, माझा हात धरून मला पुढे नेतो.' ताईंचा पूर्ण वेळ, त्यांची प्रापंचिक कर्तव्ये, कृष्ण सांगेल त्याप्रमाणे त्याच्या भक्तांना मार्गदर्शन करणे, (तेव्हा हे काम दिवसभर चाले, कोणीही कोणत्याही वेळेत मार्गदर्शनासाठी येत असत, फोन करत असत) तसेच कृष्ण सांगेल तसे व तेव्हा ध्यान करणे; असा जात होता.

एकदा ताई ध्यानात पडल्या होत्या. पहाटे दोन अडीचच्या दरम्यान त्यांना कोणीतरी 'आई' म्हणून हाक मारली. त्या पलंगावर झोपल्या होत्या. आता एवढ्या पहाटे कोणी हाक मारली, असं वाटून त्या डोळे उघडून पाहू लागल्या, तर त्यांच्यासमोर वीस बावीस वर्षांच्या तरुणाच्या रूपात साक्षातं श्रीकृष्ण उभा असलेला दिसला. पीतांबर नेसलेला, पूर्ण शरीरभोवती तेजोवलय आणि जमिनीपासून चार बोटे उंच असलेला, अधांतरी असा तो होता. कृष्ण ताईंना सांगू लागला की, ''ताई, आता तुझ्यातील महाशक्ती जागृत झाली आहे. म्हणून मी तुला आई या नावाने हाक मारली.'' थोड्या वेळाने श्रीकृष्ण ताईना अंतरंगात दिसू लागला आणि त्या गाढ ध्यानावस्थेत गेल्या.

कृष्णाने डिसेंबर १९८७ मध्ये सांगण्यास सुरुवात केली, की पुढील १९८८ साल हे माझे पूर्ण मौन असण्याचे साल आहे. मौन म्हणजे, सध्या जे मी माझ्या भक्तांना व्यावहारिक, पारमार्थिक मार्गदर्शन करत असतो तसे आता मी वर्षभर करणार नाही.

ह्या मौनाच्या संदर्भात ताईंनी कृष्णाला काही प्रश्न विचारले ते प्रश्न आणि त्याला कृष्णाने दिलेली ही उत्तरे :

**प्रश्न :** कृष्णा, पुढच्या वर्षी बोलायचे नाही असे तू का म्हणतोस?

**उत्तर:** कोणत्याही मोठ्या कार्याची उभारणी करण्यासाठी मला योजना करून पूर्ण तयारी करावी लागते. ती योजना उत्तम प्रकारे अमलात येण्यासाठी त्याची योग्य ती रचना असावी लागते. ती रचना करताना सर्वांचे हित साधावे लागते. ज्यांच्यामार्फत हे हित साधायचे असते, ते हित ज्यांच्या पदरात पाडावयाचे असते, अशा व्यक्ती निवडाव्या लागतात. त्यांना ते सर्व योग्य प्रकारे करण्याची कुवत द्यावी लागते आणि त्याच्यासाठी ध्यान धारणा फार महत्त्वाची असते. म्हणून मी हा निर्णय घेतलेला आहे.

आत्तापर्यंत जे कार्य केले, ते व्यक्तिगत झाले. आता सामुदायिक कार्याची गरज आहे. ज्यांच्या ज्यांच्याकडून आजपर्यंत मी अशा प्रकारे कार्य करून घेतले, त्यांना असा ध्यान धारणेत काळ घालवावा लागला आहे.

कार्याचा ओघ सतत टिकावा म्हणून बळकटीची फार जरूरी असते. ती बळकटी येण्यासाठी, धैर्य, नम्रता, त्याग, भावनाशीलपणा व कसोटी ह्या गुणांची अत्यंत आवश्यकता आहे. त्यासाठी ध्यानधारणा ही गरजेची आहे.

**प्रश्न :** कृष्णा, तुलाही ह्या सर्वांची गरज असते का रे?

**उत्तर :** होय ताई, ज्याला तुम्ही आदर्श मानता त्याला उर्जेची अत्यंत गरज असते. त्यात त्रुटी म्हणजे तुमच्या कार्यातील अडथळे. मी ज्यांच्यातर्फे कार्य करतो, त्यांना ध्यानधारणेमुळे बळकटी येते, उत्साह वाटतो, धैर्य येते व काहीही अडचण आली तरी मी साथीदार आहे. याची पुरेपूर खात्री असल्यामुळे त्यांच्या मनाची चलबिचल होत नाही. धैर्य खचत नाही, बळकटी कायम राहून कार्याचा ओघ तसाच कायम राहतो.

**प्रश्न :** कृष्णा, ह्या सर्व कार्यात 'तू साथीदार आहेस' ही जाणीव, खात्री ठेवण्यासाठी काय करायचे?

**उत्तर :** माझे अस्तित्व दृष्य स्वरूपात नसते. तसे ते नसताना देखील, मी सतत जवळ आहे, तुमच्याबरोबर वावरत आहे, हे जाणून असणे, हे तुमच्यासाठी अत्यंत कठीण आहे. माझं अस्तित्व पावलोपावली जाणून घेणे म्हणजे जगाच्या दृष्टीने वेडेपणाचे

ठरते. त्यामुळे माझ्या भक्ताला, अनेक संकटांशी मुकाबला करावा लागतो व त्याच्यासाठी मला त्या भक्ताला तयार करावे लागते. अनंत अडचणी, अनंत प्रकारचे व्यवहारातील अनुभव देऊन त्याला तोंड कसे द्यायचे आणि ते देताना माझ्या नियमांचे पालनही कसे करायचे, ह्या सर्व गोष्टींचा परिचय त्याला करून द्यायचा असतो.

ऐकायला आणि सांगायला ही गोष्ट साधी वाटते. परंतु प्रत्यक्षात ही अत्यंत कठीण असून त्यासाठी काळही फार घालवावा लागतो. तेव्हा ती व्यक्ती थोडीशी तयार होते. त्या व्यक्तीला मला काम, क्रोध, लोभ, मोह, मत्सर आणि माया या सर्वांपासून दूर ठेवायचे असते. हे सर्व निसर्गाच्या सर्वसाधारण नियमांच्या बाहेरचे असते. हे करताना मी सतत जवळ आहे म्हणजेच मला अदृश्यातून दृश्य रूपात जाणून घेऊन वाट चालणे म्हणजे पाय असतानाही वाऱ्याबरोबर, हवेत चालण्यासारखे आहे. अथांग सागरात शांत मन:स्थितीत समाधानाने चालणे जितके कठीण त्याहूनही हा मार्ग कंठणे कठीण. ते माझ्या कृपेमुळेच होऊ शकते आणि असा माझ्या कृपेचा, आशीर्वादाचा वर्षाव व्हावयाचा असेल तर त्या व्यक्तीला मला समर्पित व्हावे लागते. माझे अस्तित्व सतत जागरूक ठेवण्याची फार गरज असते. ती गरज तुम्हाला श्रद्धा, भक्ती व त्याग ह्या तिघांच्या समन्वयामुळे मिळू शकते.

खरे म्हणजे करणारा व करवून घेणाराही मीच आहे. म्हणून हे सर्व करत असताना, जर काही मनाविरुद्ध घडले, तर ती पण माझीच इच्छा असे समजावे. त्यासाठी उद्वेग, संताप यांची वाढ होऊ देऊ नये. कारण उद्वेगामुळे स्वत:ची मन:स्थिती तर बिघडतेच आणि इतरांवरही त्याचा दुष्परिणाम होतो. म्हणून ज्या ज्या वेळी मनस्ताप होण्यासारखे काही घडेल, त्यावेळी मनस्ताप करून न घेता, नामस्मरण करावे. त्याने मनाची चलबिचल थांबण्यास फारच मदत होते. आपली कर्ता करविता जी शक्ती आहे, तिची आठवण जागृत होते. हे श्रद्धा व भक्ती असल्याखेरीज होणे अशक्य! तुम्ही एका अर्थी नामस्मरण करून सर्व मनस्तापाची जबाबदारी, भार माझ्यावर टाकता. त्यामुळे ती जबाबदारी स्वीकारून मी तुमच्यासाठी धावून येतो. म्हणून नामस्मरण हा मनस्तापावरचा रामबाण उपाय आहे.

**प्रश्न :** कृष्णा, मग असे नामस्मरण कोणाचे, कोठे, किती करावे?

**उत्तर :** नामस्मरण करणे हेच मुळी मनात प्रथम ठसवावे लागणार. कोणतीही कृती करायची म्हणजे निश्चयाची फार गरज असते आणि एकदा का निश्चय झाला म्हणजेच ती आपल्या हातून होऊ शकते. असं नामस्मरण करताना कोणी मुखावाटे

शब्द बाहेर काढतील, तर कोणी मनातल्या मनात करतील. दोन्हीचा उद्देश एकच- मनातील विचार थांबवण्यासाठी व ते विचार मुखावाटे बाहेर न पडण्यासाठी हे करणे फारच जरूरीचे आहे.

प्रत्येकाचे श्रद्धास्थान एकच असावे. ज्याला पाहून आपले समाधान होते, त्याचेच नामस्मरण करावे. आपल्या मनात, हृदयात जी प्रतिमा आपण जपून ठेवली असेल, त्याचेच नामस्मरण करणे योग्य व हिताचे ठरेल. नाहीतर ते मनापासून केले जाणार नाही. कोणतीही गोष्ट मनापासून केली नाही, तर त्यात आपल्याला यश येणार नाही.

आता ते कोठे आणि किती करावे तर त्याला कसलेच बंधन नाही. ना खाण्यापिण्याचे, ना आंघोळीचे. ते सतत उठता बसता, वावरताना करावे आणि तुम्ही ते फक्त करा! मोजण्यात वेळ घालवू नका. ते मोजण्याची जबाबदारी माझी.

**प्रश्न :** कृष्णा, सुख सहन करता येणे म्हणजे काय?

**उत्तर :** ताई, सुखात असतानासुद्धा माझा आधार, माझे पाठबळ असेल तरच ते सुख सुखासमाधानाने उपभोगता येते. तसं नसेल तर त्यातही शल्य राहते. ते कसे तर यावर एकच सांगता येईल की, प्रत्येकाच्या सुखाच्या कल्पना वेगवेगळ्या असतील. प्रत्येकाची एखाद्या गोष्टीकडे पाहण्याची नजर भिन्न भिन्न असते. माझा भक्त म्हटला म्हणजे त्या घटनेकडे बघण्याची त्याची नजर माझ्यामधून असते. म्हणजे त्याचा अर्थ असा की, श्रीकृष्णाच्या इच्छेमुळेच सर्व काही घडत आहे, घडले आहे आणि घडणारही आहे. त्यामधून मला तो शिकवत आहे व त्याने माझी सर्व जबाबदारी घेतली आहे.

ध्यान करताना एके दिवशी कृष्णाने ताईना सांगितले, ''ताई अमुक अमुक माझ्या भक्ताला माझा निरोप दे की कृष्णकुटीरसाठी एक छानशी शिवपिंडी आणून दे.'' 'काय? अरे कृष्णा, त्या भक्ताला सांगू?' ''हो. त्यालाच सांग. तोच ती आणून देईल. ही इतिहासाची पुनरावृत्ती आहे.'' तो भक्त परधर्मीय होता. त्यामुळे सामाजिकदृष्ट्या ताईंना ते अवघड वाटत होते. कृष्णाच्या ह्या वाक्याचा अर्थ त्याचा त्यालाच माहीत. त्याने सांगितले आहे म्हणून आपण फक्त निरोप्याचे काम करायचे. असे जाणून, ताईंनी 'त्या' कृष्णभक्ताला फोन करून निरोप दिला. त्यावर तो आनंदाने म्हणाला, 'कृष्णा, मला सेवेची संधी दिलीस, त्यासाठी कोणत्या शब्दात मी आभार मानू. पण ताई, कृष्ण कोणत्या दुकानाचे नाव सांगत आहे का? नाहीतर मला माधवबागेतली काही दुकाने माहीत आहेत. तेथे तुम्ही बघून याल का? कृष्णाला आवडेल ती, शिवपिंडी तुम्ही पसंत करून ठेवा. घेऊन मात्र जाऊ नका. बाकी पुढे कृष्णकुटीरमध्ये पाठवायची सर्व

व्यवस्था मी करतो.' ताईंना कृष्णाने ध्यानात दुकान दाखवले आणि माधवबागेतच जा म्हणूनही सांगितले. त्याप्रमाणे ताई एका स्त्रीभक्ताबरोबर तेथे गेल्या. त्या दुकाने हिंडून बघत होत्या, एवढ्यात कृष्णाने दुकान दाखवले आणि सांगितले, ''ह्याच्याकडेच घ्यायची शिवपिंडी.'' त्याप्रमाणे ती दोघे दुकानात गेली. कृष्णाने शिवपिंडी पसंत केली. त्या दुकानदाराला आमचा माणूस येऊन पैसे देऊन घेऊन जाईल म्हणून सांगितले. तेही त्याने मान्य केले. ताईंनी त्या भक्ताला दुकानदाराचे नाव, पैसे सर्व काही कळवले. त्याप्रमाणे त्याने ३१ डिसेंबर १९८९ला शिवपिंडी पोहोचवतो म्हणून सांगितले.

३१ डिसेंबरला सकाळी सकाळी कृष्णाने ताईना सांगितले, ''ताई, आज सुकामेव्याचे ८९ लाडू कर. शिवपिंडीच्या आधी माझे दिवे येतील, मगच शिवपिंडी येईल हं ताई.'' 'म्हणजे रे काय कृष्णा' असं म्हणत ताई सुकामेव्याचे लाडू करायला लागल्या.

त्याच दिवशी दुपारी एक घाटकोपरच्या भक्त बाई कृष्णासाठी दिवे घेऊन आल्या आणि सांगू लागल्या, 'ताई किती दिवस झालेत दिवे आणून, पण यायलाच जमले नव्हते. मात्र आज वर्षाचा शेवटचा दिवस. आज तरी पोहोचवायचेच म्हणून घेऊन आले.' नंतर चार-साडेचारच्या सुमारास शिवपिंडी पण मंदिरात आली. कृष्ण म्हणतो त्याचप्रमाणे सर्व घडत असते.

एक कृष्णभक्त पतिपत्नी कृष्णकुटीरमध्ये येत असत. ते दोघेच होते. त्या गृहस्थांना पावसाळी हवा, वादळ, ढगांचा गडगडाट ह्याची अत्यंत भीती वाटत असे. इतकी की त्या भीतीने ते डोळ्यावर/कानावर घट्ट रुमाल बांधून चारचार दिवस डोक्यावर पांघरूण घेऊन झोपत असत. एकदा त्यांच्या पत्नीने कृष्णाच्या कानावर त्यांची ही भीती घालून प्रश्न विचारला, 'की ह्यावर उपाय काय?' कृष्ण म्हणाला, ''तू कृष्णकुटीरमध्ये घंटा आणण्यासाठी पैसे दे. जसजसा ह्या घंटेचा नाद, स्पंदनं हवेत सर्वत्र पसरतील तसतशी वादळवाऱ्याची त्यांची भीती कमी होत जाईल. ते शांत व निर्भय होतील.'' ही घंटा जेव्हा कृष्णासमोर बांधली तेव्हा चार दिवस सतत वादळी वाऱ्यासह, गडगडाटासह पाऊस पडत होता आणि नंतर हळूहळू त्यांची भीतीही कमी झाली.

कृष्ण नेहमी सांगत असे की, मी हृदयाच्या हाकेला नेहमीच धावून येत असतो. मी प्रत्येक गोष्टीत, प्रत्येक कृतीमागे असलेला तुमचा भाव जाणतो. मी फक्त भावाचा भुकेला आहे. बाकी मला काहीही नको.

एक कृष्णभक्त निवृत्त व्हायचे होते. त्यांची इच्छा होती की त्यांच्या निवृत्तीचा दिवस त्यांनी कृष्णकुटीरमध्ये सत्यनारायणाची पूजा करून घालवावा. त्याप्रमाणे त्यांनी

ताईंना फोन करून त्या दिवशी येऊ का विचारले. पण संकोचाने तेथे पूजा पण करावी असं वाटतं आहे असं मात्र ते सांगू शकले नाहीत. तेव्हा ताईंची शाळेतली नोकरी पण चालू होती. ताईंनी त्यांना सांगितले, 'जरूर या हं.'

त्या दिवशी सकाळी सकाळी एका गृहस्थाने इतक्या छान तुळशी आणल्या. ताई म्हणाल्या, 'अरे वा, काय सुंदर तुळशी आहेत.' कृष्ण म्हणाला, ''असू देत हं ताई, पण त्या तशाच ठेव, मला नंतर लागतील बरं.'' ताईंनी वरणभाताचा कुकर लावला. एवढ्यात अजून एक कृष्णभक्त छानसा आंब्याच्या रसातला शिरा घेऊन आला. तो पण कृष्णाने स्वीकारला आणि पायाजवळ ठेवायला सांगितला. थोड्या वेळाने मुंबईचे एक भक्त मोठा बॉक्स घेऊन आले. आणि सांगू लागले 'ताई अमुक अमुक भक्तानी कृष्णासाठी हा फळांचा बॉक्स पाठवला आहे.' उघडून पाहिले तर ताजी, तजेलदार अशी पाचसहा प्रकारची फळे त्यात होती. कृष्णाने ती पण स्वीकारली आणि म्हणाला की, ''ताई ही पण इथेच ठेव. मला नंतर लागणार आहेत हं.''

थोड्या वेळाने मुलांना जेवून घ्या असे सांगून ताई शाळेसाठी बाहेर पडल्या. दुपारी शाळेतून घरी आल्या, तोपर्यंत हे निवृत्त झालेले गृहस्थ त्यांच्या कुटुंबियांसमवेत येऊन थांबले होते. त्या आत स्वयंपाकघरात गेल्या. बघतात तर काय कुकर तसाच. भूक नाही म्हणून मुले न जेवताच गेली होती. तेथून त्या कृष्णाजवळ आल्या तर सांगू लागला, ''ताई, तू हात पाय धुवून ये. मी आज तुमच्या सगळ्यांसाठी भाजी भाकरी पाठवणार आहे आणि हे बघ, माझ्याजवळ सगळी पूजेची तयारी आहे. तू आलेल्या ह्या माझ्या भक्ताकडून पूजा करून घे. त्याची फार इच्छा होती पूजा करण्याची.'' ताईंच्या मनात आले की आता इतक्या दुपारी कोण भाजी-भाकरी आणणार? जाऊ दे, कृष्ण बघेल असं म्हणून सगळ्यांनी छान पूजा केली. तोपर्यंत काही लोक अकरा मोठ्या भाकऱ्या आणि भाजी असे डबे घेऊन आले आणि सांगू लागले 'आज आमच्याकडे शेतावर मोठी पार्टी आहे. सगळं व्यवस्थित पार पडू दे असं सांगायला आणि नेवैद्यासाठी म्हणून हे घेऊन आलो.' कृष्णानी त्याला घाईघाईनेच सांगितले, ''स्वीकारले हे सगळे मी तुझे. ताई हा शिऱ्याचा नेवैद्य दाखव आणि तुम्ही सगळे जेवून घ्या.'' त्याप्रमाणे वरणभात, भाजी भाकरी, शिरा, पाच फळे असा साग्रसंगीत नेवैद्य दाखवून सगळेजण जेवले. त्या निवृत्त झालेल्या कृष्णभक्तांचे मात्र डोळे वारंवार भरून येत होते. किती मनकवडा, दयाळू कृपाळू आहेस रे कृष्णा. भक्तांचे कौतुक करावे तर कृष्णानेच.

गणेशपुरीच्या नित्यानंद महाराजांनी, कर्नाटकात काननगड जवळ शंभर सव्वाशे गुहा खोदून घेतल्या होत्या. त्या गुहांची देखभाल करण्यासाठी त्यांनी त्यांचा शिष्य जनानंद स्वामी यांना तेथे राहायला सांगितले होते. जनानंद स्वामींची इच्छा होती की काननगड येथे नित्यानंद महाराजांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करावी. त्याप्रमाणे त्यांच्या शिष्यांच्या मदतीने तेथे मूर्तीची प्रतिष्ठापना करायचे ठरले. पण काय असेल ते असो, त्या कामाला काही गतीच येत नव्हती. एक ना दोन अडचणी येऊन काम मात्र रेंगाळत होते. गुरुतत्त्व कसे काम करत असते बघा - ह्या जनानंद स्वामींच्या शिष्याच्या नातवाला मनापासून वाटत होते की आपल्या आजोबांचे गुरू जनानंद स्वामी ह्यांच्या इच्छेची पूर्तता लवकरात लवकर व्हावी. म्हणून त्याने काय केले? तो बदलापूरला याबाबत मार्गदर्शन घेण्यासाठी कृष्णाकडे आला. तेव्हा कृष्णाने त्याला सांगितले होते, ''आता सर्व अडचणी दूर होतील आणि लवकरच मूर्तीची स्थापना होईल.'' त्याप्रमाणे पाचसहा महिन्यांतच स्थापनेची वेळ आली. त्या भक्ताने आठवणीने कृष्णाला आणि ताईंना आशीर्वाद द्यायला बोलावणे केले होते. त्यांच्यासाठी विमानाची तिकीटे, तेथे उतरवून घेण्याची व्यवस्था, राहण्याची सोय सर्व काही केले होते.

त्याप्रमाणे ताई आणि एक कृष्णभक्त त्या कार्यक्रमासाठी जाणार असं ठरलं. मुंबई ते मंगलोर विमानाने आणि पुढे काननगडपर्यंत गाडीने प्रवास असं ठरलं. पण विमानाची कन्फर्म तिकीटे नव्हती. ताई मात्र सांगत होत्या, अरे कृष्णाने मला त्याचा शेला बॅगेत ठेवायला सांगितला म्हणजे आपण जाणार हे निश्चित. त्याप्रमाणे ते विमानतळावर गेले. एअर इंडियाची फ्लाइट होती. कृष्णाकडे एक मेघा आसोंदेकर नावाची मुलगी येत असे. ती एअर इंडियात बुकिंग ऑफिसमध्ये नोकरी करत होती. त्या दिवशी नेमकी ती कामावर होती. तिला जेव्हा कळले की ताईंकडे वेटिंग लिस्टची तिकिटे आहेत आणि ताई विमानतळावर आल्या आहेत तेव्हा तिने ती तिकिटे घेऊन ताबडतोब बोर्डिंग पास आणून दिले.

ठरल्याप्रमाणे ताई काननगडला पोहोचल्या. समारंभ झाला. समुद्रकिनारी जिथे नित्यानंद महाराजांची मोठी मूर्ती आहे तेथे एक छोटासा कठडा आहे. त्यावर ताई बसल्या. नित्यानंद महाराजांसारखी पायाची अढी घालून बसल्या आणि म्हणू लागल्या, ''बघ, आता तो माझ्या जिवाला बाजूला करेल आणि तेथे स्वत: बसेल.'' आपल्या दृष्टीने दत्तपंथ, कृष्णपंथ असे दोन वेगळे पंथ असतील, तरी गुरुतत्त्व मात्र एकच असते, हेच जणू त्या दाखवून देत होत्या.

***

ॐ

कृष्णाने ९० सालपासून नवीन नियम केला की प्रश्नोत्तरांची वेळ फक्त सकाळची राहील. संध्याकाळी कृष्ण बोलणार नाही. ताईंना कृष्णाने सांगितले, ''ताई, आजपर्यंत म्हणजे दोन तपे मी तुझ्याकडून बहिर्मुख होऊन कार्य केले. आता अंतर्मुख होऊन कार्य करण्याकरीता मला ध्यानाची जास्त गरज आहे. म्हणून तू संध्याकाळी निर्विकार ध्यान कर. ती ध्यानाची वेळ साडेसहा ते साडेआठ अशी राहावी. त्या ध्यानाचा परिणाम माझ्या अनेक भक्तांसाठी होईल.'' त्याप्रमाणे ताईंचे २ जानेवारी १९९० पासून संध्याकाळचे ध्यान सुरू झाले.

आता कृष्णाने सांगायला सुरुवात केली, ''ताई, मी तुला १९५१ साली सांगितले होते, की तुला ९० साली अमेरिकेत घेऊन जाईन म्हणून. ती वेळ आता जवळ आली आहे. आपण ९० साली अमेरिकेत जायचं हं ताई.'' 'कृष्णा, अरे कसे शक्य आहे ते? माझी शाळा, एवढा खर्च, मुलांची अजून शिक्षणं चालली आहेत.' ''ताई, तू काळजी करू नकोस. ठरल्याप्रमाणे आपण जाणार. तू पासपोर्ट काढायला दे.''

थोडे दिवसांनी मुंबईचे एक कृष्णभक्त आले आणि सांगू लागले की ताई मी थोडे दिवसांनी अमेरिकेला भावाकडे जाणार आहे आणि त्यांचा आग्रहाचा निरोप आहे की तुम्ही पण माझ्याबरोबर आलेच पाहिजे. कृष्णाचं हे असंच असतं. तो जेव्हा कोणचीही गोष्ट सांगतो नं, तेव्हा त्याची योजना आधीच तयार झालेली असते. ताई सांगायच्या, 'अहो, मी आपली प्रायमरी शाळेतली शिक्षिका, अशी अमेरिकेत जाणे वगैरे स्वप्नात तरी शक्य होते का? पण कृष्णाने मला आपली ताई म्हटले. त्याचे कार्य करून घेण्यासाठी माझी निवड केली. तशीतशी माझी तयारी करून घेतली आणि अजूनही घेतोय, हा सर्व निव्वळ त्याच्या कृपेचा परिणाम.' कृष्णाने तेव्हा (१९५१ साली) सांगताना पुढे असेही म्हटले होते की, जगभर फिरून तुला कार्य करायचे आहे. बहुधा त्या कार्याची ही नांदी असावी.

१९९० साल उजाडले. कृष्णाने जायची तारीख सांगितली १२ मे १९९०. त्याप्रमाणे बाकीच्या तयारीला सुरुवात झाली. शाळेची परवानगी, रजा हे सर्व काही झाले. सगळ्या कृष्णभक्तांना भारीच कौतुक वाटत होते. आपल्या ताई यूएसला जाणार म्हणून कौतुकाने कोणी कोणी कृष्णाला लागणारे सामान, फोटो, चांदीची पाने, वस्त्र वगैरे आणून दिले होते. कृष्णाने परवानगी दिल्याप्रमाणे त्या कृष्णभक्ताने लुफ्तांसा एअरवेजचे १२ मे १९९०चे. त्यांचे तिकीट बुक केले. सातआठ तारखेपर्यंत व्हिसाचे काम झाले नव्हते. मात्र कृष्ण सांगत होता की मी तुला बारा तारखेला अमेरिकेत नेणार.

दहा तारखेला ताई कृष्णाला अभिषेक करत होत्या. त्यादिवशी वैभवीचा वाढदिवस होता. कृष्णाने वैभवीला बोलावले आणि सांगितलं, ''वैभवी, इकडे ये, आज मी माझ्या अमेरिकेतल्या कार्यासाठी इथून निघतो. ते कार्य केल्याशिवाय इथे परत येणार नाही. (तेव्हा खरं तर ताईंच्या हातात व्हिसा नव्हता) आणि लक्षात ठेव, मी येईपर्यंत कृष्णकुटीरची सर्व जबाबदारी तुझ्यावर टाकून चाललेलो आहे.'' अंबरनाथच्या विजूताई तेथेच होत्या. त्या म्हणाल्या की, 'लीलाताई, कृष्णाचे हे दृढनिश्चयाचे उद्‌गार कधीही खोटे होणार नाहीत. आता तुम्हाला व्हिसा असो का नसो तुम्ही बारा तारखेला तिकडे जाणार म्हणजे जाणार. तुम्ही आत्ता लगेच आवरा. मी ह्यांना फोन करून गाडी मागवते आणि आम्ही तुम्हाला मुंबईला सोडून येतो.'

असं म्हणून विजूताईंनी खरंच गाडी मागवली. भराभर सामान कसेबसे भरले आणि त्यांनी ताईंना नारकरकाकांकडे दादरला पोहोचवले.

ताई अकरा तारखेला अमेरिकन एम्बसीत पोचल्यावर तेथील कायदेशीर पूर्ततेत ताईंचा व्हिसा नाकारला गेला. त्यामुळे निराश झालेल्या ताई वैतागून कृष्णाला म्हणाल्या, 'अरे, तुला हे नसते उपद्‌व्याप कोणी सांगितले आहेत? मी थोडीच तुझ्या मागे लागले होते? आता प्रत्येकाने जे जे काही अमेरिकेला जाण्यासाठी आणून दिले होते ती वस्तून्‌ वस्तू परत करत बसते झालं.' त्या वेळेस कृष्ण जेवत होता, त्याने नारकरकाकांना हाक मारली. ''रमेश, इकडे ये. आज आता मी ताईच्या तोंडून जेवणार नाही. ती माझ्यावर रागावली आहे. मी आता वर्षभर तुझ्याच तोंडून जेवतो. माझ्या एका भक्ताला फोन करून बोलवून घेतो आणि त्याला सांगतो माझा व्हिसा घेऊन ये म्हणून.'' असे म्हणून कृष्णाने खरोखरच एका भक्ताला बोलावून घेतले. आणि सांगितले, ''जा आणि व्हिसा घेऊन ये.'' आज्ञेप्रमाणे तो भक्त गेला. आणि अडीचच्या सुमारास व्हिसा घेऊनच बाहेर आला. बहुधा अमेरिकन कॉन्सुलेटमधली ती एकमेव केस असेल, की ज्या दिवशी व्हिसा नाकारला, त्याच दिवशी पुन्हा फेरतपासणी करून व्हिसा मिळाला.

व्हिसा हातात आल्यावर कृष्णाने सांगितले, ''आज माझ्या कार्यासाठी ज्याची सही घेतली, त्याचा मी कायमचा बांधला गेलो.'' ताई पुढे सांगतात की, सध्या तो माणूस अमेरिकेत आहे. पण कृष्ण अधूनमधून त्याच्या अडचणींच्या वेळेस मला सांगतो तो माझा सहीवाला भक्त अडचणीत आहे. त्याच्यासाठी ध्यान कर. कारण कृष्ण त्याने दिलेला शब्द कधीच विसरत नाही. मग तो भक्त ताईला ओळखणारा असो वा नसो.

आता व्हिसा तर मिळाला, पण अकरा तारखेला लुफ्तांसाची यूएस फ्लाईट नव्हतीच. मग प्रयत्न करून तिकीट बदलून एअर इंडियाचे घेतले आणि त्याच रात्री ताई अमेरिकेकडे रवाना होऊन कृष्णाने सांगितल्याप्रमाणे १२ मे १९९० रोजी रात्री नॉर्थ कॅरोलिनाला पोहोचल्या.

अशा रीतीने १२ मे ९० ते १७ जुलै ९० ताईची अमेरिकाध्यानयात्रा झाली. जाताना फक्त दोनच भक्तांना भेटण्याचे निश्चित होते. भारतामध्ये अनेक वेळा कृष्णाने अनेक भक्तांसाठी ताईंकडून ध्यान करून घेतले होते. त्यातले काही ज्ञात, अज्ञात, अशा अमेरिकन भक्तांना ताई भेटून आल्या. कृष्णाचा प्रसाद, आशीर्वाद देऊन आल्या. जवळ जवळ सत्तर, ऐंशी घरी त्या जाऊन आल्या. तेथील प्रत्येक दिवस नवीन अनुभव घेऊन येत होता. कृष्ण जे एकावन्न सालापासून सांगत होता की तुला माझ्या कार्यासाठी उभे राहायचे आहे, त्यासाठी मी तुझी योग्य ती तयारी करून घेत आहे, त्याचा जणू प्रत्यय येत होता.

आजवरच्या जीवनातले अनेक प्रसंग, अनेक व्यक्ती त्यातून प्रत्येक वेळी कृष्णाने त्यांना उलगडून दाखवलेले प्रपंचातील आध्यात्मिक रहस्य सारं सारं ताईंच्या नजरेसमोरून जात होते. आजपर्यंतच्या आयुष्यात कृष्णभक्तांच्या अनेक तऱ्हा त्यांनी पाहिल्या; कोणी प्रश्न विचारणारे, कोणी मार्गदर्शन घेण्यापुरते, काही विशिष्ट भूमिका ठेवून कृष्णाने पाठवलेले, तर काही परिस्थितीनुसार व्यावहारिक व आध्यात्मिक दृष्ट्या काही काळापुरते कार्य करणारे. तेव्हाही कृष्ण सांगत असे,''ताई, माझ्याशिवाय कोणीही नित्य नाही. जोपर्यंत ज्याची त्याची पुण्याई असते, सद्वर्तनाचा पाठिंबा असतो, तोपर्यंतच मी त्या व्यक्तीची सेवा स्वीकारू शकतो. त्यानंतर मात्र ती व्यक्ती माझ्याजवळ, माझ्या संपर्कात माझ्या सेवेत राहूच शकत नाही. हे अनेक घटनांमधून, प्रसंगातून मी तुला दाखवून दिले. काळाच्या पोटात काय दडले आहे हे अजिबात सांगता येत नाही.''

''ताई, काळ पुढे पुढे जात आहे, आठवणी मागे राहात आहेत. आठवणी काढून त्याचे चर्वण करण्यात काहीच अर्थ नाही. आता पुढील प्रवासात माझ्या साथीने कसे चालायचे ते बघ.''

अमेरिकेत असताना एके दिवशीच्या ध्यानात कृष्णाने ताईंना वरील संदेश दिला व त्यावर ताई कृष्णाला म्हणाल्या, 'देवा, तुझा ओघ म्हणजे धावणारे चक्र म्हणून तुला पुढेच लक्ष ठेवावे लागणार. तू मागे वळला नाहीस, वळणारही नाहीस. पण आम्ही भूतकाळात गुंतणारे. म्हणून आम्हाला आठवणींचे गाठोडे बरोबर घ्यावे लागते. बाकी सर्व नाही घेतले तरी चालेल, पण तुझ्या सहवासाचे क्षण नक्कीच सोबत हवेत. तुझ्या शब्दावर, तू दिलेल्या वचनांवर आम्ही भार ठेवून असणार. त्या भारामुळेच तू आमच्याकडे परत परत पाहून आमची आठवण ठेवणार. मात्र आम्ही तुला आपला म्हणतो, तू एकदाच आम्हाला 'माझा' म्हटलेस, म्हणजे आमच्या जीवनाचे सार्थक झाले. कृष्णसहवास म्हणजे खूप मोठा सत्संग. तो आज अनुभवत आहे. त्यावरच सर्व काही अवलंबून आहे. कृष्णा, सतत हेच लाभो अशी प्रार्थना आम्ही करतो. देवा, ह्या सौख्याची तुलना कशाशीच होऊ शकणार नाही. देवा, तू आमचा हो आणि आम्हाला तुझा कर हीच तुझ्या चरणी विनम्र, संपूर्ण शरणागत होऊन प्रार्थना करते.'

वाहतो सर्व भार मी भक्तांचा
म्हणूनच स्वीकार करतो मी सर्वस्वाचा ।
भक्त माझा मी भक्तांचा
आनंद सर्व आहे या कल्पनेचा ।
काया वाचा मने स्मरा मजला
तुमच्या अवती भवती मी सज्ज जाहला ।
आठवते का तुम्हाला?
लोक म्हणती गरीब सुदामा ।
परंतु स्वीकारून चिमुट पोहे
कायम राखिले प्रेम ।
असा आहे मी योगेश्वर
म्हणती मला प्रेमसागर ।
रमतो मी निरंतर
श्रद्धा, विश्वास यांच्यावर

एके दिवशी कृष्णाने एका भक्ताला सांगितले, ''अरे ताईकडून मला जे कार्य करून घ्यायचे आहे नं, त्याचे स्वरूप, त्याची व्याप्ती काय असणार आहे ते आज तुला

सांगतो. तुझ्या वहीत ते लिहून ठेव-

''जगात सर्वत्र अशांतता पसरलेली आहे. प्रत्येक जण आपापल्या पंथात, मतात अडकून पडलेला आहे. माणसामाणसात द्वेष, वैर, मत्सर वाढत आहे. सर्व लोकात प्रेमाची भावना निर्माण करणे, जात, पात, सोवळे ओवळे ह्या सर्वांना ओलांडून जगात मानवतेच्या धर्माची पताका फडकत ठेवणे हे ताईच्या कार्याचे लक्ष्य आहे. कृष्ण म्हणजे सर्वांच्या आत्म्याला आकर्षित करणारा. प्रत्येकाची दृष्टी विशाल करण्याचे कार्य ताईला करायचे आहे. जनजागृती, आपुलकी, प्रेम, एकात्मता म्हणजेच अध्यात्मशक्तीचा पाया हे प्रत्येकाच्या मनात बिंबवण्यासाठी ताईचे चाललेले कार्य म्हणजेच कृष्णभक्तीचे कार्य.''

आज सकाळपासून कृष्णाने ताईंना ध्यान करायला सांगितले होते. बारापर्यंत ध्यान झाल्यावर कृष्ण म्हणाला की, ''ताई, आज तू भाकरी कर. आज जनाबाईच्या भाकऱ्या भाज.'' 'कृष्णा, करते हं, पण अरे जनाबाईच्या भाकऱ्या म्हणजे रे काय?' ''अगं जनाबाईच्या भाकऱ्या म्हणजे प्रेमाचे प्रकटीकरण. मी तुला त्या मुद्दाम करायला सांगतो त्याचे कारण, म्हणजे प्रेमाची उत्पत्ती व्हावी. तू काय करतेस, मी काय करतो त्याची जाणीव माझ्या भक्तांना असावी हा उद्देश. कारण सर्वसाधारणपणे जाणीव असते ती तात्पुरती. दोन दिवसांनंतर ते विसरतात. त्यांना वाटू लागते की जे घडले त्यात सर्व कर्तृत्व त्यांचेच आहे. ह्या 'मीपणात' कृष्णाने त्यांच्यासाठी काय केले हे ते सर्व विसरतात आणि त्यांचा पाय घसरतो. ते स्वत: स्वत:साठीच पोरकेही होतात. याची जाणीवही त्यांना फार उशीरा होते. त्याला नाईलाज आहे, कारण हा व्यवहार आहे. व्यवहारी माणसाचा दर्जा माझ्यासारखाच असावा हे अशक्यच आहे. मी नेहमी जे म्हणतो, की परमार्थ आणि व्यवहार ह्याची फारकत करू नका. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे मी.

''ताई, जनाबाईंच्या गोवऱ्यांची गोष्ट माहीत आहे नं. तिच्या पेशीपेशीत माझे नाम मुरल्याने तिने थापलेल्या प्रत्येक गोवरीतून विठ्ठल विठ्ठल असा नामघोष ऐकू येत असे. तशा तू केलेल्या भाकरीच्या कणाकणात तुझे माझ्यावरचे प्रेम आणि दृश्य--अदृश्य सृष्टीतील सर्व चराचरावर असलेले माझे प्रेमच प्रतीत होईल. ताई, तू म्हणजे माझ्या प्रेमयोगाचे मूर्तिमंत प्रतीक असावेस असे मला वाटतं.''

त्यावर ताई त्या भावसमाधीतून बाहेर येत म्हणाल्या, 'श्रीकृष्णा, लाडक्या, शेवटी आदी अंती तूच. तूच फक्त मला दिसतोस. कारण तुझ्यामुळेच मला बळ येते, ताकद येते, स्फूर्ती येते, प्रोत्साहन मिळते, शक्ती मिळते आणि त्यामुळे ॐकाराची जागृती होते.'

अशा रीतीने ताई आता सतत, ध्यान, चिंतन, मनन करत कृष्णभावातच स्थित असत. जसजसा ताईंचा सेवानिवृत्तीचा काळ जवळ येत चालला तसतशी ध्यानाची वेळ पण वाढत चालली होती. कृष्ण सांगत असे की ताई, माझ्या ज्ञात आणि अज्ञात भक्तांसाठी आणि विश्वशांतीसाठी अशा ध्यानाची गरज आहे. त्यामुळे रात्री २/२ वाजेपर्यंत ताई ध्यानातच असत.

एके दिवशी, कृष्ण म्हणू लागला, ''ताई, मी तुला कृष्णकुटीर झाल्यावर सांगितले होते, की पंधरा वर्षांनंतर ते तुला सोडायला लागणार. आता ती वेळ जवळ येत चालली आहे. तुझी मानसिक तयारी आहे नं? इतकी वर्षे तू जे काही केलेस ती संथ वाटचाल केलीस, आता तुला हा डोंगर चढायचा आहे. बघ तो चढायचा, का इथेच थांबायचे ते सांग. चढायचा नसेल तर इथेच थांबू या.'' बघते तर वरपर्यंत नजरही पोहोचत नव्हती. क्षणभर देखील विचार न करता ताई कृष्णाला म्हणाल्या, 'कृष्णा, तू जर मला सांगतोस तर मला काहीही विचार करण्याची गरजच नाही. मी तो नक्कीच चढणार अशी मला खात्रीच आहे.' ''ताई, माझ्या पायातल्या ह्या घुंगरवाल्या साखळ्या बघितल्यास नं, हे बघ, ही दुर्गम वाट चालताना, माझ्या ह्या घुंगराच्या मंजुळ नादाने तुला बरे वाटेल. तू तुझे कष्ट, त्रास, मनस्ताप विसरशील, कारण आता तुझी वाटचाल जगज्जननी होण्याकडे सुरू होणार. आता तुला तुझ्या तीनच नाही तर माझ्या असंख्य ज्ञात, अज्ञात लेकरांसाठी उभे राहावे लागणार. त्यांची आई म्हणून, माता म्हणून. म्हणून हे घुंगरू तू देहात असेपर्यंत मी काढणार नाही.''

***

ॐ

अखेर मे १९९२ मध्ये ताई शाळेच्या सेवेमधून मुक्त झाल्या. ताई निवृत्त झाल्या. नोकरी करत असताना कर्मभूमीतले कर्मभूमीत आणि कार्य भूमीतले कार्यभूमीत असा कृष्णाचा अलिखित नियम असल्याने त्यांनी अखंड कृष्णकार्य करत असताना, त्यांची कर्मभूमी जी शाळा तेथील कर्तव्य पार पाडण्यात कधीच किंचितही कसूर केली नाही. कृष्णाला कायमच कर्तव्य केलेले आवडायचे. कर्तव्य पहिले हेच ताईंचे जणू ब्रीदवाक्य होते. ताई अतिशय विद्यार्थिप्रिय बाई होत्या. अगदी खानापूरच्या शाळेपासून त्यांनी अर्थाजनासाठी शाळेव्यतिरिक्त कधीही खाजगी शिकवण्या घेतल्या नाहीत. मात्र, सुट्टीच्या दिवशीही त्यांच्या घरी मुले अभ्यासाला येऊन बसायची. खानापूरहून बदली झाल्यावर तेथील मुमताज नावाच्या छोटुकलीला, आपल्या शेणवीबाई आता येणार नाहीत. त्या दुसऱ्या शाळेत जाणार, हे पटतच नव्हते. ताई जेव्हा चिकोडीला निघाल्या तेव्हा ती रडत रडत त्यांना स्टॅण्डपर्यंत पोहोचवायला आली होती.

पुढे नंदाच्या जन्मानंतर, चिकोडीतल्या मुलांनी वर्गणी गोळा करून बाईंच्या बाळासाठी आहेर म्हणून मनिऑर्डरने दोन रुपये पाठविले होते. बाळासाठी आलेला हा माहेरचा आहेर बघून ताईनाही फार आनंद झाला होता.

ताईंच्या बरोबर गाडीने जाणाऱ्या-येणाऱ्या त्यांच्या कित्येक मैत्रिणींना त्यांचे हे कृष्णकार्य, त्यांची आध्यात्मिक वाटचाल ह्याबद्दल काहीही माहिती नसायची. त्याला कारण होते ताईंचे विलक्षण साधेपण. मात्र ह्याची कल्पना त्यांच्या मुख्याध्यापकांना होती. कधी कधी कोणा भक्तासाठी अचानक ध्यानाची गरज असेल किंवा तेथे जाण्याची गरज असेल तर कृष्ण आज्ञा करायचा,की हातातला खडू खाली ठेव आणि ताबडतोब अमुक अमुक ठिकाणी जाऊन माझ्या या भक्तासाठी ध्यान कर. तेव्हा ताई मुख्याध्यापकांच्या परवानगीनेच ध्यानासाठी जात असत. पण, त्यामुळे राहिलेला अभ्यास शनिवारी जादा तास घेऊन भरून पण काढत असत.

ताई निवृत्त झाल्यावर कृष्णाने सांगितले, ''ताई, तुझ्या निवृत्त होण्याची पार्टी म्हणून सगळ्या कुटुंबियांना आणि काही कृष्णभक्तांना घेऊन गोव्यात जाऊन यायचं.

त्याप्रमाणे ताईंची तीनही मुले, सुना, नातवंडे, व्याही आणि श्रीकृष्णाने सांगितलेले कृष्णभक्त असे २५-३० जण गोव्याला, मंगेशीला आणि मडकईला नवदुर्गेच्या दर्शनाला जाऊन आले. नवदुर्गा म्हणजे ताईंची साक्षात् आई. ताईंना तिने आदेश दिला होता की ह्या सगळ्यांना माझ्याकडे घेऊन ये आणि माझ्या पायावर घाल.

जून-जुलै मध्ये कृष्ण सांगू लागला, की ताई माझा दोह्याचा भक्त मला सारखा बोलवतो आहे. आपण ऑगस्टमध्ये दोह्याला जाऊ या. तेथे अनेक नियम, कायदेकानून, लोकांच्या एकत्र येण्यावर, पूजा पाठ करण्यावर पण अनेक निर्बंध! ज्यांना ज्यांना कळत होते ते जरा आश्चर्यच व्यक्त करत होते. कृष्णकृपेने व्हिसा मिळून ताई दुबई, शारजा, मस्कत आणि दोहा येथे ध्यानासाठी निघाल्या.

कृष्णकुटीरमध्ये येणारे काही भक्त दुबईमध्ये राहत होते. त्यांना ताई दुबईला येणार म्हटल्यावर अतिशय आनंद झाला. सगळी भक्तमंडळी कृष्णाच्या-ताईंच्या येण्याची वाट बघू लागली. ताई कोणाकोणाकडे जाणार, कुठे राहणार, कृष्णाला काय दाखवता येईल, असं सगळ्या भक्तांमध्ये अगदी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. सारखे फोन खणखणत होते. लोक एकमेकांना भेटत होते. निरनिराळे बेत ठरत होते. जणू साधुसंत येती घरा तोची दिवाळी दसरा असे वातावरण तयार झाले होते. तेथे ताई अनेक भक्तांना भेटल्या, त्यांच्या घरी जाऊन त्यांनी ध्यान केले. शारजाला जाऊन आल्या. पुढे मस्कतला पण गेल्या. त्याआधी श्रीकृष्ण ताईंना म्हणत होता, ''ताई मस्कतला मला एक केंद्र स्थापन करायचे आहे.'' ताईंना काही कळेना, 'कसले केंद्र कृष्णा?' ''अगं आता सामुदायिक उपासना व्हायला पाहिजे. आत्ताच्या काळात त्याची अत्यंत गरज आहे. सामुदायिक मंत्रजपाने ज्या नादलहरी वातावरणात उत्पन्न होतात, त्यातून सकारात्मक शक्तींची अनेकपटींनी वाढ होते. सामुदायिक नामस्मरण होण्यासाठी मला कृष्णकेंद्र काढायचे आहे.'' ताईंनी आपलं 'हो का कृष्णा'. असं म्हटलं आणि त्या मस्कतला चोथाभाई म्हणून एक भक्त होते त्यांच्याकडे आल्या. चोथाभाईंची फार इच्छा होती, की अनायासे ताई आल्याच आहेत तर आता आपण त्यांना पूर्ण मस्कत शहर फिरून दाखवू या. त्याप्रमाणे त्यांनी ताईंना विचारल्यावर, कृष्ण म्हणाला की, ''अरे, मला शहर फिरण्यात स्वारस्य नाही. मी येथे कार्यासाठी आलोय. मला माझे एक केंद्र इथे स्थापन करायचे आहे. त्यासाठी खिमजी परिवारातला माझा भक्त मला मदत करेल.'' आता कोणते खिमजी? त्यांना माहीत असलेल्या एकेक खिमजी परिवारांचा उल्लेख करून ते कृष्णाला विचारू लागले. त्यापैकी रमेश खिमजींचा

उल्लेख केल्यावर कृष्ण ताबडतोब बोलला, ''अरे, रमेशच माझे काम करणार. त्याला फोन लाव बरं.'' चोथाभाईंनी त्याप्रमाणे फोन लावला ते दोन तीन दिवस बाहेरगावी जाणार होते. असे ते म्हणताच, कृष्ण म्हणाला की, ''अरे, मी तुझ्याकडे यायचे म्हणतोय, तर तू काय बाहेर जातोयस?'' ते त्वरित म्हणाले, 'नाही हं, मी नंतर जाईन. तुम्ही आमच्याकडे याच.' त्याप्रमाणे चोथाभाई ताईंना घेऊन त्यांच्याकडे गेले. कृष्णाने ह्या रमेश खिमजींना केंद्राची कल्पना देऊन विचारले, ''इथे असे केंद्र करायचे आहे तुम्हाला जमेल का ते?'' त्यांनी तत्काळ संमती दिली. योगायोग असा की, रमेश खिमजी मस्कतला एक कृष्णमंदिर बांधत होते. पण त्या बांधकामात सतत अडचणी येत होत्या व आता तर त्या मंदिराचा पाया खचत चालला आहे अशी शंका येऊन ते अत्यंत चिंताग्रस्त होते. त्यांनी आपली ही अडचण सांगून कृष्णाला प्रार्थना केली की, त्याने एकदा आपल्या नजरेखालून ते बांधकाम घालावे. कृष्णाने तत्काळ होकार दिला. आणि लगेचच त्या बांधकामाच्या ठिकाणी जाऊन आले. आपली दिव्य नजर त्या बांधकामावर फिरवून आल्यावर कृष्णाने रमेश खिमजींना आश्वासन दिले, ''अरे, तू अजिबात काळजी करू नकोस. मी छान बांधकाम करून घेतो. पाया खचण्याचा वगैरे काहीही धोका नाही.'' जणू खिमजींच्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यासाठीच ही कृष्णभेट होती.

१२ सप्टेंबर ९२ रोजी मस्कतचे पहिले श्रीकृष्णलीलाकेंद्र स्थापन झाले. सुमारे चारपाचशे लोक जमले होते. अतिशय भव्य, दिव्य असा समारंभ झाला. अनेक ज्ञात-अज्ञात भक्त कृष्णाचा प्रसाद, आशीर्वाद, फोटो घेऊन गेले. आता ताईंना उलगडले की ह्या वेळेस बदलापूरहून निघताना इतके स्टीकर्स, फोटो, चांदीची तुळशीची पाने कृष्णाने का घ्यायला लावली होती. विचारले अर्थातच इतर भक्तांनी (कारण ताई कधीच हे कशाला आणि ते कशासाठी असं कृष्णाला विचारत नाहीत. त्यांच्या दृष्टीने 'कृष्णाने सांगितले' एवढेच पुरेसे असे) तर नुसतेच सांगत होता, मला लागणार आहेत असे.

मस्कतला येण्यापूर्वी ताई दोह्याला गेल्या होत्या. दोहा म्हणजे अत्यंत कडक कायदेकानून असलेला देश. तेथेही ताई अनेक भक्तांकडे ध्यानाला जात होत्या. सत्संग होत होता. मात्र कृष्णाने सर्व भक्तांना निक्षून सांगितले होते, की येथल्या कोणत्याही नियमाचे, कायद्याचे कोणीही उल्लंघन करू नका. मग ती कितीही छोटी गोष्ट का असेना! अगदी सातआठ पेक्षा जास्त लोक एकत्र जमण्यावरून असू देत वा पार्किंगसंबंधी असू देत, जेथे आपण असतो तेथले नियम पाळून राहिलेलेच कृष्णाला आवडते, असे ताई आवर्जून सांगत होत्या.

दोह्यात असताना कृष्णाने सांगितले की इथून पुढे मी मस्कतला जाणार. तेथे पहिले श्रीकृष्णलीलाकेंद्र स्थापन करणार. त्यावर दोह्यातल्या भक्तांनी विचारले ‘कृष्णा, मग दोह्यात कधी करणार?’ ‘‘अजून सातआठ वर्षांनी मी पुन्हा येईन तेव्हा इथे केंद्र करेन.’’ असे कृष्णाने आश्वासन दिले. त्याप्रमाणे पुढे ९९साली ताई परत दोह्यात आल्या असताना खरोखरच तीन केंद्रं स्थापन झाली. सध्या ते तीनही भक्त भारतात परत आल्याने आता तेथे केंद्र नाही. परंतु श्रीकृष्णाने नववी विश्वजननी मात्र दोह्यात स्थापन करणार असल्याचे सांगितले आहे. कृष्णवचनच ते. निश्चितच खरे होणार. पण कधी होणार ते कृष्णालाच माहीत.

दोह्यात असताना एका स्त्रीभक्ताला सांगितले, ‘‘मला चप्पल हवी आहे. आपण ती घ्यायला जाऊ.’’ वेळ भर दुपारची होती. त्या भक्ताच्या गाडीत एसी नव्हता. त्यांना वाटले की ताईंना इतक्या उन्हातून अशा गाडीतून कसे न्यायचे? त्यांना त्रास होईल. तसं ताईंना सांगताच त्या म्हणाल्या, ‘नाही नाही. काही होणार नाही. कृष्णाचे काम पहिले व्हायला हवे. चल आपण जाऊ. त्याला आपली काळजी आहेच नं.’

कृष्णाने ताईंना ती चप्पल पायात घालून तीन दिवस एका भक्तासाठी ध्यान करायला सांगितले होते. त्याप्रमाणे ताईंचे ध्यान सुरू झाले. झोपेतही पायतली चप्पल निघाली तर कृष्ण ताईंना जागे करून ती पुन्हा घालायला लावत असे. ताई अशा ध्यानात असतानाच, त्यांना भेटायला काही बायका आल्या होत्या. ताई ध्यानात देवघरात बसल्या होत्या. पायात चपला पण होत्या. ते पाहून त्या बायका आपापसात हळू आवाजात बोलू लागल्या, ‘काय कमाल आहे बघा, देवाजवळ चप्पल घालून बसल्या आहेत. बघावे तो एक एक अजबच आहे.’ एवढ्यात ताईंनी त्यांना आवाज दिला, ‘बसा हं. येतेच मी. ध्यानातच होते. कृष्णाने सतत तीन दिवस पायात ह्या चपला घालून ध्यान करायला सांगितले आहे. कोणासाठी एवढी वणवण करतो आहे, कोण हा भाग्यवान भक्त आहे कृष्णच जाणे.’ त्या बायका चपापून एकमेकींकडे पाहू लागल्या. त्यांच्या सगळ्याच प्रश्नांची उत्तरे न मागताच त्यांना मिळाली होती.

ताई जेव्हा दोह्याला ९२ साली गेल्या होत्या, तेव्हा एक कृष्णभक्त ताईंना म्हणाले, ‘ताई, तुम्हाला मला एक ठिकाण दाखवून आणायचे आहे. कृष्ण येणार का?’ कृष्णाने सांगितले, ‘‘चल, जाऊ या आपण.’’ त्याप्रमाणे ते फिरायला गेले. तेव्हा वाटेत एका ठिकाणी बोट दाखवून कृष्णाने सांगितले, ‘‘मी मूर्ती स्थापन करायला काही वर्षांनी इथे येणार.’’

त्यानंतर दोनचार वर्षांनी त्याच भागात बिल्डींगसाठी खोदकाम करत असताना गायीसह असलेली एक कृष्णाची मूर्ती एका स्थानिक कामगाराला सापडली. तो परधर्मीय असल्याने खरं तर ती मूर्ती आहे हेही त्याला कळले की नाही कोणास ठाऊक? त्याने ती दगड म्हणून फेकूनही दिली असती. पण तसं घडलं नाही. त्याने तेथे असलेल्या एका गुजराथी का बंगाली माणसाकडे हे काय आहे ते बघा असं म्हणत ती मूर्ती नेऊन दिली. त्यांनी ती ठेवून घेतली व तेव्हापासून त्या घरात गोकुळाष्टमी साजरी होते.

दोह्याला असताना कृष्णाने खालील संदेश आपल्या भक्तांसाठी लिहून ठेवला.

''मानवाच्या जीवनात मी फार उच्चस्थानी आहे. त्याने माझ्याकडे एकदाच कनवाळू नजरेने पाहिले तर माझे सहस्र हात त्याच्यासाठी काम करीत असतात. म्हणून प्रत्येक वेळी माझी आठवण ठेवा. मला स्मरा म्हणजे मी तुमच्यासाठी उभा आहे. मी भक्ताला ओळखतो तो त्याच्या भांडारावरून आणि मी मानतो ते भांडार म्हणजे पूर्ण श्रद्धा. लहान, मोठा, गरीब, श्रीमंत मी काही जाणत नाही. मीच कुबेर आहे. त्यामुळे प्रत्येकाला जे काही दिलेले आहे, ते मीच दिलेले आहे. त्यामुळे श्रीमंताकडे कृष्ण जातो असे जर कोणी म्हटले तर त्यांच्याइतके अज्ञानी तेच. मीच सर्वात मोठा कुबेर आहे, हे ते विसरलेले असतात. मी ज्यांच्या घरी जातो ते सर्वात मोठे कुबेर, कारण कुबेराची माझी व्याख्या फार आगळी आहे. ती म्हणजे 'माझ्यावर असणारी पूर्ण श्रद्धा ही माझी संपत्ती' माझे स्थान म्हणजे तुमचे हृदय. तुमच्यातच मी वावरतो. तुमच्यातर्फेच मी काम करतो आणि तुमच्याकडूनच सर्व कामे करून घेतो. मी एकाच वेळी अनेक ठिकाणी वावरतो ह्याचा तोच अर्थ होतो.''

***

ॐ

३१ डिसेंबर १९९२. कृष्णाने सांगितले, ''१९९३ साल हे माझ्या कार्याच्या दृष्टीने फारच महत्त्वाचे आहे. माझा ह्या वर्षीचा संदेश, श्रद्धास्थान ढळू देऊ नका. म्हणजे मी तुमच्यासाठी उभा राहीन. आता ह्या ठिकाणी प्रत्येकाचे श्रद्धास्थान वेगवेगळे असू शकते. कोणी गणपती, कोणी साईबाबा अशा वेगवेगळ्या रूपात मला पाहतात. ते सर्व शेवटी मलाच पोहोचते. फक्त रूपे वेगवेगळी. जसे, नाना अलंकारी सुवर्ण त्याप्रमाणे मी आहे. म्हणून मी सर्व माझ्याकडे घेतो. कारण मी 'पूर्णब्रह्म' आहे. ॐकार माझेच रूप आहे. म्हणून निक्षून सांगतो की, हे वर्षच असे आहे. माझी मदत पाहिजे असेल तर श्रद्धास्थानावर पूर्ण विश्वास ठेवा. म्हणजे मला तुमच्यासाठी उभे राहावयास सोपे जाईल.''

आता ताईंना कृष्ण सांगत होता, ''ताई, आता तुला माझ्या खूप भक्तांसाठी ध्यान करायचे आहे. आता शिवशक्तीची आराधना पण व्हायला हवी. म्हणून आता आपण जायचे रामेश्वर आणि कन्याकुमारीला.'' २५ फेब्रुवारी १९९३ ते ११ मार्च ९३ ताईंबरोबर डोंबिवलीचे भक्त या यात्रेत होते. त्याच यात्रेत ते त्रिवेंद्रम, मद्रास, पॉन्डेचरी आणि पद्नाभ मंदिर येथे पण गेले होते.

कन्याकुमारीहून आल्यावर कृष्णाने सांगितले, ''मला २४ ते २६ असे तीन दिवस अज्ञात स्थळी ध्यानाला जायचे आहे.'' ही जबाबदारी कृष्णाने एका कृष्णभक्तांवर सोपविली. कृष्ण ताईंना सांगत होता, ''ताई माझ्या कार्याच्या योजनेसाठी व प्रत्यक्ष कार्यासाठी लागणारी ताकद तुला आणि कार्याला मदत करणाऱ्या भक्तांना देण्यासाठी ह्या ध्यानाची खूप मदत होणार आहे. त्यामुळे मला कोणाचाही संपर्क नको.''

दुसऱ्या दिवशी ध्यानाच्या वेळेस कृष्णाने कोणालाही अगदी घरमालकांनाही घरात थांबू दिले नाही. सकाळचे असे एकांतातले ध्यान अगदी गाढ, छान झाले. मात्र ध्यान संपवून ताई जेव्हा उठल्या तेव्हा त्या घामाने अगदी डबडबल्या होत्या. खूप लांबचा प्रवास करून आल्यासारख्या शिणल्या होत्या. नंतर त्या सांगत होत्या, 'आजच्या

ध्यानात कृष्ण मला खूप लांब, अगदी डोंगरदऱ्यात घेऊन गेला. तेथे एका गुहेत एक सत्पुरुष ध्यानस्थ बसले होते. त्यांचे डोळे अगदी शांत व सात्त्विक दिसत होते. मला कृष्णाने त्यांच्यासमोर उभे केले. मग तो म्हणाला, ''हे सत्पुरुष तुझ्या डोक्यावर हात ठेवतील. ते तुला खूप ज्ञान देतील. ते फार आवश्यक आहे.'' त्यावर मी कृष्णाला म्हटलं, 'कृष्णा मला फसवतोस काय? एवढी शांत नजर तुझ्याशिवाय कोणाची असेल सांग बरं आणि त्यातून तुझ्याशिवाय अन्य कोणाचाही हात माझ्या डोक्यावर ठेवलेला मला नको आहे. तू असताना ज्ञान देण्यासाठी मला इतर कोणाचीही जरूरी नाही.' असे मी सांगताच कृष्ण म्हणाला, ''असे म्हणतेस, तर मग मीच तुला ज्ञान देऊ का? ऐक तर मग.'' असं म्हणून सतत तीन तास काही सांगत राहिला. मी त्याला म्हटले, 'कृष्णा, अरे ह्यातलं मला अक्षरही समजत नाही आणि लक्षात पण राहणार नाही.' त्यावर तो लगेच म्हणाला, ''ताई तुला नाही समजलं तरी चालेल, पण हे ज्ञान तुझ्या शरीरात सामावलेले राहू दे.'' हे गूढज्ञान संपादन करून ताई परत आल्या त्या अगदी थकलेल्या अवस्थेत. तरीही चेहरा मात्र तेजस्वी आणि आनंदित दिसत होता.

नव्वद साली अमेरिकेतून परत येतानाच कृष्णाने तेथील भक्तांना सांगून ठेवले होते, ''मी आता तीन वर्षांनी परत येणार आणि येईन तेव्हा तुमच्यासाठी काहीतरी योजना करून येईन.'' त्यावर ताई हसत हसत म्हणाल्या होत्या, 'कृष्ण येणार म्हणतोय तर तसे घडेलही. पण ताई म्हणून जर मला विचाराल तर पुन्हा तीन वर्षांनी इकडे येणं हे मला तरी शक्य नाही.'

कृष्णाच्या या सांगण्याप्रमाणे आता ती वेळ आली होती. कृष्ण सांगू लागला, मी आता अमेरिकेला जाणार. आता मला माझी तयारी करायला पाहिजे. खरं तर असं कृष्ण सप्टेंबर-ऑक्टोबर पासूनच म्हणत होता. थोडे दिवसांनी अमेरिकेच्या दोनतीन भक्तांचे फोन आले. 'आम्ही तुम्हाला तिकीट पाठवतो.' मी तसं कृष्णाला सांगितले तर कृष्ण म्हणाला, ''बरं. पण मला ते इतक्यात नाही ठरवता येणार. कारण माझ्या कार्यासाठी कोणाची सेवा स्वीकारायची ते अजून ठरवायचं आहे. मी एका भक्ताच्या वचनात बांधील आहे. एक डिसेंबरपर्यंत मी त्याच्याकडून येणाऱ्या तिकीटाची वाट बघणार आहे. तेव्हा तुम्ही मला ३ डिसेंबरला फोन करा. तोपर्यंत इतरांची सेवा मला स्वीकारता येणार नाही.'' त्यानुसार एका भक्ताचाच फोन आला, 'तिकीटे पाठवू का?' त्यावर जाणे गरजेचेच आहे का? इथूनही ध्यान होऊ शकते. अशा विचारांच्या संभ्रमामुळे ताई जाण्यास नको म्हणत होत्या. मात्र कृष्ण त्या भक्तास म्हणाला, ''तू ताईचे काही ऐकू

नकोस. मला पुढच्या यंग जनरेशनसाठी तेथे यावेच लागणार आहे. म्हणून या सामुदायिक कार्यासाठी तुझी सेवा मी स्वीकारेन. मला बारा ते पंधरा मेच्या दरम्यानचे एअर इंडियाचे तिकीट पाठव.'' थोडे दिवसांनी त्यांचा फोन आला की, 'कृष्णा, एअर इंडियाचा तर आता संप चालू आहे, तर ताई कशी येणार?' कृष्ण म्हणाला, ''एकदाच सांगतो मी एअर इंडियानेच येणार. तोपर्यंत संप मिटेल. तू बारा ते पंधरा मेच्या दरम्यानचे तिकीट पाठव.''

त्याप्रमाणे ताई जेव्हा तिकडे जाणार असं ठरलं तेव्हा कृष्णाने सांगितलं की, ''ताई. ह्यावेळेस मला तीनशे फोटो लागणार आहेत.'' अशा वेळेस ताई काही कोणाला सांगायला जात नाहीत. पण कोणीतरी येतो आणि त्या वस्तू अर्पण करून जातो.

ह्या वेळेस कृष्ण जी योजना करून आला होता त्याचा दृष्य परिणाम म्हणजे, कॅलिफोर्नियामध्ये कृष्णाने अमेरिकेतले पहिले श्रीकृष्णलीलाकेंद्र श्रीमती शशी बाळ यांचेकडे दिनांक १८ ऑगस्ट १९९३ रोजी सुरू केले.

त्यावेळेस मार्गदर्शन करताना ताईंनी सांगितले, 'सामुदायिक उपासना म्हणजेच एकीचे बळ. खरा धर्म म्हणजे मानवता धर्म. तो कळण्यासाठी लागणारी ॐकाराची जागृती. ती कशाने होऊ शकते, तर ह्या काळाला अनुरूप आणि आवश्यक असा जो चैतन्यदायी, प्रेरणादायी मंत्र, 'ॐ नमो भगवते वासुदेवाय,' त्याच्या जपाने, पुनरुच्चाराने होऊ शकते. कोणी कितीही गप्पा केल्या तरी कृष्णाच्या आधाराशिवाय आपल्या जीवनाला अर्थच नाही. म्हणूनच कृष्णावर विश्वास ठेवून, त्याचा हात धरून मार्गक्रमणा केलीत तर कृष्ण तुमचा सर्व भार वाहतो. ''तुम्ही सर्वांनी आपल्या भक्तीने, प्रेमाने, श्रद्धेने आपल्याकडे मला खेचून आणलेलं आहे. मीही तुमच्यासाठी आलेलो आहे. उभा राहिलो आहे. असाच मला उभा ठेवा आणि माझ्याकडून तुमच्यासाठी सर्व काही करवून घ्या. मी ते करेनच' असे वचन कृष्णाने दिले.

त्याचप्रमाणे कृष्ण जे म्हणतो की, मी काळाप्रमाणे बदलतो; त्याचाही अर्थ सांगितला. '' तुम्ही 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' या मंत्र जपासाठी सगळ्यांनी एकत्र येऊन त्याचा पुरेपूर आनंद लुटा आणि विश्वशांतीच्या या यज्ञाला आपल्या अस्वास्थ्याची आहुती द्या. ती दिली की त्यातून निघणारी ज्योत आपल्याला ज्ञान, प्रकाश आणि उत्साह देऊन आपले जीवन सुसह्य व्हायला मदत करेल. शिवाय तुमच्या सहवासात येणाऱ्यांवरही तिचा प्रभाव पडून त्याच्या जीवनात तुमची ज्योत प्रभावी होऊन त्यांनाही तेजोमय होण्यास तुमची फार मदत होईल. त्याप्रमाणे हे कार्य वाहतच जाईल, पसरत

जाईल. आता आपल्याला यज्ञासाठी समिधा गोळा करायला लागणार नाहीत. तुमच्या भक्तिरसातूनच प्रेमाची, आपुलकीची आणि मानवताधर्माची तेज:पुंज ज्योत निर्माण होणार आणि अनेकांच्या जीवनात ती मार्गदर्शक ठरणार हाच या काळाचा यज्ञ आहे. त्याची आता फार गरज आहे. ती गरज पूर्ण करण्यासाठीच मी आलो.''

कृष्णाने पुढे ठिकठिकाणी अजून दहा केंद्र स्थापन केली. आता कृष्णकेंद्रांची संख्या झाली १२. यूएसएच्या या ट्रीपमध्येसुद्धा कृष्णाचे सतत ध्यान चालू होते. अनेक लोकांकडे जाऊन तेथे ध्यान करणे, लोकांना मार्गदर्शन करणे, कृष्णभक्तीचे मर्म उलगडून त्याचे बीजारोपण करणे, असे न थकता अविश्रांतपणे चालू होते. भक्तांचा भरभरून प्रतिसादही मिळत होता.

कृष्ण वारंवार सांगत होता की, तुमच्यासाठी आणि तुमच्या पुढच्या यंग जनरेशनसाठी तुमच्यातल्या ॐकाराची जागृती होण्याची अत्यंत गरज आहे. त्यासाठी 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' ह्याच मंत्राची आराधना करा. ह्या आराधनेची विश्वशांतीसाठी अत्यंत गरज आहे. या विश्वाचा तुम्ही प्रत्येकजण एक घटक आहात. आज जर आपण पाहिलं तर घरोघर बाकी भौतिक सुखं हात जोडून उभी आहेत. वर वर बघितलं तर सगळं चांगलं आहे. पण समाधान, मानसिक शांती म्हणाल तर ती मात्र अजिबात नाही. ती शांती तुम्हाला फक्त माझ्या सान्निध्यातच मिळू शकणार आहे. माझ्यात आणि तुमच्यात सान्निध्य निर्माण करायचं असेल, तर तुमच्यामध्ये जागणारा, वावरणारा मी तसेच तुमच्यामध्ये असलेली ताकद, शक्ती ह्या सर्वांमध्ये जागणारा जो ॐकार आहे त्याची जागृती व्हायला पाहिजे. त्यासाठी 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' ह्या महान मंत्राचा जप माझ्या सगळ्या भक्तांना करायला सांग, असं श्रीकृष्णाने बजावून बजावून सांगितले. पुढे असंही म्हणाला की आता जो मी अमेरिकेत चाललो, तो केवळ माझ्या भक्तांना हा साधा, सहज, सुलभ, सोपा मार्ग दाखविण्यासाठीच चाललो आहे.

त्या वेळेस जी केंद्रे झाली त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक वेळी कृष्णभक्त आपल्या कुटुंबातील छोट्या मुलांसह आले होते. हा मंत्र त्या मुलांनी पण म्हटला. काहींनी सांगितले, 'आम्हाला म्हणता येत नाही. तुम्ही शिकवा.' काहींनी तो इंग्लीशमध्ये लिहून घेतला. त्यामुळे नक्कीच ह्या मंत्राचे बीज तेथे रुजले असले पाहिजे.

त्यावर तेथल्या काही भक्तांनी सांगितले, 'ताई, तुम्ही जे हे कार्य सुरू केलेले आहे, ते खरोखरच फार आनंददायक आहे. ह्यातून आम्हाला मार्गदर्शन मिळते.' त्यावर

ताई म्हणाल्या, 'खरं सांगू का, तुम्ही जे म्हणालात नं, की हे जे कार्य 'मी' करते, ते व्यावहारिकदृष्ट्या बोलताना आपण बोलतो. खरं सांगायचं तर हे सर्व कृष्णाची इच्छा म्हणूनच होतं. श्रीकृष्णभक्तांच्या प्रेमाच्या वर्षावामुळे ते कार्य जास्तीत जास्त फोफावत, पसरत जाते आहे, जाणार आहे असे मला निश्चित वाटते.'

ताई ५ सप्टेंबर ९३ला अमेरिकेहून परत आल्या. त्याच दिवशी कृष्णाने त्यांना सांगितले, ''ताई, उद्यापासून बावीस सप्टेंबरपर्यंत आता तू उंबरठाही न ओलांडता सतत ध्यान करायचे आहेस. अमेरिकेत मी माझ्या अनेक भक्तांना वचन देऊन आलो आहे. त्याची पूर्तता करण्यासाठी मला ह्या ध्यानाची अत्यंत आवश्यकता आहे.'' फार पूर्वीपासूनच कृष्णाने सांगायचे आणि ताईंनी त्याची आज्ञा तंतोतंत पाळायची हा सिलसिला चालूच होता. त्याप्रमाणे हे पंधरा-सोळा दिवस ताईंनी उंबरठासुद्धा न ओलांडता गाढ ध्यान केले.

ऑक्टोबर महिन्यात कृष्णाने पुन्हा ताईंना काही भक्तांना घेऊन मंगेशी, मडकईला जाऊन पुढील कार्यासाठी मंगेशाचे आणि नवदुर्गेचे आशीर्वाद घेऊन यायला सांगितले.

कृष्णाकडे सकाळी साडेआठ ते दहा या वेळात मार्गदर्शनासाठी येणाऱ्या लोकांची खूप गर्दी होऊ लागली. गावोगावहून लांबून लांबून लोक आपल्या अडचणी सोडवण्यासाठी कृष्णकुटीरमध्ये येऊ लागले. ताईंच्या मार्फत त्यांना त्यावरचे उपायही मिळू लागले. अनुभव असा की एकदा कृष्णकुटीरमध्ये अडचणीच्या निमित्ताने आलेला माणूस परत परत नकळत तेथे येतच राहिला. पूर्ण कृष्णमय झालेल्या माउलीला साक्षात् भेटण्यासाठी, त्यांच्या तोंडून त्यांच्या लाडुल्याच्या लीला ऐकण्यासाठी त्यांची पावले कृष्णकुटीरकडेच वळत असत.

ताईंच्या ध्यानाच्या वेळा पण आता वाढू लागल्या. निवृत्त झाल्यानंतर कृष्णाने दुपारची दोन ते तीन ही वेळ ध्यानाची म्हणून सांगितली होती. त्याप्रमाणे आता अमेरिकेहून आल्यावर रोज रात्री अकरा ते बारा विश्वशांतीसाठी आणि बारा ते एक व पहाटे दोन ते पाच माझ्या सर्व ज्ञात आणि अज्ञात भक्तांसाठी ध्यान कर असं कृष्णाने सांगितले. ताई सांगत की रात्रीच्या ध्यानाच्या वेळा पाळण्यात कृष्णकृपेने कधीच अडचण येत नसे. पण दुपारची दोन ते तीन ही वेळ मात्र कधी कधी पाळता येत नसे. कारण सकाळी आलेले भक्त प्रसाद वगैरे घेऊन जाऊन पुढे आमची जेवणं होईपर्यंत कधी कधी अडीच-पावणेतीनसुद्धा होत असत. पण कृष्ण इतका दयाळू, कृपाळू आहे, की सांगायचा

''ताई हरकत नाही. आता साडेतीनपर्यंत ध्यान कर.'' संध्याकाळी सात ते आठ हीपण त्याची महत्त्वाची ध्यानाची वेळ आहे. कोणासाठी म्हणून ताईंना जेव्हा ध्यान करायला सांगे ती वेळ बरेच वेळा सात ते आठचीच असायची.

ताई कधीकधी त्यांच्या ध्यानावस्थेबद्दल बोलताना सांगायच्या, 'हा जो फुलांच्या पाकळ्यांचा अभिषेक मी करते नं तो मी माझ्या ज्या हजारो भक्तांची जबाबदारी घेतली आहे त्यांच्यासाठी करते. मी जेव्हा उभी राहून ध्यान करते नं तेव्हा माझा एक पाय असा दिडका झाल्यासारखा दुसऱ्या पायावर येतो. माझ्याही नकळत; आणि मी फुलांचा हार तोडून अभिषेक करत असते, तेव्हा तो पुढे आलेला पाय मला दिसत नाही. मात्र जाणवत असतो. मी तुझ्यातर्फे वावरतो, असे जे कृष्ण सांगतो नं, त्याचा तो परिणाम आहे.

अनेकदा मी जेव्हा ध्यान करते, तेव्हा माझं शरीर इतकं हलकं होतं की विचारू नका. अनेक वेळा लोक सांगतात, माझे पाय जमिनीपासून फूटभर तरी वर होतात. त्यांना ते दिसते. पण मला तसे ते जाणवत नाही.'

कृष्ण अलीकडे 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' या मंत्राचे महत्त्व सतत सांगत होता. त्या संदर्भात एकदा कृष्णाने पुढील संदेश दिला.

''रोज 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' ह्या मंत्राने आपला दिवस सुरू करावा. म्हणजेच आपल्या सर्व हालचालींवर, वागण्यावर भगवान श्रीकृष्णाची नजर रहाते. दिवसाची सुरुवात म्हणजे माणसाच्या सर्व हालचालींची सुरुवात. त्या दिवशी करावयाची कामे, कर्तव्ये ह्या सर्वांची सुरुवात. मग त्याचे विचार व विचाराप्रमाणे कृती करून घेणारा जो 'तो' म्हणजेच ॐकार. आपल्यामध्ये जागणारा, पावलोपावली आपल्यासमोर कोणत्या ना कोणत्या रूपात वावरणारा तो म्हणजे परब्रह्म. त्याला हे वंदन होते. ह्या मंत्राने दिवसाची सुरुवात म्हणजे पुढे येणाऱ्या सर्व क्षणांची जबाबदारी परब्रह्माची!

दिवसभरात सतत चांगलेच समोर येईल असे अजिबात नाही. कारण जीवन म्हणजे सुखदु:खाचा खेळ. त्यामुळे थोडे जरी मनाविरुद्ध घडले, तरी आपल्या मनात सुप्त असलेला क्रोध उफाळून येतो व क्रोधाचेच विचार चालू होतात. त्यामुळे होणाऱ्या यातनाही आवरता येत नाहीत. ह्या यातना म्हणजे निराशेला आमंत्रणच असते. हा क्रोध, ही निराशा म्हणजे जणू काही ह्या मार्गातले धोक्याचे कंदील. आपण घसरू नये म्हणून सतत प्रयत्नशील राहावे लागते. आणि तो प्रयत्न म्हणजेच 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' ह्या मंत्राने आपल्या दिवसाची सुरुवात करणे. अर्थात हे सांगणे फारच सोपे.

पण ते आचरणात आणणे अत्यंत अवघड. हे कृष्णाच्या कृपेशिवाय, आशीर्वादाशिवाय घडूच शकत नाही. त्याची कृपा म्हणजे आपल्या मनाचा तोल जाऊ न देणे. त्याचा आशीर्वाद म्हणजे मनाला सावधगिरीने वागायला लावणे. हे सर्व व्हावे म्हणून आपल्या पाठी त्याला उभे करण्यासाठी 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' या मंत्राचा जप श्रद्धा आणि विश्वासाने करण्याची नितांत गरज आहे. अर्थात हे देखील त्याच्याच कृपेने घडणार आहे.

श्रीकृष्णाने उद्धवाला उपदेश करताना हेच सांगितले आहे, 'मी दानाने मिळत नाही. मी ध्यानाने मिळत नाही. मी उपासनेने मिळत नाही. मी केवळ माझ्याच कृपेने मिळू शकतो. उद्धवा, मी तुला सर्व काही दिलेले आहे. आता तुझा तूच गुरू! तुझ्या स्वत:च्याच ठिकाणी तू माझा शोध घे.'

***

ॐ

डिसेंबर ९३चा शेवटचा आठवडा. कृष्ण ताईंना म्हणू लागला, ''ताई १ जानेवारी ते ७ जानेवारी ९४ पूर्ण मौन पाळून चित्राप्रमाणे राहून ध्यान करायचे आहे. आहे तुझी तयारी?'' इतकं सात दिवस पूर्ण मौन आणि चित्राप्रमाणे ध्यान! ताईंना तर थोडे दडपणच आले. जमेल आपल्याला? येईल का करता? पण दुसऱ्या क्षणी आजपर्यंतचे अनेक कसोटीचे क्षण आणि कृष्णाच्या मदतीने त्या क्षणांचे झालेले चीज हे सर्व त्यांच्या डोळ्यापुढे आले आणि त्या कृष्णाला म्हणाल्या 'कृष्णा, विचारणाराही तूच आणि करवून घेणाराही तूच. मला इतकंच माहीत आहे की मी निमित्तमात्र आहे. माझ्याकडून मी तुझी आज्ञा तंतोतंत पाळण्याचा अत्यंत कसोशीने प्रयत्न करेन हे मात्र निश्चित.'

बरोबर बारा वाजता ताई त्यांच्या ध्यानाच्या खुर्चीत होत्या. नजर अत्यंत स्थिर, कृष्णाकडे एकटक. मंदिरात सत्तर-ऐंशी लोकांचा नववर्षाचा गलका चाललेला. शरीराने तिथे असलेल्या त्या पूर्ण अंतर्मुख होऊन ध्यानस्थ झालेल्या होत्या.

एक जानेवारी, ध्यानाचा पहिला दिवस. 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' ह्या मंत्राने ध्यानाला सुरुवात झाली.

दुसऱ्या दिवशी 'ॐ महान शक्ती देवताय नम:'

तिसऱ्या दिवशी 'सर्वबाधाविनिर्मुक्तो धनधान्यसमन्वित:। मनुष्यो मत्प्रसादेन भविष्यति न संशय:' हा मंत्र करायला सांगितला.

चौथ्या दिवशी 'सर्वमंगलमांगल्ये, शिवे सर्वार्थसाधिके, शरण्ये त्र्यंबके गौरि, नारायणि नमोऽस्तु ते' हा मंत्र करावयास लावला.

ध्यानाचा पाचवा दिवस. 'अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जना: पर्युपासते। तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्' हा मंत्र करावयास लावला. नंतर सहा ते आठ ध्यान करावयास लावले.

ध्यानाचा सहावा दिवस. श्रीकृष्णाने 'शरणागत दीनार्त' हा मंत्र करावयास सांगितला. त्याचबरोबर नवीन वस्त्र धारण करून, ह्या मंत्राने माझी स्तुती कर असे सांगितले.

ध्यानाचा व मौनाचा सातवा दिवस. म्हणजेच शेवटचा दिवस. ध्यान उत्तम प्रकारे झाले याचे ताईंना फार समाधान झाले.

''बऱ्याच दिवसांपासून ध्यान करायचे होते त्याचा आज योग आला. सर्व भक्तांसाठी आराधना लागते, ती आज पूर्ण झाली. याचा खूप परिणाम माझ्या तीन हजार भक्तांवर होणार आहे आणि एकंदरीत सात हजार भक्तांना याचा फायदा होणार आहे. अर्थात प्रत्येकाच्या श्रद्धेवर हे अवलंबून आहे. त्याचप्रमाणे ज्याच्यातर्फे हे सर्व करत आहे, त्या शरीराला ताकद देण्यासाठी मला जे काय करायचे होते, ते सर्व काही केले, म्हणजेच दिले. पंधरा वर्षांनी कृष्णकुटीर सोडणार याचा गर्भित अर्थ खऱ्या अर्थाने आज ताईला जाणवून दिला. आजपर्यंत तू सुखदुःखाच्या पायऱ्या चालत आलीस. आता त्याची परमावधी झाली. म्हणजे ते जीवन संपले आणि मानसिक ताकद घेऊन, आता तू माझ्या कार्यासाठी कार्यरत होणार त्याचा आनंद तुला मिळणार. हे सर्व अर्थपूर्ण आहे. ताई, तुला त्यातील काही कळो अगर न कळो, त्याचा परिणाम होणारच. मी ज्या कार्यासाठी उभा राहणार, त्या कार्याची सुरुवात झाली, असे तू समज. सर्व माझ्या हातात आहे.''

वरील संदेश ताईंना कृष्णाने ध्यानाच्या शेवटच्या दिवशी दिला.

कृष्णकुटीरमध्ये येणाऱ्या भक्तांची व फोनची संख्या जसजशी वाढू लागली तसतशा ताईंच्या ध्यानधारणा आणि मौन ह्याच्या वेळा पण वाढू लागल्या. त्याचबरोबर ताई सांसारिक जबाबदाऱ्याही पार पाडत होत्या.

वैभवीच्या लग्नाचे बघायचे होते. ताईंना कृष्णाने सांगितले की तिचे लग्न चोविसाव्या वर्षी ठरेल. परंतु लग्नासाठी तू आई म्हणून जी काही खटपट करायला हवीस ती तू करावीस. त्याप्रमाणे स्थळांची शोधाशोध, चौकशी वगैरे सर्व गोष्टी ताईकडून कृष्ण करून घेत होता. १० मे ९५, वैभवीचा २४ वा वाढदिवस. तीही तारीख उलटून गेली. लग्नाच्या बाबतीत काहीच पुढे होईना. ललितापंचमीचा दिवस उजाडला आणि पहाटे ध्यानात कृष्णाने ''आज मी वैभवीला सरप्राईज भेट देणार आहे.'' असे सांगितले. दुपारी कारखानीसकाका आले त्यांनी ताईंना श्री संतोष श्रॉफ या स्थळाबद्दल सांगितले. ताई म्हणाल्या, 'काका, कृष्णालाच विचारू.' कृष्णाला विचारल्यावर कृष्णाने ह्या स्थळाला तत्काळ होकार दिला. त्या दिवशी वैभवीचा तिथीने वाढदिवस होता. पुढे त्यांच्याशी बोलणी वगैरे होऊन रीतसर लग्न ठरले. लग्न होते डिसेंबरमध्ये. आता लग्नाच्या तयारीला लागायचे. त्याप्रमाणे मुलांशी बोलून एकेक गोष्टी ताई ठरवू लागल्या.

मध्येच एके दिवशी सकाळी कृष्णाने सांगितले, ''ताई, आज महानशक्तीला दुधाचा अभिषेक करून पूजा करायची आहे.'' सांगणाराही तोच, करून घेणाराही तोच आणि योजना आखणाराही तोच. या गोष्टीचा पुन्हा एकदा अनुभव आला.

तो दिवस कृष्ण बोलण्याचा होता. अनेक भक्त येत होते. आज येताना जो तो दूध घेऊन येत होता. कृष्ण सांगत होता, ''ताई, आज ह्या सगळ्या दुधाचा अभिषेक महानशक्तीसाठी करायचा आहे.' त्याप्रमाणे अभिषेक चालू होता. मध्येच कृष्णाने ताईंना सांगितले, ''ताई, माझ्या बाबांनी ती एक हिऱ्याची चमकी केली होती नं. ती जरा आण गं.'' ताईंचे डोळे कृष्णाच्या कौतुकाने भरून आले.

कै. बाबांना एकदा अचानक ऑफिसमधून कसलेतरी पैसे मिळाले. चारपाचशे असतील. त्यांची त्यांनी एक हिऱ्याची चमकी करून आणली आणि म्हणू लागले, 'लीला, माझी फार इच्छा होती की अशी चमकी माझ्या गृहलक्ष्मीसाठी म्हणून करायची. आता अनायसे पैसे हातात आले आहेत, म्हणून करून आणली बघ.' नेहमीच्या पद्धतीप्रमाणे प्रथम ती कृष्णाच्या-नवदुर्गेच्या पायाशी ठेवून, ताईंनी काही दिवस ती वापरली देखील. पुढे बाबांना देवाज्ञा झाल्यावर ती तशीच ठेवलेली होती. ताईंना वाटत होते की आता वैभवीचे लग्न ठरले आहे तर, कृष्ण म्हणेल त्याप्रमाणे एकतर वैभवीला किंवा लग्नाची म्हणून रेशमाला (सून) ती देता येईल. ताईंना त्या चमकीचा सर्व इतिहास क्षणात डोळ्यापुढे आला आणि बाबांच्या आठवणीने ऊर भरून आले.

त्या ती चमकी घेऊन मंदिरात आल्या. इकडे अभिषेक जप चालूच होता. तेवढ्यात कृष्णाने एका बाईंना पुढे बोलावले. त्यांना सांगितले, ''आज तुमची पूजा झाली. ही चमकी प्रसाद म्हणून तुम्हाला देतो.'' असं म्हणून ती चमकी त्यांच्या हातात दिली. अभिषेकाचे दूध प्रसाद म्हणून सगळ्यांना द्यायला सांगितले. त्या बाई अवाक् होऊन पाहतच राहिल्या. क्षणभर त्यांना काय घडत आहे ते कळलेच नाही, पण त्या भानावर आल्यावर पटकन कृष्णाला व नवदुर्गारूपी ताईंना नमस्कार करून बाहेर धावल्या. मंदिरात इतकी गर्दी होती की थोडावेळ कोणाला काय झालंय काहीच कळले नाही. कृष्णाजवळ असलेल्या भक्तांनी ती सारी हकीगत सांगितल्यावर मात्र कोण त्या बाई कोठे गेल्या? अशी कुजबूज सुरू झाली. एक अर्धा तास गेला असेल. दाराशी एक रिक्षा थांबली त्यातून एक बाई आल्या. मंदिरात येऊन कृष्णासमोर उभ्या राहून ताईंना सांगू लागल्या, 'ताई, आज कृष्णाने, नवदुर्गेने माझा इतका मोठा सन्मान केला, पण माझे नाक टोचलेले नव्हते म्हणून सोनाराकडे जाऊन ती चमकी नाकात घालूनच आले

आहे. नमस्काराचा स्वीकार करा.' सगळ्यांनीच तिचे आणि तिच्या समयसूचकतेचे तोंडभरून कौतुक केले.

दुपारी ध्यानात कृष्णाने ताईंना सांगितले, ''ताई आता लग्नाच्या तयारीला सुरुवात करा.'' द्वारकाधीशाच्या घरचे लग्न असावे असे वैभवीचे लग्न अगदी थाटात झाले. ताई सांगत, 'ते आमच्या कल्पनेपलीकडचे होते.'

कृष्णाने कन्याकुमारीला गेलेले असताना सांगितले होते, ''ताई तुझा सत्कार करणार आहे हं.'' कृष्ण काय म्हणतो ते तेव्हा कोणाला कळले नव्हते. पुढे योजना ट्रस्ट, कल्याण येथून काही लोक कृष्णकुटीरमध्ये आले आणि सांगू लागले, 'ताई, आम्ही पंडित भीमसेन जोशींचा आमच्या ट्रस्टतर्फे सत्कार करणार आहोत.' आमच्या मंडळाने ठरवले आहे की त्यांच्याबरोबर तुम्ही आणि समर्थभक्त प. पू. नाना परांजपे यांचाही सत्कार करायचा. त्याचे निमंत्रण कृष्णाला आणि तुम्हाला करण्यासाठी आलो आहोत.' असं म्हणून कृष्णाच्या पायाशी त्यांनी निमंत्रणपत्रिका ठेवली. 'अहो, पंडितजींचे ठीक आहे, पण माझा कसला सत्कार करता?' 'नाही, नाही ताई. अत्यंत प्रसिद्धिपराङ्मुख, अध्यात्मातले गुरू म्हणून तुम्ही आणि प.पू. नाना ह्यांचा सत्कार आम्ही करणार आहोत. आपल्याला त्या समारंभाला यायलाच पाहिजे.' 'ठीक आहे, कृष्ण काय सांगेल तसे करेन हं.'

कृष्ण म्हणू लागला, ''ताई, मी तुला सांगितलं नव्हतं का की तुझा सत्कार करेन. म्हणून तू समारंभाला जायला काहीच हरकत नाही.''

त्याप्रमाणे ताई काही कृष्णभक्तांसह त्या समारंभाला मुंबईला गेल्या. कृष्ण कोणते माप कधी आणि कसे कोणाच्या पदरात टाकेल ते सांगता येत नाही. समारंभ सुरू होऊन मध्यंतर झाले. संयोजकांपैकी एक जण जज्ज होते. कृष्णाने काय करावे? तो तरातरा तेथे गेला आणि त्यांना म्हणाला, ''काय रे, नुसते मेडिटेशन करतोस, पण प्रत्यक्ष कृती मात्र काहीही नाही. नुसता ठोकळा आहेस. सगळीकडे शोधत आहेस पण पायाखालचे कसे दिसत नाही?'' असं बोलला आणि जागेवर येऊन बसला. कृष्णाच्या अज्ञात भक्तांपैकी ते एक असावेत. क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे अशी शिकवणूकच कृष्णाने त्यांना भर समारंभात दिली. तेसुद्धा अगदी शांतपणे आपल्या जागेवर बसले. ताईंना तर खानापूरच्या शाळेतल्या शाळा तपासणीचीच आठवण झाली.

कृष्णाचं आपल्या भक्तांवर अतिशय बारकाईने लक्ष असते. कृष्णकुटीरमध्ये नेहमी सेवेला येणारे अनेक कृष्णभक्त आहेत. नेहमी असं म्हणतात की जे सत्पुरुषांच्या,

संतांच्या अगदी निकट सहवासात असतात, त्यांची खरी कसोटी असते. परीक्षा असते. पावलोपावली त्यांना सांभाळून राहावे लागते.

एके दिवशी ताईंना एकांचा फोन आला. फोनवर ते काहीतरी अत्यंत महत्त्वाचे बोलत होते. नेहमी येणाऱ्या भक्तांच्या कानावर ते बोलणे पडले. त्यातले संदर्भपण कळले. पुढे दोनतीन दिवसांनी त्या विषयाला अनुसरून कोणीतरी ताईंशी काही बोलत होते. अनवधानाने ह्या बाईपण त्या संभाषणात भाग घेऊन काही बोलू लागल्या. ताईंनी नुसते त्यांच्याकडे बघितले. बोलल्या काहीच नाहीत. पण सगळे भक्त गेल्यावर नेहमीचेच लोक राहिल्यावर मात्र त्यांना कृष्णाने पुढे बोलावले आणि सांगितले, ''एक लक्षात ठेवा, तुम्ही इथे येणाऱ्या सर्व भक्तांनी एक पथ्य जरूर पाळा. कोणाबद्दल काहीही गोष्टी तुमच्या कानावर पडल्या, तुम्हाला समजल्या तरी त्याचा उल्लेख, त्याची वाच्यता, त्याच्यावर मतप्रदर्शन, अनाहूत सल्ला असं मात्र कोणीही देऊ नका.'' पुढे ताई म्हणाल्या, 'ते कृष्णाला अजिबात आवडत नाही. प्रत्येक भक्त माझ्याजवळ जे मनातलं बोलत असतो ते आईजवळ बोलावं असं असते. त्याची वाच्यता झालेली कृष्णाला आणि मलाही आवडत नाही आणि सहनही होणार नाही.'

असाच एकदा, बरेच दिवसांनी कृष्ण बोलणार होता. मंदिरात अगदी तुडुंब गर्दी होती. स्वयंपाकघरात काही भक्त सेवा म्हणून चहा, नाष्टा करणे, स्वयंपाकाची तयारी करणे ह्यात गुंग होत्या. हात कामात गुंग होते पण मनं मात्र कोणा एका भक्ताची नक्कल करत, त्याची टिंगलटवाळी करत हास्य विनोद करत होती. आवाजही नकळत मोठे होऊन मंदिरात येत होते. अचानक कृष्ण बोलायचा थांबला. तरातरा स्वयंपाकघरात जाऊन त्याने तीन घोट पाणी मागितले आणि जरबेच्या आवाजात सांगितले, ''इथले आवाज पहिले बंद करा, इथे नको ते बोलले जात आहे. ते मला अजिबात चालणार नाही. आवडणार नाही.'' थोडा वेळ आवाज थांबले. पण पुन्हा त्या बायकांचे तेच, तसेच बोलणे सुरू झाले. कृष्ण आता मात्र रागारागाने आत आला. अत्यंत तीक्ष्ण नजरेने सगळ्यांकडे बघितले व सरळ आतल्या खोलीत निघून गेला. दहा-पंधरा मिनिटांनी बाहेर कुजबूज सुरू झाली. ताई अशा अचानक का निघून गेल्या हे कोणालाही कळेना. कोणासाठी तरी कृष्णाने तातडीने ध्यान करावयास सांगितले का? सगळे वातावरण तणावपूर्ण झाले. लोक थोडा वेळ वाट बघून, थांबून, नमस्कार करून जाऊ लागले. त्या दिवशी नंतर कृष्ण बोललाच नाही.

संध्याकाळी नेहमीसारखे एक एक भक्त (नेहमी येणारे) येऊ लागले. ताई ध्यानाच्या खुर्चीतच बसलेल्या होत्या. त्यांचा नमस्कार करून झाल्यावर ताई म्हणाल्या, 'मला सांगा, आज सकाळी कोण कोणाबद्दल नक्की काय बोलत होते? मला ते अजिबात आवडलेलं नाही. ज्याअर्थी कृष्ण बोलायचे बंद झाला त्याअर्थी तेथे निश्चितच जे बोलायला नको होते अशी काही चर्चा झालेली असणार. कोणाची तरी टिंगलटवाळी चाललेली असणार. खरं सांगा मला काय चालले होते?' समोरची भक्त म्हणाली, 'हो ताई, अमुक अमुक व्यक्तीबद्दल सगळे बोलत होते. क्षमा असावी.' त्यावर ताई म्हणाल्या, तरीच आज कृष्णाने सांगितले की, ह्याची शिक्षा म्हणून मी पुढील आठ दिवस बोलणार नाही. सकाळी तेथे असलेल्या एका भक्ताला सांगितले की तू आता पुढे महिनाभर मंदिरात काहीही सेवा करायची नाही आणि अजून एकीला सांगितले की तू पुढचा महिनाभर स्वयंपाकघरात पाऊलही ठेवायचे नाही.

नंतर त्या भक्तांनी कृष्णापुढे उभे राहून झाल्या प्रकाराबद्दल माफी मागितली. त्यावर कृष्णाने सांगितले, ''माझ्या भक्तांनी सतत सावध राहायला पाहिजे. माझ्याशिवाय माझ्या भक्तांना हे कोण सांगणार? कोण शिकवणार? तुम्ही नको ते नजरेने बघून, नको ते कानाने ऐकून, नको तो विचार करून आणि स्पर्शानेसुद्धा कर्मबीजं निर्माण करता, म्हणून माझ्या भक्तांना मी नेहमीच सावध करत असतो.'' आताशा कृष्ण अशा घटनांमधून आपली शिकवणूक भक्तांपर्यंत पोहोचवत होता. कधी समजावून, कधी दटावून, कधी सौम्यशी का होईना शिक्षा करून.

***

ॐ

आता कृष्ण सांगू लागला की, ९६ साली मला विश्वशांतीसाठी खूप ध्यान करायचे आहे. ताईंना म्हणाला की, ''मी सर्व तयारी करून घेतो''; त्यावर ताई म्हणाल्या, 'अरे, मी तर तशी चिंता करतच नाही. माझे एकच काम, तुझा शब्द तंतोतंत पाळणे. बस! बाकी काही नाही.' त्यावर कृष्ण हसला आणि त्याने ताईंना सांगितले, ''आपण प्रथम कोल्हापूरला जाऊ. 'ती' (आदिशक्ती) पण माझ्याबरोबर येईल.'' त्यासाठी काय पूजासाहित्य न्यायचे, ओटी काय न्यायची ते सर्व काही सांगितले. त्याप्रमाणे ताई तेथे शुक्रवारी रात्री पोहोचल्या. देवीच्या पालखीची वेळ झालीच होती. त्या पोहोचल्या तेव्हा देवीची उत्सवमूर्ती पालखीत ठेवण्यासाठी बाहेर आणली. श्रीकृष्ण म्हणाला, ''ती बघ माझ्याबरोबर येण्यासाठी तयार होऊन आली.'' त्या पालखीसोहळ्याचा आनंद घेऊन दुसऱ्या दिवशी पूजा, ओटी दर्शन, करून ताई बदलापूरला आल्या.

त्यानंतर थोडे दिवसांनी यूएसहून एका कृष्णभक्ताचा फोन आला. 'कृष्णा, तुझी आमच्याकडे येण्याची वेळ जवळ आली. ह्यावेळेस तिकीट पाठवायची सेवा मी करू का? कृष्णा, स्वीकार कर ना. आम्हाला फार आनंद वाटेल.' कृष्ण तत्काळ म्हणाला, ''अरे, ह्यावेळेस मी कार्यासाठी येणार, त्यामुळे कोणा एकाकडून मला सेवा स्वीकारता येणार नाही. सर्वांनी मिळून माझे तिकीट काढले पाहिजे. जेथे जेथे केंद्र आहेत त्या सर्वांनी मिळून मला तिकीट पाठवा.''

त्याप्रमाणे साधारणपणे १५ एप्रिल ते १५ मे १९९६च्या सुमारास ताई तिसऱ्यांदा यूएसएला जातील, असे कृष्णाने सांगितले.

ताई जेव्हा ऑक्टोबरमध्ये गोव्यात गेल्या होत्या तेव्हाचा एक अनुभव. ताईंना मंगेशीला जायचे होते. त्याआधी ताई म्हणाल्या, 'आपण प्रथम मडगावला जाऊ. पण कृष्ण म्हणतो चपला घ्यायच्या आहेत त्याला.' 'बरं ताई' म्हणून गायतोंडे काकांनी गाडी मडगावच्या दिशेने घेतली. पहिल्याच दुकानात ताईंना चप्पल पसंत पडून पाचव्या मिनिटाला दुकानाबाहेर पडलो. काका दुकानात ताईंना नव्या चपला घालण्यासाठी आग्रह करत होते. ताई म्हणाल्या, 'छे आत्ता नको. त्या नंतर लागतील.' ताई जुन्या

चप्पल घालूनच मंगेशीच्या देवळात आल्या. हे स्थान म्हणजे जणू ताईंचे पितृस्थानच! त्यांनी तेथील प्रथेप्रमाणे चप्पल बाहेर काढून ठेवल्या आणि आत दर्शनाला गेलो. दर्शन, प्रसाद घेऊन बाहेर आलो. बघतो तर काय फक्त ताईंच्या चप्पल गायब. 'अरे ताईंच्या चपला कोणी नेल्या. अरे कोण हा चप्पलचोर?' 'त्याला असं बोलू नको, जो कोणी चप्पल घेऊन गेला नं, त्याच्या तर त्या पायाला पण होणार नाहीत. पण एक लक्षात ठेव, त्याच्याकडून काहीतरी मोठे कार्य घडणार बघ! त्यामुळे त्याला नावं ठेवू नको. गाडीतल्या नव्या चपला मात्र घेऊन ये.' म्हणजे कृष्णाला ह्या गोष्टीची पूर्ण कल्पना होती तर आणि त्या चप्पलचोराने ती खरे. चोरली की चूकून बदलून नेली. बहुदा ती त्याला झाली म्हणून नेलीच नसावी, तर कृष्णाला त्याच्या हातून पुढे काही काम करून घ्यायचे असेल, त्याची खूण म्हणून त्याला तशी बुद्धी झाली. एका चप्पल गायब होण्यामागे किती वेगवेगळ्या बाजू असू शकतात नाही? ताईंची ही शिकवण्याची पद्धत होती. त्यांनी समोर बसून कधी लेक्चर दिले नाही. पण सहज जाता जाता बरंच काही शिकवून जायच्या.

कृष्णाने ह्या ३१ डिसेंबरला पण नवीन वर्षासाठी संदेश दिला.

''प्रत्येकजण आपापल्या पद्धतीप्रमाणे माझ्यावर श्रद्धा ठेवून माझी पूजाअर्चना करत असतात. माझा भक्त म्हटला की तो मला प्राणापेक्षाही प्रिय असतो. पण ह्या वर्षासाठी मी असे निक्षून सांगतो की दुसऱ्याच्या आनंदात जे आनंद मानून राहतील, वागतील, त्यांना मी माझे खरे भक्त म्हणेन. मी ताईतर्फे काम करतो ह्याचा अर्थ असा नव्हे, की जेथे जेथे ताई आहे तेथेच फक्त मी आहे. मी चराचरात भरलेला आहे. तुम्हाला प्रत्येकाला माझ्या अस्तित्वाची जाणीव होऊ शकेल आणि हेच माझ्या कार्याचं सार्थक असेल. माझ्या भक्ताने असा कधी विचारही करू नये की 'ताई नाही म्हणजे कृष्ण नाही.' मी कणाकणात, चराचरात भरून व्यापून राहिलो आहे हे लक्षात घ्या.

तुम्हाला आश्चर्य वाटेल, पण अनेक वेळा माझ्या कार्यात मलाही अनेक अडचणी येतात. याचं कारण म्हणजे माझे अनेक भक्त स्वत:ला भक्त समजतात, पण मी काय सांगतो, त्याचे यथार्थ किंवा तंतोतंत पालन मात्र करत नाहीत. अशा वेळी ते माझ्यापासून दूर जातात आणि त्याचे मला अत्यंत वाईट वाटते. पण हेसुद्धा ह्या काळाचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे मला हे परत परत सांगावेसे वाटते की, मी सतत त्यांच्याजवळ असतो. हे माझ्या भक्तांनी निश्चित लक्षात ठेवावे. त्यांनी अत्यंत श्रद्धेने त्यांचे प्रत्येक कर्म मलाच अर्पण करावे म्हणजे मी सतत त्यांच्यासाठी उभा राहू शकेन.

त्यासाठी माझा ह्यावर्षाचा आदेश लक्षात ठेवा, ''दुसऱ्याच्या आनंदात आनंद मानायला शिका. त्यामुळे मी तुमच्या सतत जवळ राहू शकेन आणि त्याची जाणिवही तुम्हाला होऊ शकेल. अगदी साध्या शब्दात सांगायचे झाले तर तुम्ही माझे आणि मी तुमचा हेच खरं आहे. पूर्ण श्रद्धा आणि विश्वास ठेवून 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' ह्या मंत्राचा जप करा आणि मला तुमच्याकडे खेचून घ्या.''

श्रीकृष्णलीला केंद्रात तो फोटो ठेवतात. त्याचे नाव कृष्णाने 'प्रेरणा' ठेवले आहे. हा फोटो कृष्णाने कसा घडवून आणला त्याची गोष्ट ऐकण्यासारखी आहे.

कृष्णभक्त दिनेश एकदा कृष्णाला विचारून त्याचे फोटो काढायला फोटोग्राफर घेऊन आले. त्याच दिवशी विजूताईंचा जितू पण मंदिरात आलेला होता. त्याला कृष्णाने पुढे बोलावले आणि सांगितले की, ''जितू, माझ्यासाठी एक छानसा मोगऱ्याचा मोठा हार घेऊन ये.'' जितूने एक सुंदरसा हार आणला.

नेहमीप्रमाणे मंदिरात खूप गर्दी होती. कृष्णाच्या अगदी गळ्यापर्यंत हार आलेले होते. मध्येच कृष्णाने ताईंना सांगितले, ''ताई मला मोकळा कर नं! सगळे हार, वस्त्र काढ. मला फक्त एक जितूचा आणि एक दिनेशचा असे दोनच हार घाल हं.'' त्याप्रमाणे ताईंनी करताच कृष्णाने दिनेशला सांगितले, ''ये दिनेश. माझा फोटो पाहिजे नं. काढ आता.'' पुढे येऊन नमस्कार करून दिनेशने फोटो काढायला सुरुवात केली. पहिला समोरून काढला आणि पुढे अजूनही सातआठ काढले. सर्वच फोटो चांगले सुरेख आले. त्यापैकी पहिल्या फोटोच्या काही कॉपी काढल्या आणि कृष्णाला द्यायला म्हणून बदलापूरला गेला. गेल्यावर कृष्णाने सांगितले, ''दिनेश, इकडे ये. मी काही मजकूर सांगतो तो लिहून घे.'' कृष्ण सांगू लागला, ''मी काळाप्रमाणे बदलतो....'' मजकूर सांगून पूर्ण झाला. दिनेशने तो पुन्हा एकदा कृष्णाला वाचून दाखवला. त्यानंतर कृष्ण म्हणाला, ''दिनेश, हा माझा फोटो एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला हा पूर्ण मजकूर छापलेला असे फोटो तयार कर आणि घेऊन ये.''

त्याप्रमाणे दिनेशने फोटो तयार केले व कृष्णाकडे घेऊन गेला. कृष्ण म्हणाला, ''छान झाले. सुंदर! ह्या फोटोचे नाव 'प्रेरणा'! तुमच्या हृदयाच्या हाकेला ताबडतोब मी धावत येणार, म्हणून मी तुमच्यासाठी तुमच्याकडे तोंड करून उभा आहे.'' आणि पुढे केंद्रासाठी म्हणून हाच फोटो कृष्णाने द्यायला सुरुवात केली. आज केंद्राकेंद्रात कृष्णप्रेरणेने प्रेरित होऊन अनेक भक्त कृष्णभक्तीत रंगून जाऊन, कृष्णकृपेचा अनुभव घेत आहेत.

एकदा एका भक्ताने विचारले, ‘कृष्णा, अरे तुझे एकच बोट असे वेगळे का केले आहेस?’ कृष्ण म्हणाला, ‘‘मी तुम्हाला सतत सावध करत असतो. त्यासाठी असे एक बोट उभे केलेले आहे. लक्षात ठेव! अविचार करू नकोस. तू दुर्विचार मनात आणू नकोस.तू नियमबाह्य वागून कोस.’’ ‘अरे बापरे! कृष्णा काय रे हे!’ त्यावर हसत ताई म्हणाल्या, ‘तो लाडोबा आहेच तसा. तो सतत आपल्याला योग्य मार्ग दाखवित असतो.’

प्रसिद्ध लेखक श्री. जयवंत दळवी हे कृष्णभक्त होते. एकदा त्यांनी कृष्णाला विचारले, ‘कृष्णा, मला ताईंबद्दल काही लिखाण करायचे आहे. त्यांचे कार्य, त्यांचे अनुभव यांची माहिती मला दे ना?’ कृष्ण म्हणाला, ‘‘जाऊ दे रे, नको. मी तेज:पुंज गोल आहे. प्रत्येकाने कृष्णकुटीरमध्ये यायचे आणि आपापल्या कुवतीप्रमाणे ते तेज घेऊन आनंदाने घरी जायचे. लिखाण वगैरे नको.’’

त्यानंतर वसुंधराताई पटवर्धन ह्या सुप्रसिद्ध लेखिका एकदा मंदिरात आल्या आणि म्हणू लागल्या, ‘ताई, मला कृष्णाची दुसरी काही सेवा करता यायची नाही. मी काही लिखाण करून सेवा करू शकेन. तर तुम्ही माझ्यासाठी कृष्णाकडे प्रार्थना करा आणि मला तशी सेवेची संधी द्या.’ त्यावर कृष्णाने त्यांना सांगितले, ‘‘मी तुझ्याकडून लिहून घेईन.’’

पुढे त्यांनी ‘संघर्ष’ नावाचे एक पुस्तक लिहिले. त्यात कृष्णकुटीर, तेथील कार्य यांचे वर्णन केलेले आहे. शेवटी लिहिले आहे की मी अनेक ठिकाणी गेले, पण कृष्णकुटीरमध्ये जाऊन जे समाधान मला लाभले ते इतर कोठेही लाभले नाही.

श्रीकृष्णाच्या अनुभवांचे संकलन असलेले ‘श्रीकृष्णलीलावली’ या पुस्तकाच्या संपादनाची पूर्ण जबाबदारी कृष्णाने वसुंधराताईंवर सोपविली होती.

एकदा कृष्णाने सांगितले म्हणून ताई दुपारी तीन ते चार ध्यान करत होत्या. तेव्हा कृष्ण ताईंना म्हणाला, ‘‘ताई, माझे जे हे भांडार (प्रसादातील वस्तूंचा संग्रह) ठेवले आहे नं, त्यातील पैसे फक्त वेगळे कर. आज मला ते पैसे पाच जणांना द्यायचे आहे.’’ त्यावेळेस नेमके पाच जण आले. खरं, तर ही दुपारची वेळ होती, पण अचानक त्यांचा मुलगा नंदा काही काम निघाले म्हणून घरी आला. आणि मुंबईची चार माणसं पण आली. त्या पाच जणांना पसापसाभर पैसे देऊ केले व उरलेले शेवटचे चार आण्याचे नाणे मात्र भांडारात पुन्हा ठेवण्यास सांगितले. किती भाग्यवान ना हे भक्त! ताई सांगत होत्या, ‘मलाही असे हे देताना फार बरं वाटतं.’

एकदा ताई बाहेरून आल्या, तेवढ्यात कृष्ण बोलला, ‘‘ताई बाथरूममध्येसुद्धा

जाऊ नकोस. ताबडतोब ध्यानाला बस. माझ्या एका भक्तासाठी आत्ता ध्यान करायची अत्यंत आवश्यकता आहे.'' त्याप्रमाणे लगेच ताई ध्यानस्थ झाल्या त्या दोन तासानंतरच उठल्या.

असं वेळोवेळी कृष्ण सांगेल त्याप्रमाणे काही गोष्टी प्रत्यक्ष करणं आणि कधी कधी ध्यान करून भक्तांच्या पाठी उभे राहणे असं सतत चालू होते. जितके कृष्णभक्त ताईंच्या संपर्कात येत होते, कृष्णाच्या नजरेत येत होते, त्यांच्या त्यांच्यासाठी कृष्ण म्हणेल तेव्हा, म्हणेल तसे ध्यान, उपासना असं सर्व काही ताईंचे चालू होते.

आता अमेरिकेला जायचे दिवस जवळ येऊ लागले. कृष्णाने एकदा ताईंना सांगितले, ''ताई, मागच्या दोन्ही वेळेस आपण कॅनडाला जाऊ शकलो नाही. पण ह्यावेळेस मात्र आपण कॅनडाला जायचंच! तेथे मला केंद्र करायचे आहे.'' ताई म्हणाल्या 'बरं', आणि स्वत:शीच बोलल्या, 'माझं मला मुंबईला जायचेसुद्धा अवघड तर मी काय कॅनडाची बात करणार?'

नेहमीचा अनुभव असा की कृष्ण जेव्हा असे काही बोलतो तेव्हा त्याची योजना आधीच तयार असते. त्याप्रमाणे त्या दिवशी दुपारीच सौ. सीमा पाठारे यांचे कॅनडातून पत्र आले. त्यांनी लिहिले होते, 'ताई, ह्या वेळेस मात्र तुम्ही कॅनडाला आल्याशिवाय भारतात परत जायचे नाही. आमच्याकडे कधी येता ते कृष्णाला विचारा आणि कॅनडाचा व्हिसा करण्यासाठी लागणारे पैसे मी पाठवून देते. ह्या पाठारे कोण ताईंच्या लक्षात येईना. पण ताईंनी ते पत्र कृष्णाच्या पायाशी ठेवून त्याला अर्पण केले.

दोनतीन दिवसांनी ह्या सीमा पाठारेच्या पत्रात जिचा उल्लेख होता ती कृष्णभक्त जॉयस आली. ताईंनी तिला ते पत्र दाखवले आणि त्यात तिच्या नावाचा उल्लेख असल्याचे सांगितले. ती तत्काळ म्हणाली, 'ताई, हे तर माझ्या बहिणीचे पत्र. तुम्ही निश्चितच तिच्याकडे जा आणि कॅनडाचा व्हिसा करण्यासाठी दिल्लीत जायला लागते ते काम मी करेन. कृष्णाला, मला ती सेवेची संधी देण्याची प्रार्थना करा आणि तुमचा पासपोर्ट द्या माझ्याकडे.' ताईंनी कृष्णाला विचारले, 'कृष्णा, काय करायचे?' कृष्ण म्हणाला, ''नाही, सध्या नको.'' ती म्हणाली, 'म्हणजे काय कृष्णा? कॅनडाला तर जाणार नं. मग व्हिसा काढल्याशिवाय कसं होणार?' असं म्हणत म्हणत तिने ताईंचा पासपोर्ट हातात घेतला. बघते तर काय, त्यात एकही पान शिल्लक नव्हते आणि पान लावून घेतल्यावाचून पुढचे कोणतेच काम झाले नसते. ती म्हणाली, 'ताई, उद्या तुम्ही मुंबईला

या. निदान हे पानं लावून आणण्याचे काम करण्याची सेवा तरी कृष्णाने मला द्यावी.' 'कृष्णा, काय करायचे?' ताईंनी विचारले, ''हरकत नाही, ती सेवा तिला करू देत.'' कृष्णाने संमती दिली. त्याप्रमाणे तिच्यासोबत ताई मुंबईच्या पासपोर्ट ऑफिसमध्ये गेल्या. तेथल्या लोकांनी सांगितले की पासपोर्ट ठेवून जा आणि चार दिवसांनी येऊन घेऊन जा. कृष्ण बोलला, ''जॉयस असं नाही, अमुक अमुक ऑफिसरकडे जा आणि त्याला सांग आजच्या आज काम व्हायला पाहिजे.'' कृष्णाज्ञाच ती! ती त्या ऑफिसरशी जाऊन बोलली. त्याने आजच्या आज पासपोर्ट तयार करावा असा शेरा मारला. तीन वाजता पासपोर्ट घेऊन ती घरी आली. कृष्ण जॉयसला म्हणाला, ''मी तुझी सेवा स्वीकारली. आता कॅनेडियन व्हिसाचे काय करायचे ते बघतो.''

दोन दिवसांनी लंडनच्या कृष्णभक्ताचा फोन आला, 'ताई, कृष्णासह तुम्ही अमेरिकेला जाणार आहात तर आमची तुम्हाला प्रार्थना आहे, की तुम्ही आमच्यायेथे थांबूनच पुढे अमेरिकेला जावे.' कृष्णानी त्याला सांगितले, ''ह्याचे उत्तर मी तेरा एप्रिलला देईन,'' आणि ताईंना सांगितले, ''ताई पंधरा मेच्या आत तुला मी अमेरिकेला नेणार आहे.''

नंतर तेरा एप्रिलला ध्यान केल्यावर सांगितले की अकरा ते तेरा मे, मला ध्यानासाठी लंडनला जायचे आहे. त्याप्रमाणे ताई अकरा मेला लंडनला पोहचल्या. तेथे ध्यान केले. नंतर कृष्णाने सांगितले, ''ताई उद्या कॅनडाचा व्हिसा काढायला जा. मी तुमच्या आधीच सकाळी नऊ वाजता व्हिसा ऑफिसला जाणार आहे. तुम्ही नंतर या.'' दुसऱ्या दिवशी चौदा तारखेला ताई व्हिसा काढायला गेल्या आणि अर्ध्या तासात तीन वर्षांचा व्हिसा काढून ऑफिसबाहेर पण आल्या.

ठरल्याप्रमाणे पंधरा मे ला ताई यूएसमध्ये पोहोचल्या.

इकडे येण्याआधी कृष्णाने ताईंना सांगितले होते, ''ताई, ह्या वेळेस मी कार्यासाठी आलोय त्यामुळे माझ्या १००८ भक्तांना मला भेटायचे आहे आणि त्यांच्या माझ्या प्रेमाचे प्रतीक म्हणून मला प्रत्येकाला चांदीचे तुळशीचे पान द्यायचे आहे.'' आश्चर्य असे की येणाऱ्या चारपाच दिवसांत पुणे, नाशिक, मुंबई आणि हैदराबाद येथील काही भक्तांनी बदलापूरला येताना चांदीची तुळशीपत्रे अर्पण केली. सगळी एकसारख्या आकाराची. सगळी मिळून संख्या झाली १००८. ताई म्हणतात, 'मी का कोणाला सांगायला गेले होते? पण इतक्या निरनिराळ्या ठिकाणाहून आलेली पाने मात्र सारख्या

आकाराची! बुद्धिदाता तो आहे नं, स्वत:ला हवे तसे सर्व काही करवून घेतो.'

ह्या वेळेस कृष्णाने सगळ्या भक्तांना आवर्जून सांगितले होते, ''मला भेटायला याल तेव्हा तुमच्या मुलांना जरूर घेऊन या. त्यांना घरी किंवा डेकेअरमध्ये सोडून अजिबात येऊ नका. कारण आत्ता मी जो येतो आहे तो फक्त ह्या मुलांसाठी येत आहे. त्यांच्या प्रगतीचा मार्ग त्यांना सांगण्यासाठी, दाखवण्यासाठी. त्याची बीजे ह्या 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' या मंत्ररूपाने रुजवण्यासाठी येत आहे.

सॅनफ्रॅन्सिस्कोचे लक्ष्मण शेणॉय यांनी एका मासिकात ताईंबद्दल माहिती वाचली. त्यांना अपार उत्सुकता वाटून ते जेव्हा भारतात आले होते तेव्हा त्यांनी ताईंना भेटण्याचा बराच प्रयत्न केला, पण त्यांना निश्चित पत्ता मिळाला नाही. निघायच्या अगदी आदल्या दिवशी, एका ओळखीच्या गृहस्थांनी त्यांना ताईंचा फोन नंबर मात्र दिला. त्याप्रमाणे त्यांनी फोन केला व कृष्णाचे केंद्र माझ्याकडे केले तर मला अतिशय आनंद वाटेल असे सांगितले. कृष्णाने तत्काळ त्यांना होकार दिला आणि सांगितले, ''मी आता अमेरिकेत येईन तेव्हा तुझ्याकडे केंद्र करू या.'' त्याप्रमाणे त्यांच्याकडे केंद्र झाले. कृष्ण म्हणायचा, ''उत्सुकतेत मी आहे,'' ह्याचाच अनुभव जणू कृष्णाने त्यांना दिला. केंद्राच्या दिवशी त्यांनी अनेक रंगाची फुले आणली होती. त्यात निळ्या फुलांचा पण एक गुच्छ होता. ती कृष्णाने अभिषेकाला वापरली नाहीत. ह्यांनी विचारल्यावर सांगितले, ''अरे, मी अडचण निवारण्यासाठी निळी फुले वाहायला सांगतो. त्यामुळे आत्ताच्या आनंदाच्या क्षणी ती नको.'' त्यांना मनापासून वाईट वाटले आणि पांढरी फुले आणली असती तर किती बरे झाले असते असे सारखे वाटू लागले. त्यांच्याकडून ताई संध्याकाळी गेल्यावर त्याने कृष्णाला नमस्कार करताना सांगितले, 'कृष्णा सॉरी! पुढच्या वेळेस आठवणीने पांढरी फुले आणीन हं!'

दुसऱ्या दिवशी सकाळी उठून बघतात तर काय निळी फुले पूर्णपणे पांढरी झाली होती. त्यांनी अत्यानंदाने ताईंना फोन केला, 'ताई, काय सांगू? चमत्कार झाला. बाजूला ठेवलेली ती निळी फुले पूर्णपणे पांढरी झाली आहेत.' ''अरे, हा चमत्कार नाही. लक्षात घे, तुला मनापासून मला पांढरी फुले द्यायची होती. निळी फुले मी स्वीकारली नाहीत. त्याचे वाईटही वाटत होते नं. म्हणून मी ती पांढऱ्या फुलांच्या रूपात स्वीकारली. मी माझ्या भक्तांच्या भावना जाणतो नं. त्याला दिलेला हा प्रतिसाद आहे. चमत्कार नव्हे! मी किती भक्तवत्सल आहे त्याचे एक उदाहरण सांगतो, ते ऐक. आपले एक सुयोग वर्दे म्हणून कृष्णभक्त आहेत. ताई न्यूयॉर्कला जाणार होती, तेव्हा त्यांची अत्यंतिक

इच्छा होती की विमानतळावर ताईंना घेण्यासाठी जावे. त्यांना ताईंनी किती वेळा सांगितले की अरे नको, माझ्याबरोबर इतर लोक आहेत. ते मला व्यवस्थित घेऊन येतील. तू इतक्या लांबून इतक्या गर्दीत येऊ नकोस. त्यांची समजूत पटेना. 'बरं तर ये,' असं म्हणून ताईंनी फोन ठेवला.''

ताई न्यूयॉर्कला पोहोचल्या. बॅगा घेण्यासाठी सगळे थांबले. बाकी सगळ्यांच्या बॅगा आल्या, पण कृष्णाची बॅग, ज्यात त्याचे भक्तांसाठी आणलेले सगळे सामान होते ती काही कोठे दिसेना. सर्वजण शोधत आहेत पण ती काही केल्या सापडेना. जवळ जवळ पंधरावीस मिनिटे ह्यातच गेली. तेवढ्यात कृष्ण अचानक म्हणाला, ''अजित, ती बघ माझी बॅग खाली काढून ठेवली आहे.'' खरंचच तिथे बॅग होती. इतका वेळ कशी आम्हाला दिसली नाही? शेवटी ती घेऊन आम्ही बाहेर आलो. बघतो तर काय? सुयोग अगदी धावत धावत येत होता. 'ताई, मला उशीरच झाला. तुम्ही भेटता की नाही असंच वाटत होतं.' त्यावर ताई म्हणाल्या, 'अरे सुयोग, तू येईपर्यंत कृष्णाने स्वत:ची बॅग इतका वेळ लपवून ठेवली बघ. नाहीतर मात्र चुकामूक झाली असती.' गोष्ट छोटीशीच असते; पण कृष्णसुद्धा आपल्या भक्ताच्या प्रेमाची कदर करतो बरं का. तोसुद्धा भक्तांची वाट बघत असतो.''

ताई जेव्हा लॉस एंजेलिसला आल्या तेव्हा, सराफीचा व्यवसाय असणाऱ्या एका भक्ताला वाटलं की आपण काही तुळशीपत्रं अर्पण करावीत म्हणून त्यांनी बराच प्रयत्न केला. सर्व मार्केट फिरले, पण चांदीची तुळशीची पाने त्यांना कोणाकडेही करून मिळाली नाहीत. ते अगदी नाराज झाले. ह्याच्या अगदी उलट म्हणजे ९३ साली ताई जेव्हा आल्या होत्या, तेव्हा त्यांनी कृष्णाला विचारले, 'कृष्णा, तुझ्यासाठी सेवा म्हणून काय आणू?' ''असं म्हणतोस! तर १०८ छानसे ॐ बनवून आण.'' त्याप्रमाणे त्यांनी ते आणले आणि कृष्णाने कितीतरी जणांना ते दिले. मात्र ह्या वेळेस सेवा करता आली नाही म्हणून ते नाराज झाले. त्यांनी कृष्णाला विचारले, 'कृष्णा, ह्या वेळेस मला सेवेची संधी नाही का देणार?' ''अरे नाराज कशासाठी होतोस, मी योग्य वेळी तुझी सेवा स्वीकारेन. मी प्रत्येकाला त्याच्या इच्छेप्रमाणे संधी देतच असतो. मात्र आवश्यकता असते ती श्रद्धा आणि सबुरीची. तुझ्यासाठी योग्य वेळ कोणती ते मीच जाणतो.''

जशी कृष्णाला आपल्या भक्तांबद्दल ओढ, जवळीक, प्रेम वाटते तसेच अनेक भक्तही कृष्णाला आपले सर्वस्व मानून त्याच्या शब्दात राहणे पसंत करतात. एलएचेच कृष्णभक्त श्री. प्रमोद गाड यांच्या सौंना बरे नव्हते. डॉक्टरांनी ताबडतोब ॲडमिट

करायला लागेल असे सांगितले. त्यांनी कृष्णाला विचारले. कृष्णाने सांगितले, ''प्रमोद, ॲडमिट अजिबात करायचे नाही. आठवडाभर तिला नारळपाणी प्यायला सांग. सगळ्याला उतार पडेल.'' आता खरंतर ते अमेरिकेसारखे ठिकाण! पण ह्या नवरा-बायकोचा कृष्णावर असीम, गाढ विश्वास. दोघांनीही सांगितले, आम्ही कृष्णाचेच औषध घेऊ आणि प्रार्थना, जपही करू; आणि खरोखरच आठवडाभरात दुखण्याला खूपच उतार पडून डॉक्टरांनी सांगितले, 'आता ॲडमिट करायची आवश्यकता नाही' श्रद्धेला मोल नाही हेच खरे.

ताई रॉचेस्टरला असताना, कृष्ण फोनवर अनेकजणांना सांगू लागला, ''मी ध्यानासाठी हवाईला जातोय. विश्वशांतीसाठी अतिशय गाढ ध्यानाची अत्यंत आवश्यकता आहे.'' ताईंना विचारले तर ताई म्हणाल्या, 'अगं नाही गं. मला तर हवाई कोठे आहे हे पण माहीत नाही. मला काहीच कल्पना नाही.' दोन दिवस गेले आणि एक कृष्णभक्त आले. हवाईची तिकीटे आणि तेथे चार दिवस राहण्याची पूर्ण सोय करून ते आले होते. तेथे गेल्यावर कृष्णाने सांगितले, ''ताई, मला विश्वशांतीसाठी गाढ ध्यान करायचे आहे. तीन दिवस तू पूर्ण मौन पाळून, हातात शिवलिंग घेऊन ध्यान कर. काहीही न खातापिता फिरून ध्यान कर. मला २००५ साली जी जगात क्रांती होणार आहे त्यासाठी ह्या ध्यानाची फार आवश्यकता आहे. ह्यात थोडीही चूक होऊ देऊ नकोस. मला माझ्या भक्तांच्या रक्षणार्थ उभे राहायचे आहे. त्याप्रमाणे तीन दिवस ध्यान झाल्यावर हातात ठेवलेली सोन्याची शिवपिंडी काळी पडली. अन्नपाणी न घेताही ताई अतिशय तरतरीत होत्या.

टोरांटोचे केंद्र झाले. त्यावेळेस तेथे आलेल्या भक्तांनी काही पैसे, वस्तू कृष्णार्पण केलेल्या होत्या. तेथून रॉचेस्टरला आल्यावर रात्री कृष्णाने देशपांडेकाकांना बोलावले, ''नारायण, कालच्या टोरंटोच्या केंद्रात मला भक्तांनी जे पैसे दिले नं त्यातले $ ३०० जरा बाजूला काढ बरं.'' नारायणकाकांच्या मनात शंका होती की इतके पैसे असतील का? पण कृष्णाने सांगितले म्हणजे असावेत असा विचार करून ते बघायला लागले, तर खरोखरच त्यात $ १००च्या तीन नोटा होत्या. कृष्णाने त्या नोटा बघताच सांगितले, ''अरे, हे माझ्या एका भक्ताने दिले. आजपर्यंत मी त्याची खूप सेवा स्वीकारली आहे. त्याला खरंतर सांगितलं होतं की आता साडेतीन वर्षे मी तुझी काहीही सेवा स्वीकारणार नाही. तरीही त्याने हे पैसे अर्पण केले. ते मला स्वीकारता येणार नाहीत. ते एका वेगळ्या पाकिटात घालून ठेव. तो भेटला की त्याचे त्याला परत करा.'' कृष्णापासून

काय लपून राहणार. त्याच्या प्रत्येक शब्दामागे, प्रत्येक आज्ञेमागे काही विशिष्ट धारणा असते. आपले हित त्याच्या शब्दात राहण्यातच असते. आपली नजर मर्यादित तर त्याची असीम!

तुम्हाला जेव्हा कधी कोणत्याही वेळेस असे वाटेल की, अरे, अमुक अमुक गोष्टीमुळे, सुविधा नसल्यामुळे आम्हाला मनात असलेल्या काही गोष्टी करता येत नाहीत, तेव्हा सर्वसमावेशक कृष्णाला पूर्ण शरणागत होऊन प्रार्थना करा, 'कृष्णा माझ्या ह्या सेवेचा स्वीकार व्हावा.' असे जर केलेत, तर त्या सर्वांची जबाबदारी माझ्यावर येते. दुसरे काहीही करायला नको आणि ह्या अशा साध्या साध्या गोष्टी सर्वांना सांगण्यासाठीच मी ह्या वेळेस बाहेर पडलो आहे. कोणत्याही गोष्टीचे अवडंबर माजवू नका. आत्तापर्यंत सर्व ठिकाणी हेच होत आहे. प्रत्येकाने आपले वर्चस्व दाखविण्यासाठी काही नियम केले. काही बंधने घातली. पण मला विचाराल तर मी निर्विकार, निर्विकल्प, निराकार आहे. त्यामुळे मला कोणतेही काहीही बंधन नको. श्रद्धा आणि विश्वास ह्या दोनच गोष्टी प्रत्येकजण प्रत्येक वेळी मला देऊ शकतो. बाकी मला देण्यासारखं तुमच्याजवळ काहीही नाही. ते सोडून दुसरं काही मला घेण्यासारखे ही नाही. श्रद्धा आणि विश्वास यामुळे तुमच्या माझ्यातलं बंधन आणि नातं दृढ होईल.

माझ्यासाठी जे उत्सुक असतात, माझ्यावरील प्रेमाने ज्यांचे हृदय भरलेले असते त्यांच्यासाठी मी सतत धावत असतो. अनन्यभक्तीने, पूर्ण श्रद्धेने, पूर्ण विश्वासाने जो कोणी माझी 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' ह्या मंत्राने सेवा करतो त्याचा सर्व योगक्षेम मी चालवितो. तुम्हाला लाखो रुपये खर्च करून किंवा दुसऱ्या कोणत्याही मार्गाने न मिळणारी मानसिक शांती केवळ ह्या मंत्राच्या आराधनेतूनच मिळणार आहे. भावी पिढीच्या प्रगतीचा मार्ग सांगण्यासाठी मी इथे आलो. तुमच्या सहकार्यामुळेच माझा इथे येण्याचा उद्देश बराचसा सफल झाला.

हे सगळे कृष्णाचे मनोगत सांगून पुढे ताईंनी सांगितले, 'कृष्ण म्हणतो आभार मानू नको, कारण हे सारे माझे भक्तच आहेत आणि भक्त हे माझेच रूप आहे. आभाराने दुरावा निर्माण होतो.' त्यामुळे तुमचे मी आभार मानत नाही. कृष्णाच्या हाकेला जो प्रतिसाद तुम्ही दिलात त्याबद्दल तुमचे कौतुक करते.

कृष्ण ताईंना म्हणतो,
''ताई, तू सूत आणि मी सुगंधयुक्त फुले.
सुगंधयुक्त फुले गुंफली जातात ती सुतांनी,
म्हणून धाग्यालाही तितकेच महत्त्व आहे;
त्याप्रमाणे तुझे आहे.
तू धागा बनलीस म्हणून प्रत्येकाने तुला आपल्या
जीवनातील कृष्णभक्तीचा दुवा बनवले.
त्यामुळे तू त्यांच्यामध्ये आणि ते तुझ्यामध्ये गुंफले जातात.
लाडक्या कृष्णाची भेट घ्यायची म्हणजे
ताईंच्या पाया पडायचे असे म्हणतात.
आणि म्हणूनच मी म्हणतो
मी ताईतर्फे तुमची सेवा स्वीकारतो.''

***

ॐ

अशा रीतीने अमेरिकेची तिसरी ध्यानयात्रा पुरी करून हजार-बाराशे नवीन भक्तांना आशीर्वाद आणि प्रसाद देऊन ताई भारतात परत आल्या. आल्यानंतर कृष्णाने त्यांना नेहमीप्रमाणे दोन आठवडे ध्यान करायला सांगितले होते. कारण अमेरिकेत असताना अनेक भक्तांना आशीर्वाद दिले, काहींना वचने दिली त्यासाठी, तसेच नऊ नव्या केंद्राची केलेली स्थापना यासाठीही ध्यानाची आवश्यकता होती. भविष्यातील विश्वकल्याणाच्या कार्यासाठी आणि अमेरिकेतील विश्वजननी मंदिराच्या स्थापनेसाठी या ध्यानाची गरज होती.

आपट्याच्या कारखानीसकाकांच्या द्वारकाधीश मंदिराच्या उद्घाटनाची तारीख कृष्णाने सांगितली होती १२ डिसेंबर १९९६. त्याचीही जोरात तयारी चालू होती. त्या मंदिरासाठी देखील ध्यान करणे चालू होते. ठरवल्याप्रमाणे १२ तारखेला पूज्य ताईंच्या हस्ते व थोर स्वामिभक्त स्व. पूज्य नानामहाराज परांजपे यांच्या उपस्थितीत द्वारकाधीशाची प्रतिष्ठापना झाली. यावेळी कृष्णाने सर्व उपस्थितांना असे वचन दिले, ''त्यांच्या योगक्षेमासाठी मी इथे सदैव उभा आहे. अठरा वर्षांपूर्वी मी कृष्णकुटीरमध्ये उभा राहिलो तो कृष्णभक्तांसाठी. आज माझ्या कार्याची व्याप्ती वाढली असून इथे मी सर्वसामान्य भक्तांसाठी उभा आहे. त्यांनी साद घालताच त्यांच्या हाकेला धावून येईन हे माझे वचन समजा. माझा आवडता प्रसाद म्हणजे सुदाम्याचे पोहे. तो मला माझ्या भक्तांना या ठिकाणी वाटायचा आहे.''

आठ ते दहा जानेवारीला मौन पाळून अखंड ध्यान कर, असा श्रीकृष्णाने ताईंना आदेश दिला. ताईंच्या दृष्टीने कृष्णाने आदेश दिला, इथेच इतर सगळ्या गोष्टी थांबतात. त्याप्रमाणे ताई तसं करणारच. हे ध्यान सर्व भक्तांसाठी करायला सांगितलं होतं त्याबद्दल ताई म्हणतात, 'आठ तारखेला जे जे निरोप आले ते इतक्या गंभीर अडचणीत असलेल्यांचे आले, की माझ्याकडून भगवंताचा आदेश सांगताना मी पण एक माणूस म्हणून चूक होण्याची शक्यता होती, ती ह्या मौनामुळे आपोआपच टळली. कृष्ण जे नेहमी म्हणत असतो की 'मी सर्व काही सगळ्यांच्या चांगल्यासाठीच करत असतो,' त्याचेच हे प्रतीक.'

आज सकाळीच एक अगदी घरच्यासारखे असलेले गृहस्थ आले होते. माझे मौन असल्याने त्यांच्याशी बोलले नाही. त्याच वेळी एक फोन आला तो मात्र श्रीकृष्णाने घ्यायला लावला. सर्वसाधारण माणसाला वाटेल माझ्याशी बोलल्या नाहीत, पण फोन आला तेव्हा मात्र बोलल्या. परंतु खरा तर याचा अर्थ असा आहे की ''गरज आहे तेथेच मी जातो. त्यांच्याशीच मी बोलतो.'' 'श्रीकृष्णाच्या सांगण्याप्रमाणेच आणि आदेशाप्रमाणेच इथे प्रत्येक गोष्ट घडते हे माझ्या भक्तांनी अजिबात विसरू नये. माणूस आपला मोठेपणा मिरवण्यात दंग होतो. परब्रह्माने त्याच्यासाठी काय काय केले याची त्याला पूर्ण विस्मृती झालेली असते. त्यानंतर मात्र पुन्हा अडचण आली की परब्रह्माकडे धाव. ह्यालाच म्हणतात मानवी वृत्ती. ही ज्या ठिकाणी वास करते तेथे परब्रह्माचे अस्तित्व जागृत होणे फार दुरापास्त. फुकटचा मोठेपणा, दंभ माजवून स्वत:ची प्रतिष्ठा कमी करू नका. जे घडते ते माझ्या इच्छेप्रमाणे घडते, घडले आणि घडणारही आहे, हे नीट लक्षात ठेवा.'

९७ साल हे जणू सतत ठिकठिकाणी जाऊन ध्यान करायचे वर्ष होते.

फेब्रुवारी आठ, नऊ आणि दहा तारखांना पुन्हा पूर्णवेळ ध्यान आणि मौन. तेपण अज्ञात ठिकाणी, असा कृष्णाचा आदेश आला. कृष्ण सांगत होता, ''मी प्रत्येक भक्ताला वचन देतो, त्याची पूर्तता मग मला करावी लागते. ती मी या ध्यानातून करतो. म्हणून मुद्दाम स्थळ निवडले ते अज्ञात. अज्ञात स्थळ म्हटल्यावर, ताईकडे सर्वांचा ओढा असल्याने ताई कोठे असेल याची तुम्हा सगळ्यांना काळजी वाटणे स्वाभाविक आहे. परंतु सर्वार्थाने भार वाहणारा मी बरोबर असल्याने कोणीही ताईची काळजी करू नये. ज्याच्याकडून मी ध्यान करून घेतो, त्यांच्या जीवनातील ते आनंदाचे क्षण! त्या आनंदाचा जो अनुभव घेतो त्यालाच तो माहीत असतो.''

त्यानंतरही अठरा तारखेपर्यंत कृष्णाला ठिकठिकाणी भक्तांच्या घरी जाऊन ध्यान करायचे होते ते ताईंनी केले आणि १९ फेब्रु. ९७ ला मंगलोरला जाण्यासाठी निघाल्या.

कृष्ण नेहमी सांगतो, ''जशी माझ्या भक्ताला माझी गरज तशीच मलाही माझ्या भक्ताची गरज असते. कारण मी माझ्या भक्तांमध्येच वावरत असतो. त्यांच्याकडूनच सर्व कामे करून घेत असतो. त्यासाठी त्यांच्या श्रद्धेची व भक्तीची खूपच आवश्यकता असते. माझा शब्द ऐकला, माझ्या सहवासात आले, म्हणजे माझ्या भक्तांना ताकद, स्फूर्ती येऊन हाताने कार्य करण्याची शक्ती येते. नैराश्य जाते. चेतना येते. चैतन्य प्राप्त होते आणि त्याचा योग्य त्या ठिकाणी, योग्य त्या प्रकारे आणि योग्य त्या वेळेस उपयोग

होणे ही एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट. ती मी माझ्या भक्तांच्या हातूनच करून घेऊ शकतो. त्याकरता मला फिरून कार्य करण्याची आवश्यकता भासते. माझा मंगलोर, उडुपीला जाण्यात तोच हेतू आहे.

दैवी आधार ही एक अत्यंत महत्त्वाची, स्फूर्तिदायक चेतना देणारी आणि भावनेने सर्व काही करून घेणारी अशी एक शक्ती असते. ती आपल्यामागे उभी आहे ह्याची जाणीव ठेवूनच त्या भक्ताने वावरावे.''

मंगलोरला सकाळी झालेल्या भक्तमेळाव्यात हजार बाराशे भक्त जमले होते. या सर्व भक्तांच्या घरात 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हा मंत्र पोचला. सकाळी दहा ते बारा या शुभवेळात कृष्णाने सर्वांना प्रसाद आणि आशीर्वादही दिला. सर्वांना खूप आनंद झाला. उत्साही वातावरणात, वाद्य-वादन, गायन असा कार्यक्रम झाला. कृष्ण म्हणतो हे सर्व लिहून ठेवण्याचे कारण हेच की 'त्या' स्मरणाने, पुन्हा पुन्हा त्या क्षणांचा आनंद माझ्या भक्तांना मिळवता येतो आणि हर्ष वाढतो. (आज ह्या पुस्तकाच्या निमित्ताने आपण तोच अनुभव घेत आहोत.)

श्रीकृष्णाचा मार्च महिन्यात आठ ते दहा तारखेपर्यंत ध्यान आणि अकरा, बारा मार्च ह्या दिवशी पूर्ण मौन पाळ असा आदेश आला. ध्यान ह्या शब्दाचा अर्थच असा की सर्वांच्यासाठी मनोभावे दृढ श्रद्धा ठेवून केलेली कृष्णाची आराधना. या आराधनेच्या काळात जे भक्त कृष्णाची श्रद्धेने प्रार्थना करतील त्यांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे लाभ होईल.

आताशा ताईंचा कार्यक्रम म्हणजे सतत गावोगावी फिरून कृष्ण सांगेल त्याप्रमाणे ध्यान करणे. अनेक भक्तांना भेटून त्यांच्यापर्यंत कृष्णाचे आदेश पोहोचविणे हे सतत चालू होते. महिन्यातले बारापंधरा दिवस ताई बदलापूरमध्ये नसायच्या. जणू ७८साली कृष्णाने सांगितले होते की ताई तुला १५ वर्षांनंतर कृष्णकुटीर सोडावे लागणार त्याचाच प्रत्यय येत होता.

शिवरात्रीच्या दिवशी पहाटे कृष्ण ताईंना म्हणाला, ''ताई, मी सांगेन तेव्हा कार्यासाठी बाहेर पडेन असे आधी मला वचन दे.'' 'अरे, परत वचन?' ''हो ताई, त्याची गरज आहे.'' 'बरं तर ! घे वचन, तूच माझ्याकडून ते निभावून ने. तुझ्या कृपेनेच ते मला शक्य आहे,' ताई म्हणाल्या.

शिवरात्रीला मंदिरात शिवपिंडीवर दुधाचा अभिषेक असे. त्याप्रमाणे आठ वाजल्यापासून भक्त यायला सुरुवात झाली. शिवपिंडीवर अभिषेक सुरू करताना कृष्णाने

सांगितले, ''ताई, आज तू अभिषेक करायचा नाही. फक्त अभिषेक केलेले दूध काढायचे काम करायचे.'' संध्याकाळी ताई सांगत होत्या, 'आज सगळेजण अभिषेक करत होते. मी अभिषेकाचे दूध काढून घेत होते, तेव्हा शंकरावर घातलेले दूध जणू माझ्याच अंगावरून ओघळत आहे असे मला जाणवत होते.' त्यावर कृष्ण लगेच म्हणाला, ''ताई, आज जसं तू अभिषेकाचे दूध काढलेस नं, त्याप्रमाणे माझ्या भक्तांवरची संकटं तुला काढायची आहेत. म्हणून आज तू अभिषेक करू नकोस असे सांगितले होते.'' हे ऐकताच ताईंना पहाटे कृष्णाने मागितलेल्या वचनाची आठवण झाली.

कृष्ण एकेक प्रसंगातून ताईंच्या कार्याची व्याप्ती जणू दाखवून देत होता. कित्येक ज्ञात आणि अज्ञात भक्तांसाठी ताईंकडून वेळोवेळी ध्यान करून घेत होता.

कृष्णप्रेरणेतून स्थापन झालेले आपट्याचे द्वारकाधीश मंदिर! दर महिन्याच्या चौथ्या शनिवार आणि रविवारी तेथे जाऊन ध्यान कर, सत्संग कर, लोकांना भेट असा आदेश आला. त्याप्रमाणे ताई आता महिन्यातले दोन दिवस आपट्याला जाऊ लागल्या. हरिहरेश्वर ताईंच्या कुलदैवताचे स्थान. तेथे पण कृष्ण म्हणेल तेव्हा तीनतीन दिवस ध्यानाला जाऊ लागल्या. जणू हरीच्या कार्यात हराचा पण सहभाग असावा असे सांगण्यासाठी त्या ध्यानयात्रा होत्या.

ह्याचबरोबर काही ठराविक दिवशी, कृष्ण सांगेल त्या दिवशी कृष्णकुटीरमध्ये भक्तांना मार्गदर्शन करायचे काम पण अव्याहत चालूच होते.

सकाळी अशीच गर्दीची वेळ होती. मंदिरात बाहेरच्या व्हरांड्यापर्यंत लोकांची गर्दी. एक पूर्ण सफेद कपडे घातलेला माणूस हातात, गळ्यात सोन्याच्या जाड चेन घातलेला, असा अंगणात थांबला होता. अचानक कृष्ण बोलत असतानाच बोलणे थांबवून ह्या माणसाजवळ जाऊन म्हणाला, ''अरे, तुझ्यासाठी मी अमुक अमुक दिवशी ध्यान केले.'' तो गोंधळला, 'अहो, आज मी इथे प्रथमच आलो आहे. इतक्या लोकांत तुम्ही मलाच का सांगता आहात?' ताई त्याला म्हणाल्या, 'ध्यानामध्ये तुमच्या डाव्या खांद्यावर हात ठेवून ध्यान करायला सांगितले होते. आत्ता तुम्ही आल्या आल्या कृष्णाने मला सांगितले, ''बघ, माझा तो भक्त बाहेर आला आहे. विचार त्याला त्याचा डावा खांदा कसा आहे?'' तो अवाक् झाला. ताईंना नमस्कार केला आणि सांगू लागला, 'ताई, मी जरी सफेद कपडे घालून आलो आहे नं तरी तुमच्याकडे येण्यासारखा माणूस मी नाही.' ताई त्याला म्हणाल्या, 'इथे सर्व गोष्टी कृष्णाच्या सांगण्याप्रमाणेच होतात.

तुम्ही कोणीही असा. कसेही असा, पण कृष्णाने सांगितले म्हणून मी तुमच्यासाठी ध्यान केलेच आहे.' 'मी आत येऊ का? मला तुमच्याशी काही बोलायचे आहे.' 'अरे, जरूर ये.' ते आत आले. कृष्णाला, ताईंना नमस्कार केला. कृष्णाने त्यांना आतल्या खोलीत जायला सांगितले. ते बोलू लागले, 'ताई, मी मंदिरात येण्याजोगा माणूस नाही. अशा पवित्र ठिकाणी मी खरे तर यायलाच नको. मी डागाळलेला आहे.' 'अहो, माझा बाकी कशाशीच संबंध नाही. माझ्या दृष्टीने कृष्णाने तुम्हाला दाखवले आणि तुमच्यासाठी ध्यान करायला सांगितले, एवढेच पुरेसे आहे. कृष्णाने अमुक-अमुक दिवशी पण पुन्हा तुमच्यासाठी ध्यान करायला सांगितले होते. कारण त्याचे म्हणणे तेव्हा तुम्ही अत्यंत अडचणीत होतात.' त्यांच्या डोळ्यात पाणीच आले. वाकून साष्टांग नमस्कार केला, प्रसाद घेतला आणि गेले. घरी जाऊन बायकोला सांगितले, 'आज माझी मम मला भेटली. अगं मी दहा दहा वेळा सांगतोय की मी किती वाईट वळणाचा माणूस आहे. तिचे आपले एकच म्हणणे की ते काहीही मला माहीत नाही. कृष्णाने सांगितल्याप्रमाणे मी तुमच्यासाठी ध्यान केले. तर माझ्या ह्या 'ममला' एकदा तरी तू घरी जेवायला बोलव.'

दुसऱ्या वेळी ते अगदी सकाळी आले. ताई ध्यानच करत होत्या. बाहेरून 'मम', म्हणून कोणीतरी हाका मारत होते. ताई बाहेर येऊन बघतात तर हा माणूस. सांगू लागले, 'मम्, मी नवीन होंडा गाडी घेतली, ती घेऊन आलो आहे. तुम्ही त्यात बसल्याशिवाय मी ती वापरणार नाही.' 'ते बघू. तुम्ही आत या. चहा घ्या. मी कृष्णाला विचारते, तो म्हणेल तसे आपण करू,' ताई त्यांना सांगू लागल्या. ते म्हणाले, 'नको, नको. चहा नको. आधी कृष्णाला विचारा.' कृष्णाने सांगितले की ताई येईल. हा माणूस एकदम खूश. ताईंना गाडीत बसवले, नमस्कार केला आणि स्वत: भन्नाट गाडी चालवत अंबरनाथपर्यंत नेऊन आणले. मग चहा घेऊन गेला.

नंतर त्याने एकदा घरी जेवायला बोलावले. त्याची बायको सांगत होती, 'ताई, आमच्या लग्नाला तेरा वर्षे झाली. हे त्यांच्या व्यवसायामुळे कधीही घरी जेवायला नसतात. आज निव्वळ तुमच्यामुळेच हा योग आला. आपण तिघेही एकदम जेवायला बसू.' ताई सांगत होत्या, 'कृष्णाला सगळे भक्त सारखेच. जो श्रद्धा आणि विश्वासाने मला हृदयापासून बोलवतो तो माझा खरा भक्त. नाहीतर वाल्याचा वाल्मीकी झालाच नसता.'

कृष्ण नेहमीच भक्तांचा उल्लेख करताना, माझे ज्ञात आणि अज्ञात भक्त असा करत असे. अज्ञात भक्त म्हणजे जे ताईंना ओळखत नाहीत, बदलापूरला आलेले नाहीत

असे. त्यांच्यासाठी देखील कृष्ण कसा उभा राहत असे, त्याचे हे उदाहरण.

नेहमीप्रमाणे आजही कृष्णकुटीरमध्ये पाऊल ठेवायलाही जागा नव्हती. आज बरेच दिवसांनी ताई बदलापूरला आल्या होत्या. सकाळी साडेआठची वेळ. ताई आतून आल्या. शंकराला अभिषेक झाला आणि त्या नेहमीप्रमाणे घंटेखाली उभ्या राहिल्या. सगळ्यांच्या मनात उत्सुकता होती आता कोणाला त्या पुढे बोलावतील. त्याने पुढे जाऊन आपला प्रश्न विचारायचा, अडचण सांगायची. ताई मात्र कोणालाच पुढे बोलवत नव्हत्या. सारखी खिडकीतून लांबवर नजर टाकीत होत्या. लोक पण शांतपणे बसून राहिले होते. दोन-तीनदा दाराजवळ जाऊन आल्या. बहुधा कोणाची तरी विलक्षण ओढीने वाट बघत होत्या. इतक्यात बाहेरचे फाटक वाजले. कृष्णाची घाई सुरू झाली, ''अग, त्यांना आत बोलव. मला त्यांच्याशी महत्त्वाचे बोलायचे आहे.'' कृष्णाच्या सांगण्याप्रमाणे ताई ताबडतोब बाहेर जाऊन म्हणाल्या, 'अरे, आतच या! तुमच्यासाठी कृष्ण किती वेळ खोळंबला आहे. तुमची वाट बघत आहे.' ते दोघेही बावरलेच. त्यांना कळेचना हे काय चालले आहे. जवळ असलेल्या कृष्णभक्तांनी सांगितले, 'अहो, ताई तुम्हाला बोलवत आहेत, तुम्ही आत जा.'

त्याप्रमाणे ती दोघं आणि ताई आत गेल्या. कृष्णाने त्यांना बसायला सांगितलं. त्यांचा प्रश्न ऐकून घेतला. अडचण समजावून घेतली आणि ते सर्व बाहेर मंदिरात आले. कृष्णाने त्यांना प्रसाद दिला आणि सांगितले, 'तुम्ही आज इथे आलात नं, आता कसलीही काळजी करू नका. पूर्ण जबाबदारी माझी. मी तुमच्या सतत पाठीशी आहे ह्याची खात्री बाळगा. तुमच्या केसाला पण कोणी धक्का लावू शकणार नाही, हे लक्षात ठेवा.' ते शब्द ऐकून ते दोघेही हरखून गेले. पुन्हा पुन्हा कृष्णाला-ताईंना नमस्कार करून बाहेर पडले.

ह्या दोघांचे नुकतेच लग्न झाले होते. भाड्याच्या घरात संसार थाटला होता. अचानक जास्त पैसे देणारे भाडेकरू भेटले म्हणून तो घरमालक, तुम्ही घर खाली करून द्या म्हणून ह्यांच्या मागे लागला होता. त्यांनी जागा सोडावी म्हणून धमक्या, लाईटच बंद करणे वगैरे प्रकार चालले होते. त्यालाही हे दाद देत नाहीत असं पाहून अगदी सामान बाहेर फेकून देऊ, पासून ते तुमच्या जिवाला पण धोका आहे, ह्या बाई एकट्याच घरात असतात सावध रहा अशा धमक्यांपर्यंत वेळ आली होती. हे बिचारे अतिशय घाबरून जाऊन जागा बघत होते. दुसरी जागा पण मिळत नव्हती. ती मिळाल्याशिवाय ही सोडणार कशी अशा पेचात ते अडकले होते. नवरा घरी येईपर्यंत बायकोच्या आणि

बायको सुखरूप दिसेपर्यंत नवऱ्याच्या जिवात जीव नसायचा. त्यांच्या ओळखीच्या गृहस्थाने सांगितले म्हणून आज पहिल्यांदाच ते कृष्णकुटीरमध्ये आले होते. त्यांच्यासाठी कृष्णही वाट पाहत होता. कृष्ण जे नेहमी सांगत असतो, की तुम्ही देव मानलाच पाहिजे का? तर अजिबात नाही. फक्त स्वत:वर पूर्ण विश्वास ठेवून माणुसकीने वागलात, कर्तव्याला चुकला नाहीत, ती प्रेमाने केलीत तर ते सर्व काही मला येऊन पोहोचते. तीच माझी सेवा असे समजून मी त्या सेवेचा स्वीकार करतो आणि माझे मदतीचे हात सतत तुमच्यासाठी पुढे असतात. ते अशा अनेक प्रसंगातून कृष्ण दाखवूनही देत असे.

कधी कोणा भक्तासाठी, कधीतरी एखाद्या जागेसाठी, कधी निसर्गासाठी आणि नियमित विश्वशांतीसाठी असे कृष्णाच्या आदेशाप्रमाणे ताईंचे सतत ध्यान सुरू झाले. ध्यान असल्याने, ताई बरेचदा बाहेरगावीही जाऊ लागल्या. कृष्णाने सांगावे, आपल्याला इथे इथे जायचे आहे, की लगेच मदतीसाठी माणसे धावून यावीत. ताईंनी तेथे जाऊन कृष्ण सांगेल त्याप्रमाणे ध्यानधारणा करून भक्तांना आशीर्वाद, प्रसाद देऊन यावे. अशी ताईंच्या कामाची व्याप्ती वाढू लागली. त्याचबरोबर कृष्णाने भक्तांनी वैयक्तिक उपासनेवर भर द्यावा असे सांगायला सुरुवात केली. ह्या काळाची गरज असा 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हा तारकमंत्र सतत जपत राहा, कर्तव्याला चुकू नका, ती प्रेमाने करा, तुमचे प्रश्न आपोआप ह्याच साधनेमुळे सुटू लागतील, मार्ग निघेल, परिस्थितीला तुम्ही धैर्याने तोंड देऊ शकाल, असं सांगून भक्तांनापण खंबीर, सक्षम बना असा आदेश कृष्ण देऊ लागला.

***

ॐ

ह्या काळात म्हणजे साधारण ९७ ऑगस्टनंतर ताई कालिकत, बद्रिनाथ, हरिद्वार हृषीकेश, पुणे, जळगाव, नाशिक, कोल्हापूर, हरिहरेश्वर, बडोदा येथे कृष्णकेंद्र स्थापन करणे, अनेक भक्तांना भेटणे, त्यांना मार्गदर्शन करणे, ह्या कार्यासाठी जाऊन आल्या.

ह्या ध्यानयात्रेत श्रीकृष्णाने किती अनुभव दिले! त्याचे परब्रह्मस्वरूप, त्याची निसर्गावर असलेली सत्ता, अणूरेणूत भरून राहिलेले त्याचे अस्तित्व अशा अनेक गोष्टींची प्रचिती, अनुभूती ताईंबरोबर असलेल्या इतर भक्तांनापण मिळाली.

मुंबईहून ताई आणि इतर कृष्णभक्त विमानाने कालिकतला चालले होते. कालिकतला पोहोचण्याआधी घोषणा झाली 'पाऊस फार असल्याने विमान नाईलाजाने मद्रासला न्यावे लागेल, क्षमस्व.' कृष्ण ताबडतोब म्हणाला, ''छे, छे आपण थोड्याच वेळात कालिकतला पोहोचू.'' आणि खरोखरच त्या थोड्या वेळासाठी पाऊस थांबला. विमान कालिकतला पोहोचले.

रात्री गुरवायुरला पालखीचे वेळेपर्यंत पोचून, मंदिरात धूळभेट घेऊन, मिरवणूक पाहून ते सर्व हॉटेलवर गेले. कृष्ण ताईंना सतत ध्यान करायला सांगत होता. त्याप्रमाणे त्यांचे 'नजर फिरवून ध्यान' चालू होते. दुसऱ्या दिवशी ताईंची तुला केली गेली. तेथील वैभवशाली हत्तीघर पाहून झाले. पुढे प्रसिद्ध शंकर व देवीचे मंदिरास भेट दिली आणि श्री. कुमारन यांच्या घरी गेले. कृष्ण जातानाच म्हणाला, ''आता तुम्हाला मातृमंदिरात घेऊन जातो.'' कोणालाच काही कळेना कोठे जायचे आहे ते. कृष्ण म्हणाला, ''आधी कुमारन ह्यांच्या घरी जाऊ, मग सांगतो.'' श्री. कुमारन ह्यांच्या आई, वय वर्षे ९४, ह्या त्या ठिकाणी राहत असत. मुंबईपेक्षा त्यांना इथेच राहणे आवडत असल्याने श्री. कुमारन यांनी त्या घरात एखाद्या शहरातील घरात असाव्यात अशा सर्व सुविधा केल्या होत्या. पाच-सात माणसे अगदी घरच्यासारखी, सर्व कामे झटून आणि आपुलकीने करत होती. मुलगासून भेटल्याने आईच्या चेहऱ्यावरचे समाधान आणि त्या उभयतांचे मातेवरील प्रेम यामुळे तेथील वातावरण भारून गेले होते. श्रीकृष्णाने सांगितले, ''आहे की नाही खरेखुरे 'मातृमंदिर'? मी त्या सर्वांची सेवा स्वीकारली आहे. ताई त्यांच्यासाठी

संध्याकाळी सात ते आठ ध्यान कर हं.'' कुमारनच्या आई हे सर्व ऐकून अत्यंत भारावलेल्या अंत:करणाने म्हणाल्या, 'बाळ, आज तू साक्षात कृष्णाला आपल्या घरी घेऊन आलास. माझ्या आयुष्याचे कल्याण आणि चीज झाले.' म्हणून त्या अत्यंत श्रद्धेने ताईंच्या पाया पडू लागल्या. त्यावर कृष्णाने त्यांना उठवून मिठीत घेऊन सांगितले, ''अगं, मी तुझ्यासाठीच इथे आलो आहे.'' कृष्ण जे सांगतो, 'कर्तव्यात मला पाहा. प्रेमाने मला जिंका,' त्याचे हे जणू जिवंत उदाहरण.

ताईंच्या वाढदिवसाला कृष्णाने सांगितले, ''सारे विश्वचक्र मी चालवतो. त्यासाठी मला व्यक्तीची गरज लागते. व्यक्तीची योग्यता पाहून कार्यासाठी मी तिची निवड करतो. ताईला मी अशी योग्यता पाहूनच निवडले. तिच्याकडून मी ५१ सालापासून कार्य करून घेत आहे. अगदी त्यापूर्वीही तिच्या नकळत ते (कार्य) मी करून घेतच होतो.

आता मला माझ्या कार्याच्या योजनेसाठी बद्रिनाथयात्रेला जायचे आहे. द्वारकाधीश जन्माला आलेला आहे. त्याच्या हातून मला पुष्कळ कार्य करायचे आहे. त्या कार्याच्या पूर्व तयारीसाठी ध्यानयात्रेची मला आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे ही यात्रा माझ्या सर्व भक्तांसाठीपण आहे. ठिकठिकाणी माझे भक्त मला भेटायला येतात. त्यांच्या चेहऱ्यावर आनंद, उत्साह ओसंडत असतो. माझ्या भक्तांचे हे प्रेम, श्रद्धा, भाव या सर्वांचे जणू गाठोडे बांधून मी माझ्या हृदयात ठेवले आणि मी यात्रेला निघालो बद्रीनाथला. त्यावर ताई कौतुकाने म्हणाल्या, 'कृष्णा, द्वारकाधीशाच्या कार्याची काय ही तुझी तयारी?' ''ताई, मला प्रत्येक कार्य करताना अशीच पूर्वतयारी करावी लागते. मगच माझ्या कार्याचा विस्तार अफाट आणि अभंग होतो; तो अखंड टिकतो आणि ओघाओघानेच वाहत राहतो. ताई, तुझीही मला अशीच तयारी करून घ्यावी लागली. कशी ते तुला माहीत नाही. कार्य माझे, मीच करणारा, मीच करवूनही घेणारा पण त्याची योजना अशीच करावी लागते.''

असे सांगून कृष्णाने डोबिंवलीच्या भक्तांसह १४ ते २३ ऑक्टोबर ९७ अशी बद्रिनाथयात्रा केली.

तेथे थंडीचा भयंकर कडाका होता. बद्रिनाथला आल्यावर सकाळीच कृष्णाने ताईंना सांगितले की, ''ताई, हे लोकरीचे कपडे घालून केलेले ध्यान मला नाही आवडणार.'' कृष्णाने असे सांगताच ताईंनी स्वेटर, हात-मोजे, पाय-मोजे, मफलर, कानटोपी काढली आणि त्या ध्यानाला बसल्या. ध्यानाच्या वेळेस सर्व भक्तांनी देवळात लावण्यासाठी नेलेली निरांजने तेथेच लावली आणि 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' ह्या मंत्राचा जप करत तेथेच थांबले. नंतर कृष्णाने सांगितले, ''संध्याकाळी कपालतीर्थावर

जाऊन तू ध्यान कर. तेथे माझ्या सर्व भक्तांसाठी आणि भक्तांतर्फे एक ताजे टवटवीत फळ घेऊन नदीत सोड.'' आश्चर्य म्हणजे इतक्या थंडीत ताईंना ध्यान पूर्ण होताना घाम आला होता.

हरिद्वारला असताना सकाळी ताईंनी बरोबर असलेल्या शिवपिंडीवर गंगाजलाचा आणि अत्तराचा अभिषेक केला. प्रत्येकाला एकेक चांदीचे तुळशीपत्र देऊन ते शिवपिंडीवर वाहायला सांगितले. ताईंनीही तुळशीपत्राचा अभिषेक केला, तांदुळाचा अभिषेक केला, बासरीला अत्तर लावायला सांगितले. मोठ्या पणतीत वाती, कापूर लावायला सांगितले. हे सर्व चालू असताना सर्वजण 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हा जप करत होते. ताई पूर्ण ध्यानमग्न होत्या. पूजा पूर्ण झाल्यावर ताई उभ्या राहील्या आणि कृष्ण बोलायला लागला. त्याने तीन मंत्र सांगून सगळ्यांकडून म्हणून घेतले. त्यांचा अर्थ सांगितला.

'हे नारायणी, गौरी आम्ही तुला शरण आलो आहोत. सर्वांचे कल्याण कर. सर्वांचे क्लेश, दु:ख दूर कर. हे महालक्ष्मी, तू आमच्यावर अनुग्रह कर. आम्हाला उत्तम आरोग्य दे. निरोगी असे दीर्घायुष्य दे. धन दे. यश दे. कारण आरोग्याशिवाय आयुष्याचा आणि धनाचा आम्ही कसा उपभोग घेणार?' असे बोलून अभिषेकाचे भांडे भरुन तीर्थ (पाणी), ताई तीन घोटात प्यायल्या. तीर्थ पिऊन झाल्यावर ते भांडेही ताईंनी पदराने पुसून कोरडे केले आणि सांगितले, ''सगळे तीर्थ मीच प्यायलो. आलेल्या तुम्हा सर्वांचे क्लेश या तीर्थाबरोबर मी प्यायलो आहे. तुमची सर्व जबाबदारी माझ्यावर आहे. हे आज मी तुम्हाला दिलेले वचन आहे. आता काळजी करू नका. सर्व माझ्यावर सोपवा. यातले एक एक पान प्रसाद म्हणून हाताने घ्या.''

हरिद्वारच्या एका घाटावर एक शिवमंदिर होते. तेथे सर्वजण दर्शनाला गेले. ताई तेथे बराच वेळ ध्यानाला बसल्या होत्या. ध्यानानंतर त्यांनी शिवपिंडीकडे बोट दाखविले. दोघातिघांनी बघितले, तर शिवपिंडीवर पांढरे स्वस्तिक व त्यात कोरल्यासारखा ॐ दिसत होता. तेथे ह्या मंडळींशिवाय इतर कोणीही आलेले नव्हते. ते पाहून हरिहराला नमस्कार करून सर्वजण बाहेर पडले.

बद्रीच्या यात्रेच्या समाप्तीच्या वेळेत जेव्हा ताई ध्यानस्थ होत्या तेव्हा कृष्णाने त्यांना सांगितले, ''ताई आता अत्यंत महत्त्वाची गोष्ट तुला सांगतो. ती ऐक व पक्की ध्यानात ठेव. 'विश्व हेच तुझे घर' हा ह्या ध्यानाचा अर्थ आहे.'' त्यावर ताई कृष्णाला म्हणाल्या, 'कृष्णा, मला अर्थ कळण्याची गरज वाटत नाही. कारण आतापर्यंत ह्या अज्ञानातच **तू** सर्व काही माझ्याकडून करून घेतलेस. माझा हात आपल्या हातात

घेऊन मला चालवलेस. कृष्णा तुझ्या लीलेबद्दल किती सांगावे, किती बोलावे तेवढे थोडेच. अशावेळेस तू म्हणतोस की ताई, तुला कळतच नाही. पण कृष्णा, तेच बरे की.' "म्हणूनच मी तुझ्याकडून फक्त मला पाहिजे तेवढेच आणि तसेच करवून घेऊ शकतो." 'कृष्णा, मलाही तेव्हा असंच वाटतं रे, की कर्ता करविता तूच. असे असताना माझे (ताईचे) तेथे अस्तित्व नसलेलेच बरे. माझे अज्ञानच योग्य.' संपूर्ण शरणागती ही ह्या भावापेक्षा काय वेगळी आहे?

बद्रीच्या यात्रेवरून आल्यावर नोव्हेंबरमध्ये कृष्ण म्हणू लागला की, "ताई, मी १४ ते १७ नोव्हेंबर नाही बरं का. सगळ्यांना सांग." एवढेच सांगत होता. कोठे व कोणाबरोबर ते मात्र अजिबात बोलत नव्हता. शेवटी चौदा तारखेला त्याचा खुलासा झाला. ते तीन दिवस तीन भक्तांकडे जाऊन ध्यान केले. ह्या तीनही भक्तांना ताई त्यांच्याकडे ह्यावेळेस ध्यानाला येणार आहेत ह्याची अजिबात कल्पना नव्हती. त्याबाबत कृष्णाने असे सांगितले की, "जेथे मी जाण्याची गरज आहे तेथेच मी वेळेवर जात असतो. मला जे योग्य वाटेल तेच मी करत असतो. अशा वेळेस कोणास काय वाटते ह्यापेक्षा कोणाची अडचण कशी दूर होईल व होणे आवश्यक आहे तेच मी पाहत असतो. तशा प्रकारची रचना मी करतो."

९६ साली जेव्हा ताई अमेरिकेत गेल्या होत्या तेव्हाच कृष्णाने तेथील भक्तांना सांगितले होते, "मी आता दोन वर्षांनी परत येईन. माझा एक भक्त मला बोलवणार आणि मी त्याच्याकडे येईन. त्याच्याकडेच राहीन. मला तेथे कोणी येऊन भेटले तर भेटीन. १९९८ नंतर मात्र मला भारतासाठी कार्य करायचे आहे. इथे जशी केंद्रे स्थापन केली आहेत तशी भारतात ठिकठिकाणी केंद्रे स्थापन करायची आहेत. तेव्हा मी काश्मीरला जाणार, पंजाबात जाणार." आजची काश्मीरची परिस्थिती अशी आहे की कोणीही तेथे जायला धजावत नाहीत. पण कृष्णाचे म्हणणे असे की "तेथे मला कार्य करायचे आहे म्हणून मी जाणार."

कृष्णाने सांगितल्याप्रमाणे ९८ साली ताई अमेरिकेत गेल्या. त्याच्या आधी ९६ साली ताई जेव्हा अमेरिकेत गेल्या होत्या तेव्हा कृष्णाने त्यांना ध्यानात एक जागा दाखविली. एक मोठं तळं होतं. त्याच्या काठावरच्या इमारतीत स्वामी विवेकानंदांचा फोटो होता. ती जागा दाखवून कृष्णाने ताईंना सांगितले होते, "इथे विश्वजननीचे मंदिर होणार."

पुढे ताई एलएला गेलेल्या असताना एक कृष्णभक्त ताईंना म्हणाले, 'ताई, तुम्हाला एक ठिकाण दाखवायचे आहे. आपण जाऊया का? जाण्याबाबत कृष्णाचे

काय मत आहे?' ताईंना ध्यानात दाखवलेली जागा आठवली आणि त्या विचारू लागल्या, 'अहो, ती अशी अशी जागा आहे का?' त्यावर कृष्ण म्हणाला, ''अरे, तू ताईचे काही ऐकू नकोस आपण जाऊ या.'' त्याप्रमाणे ते ताईंना तेथे घेऊन गेले. ताईंच्या लक्षात आले की ध्यानात आपण हीच जागा बघितली होती. त्या म्हणाल्या, 'हेच ते ठिकाण जे मला कृष्णाने ध्यानात दाखवले. इथेच विश्वजननीची स्थापना होणार. त्या दृष्टीने तुम्ही त्यांच्याशी बोलून घ्या.' ती जागा म्हणजे स्वामी योगानंदाच्या प्रेरणेतून स्थापन झालेला योगदा सत्संग सोसायटीचा(वायएसएस)आश्रम होता.

तेव्हा वायएसएसच्या अध्यक्षा होत्या 'दया माँ'. स्वामी योगानंदांची विश्वजननीचे मंदिर त्यांच्या आश्रमात करण्याची इच्छा होती. पण ते असेपर्यंत हे काम होऊ शकले नव्हते. त्यापुढेही ९८ सालापर्यंत ते झालेले नव्हते. ताईंचे यूएसला जायचे निश्चित ठरल्यावर दया माँच्या बरोबर मुलाखतीची वेळ खास ह्या कामासाठी म्हणून घेतली होती. त्याप्रमाणे ताई आणि काही कृष्णभक्त योगदांच्या एलएच्या आश्रमात दया माँना भेटायला गेले. प्रथम थोडी औपचारिक बोलणी झाल्यावर त्या ताईंना म्हणाल्या, 'आपण आश्रम बघू या.' असे म्हणून सगळे आश्रम बघायला गेले. आश्रमात फिरत असताना ताई अचानक एके ठिकाणी थांबल्या. आणि त्यांचा कृष्णाशी संवाद सुरू झाला. श्रीकृष्ण सांगत होता, ''इथेच थांब. इथे विश्वजननीची प्रतिष्ठापना करायला पाहिजे. माझ्या भक्ताची ती इच्छा अपूर्ण राहिली आहे. ताई तू ह्याच्यापुढे जाऊ नकोस.'' 'ठीक आहे कृष्णा,' असं म्हणून त्यांनी दया माँना हा निरोप दिला. दया माँ म्हणाल्या, 'ठीक आहे. ह्याबाबत तुमचे काही ठरले की आम्हाला कळवा. मी पण आमच्या इतर लोकांशी बोलून घेईन.' असे बोलणे होऊन सगळे तेथून निघाले. ह्या ध्यानयात्रेत, ताईंचे ध्यान मात्र खूप झाले. त्याचप्रमाणे नवीन पंचवीस ठिकाणी श्रीकृष्णलीलाकेंद्रांची स्थापना पण झाली.

*३१ डिसेंबरला नववर्षासाठी श्रीकृष्णाने संदेश दिला.*

''सर्व ब्रह्मांड ज्यामध्ये भरलेलं आहे, जीवनाचा सर्व अर्थ ज्यात सामावलेला आहे, असा महत्त्वाचा मंत्र म्हणजे 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हा आहे. या मंत्रानेच मला जवळ करा. मला तुमच्याजवळ करण्याचा हाच साधा, सोपा आणि सरळ मार्ग आहे. हे सर्व मनापासून करणे हे मात्र फारच महत्त्वाचे आहे. तुम्ही जे हृदयापासून कराल, तेच मला पोहोचते आणि तेव्हाच मी तुमच्यासाठी उभा राहू शकतो. त्यालाच तुम्ही श्रीकृष्णाचा 'अनुभव' असे म्हणता.

ताई ९२ साली जेव्हा दोहा, मस्कत, दुबईला आल्या होत्या तेव्हाच कृष्णाने सांगितले होते, ''मी आत्ता (९२ साली) मस्कतला माझे पहिले केंद्र काढले आहे. सात-आठ वर्षांनी मी जेव्हा दोह्यात येईन, तेव्हा सामुदायिक प्रार्थनेसाठी केंद्राची स्थापना करेन.'' तेव्हा तेथील सामाजिक स्थिती पाहता, तेथे केंद्र सुरू होतील असं अजिबात वाटत नव्हतं. कारण तेथले नियम कडक आहेत. तेथले सरकार मूर्तिपूजेविरुद्ध आहे. त्या भूमीवर असे काही घडेल असे वाटण्याजोगी परिस्थिती अजिबात नव्हती. ताई पुन्हा ९९ साली बरोब्बर सात वर्षांनी दोहा, दुबई, शारजा येथे कार्यासाठी आल्या. कृष्णवचनाप्रमाणे दोह्यात तीन व दुबई इ. ठिकाणी मिळून एकूण सहा श्रीकृष्णलीलाकेंद्रे स्थापन झाली.

दोह्यात ताईंना भेटायला एक केरळी ख्रिश्चन मुलगी नूरा आली होती. ती व्यवसायाने नर्स होती. फार वर्षापूर्वी इथे आलेली. नंतर तेथल्याच एका कतरी मुसलमान व्यक्तीशी लग्न केलेले होते. ती आशीर्वाद घ्यायला कोणाच्या तरी सांगण्यावरून आली होती. बहुधा त्या नवराबायकोचे पटत नसावे. काहीतरी अडचण असावी.

ती आली. भारतीय पद्धतीप्रमाणे नमस्कार करून समोर बसली. ताईंनी तिची प्रेमाने चौकशी केली. तिचं सगळं म्हणणं ऐकून घेतलं. कृष्णाने तिला भरभरून प्रसाद, आशीर्वाद देऊन तिचे लाड केले. ती फारच खूश झाली. थोड्या वेळाने तिने धीर करून विचारले, 'ताई तुम्ही माझ्याकडे घरी याल का?' तिला विचारताना अतिशय संकोच वाटत होता. कारण एका हिंदू धार्मिक गुरूला ती तिच्या घरी बोलवत होती. मात्र कृष्ण लगेचच तयार झाला. ताई म्हणाल्या, 'अगं, मी येईन तुझ्याकडे! कधी यायचे ते सांग.' तिला फार आनंद झाला. ती त्यांना आपल्या घरी घेऊन गेली. घर कसले ते, राजवाडाच होता तो! अफाट श्रीमंतीची साक्ष तिथली वस्तून् वस्तू देत होती. वास्तू इतकी प्रचंड मोठी होती की एक खोली हिच्या फक्त पादत्राणांसाठी होती. असा सगळा शाही कारभार होता. तिने ताईंचे कतरी पद्धतीने स्वागत केले. प्रथम कतरी स्पेशल पेय म्हणजे 'गावा', ते दिले. त्यानंतर एका मोठ्या परफ्युम बारजवळ नेऊन हवे ते परफ्युम लावले. नंतर खास तयार केलेल्या आसनावर बसवून कृष्णाची साग्रसंगीत पूजा केली. प्रसाद, फळे, फुले आणि दक्षिणा अर्पण केली. कृष्णाने पण ते सगळे स्वीकारले. दक्षिणा गुरूपौर्णिमेच्या प्रसादासाठी वापरेन असे वचनही दिले. तिने प्रसादासाठी केलेल्या खिरीवर कोरल्यासारखा ॐ आला होता. ती अगदी भारावून गेली.

ताई दोह्याहून परत यायच्या वेळी ही त्यांना भेटायला आली होती.ती नमस्काराला खाली वाकली. तिला उठवून ताईंनी आपल्या जवळ घेतले. कृष्णाचा एक फोटो दिला

आणि सांगितले, ‘हा फोटो घे. तुझ्या गादीखाली हा ठेव. हे नवऱ्याला सांगायची आवश्यकता नाही. रोज रात्री झोपताना मात्र माझे स्मरण करून झोप. मी सतत तुझ्या पाठीशी आहे ह्याची खात्री बाळग,’ असे बोलत बोलत ताईंनी तिला एक वस्त्र दिले. तिने ते कापड हातात घेतले, उलगडून पाहिले आणि ती अगदी ओक्साबोक्शी रडायला लागली. कोणालाच काही कळेना हिला अचानक असे झाले तरी काय? थोड्या वेळाने ती जरा शांत झाल्यावर सांगू लागली, ‘ताई, मी इथे प्रथम नर्सिंगचे काम करण्यासाठी म्हणून केरळहून आले. आज त्याला कित्येक वर्षे झाली. त्यानंतर मी कधीही केरळला जाऊ शकले नाही ना तिकडची कोणी माणसे माझ्याकडे आली. आता कृष्णाने जे वस्त्र मला दिले नं, ते अगदी तसेच आहे, जसे आम्हा तिघी बहिणींच्या फ्रॉक्ससाठी आई वापरायची. ते कापड बघून थेट केरळला आईकडे गेल्यासारखे वाटले. तुमच्या रूपाने मला माझी आईच भेटली असे वाटल्याने मला इतके अनावर रडू आले. ताई, माफ करा हं.’

त्यावर कृष्ण प्रसन्न हसत म्हणाला, ‘‘अगं, मला तुझाच मान! माझ्याइतके जवळचे तुमचे कोणीच नसते आणि अशीच माझ्या कृपाछत्राखाली राहा. काही काळजी करू नकोस.’’

ह्या नूराच्या उदाहरणावरून, वारंवार ज्या मानवताधर्माचा कृष्ण उल्लेख करी त्याची प्रचिती आली. कोण भारतीय ख्रिश्चन मुलगी. एका कतरी मुसलमानाशी लग्न करून मुसलमान झालेली. ताईंच्या रूपात कृष्णाला भेटली. त्यांनी पण तिला स्मरणाशिवाय कोणतीही दुसरी उपासना, साधना दिली नाही. तिचे आईच्या मायेने लाड, कौतुक केले. हा माणुसकीचा धर्म नाही तर दुसरे काय? तिला जप, नामस्मरण असे काहीही करायला सांगितले नाही. तो इतका दयाळू आहे की आपल्याला उपाय, उपासना देतानाही, भक्ताला ती सहजपणे करता येईल अशीच देतो.

***

ॐ

ताई दोह्याहून बदलापूरला आल्या, तेव्हा कारगिल युद्धाचे सावट भारतावर होते. कृष्णाने ताईंना आदेश दिला. ताई १२, १३, १४ जुलै ९९ भारतासाठी, कारगिलसाठी तू मेल्यासारखे ध्यान कर. त्याची अत्यंत आवश्यकता आहे.

दिनांक ११ जुलै ९९ला रात्री बरोबर बारा वाजता ताईंचे कारगिलसाठीचे ध्यान सुरू झाले. १२, १३, १४ असे तिन्ही दिवस कृष्ण सांगतो त्याप्रमाणे ताईचे ध्यान झाले. १२ सप्टेंबर ९९ रोजी कारगिल विजय झाल्याची बातमी आली. ह्या ध्यानाचे वर्णन नंतर कृष्णाने ताईंना लिहून ठेवायला सांगितले. ताई म्हणतात, 'हे ध्यान श्रीकृष्णच करवून घेत होता. मला जे दृश्य पाहावयास मिळाले ते अवर्णनीय. बऱ्याच वेळा मी बर्फाच्छादित डोंगरातून कड्याकड्यावरून जात होते. काही ठिकाणी पूर्ण शुष्क तर काही ठिकाणी खुरटे गवत, तर काही ठिकाणी लहान लहान झाडे अशा त्या डोंगरातून मी फिरत होते. मी फिरत होते असे म्हणण्यापेक्षा, श्रीकृष्ण आपली नजर फिरवत होता. मी सतत गोलगोल फिरत आहे असे मला वाटत होते. संध्याकाळी साडेसहाच्या सुमारास माझे त्या दृश्याचे ध्यान पुरे होत आले आणि मला खूपच थंडी वाजू लागली. आमच्या घरातले सगळेच आश्चर्यचकित झाले. कारण मी तर अगदी पंखासुद्धा न लावता ध्यान करत होते. तरी देखील माझे शरीर हुडहुडी भरून आल्यासारखे थरथरत होते. मला रेशमाने खुणेनेच अर्धा कप चहा देऊ का विचारले. मी खुणेनेच हो म्हटले. चहा घेतला आणि कृष्ण म्हणाला, ''साडेआठला गरम पाण्याने आंघोळ कर म्हणजे हुडहुडी थांबेल आणि तसेच घडले.'' त्यानंतर पुन्हा ध्यानाला सुरुवात झाली. मला खात्री आहे मी कधी प्रत्यक्ष त्या जागी गेले तर ती जागा, ते ठिकाण मला निश्चित पाहायला मिळेल. मी ते ओळखू शकेन. एकंदरीत त्या ध्यानाचा आनंद अवर्णनीय होता. आजही मी त्याचा आनंद उपभोगते आणि प्रत्येक वेळी मानसिकरीत्या तेथे जाऊन मी ध्यानाचा आनंद मिळवते.'

त्यानंतरही दोन दिवस कृष्णाने निरनिराळ्या प्रकारे ध्यान करून घेतले. मुख्य म्हणजे त्या वेळी मला हे जाणवले की, माझ्यातला 'मी' भाव सरला होता. 'मी' म्हणजे काहीच नाही हे मला निक्षून सांगायचे आहे. कारण कर्ता करविता तोच. तो

कोणाच्यातरीतर्फे ते करून घेतो हे त्यातील मुख्य तात्पर्य आहे. हे श्रीकृष्णा, विश्वाचा भार तुझ्यावर. मी त्यातला एक क्षुल्लक कण! तू हे सर्व काही माझ्याकडून करवून घेतोस, हेच माझे परमभाग्य. तुझी कृपा म्हणूनच तू माझी निवड केलीस. तुझे किती आभार मानावे ते थोडेच आहेत. अशा प्रकारे पुढे तू आणखी दोन दिवस ध्यान करून घेतलेस. परंतु त्याचे मला वर्णन करणे अजिबात शक्य नाही.' मी फक्त एवढेच म्हणेन, 'कृष्णा, ही तुझीच लीला!'

ताईंचे हे मनोगत वाचून डोळ्यात अक्षरश: पाणी उभे राहते. काय ही लीनता, नम्रता! आपल्या गुरुमाऊलींनी आपल्यापुढे केवढा मोठा आदर्श ठेवला आहे. कृष्णाची त्याच्या भक्तांकडून त्यांनी कसा सेवाभाव ठेवावा, दास्यभक्ती कशी करावी, ह्याचा जणू वस्तूपाठच ह्या मनोगतातून मिळतो.

मुंबईच्या काही भक्तांबरोबर कृष्णाने तिरुपती आणि बेंगलोरला जाण्याचे कबूल केले होते, त्याप्रमाणे ताई आणि चारपाच कृष्णभक्त असे प्रथम तिरुपतीच्या दर्शनाला गेले. हे सर्वजण रेल्वेने जाणार होते. प्रवास जवळजवळ छत्तीस तासांचा. कृष्णाने सर्वांना बजावले होते, प्रवासात कोणीही काही खायचे, प्यायचे घेऊ नका. मी सर्व सोय करतो. त्याचा शब्द खरा ठरला. गाडी पुण्यात आली तेव्हा पुणेकर भक्त जेवण--नाश्त्यासाठी उकडीचे मोदक, वाटली डाळ, पुरणपोळ्या, गरमागरम चहाचा थर्मास, सोबत भरपूर हार, फुले, पूजासाहित्य असा सारा सरंजाम घेऊन फलाटावर हजर होते.

तिरुपतीला गेल्यावर ह्या मंडळींना कळले की वर मंदिरात काहीच नेता येत नाही. ताई अंघोळ करून छान मोतिया रंगाची साडी नेसलेल्या, केस धुतल्यामुळे मोकळेच सोडलेले अशा खोलीत आल्या आणि ध्यानस्थ झाल्या. थोड्या वेळाने कृष्ण बोलू लागला, ''विचार काय करताय? व्यंकटेश्वराला भेटून आलो. हे हार योगेश्वराला घाला, सर्व पूजासाहित्य वापरून पाद्यपूजा करा. सर्व भक्तांनी अत्यानंदाने साग्रसंगीत पाद्यपूजा केली. ताईंचे ध्यान झाल्यावर पहाटे तीन-साडेतीनलाच वरती देवळात सगळे गेले. थेट गाभाऱ्यापर्यंत जाऊन मनसोक्त दर्शन झाले. पुजाऱ्यांनी वेंकटेश्वराच्या वस्त्रागृहात नेऊन, तेथील टोप प्रत्येकाच्या डोक्यावर ठेवून आशीर्वाद दिला. ताईंनी योगेश्वराच्या सांगण्याप्रमाणे सर्व कृष्णभक्तांच्या वतीने वेंकटेश्वराच्या हुंडीत पैसे ठेवले.

कृष्णाने कारगिलध्यानाच्या वेळेसच ताईंना सांगितले होते, ''ताई मला असेच ध्यान १३ ते १७ सप्टेंबरला करायचे आहे.'' त्यामुळे ऑगस्टपासूनच ताई सांगत होत्या की माझे सप्टेंबरमध्ये अत्यंत महत्त्वाचे ध्यान आहे. तेव्हा शक्यतो कोणीही

कृष्णकुटीरमध्ये येऊ नका, फोनही करू नका. ताई सांगतात की खरोखरच तसेच सहकार्य कृष्णभक्तांनी दिले. असे सहकार्य असल्याशिवाय कार्य घडूच शकत नाही. कार्य म्हटले म्हणजे ते एका व्यक्तीचे नसून त्याला अनेकांचे सहकार्य लागते. ''मी माझ्या भक्तांमध्येच वावरत असतो. त्यांच्याकडूनच सर्व काही करून घेत असतो आणि ह्या सर्वांचा फायदाही माझ्या भक्तांना मिळत असतो.''

तेरा सप्टेंबरला ध्यानाची सुरुवात झाली. कृष्णाने सांगितले, ''आजचे ध्यान हे सर्व माझ्या भक्तांसाठी. या सर्व भक्तांमध्ये आपण येण्याचा प्रयत्न करा. सत्य हा माझा गाभा आहे. मी सत्याच्याच बाजूने कायम वावरत असतो. श्रद्धा, भक्ती आणि त्याचबरोबर सत्याची पण फारच आवश्यकता आहे. हे जेथे आहे त्यांच्या बाजूने वावरणे हे मला फारच आवडते. मी तसाच असतो व माझ्या भक्तांनीही तसेच असावे असे मला वाटते. असे जे कोणी असतील, त्यांच्यासाठी ह्या ध्यानाचा फार उपयोग होईल. त्यांना ह्या ध्यानाचा लाभही मिळेल.''

चौदा आणि पंधरा तारीख, आपल्या देशासाठी ध्यान कर असा भगवंताचा आदेश आला. त्याप्रमाणे हे दोन दिवस भारतासाठी ध्यान केले. चौदा तारखेचा ध्यानाचा मंत्र म्हणजे

''यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥

(गीता ४था अध्याय, श्लोक ७ )

सजीवतेला प्रेमाची, आपुलकीची, कर्तव्याची आणि सद्भावनेची गरज असते, की जेणे करून सर्वांना सुख, समाधान, शांती मिळेल. पंधरातारखेचा मंत्र-

अनन्याश्चिंतयन्तो मां ये जनाः पर्युपासते।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥

(गीता ९वा अध्याय, श्लोक २२)

ज्याला खऱ्या अर्थाने कार्य करायचे आहे त्यांच्याकडून ते करून घेण्यासाठी माझ्या ह्या ध्यानाचा निश्चित उपयोग होईल. कारण शक्ती, बुद्धी देणारा मी आहे आणि ते कार्य त्यांच्याकडून करून घेण्याची जबाबदारीही माझीच आहे.''

सोळा तारीख ही विश्वासाठी ध्यान करण्याची तारीख. अर्थात त्या विश्वात आपला भारत पण आलाच. त्याहीपेक्षा व्यापक अर्थाने म्हणायचे झाले तर आपण प्रत्येकजण विश्वाचा एक घटक आहोत. त्यामुळे कळत नकळत एक मोठी जबाबदारी आपणावर आहे. म्हणून सामुदायिक प्रार्थना करून त्या विश्वकार्याला मदत करा. सामुदायिक प्रार्थनेचे बळ महान असते आणि ते केवळ स्वत:पुरते नसून त्याचा परिणाम समाजासाठीही होऊ शकतो. यामुळे मानसिक बल वाढते. आपल्या हातून होणाऱ्या कार्याची व कर्माची ताकद कायम राहते. सद्‌भावना जागृत होते आणि भक्तीच्या मार्गाचा अवलंब होऊन मानवी जीवनाची मूल्ये जशीच्या तशी राखली जातात. त्यामुळे आपल्या विचारांना स्थिरता येते. आपल्या हातून होणारी कर्मे योग्य व स्थिर होऊन, मानसिक शांती मिळायला फारच मदत होते. विचार स्थिर झाले की आपल्या हातून होणारे कार्यही व्यवस्थित व सुरळीत होऊ लागते.

सतरा तारीख, म्हणजे माझ्या ध्यानाचा शेवटचा दिवस! परत माझ्या सर्व भक्तांसाठी ध्यान करून घेतले. आणि ''एकंदरीत हे वर्तुळ पूर्ण करून, पुन्हा होतो तसा मी केंद्र बिंदू राहिलो. माझे कार्य हे असेच असते. त्याचा परिणामही कायम राहतो. हे एक मोठे चक्र आहे. त्यालाच मी कार्य म्हणतो. ह्यासाठी एक व्यक्ती निवडून, तिच्या हातात सूत्रं देऊन, सर्वांतर्फे ते मी करवून घेत असतो. म्हणूनच मी परत परत सांगत असतो, की मला जाणा. माझ्यावर विश्वास ठेवा. मला विसरू नका. माझ्या कार्याची आठवण ठेवा. म्हणजेच तुमच्यातला मी जागृत राहून तुमच्याकडून कार्य करून घेईन. माझ्या इच्छेशिवाय एक पानदेखील हलू शकणार नाही. म्हणून सतत माझ्या कार्यावर लक्ष ठेवा. माझ्यावर पूर्ण भाव, श्रद्धा ठेवून राहा. म्हणजे कालचक्राप्रमाणे तुम्हाला सुखासमाधानाने राहता येईल. इथे सुख म्हणजे मानसिक शांतता. हे सर्व जाणून घेण्यासाठी एक गोष्ट पक्की हृदयात ब ाळगा.

यत्र योगेश्वर: कृष्णो यत्र पार्थो धनुर्धर: ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम॥''

(गीता १८वा अध्याय, ७८श्लोक)

त्या दिवशी कृष्णमंदिरात दुपारच्या वेळेस ताई आणि काही भक्त बसल्या होत्या. ताई ध्यानाच्या खुर्चीत बसल्या होत्या. बाकी मंडळी समोरच होती. ताई ध्यानस्थ

होत्या आणि त्यांची नजर स्थिर होती. चेहऱ्यावर अतिशय आनंद आणि विलक्षण तेज होते. एकीने धीर करून ताईंना विचारले, 'ताई, तुमचा चेहरा किती आनंदी दिसतोय, तुम्ही काय बघताय?' ताई म्हणाल्या, 'अगं, काय सांगू? बघा हो कृष्णाजवळ, प्रसन्नवदना जगत्‌जननीच्या रूपात महानशक्ती उभी आहे. 'ताई, विश्वजननी कशी दिसतेय?' 'सुंदर! अति सुंदर! धवल वस्त्र नेसली आहे, काळेभोर केस पाठीवर मोकळे सोडलेले आहेत. चेहरा अत्यंत आनंदित. प्रसन्न अशी मुद्रा आहे. चेहऱ्यावर इतके विलक्षण तेज आहे की मी वर्णनच करू शकत नाही.' असं म्हणत म्हणत ताई पुन्हा ध्यानस्थ झाल्या.

कृष्णाबरोबर जणू विश्वजननी पण आता प्रगट होत होती. ९६ पासून कृष्ण जे सांगत होता की विश्वजननीची स्थापना व्हायला पाहिजे, त्याचेच जणू हे प्रत्यंतर होते.

डिसेंबर महिन्याच्या २२ ते ३१ तारखेपर्यंत कमीतकमी बोल व जास्तीत जास्त ध्यान कर असा आदेश कृष्णाने ताईंना दिला. कृष्णाला वाटते की सर्व भक्तांचा भार जेव्हा कृष्ण वाहतो, त्या वेळेला अशा ध्यानाची फारच गरज असते. प्रत्येक भक्त त्याच्यावर विसंबून असतो. प्रत्येकाला कृष्णाने वचन दिलेले असते. त्या वचनाच्या पूर्ततेसाठी कृष्ण ध्यान स्वीकारत असतो. ते पण त्याच्या भक्तांमार्फतच स्वीकारतो. कारण कृष्णाच्या कार्याचा केंद्रबिंदू हा त्याचा भक्तच असतो आणि तो त्याला प्राणापेक्षाही प्रिय असतो.

ताईंना १ ते ७ जानेवारी २००० मौन पाळून ध्यान कर असे कृष्णाने सांगितले. ३१ डिसेंबर १९९९च्या रात्री बारा वाजल्यापासून ताईंची मौन आणि ध्यानाची सुरुवात झाली.

तेव्हा कृष्णाने काही गोष्टींचा अर्थ सांगितला. काही गोष्टीचा खुलासा केला.

- कृष्ण ध्यान कोणाकडून करून घेतो? जो कृष्णाला सर्वस्वी आपला मानतो, त्याच्या शब्दाचे उल्लंघन अजिबात करत नाही, कृष्ण म्हणजे कृष्णच हे जो जाणतो, त्यालाच कृष्ण ध्यानमूर्ती म्हणून निवडतो.
- कृष्ण कोणाला आपला भक्त मानतो? जो भक्त कृष्णाला आपला एकमेव आधार मानतो, मग त्याचा धर्म, जात कोणतीही असो; असा भक्त कृष्णाला सदैव प्रिय असतो. तो त्याचा सर्व भार वेळोवेळी वाहतो आणि त्याच्यासाठी उभा राहीन असे वचनही देतो.

- गीतेतील प्रत्येक श्लोक म्हणजे कृष्णाने त्याच्या भक्तांना दिलेले वचनच आहे आणि केलेले मार्गदर्शन आहे. या काळाची गरज म्हणजे सामुदायिक प्रार्थना आणि ती गरज 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' ह्या मंत्राच्या जपानेच भागवली जाईल.
- त्यामुळे परत परत सांगत असतो की केंद्रात या आणि तो अर्धा तास पुरेपूर कृष्णाला देऊन 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' ह्या मंत्राचीच आराधना करा.
- आपण ज्याप्रमाणे पैशाची साठवण करतो, त्याचप्रमाणे अध्यात्माचा साठाही आपणास करावा लागतो. आज आपण जे कार्य करतो आहोत, ते केवळ आपल्यासाठी नसून आपल्या पुढील पिढीसाठी त्याचा फार मोठा उपयोग होणार आहे. तुम्ही स्वत:साठी आणि पुढच्या पिढीसाठी हे भक्तीचे रोप लावून ठेवा. हळूहळू त्याचे वृक्षात रूपांतर होईल आणि क्वचित तसे झाले नाही तरी रोप जसेच्या तसे राहील यात शंकाच नाही.
- आज जे कृष्णावर पूर्णपणे विसंबून आहेत, त्यांचा तो पाठीराखा राहीलच. उद्याही जो जितका कृष्णाच्या जवळ जाईल तितकाच तोही त्यांच्यासाठी धावत जाईल. कृष्ण म्हणतो ज्यांचा अध्यात्मशक्तीचा ठेवा संपत येणार त्यांना अडीअडचणींना तोंड हे द्यावेच लागणार.
- लक्षात ठेवा, कृष्णकृपा म्हणजे आनंदाचा व सौख्याचा ठेवा. ती कृपा मिळण्यासाठी 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' ह्या मंत्राचा जप करा. त्यामुळे तुमच्यामध्ये मी जागृत होईन. त्या जागृतीमध्ये आनंद, प्रेम, आस्था, आपुलकी निर्माण होऊन कर्तव्यतत्परताही जागृत राहील. त्यामुळे घरोघर आनंदी वातावरण राहून सगळीकडे शांततासमाधानाची समृद्धी होईल.

कृष्ण भक्तांना अंतर्मुख होऊन स्वत:चे प्रश्न कृष्णाच्या आधारे कसे हाताळता येतील याची शिकवणूक देत होता. कित्येकदा येणारे भक्त ताईंना म्हणत, 'ताई आमचे जीवन जगणे कृष्णाने अगदी सोपे करून दिले आहे.' त्यावर ताई प्रसन्नपणे सांगत, 'अगं, ते अवघड होते कधी? आपणच तर सगळी गुंतागुंत निर्माण करतो. काळज्यांची गाठोडी बांधत राहातो आणि त्याच्या भाराखाली दबून जातो. येणारा प्रत्येक क्षण हा कृष्णेच्छेनेच येत आहे, ह्यावर दृढ विश्वास बसला नं की जगण्यालाच एक सहजता येते. तो अयोग्य असे काही आपल्याला देईल का? तर निश्चितच नाही.'

***

ॐ

अनेक ठिकाणी श्रीकृष्णलीलाकेंद्राची स्थापना झाल्याने भक्तांमध्येही एक प्रकारची संघभावना निर्माण होऊ लागली. कृष्णधाग्याने लोक बांधले जाऊ लागले. पुण्यात तर जणू चैतन्याची लाट आली असावी, अशा पद्धतीने नवनवीन घरी कृष्ण-केंद्राची स्थापना होऊन सामुदायिकरीत्या नामस्मरण सुरू झाले. त्यातून निर्माण होणाऱ्या नादलहरीमध्ये लोक रमू लागले. एकमेकांकडे जाऊयेऊ लागले. ठिकठिकाणी काही तासांचे सामुदायिक नामस्मरण पण सुरू झाले.

अशात गुरुपौर्णिमा जवळ आली. सर्व भक्तांच्या उत्साहाला जणू उधाणच आले. बदलापूरला येऊन ते ताईंना विनंती करून विचारू लागले, 'ताई, कृष्णाला एक विचाराल का? इथे मंदिराच्या सान्निध्यात चोवीस तासांचा अखंड जपयज्ञ करावा अशी सर्व भक्तांची इच्छा आहे. तर तो करावा का? करायचा असेल तर त्याला गुरुपौर्णिमेसारखा दुसरा कोणता मुहूर्त मिळणार?' कृष्णाकडून संमति मिळताच सर्व तयारी सुरू झाली. मंदिराशेजारीच कृष्णभक्तांचे ब्लॉक्स् आहेत, तेथेच हा जप करू असे ठरले.

पंधरा जुलै २०००ला सकाळी कृष्णाचे आशीर्वाद घेऊन ११ वाजता मंदिरात सर्व कृष्णभक्तांतर्फे, सर्व कृष्णभक्तांसाठी आणि कृष्णकार्यासाठी करायच्या ह्या जपाचा संकल्प केला. कृष्णाचे, ताईंचे आशीर्वाद घेऊन जपाला सुरुवात झाली. साखळी पद्धतीने सात ते दहा जण सतत जप करत होते. बदलापूर, पुणे, ठाणे, कल्याण, डोंबिवली, मुंबई अशा सर्व ठिकाणाच्या भक्तांचा मनापासूनचा सहभाग हे त्या दिवसांचे वैशिष्ट्य म्हणायला लागेल. अतिशय शांतपणे, कोणत्याही प्रकारचा गोंधळ, गडबड न करता एखादे मोठे कार्य असावे, अशा पद्धतीने सर्व कार्यक्रम चालू होता. होता होता रात्र झाली. त्या रात्रीच्या शांत वेळी अचानक जुलैचा पाऊस कोसळू लागला. जणू अखंडपणे होणाऱ्या जपधारांच्या सोबतीला पर्जन्यधारांनी पण हजेरी लावली. चाळीस पंचेचाळीस माणसं ना नात्याची ना गोत्याची, एरवी एकमेकांशी फारसा परिचय नसलेली. आता मात्र 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' ह्या तारकमंत्राच्या नादाने भारलेली त्या नादब्रह्मातच रमून गेली होती. एकीकडे आवाज न करता, चहा, पाणी, नाष्ट्याची तयारी ही सर्व कामे चालू होती. प्रसादासाठी कृष्णमंदिरातच जायचे होते. त्याआधी सगळ्या भक्तांच्या

प्रार्थनेला मान देऊन, कृष्णाने कबूल केले होते की मी पाद्यपूजेसाठी बरोबर अकरा वाजता येथे येईन.

कृष्णकुटीरमध्ये गुरुपौर्णिमेची म्हणून खूपच गर्दी होती. ज्यांना ह्या जपयज्ञाची कल्पना नव्हती ते आश्चर्य व्यक्त करत होते. त्यावर ताई आवर्जून सगळ्यांना शेजारी जाऊन थोडा वेळ तरी जप करून या म्हणून सांगत होत्या. होता होता अकराला पाच मिनिटे बाकी होती. मंदिराचा हॉल तुडुंब भरलेला होता. बाहेर गेटपर्यंत लोकांच्या रांगा दर्शनासाठी आणि ताईंकडून आशीर्वाद घेण्यासाठी तिष्ठत होत्या. इतक्यात, कृष्णाची घाई सुरू झाली, ''ताई, चल जाऊ या बाबा. अरे, त्या लाडवाच्या प्रसादाचा डबा कोठे आहे, त्यांना मी वचन दिले आहे, अकरा वाजता मी येईन. मी चाललो बाबा.'' असं म्हणत ताई झटकन सगळी गर्दी बाजूला सारून जपयज्ञाच्या स्थानावर निघाल्या. त्यांच्याबरोबर काही भक्तपण निघाले. सारे वातावरण 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' ह्या मंत्राने नादमय झालेले होते. दारात साक्षात परब्रह्माला पाहिल्यावर तेथील लोकांच्या भावना अनावर होऊन डोळ्यात आनंदाश्रू उभे राहीले. आशीर्वादमुद्रेत, कृष्ण आत येऊन तयार केलेल्या आसनावर विराजमान झाला. सर्व भक्तांच्या आनंदाला पारावार उरला नाही. सगळ्यांच्या वतीने कृष्णाची साग्रसंगीत पाद्यपूजा करण्यात आली. कृष्णाच्या आशीर्वादाने यज्ञाची सांगता झाली. कृष्णाने सांगितले, ''मला फार आनंद वाटला. ही तुमची सर्व सेवा मी स्वीकारली. ज्या एकीच्या भावनेने तुम्ही सर्वांनी एकत्र येऊन ही सेवा केलीत त्याबद्दल तुमचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. असेच मला मध्ये ठेवून सतत एकत्र या. सेवा करा आणि माझे आशीर्वाद मिळवा. आज मी तुम्हाला वचन देतो की मी तुमचा पाठीराखा राहीन. माझ्यावरची श्रद्धा आणि विश्वास फक्त ढळू देऊ नका.'' असे सांगून प्रत्येकाला आशीर्वाद, प्रसाद दिला आणि तीन घोट पाणी घेऊन ताई पुन्हा कृष्णकुटीरमध्ये गेल्या.

ह्या गुरुपौर्णिमेच्या आधी ३१ मे ते ११ जून २००० ह्या दिवसात ताई आणि मुंबईचे काही भक्त हे नेपाळ, पशुपतिनाथयात्रेला गेले होते. दोन-तीन वर्षांपूर्वी ताई जेव्हा हरिद्वार, बद्रिनाथाच्या यात्रेला गेल्या होत्या, तेव्हा एक दिवस कृष्णाने ध्यानात एका उंच गोऱ्या तरतरीत व्यक्तीच्या अंगावर हात ठेवून ध्यान केले होते. ती व्यक्ती कोण हे ताईंना तेव्हा कळले नव्हते; त्यावेळेस हरिद्वारला संस्कृत संमेलन होते आणि त्या कार्यक्रमासाठी हे नेपाळनरेश तेथे आले होते. तेथला समारंभ संपवून बाहेर पडताना ताईंची आणि ह्या नेपाळनरेशांची नजरभेट झाली होती. त्या क्षणी त्यांना जाणवले होते की पहाटेच्या ध्यानात कृष्णाने जी व्यक्ती दाखविली होती ती हीच आहे. तेव्हापासून कृष्णसारखा नेपाळला जायचे आहे असे म्हणत होता.

ह्या नेपाळनरेशांना द्यायला कृष्णाने एक शिवपिंडी आणि सुरेखशी चांदीची बासरी बरोबर घेतली होती. नेपाळनरेशांना भेटून आशीर्वाद देणे, प्रसाद देणे हा ह्या यात्रेमागचा कृष्णाचा मुख्य उद्देश होता.

त्याप्रमाणे पाच तारखेला ताई आणि काही कृष्णभक्त राजाला भेटायला म्हणून किंवा त्यांची भेटीची वेळ ठरवून घेण्यासाठी त्यांच्या ऑफिसमध्ये गेले. तेथे जवळ-जवळ एक-दोन तास थांबावे लागले. तेथील ऑफिसर येईपर्यंत ताई ध्यानस्थ झाल्या होत्या. ध्यानात ताईंनी पाहिले की पशुपतिनाथाची मोठी पिंडी आहे. त्यावर रुद्राक्षाची माळ घातलेली आहे. एक एक मंत्र होताना एक एक रुद्राक्ष पुढे सरकत होता. शेवटचा मंत्र झाल्यावर, मेरूमण्याचा रुद्राक्ष समोर आला आणि पटकन ताईंच्या भ्रूमध्यावर येऊन आपटला. त्या क्षणी तेथे संवेदना, वेगळे स्फुरण जाणवू लागले.

थोड्या वेळाने ते ऑफिसर आले. त्यांना कृष्णभक्तानीं सांगितले की, महाराजांना आशीर्वाद आणि प्रसाद द्यायला कृष्ण आला आहे. तेव्हा संसदेचे अधिवेशन चालू होते. त्यामुळे ते ऑफिसर म्हणाले, 'प्रत्यक्ष महाराजांची भेट घेणे कठीण दिसतंय, पण महाराजांच्या वतीने त्यांचे सचिव ह्या प्रसादाच्या वस्तू स्वीकारतील व त्यांना देतील. मी जास्तीत जास्त प्रयत्न करतो. आपण साडेतीनला फोन करा.'

तेथे वाट बघत असताना ताई कृष्णाला म्हणाल्या, 'कृष्णा, तुलासुद्धा वाट पाहावी लागावी. त्यापेक्षा राजालाच भेटण्याची बुद्धी दे नं.' यावर लगेच एक फार महत्त्वाची गोष्ट कृष्णाने सांगितली, ''मला भेटण्याची बुद्धी होणं सोपं काम नाही. त्यासाठी जिवाची तयारी, पात्रता असावी लागते. अर्जुन लहानपणापासून माझ्याबरोबर होता. आम्ही एका ताटात जेवत होतो. एका शय्येवर निजत होतो. एकत्र फिरत होतो, भांडत होतो. तरीही त्याला युद्धाला तयार करण्यासाठी मला किती प्रयत्न करावे लागले. माझ्यापर्यंत पोहोचणे एवढे सोपे नाहीच मुळी.'' दुपारी फोनवर महाराजांचे खाजगी सचिव भेटले. त्यांनी सांगितले, 'उद्या तर काही शक्य नाही. पण परवा प्रयत्न करतो. सकाळी अकरा वाजता दोघे या. मी प्रयत्न करतोच तरी नाहीच जमले, तर महाराजांतर्फे या वस्तू मी स्वीकारेन. अनेकदा मला असे करावे लागते.'

दुसरा दिवस म्हणजे सहा जून कृष्णकुटीरमध्ये कृष्णमूर्तीची स्थापना झाल्याचा वर्धापनदिन. म्हणून आज कृष्णाने पाद्यपूजा करायला परवानगी दिली होती. त्याप्रमाणे 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' ह्या मंत्राच्या गजरात नेपाळमध्ये पाद्यपूजा केली. तेव्हा ताईंच्या कपाळावर लावलेल्या अष्टगंधावर ॐ आला होता. काहीजणांना भला मोठा त्रिशूल हातात घेतलेला, उंचापुरा कृष्ण ताईंच्या मागे उभा असलेला दिसला. त्यावेळेस

गीतेचा नववा अध्याय आणि पसायदान सगळेजण म्हणत होते. पूजेचा स्वीकार करून कृष्णाने आशीर्वाद देताना सांगितले, ''तुम्ही पसायदान म्हटले नं? हे घ्या पसाय.'' असे म्हणत कृष्णाने आपली ओंजळ सर्व भक्तांच्या ओंजळीत ओतली. नंतर कृष्णाने 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हा मंत्र तीन वेळा सांगून सर्वांना म्हणायला लावला. पुढे

१) ॐ महानशक्तीदेवताय नम: — तीन वेळा

२) लक्ष्मीदेवि महामाये, देहि मे अनुग्रहम्।
तथा च संपत्तिधनम्, आयुरारोग्यमसंपदम्॥ — दोन वेळा

३) शरणागतदीनार्तपरित्राणपरायणे
सर्वस्यार्तिहरे देवी, नारायणी नमोऽस्तु ते
नारायणी नमोऽस्तु ते, नारायणी नमोऽस्तु ते — दोन वेळा

आणि 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' असेही परत म्हणायला सांगितले. नमस्कारासाठी उंचावलेले हात स्वत:च्या अंतरंगाकडे वळवत श्रीकृष्णार्पणमस्तु असेही तीनदा म्हणायला सांगितले.

''सगळं छान झालं,'' असं म्हणत कृष्ण बोलायला लागला, ''तुम्ही केलेली पूजा, सेवा ही मी विश्वकार्यासाठी स्वीकारतो आणि वापरतोही. तुम्हालाच माझी गरज आहे असं नाही, तर मलाही माझ्या भक्ताची गरज असते. तुमचा जप, तुमची सेवा जेव्हा मी वापरतो, तेव्हा तुमची सर्व जबाबदारी माझ्यावर येते. मी तुमचे सर्वच पुरेपूर स्वीकारतो, वापरतो व माझी जबाबदारीही पूर्ण करतो. मी सर्वांचाच आधार आहे. सगळे भक्त मला भेटू शकत नाहीत. अशांची अगदी मानसपूजाही स्वीकारून त्यांच्या हाकेला धावून जातो. माझे भक्त म्हणतात, 'कृष्ण माझा सखा, कृष्ण माझा भ्राता, कृष्णावीण मला कोणी नाही त्राता . हेही अगदी खरं आहे.''

त्या दिवशी संध्याकाळी सात ते आठ ध्यान झाल्यावर कृष्णाने सांगितले, ''माझ्या पायावर स्वस्तिक काढा गं. कारण आजपासून माझ्या विश्वकार्याची खरी सुरुवात झाली आहे. त्या कार्याची मुहूर्तमेढ आज मी रोवली आहे. मी आता 'योगेश्वर' म्हणून वावरणार आहे.''

'सात तारखेला सकाळीच महानशक्ती ताईंना म्हणाली, ''परब्रह्माला घेऊन निघालीस नं कार्याला! मी आहे बघ पुढे.''

ठरल्याप्रमाणे ताई आणि कृष्णभक्त राजवाड्यात गेले. बरोबर शिवपिंडी, बासरी आणि राणीसाहेबांसाठी भरजरी शेला होता. तेथे महाराजांचे खाजगी सचिव भेटले व

त्यांनीच महाराजांच्या वतीने प्रसाद आणि सर्व प्रासादिक वस्तू स्वीकारल्या. त्यांच्याबरोबर महाराजांना कृष्णाने एक निरोप दिला, ''जे दोन-तीन देश आज तुला मित्र वाटत आहेत, त्यांच्यावर विश्वास ठेवू नको. अडीच वर्षांनी त्यांच्यापासून तुला धोका आहे.'' नेपाळनरेशांच्या बाबतीत पुढे काय झाले, आपणास माहीत आहेच. त्याबाबतही कृष्ण म्हणतो की, ''मी संधी देतो, कुणाचे नशीब बदलू शकत नाही.''

पुण्यात वानवडीला एक अपंग कल्याणकारी संस्था आहे. परिस्थिती चांगली नसलेल्या कुटुंबातील अपंग मुलांसाठी ही संस्था काम करते. जवळ जवळ २५०/३०० मुलांची राहण्याची, जेवणखाण व शिक्षण अशी सर्व व्यवस्था ह्या संस्थेतर्फे केली जाते. त्यांच्या कामाचे कौतुक करायला आणि ह्या सर्व मुलांना आशीर्वाद द्यायला म्हणून संध्याकाळी सात वाजता ताई तेथे जाणार होत्या.

परंतु केंद्रस्थापनेमुळे तेथे पोहोचायला उशीर झाल्याने सर्वप्रथम ताईंनी त्या मुलांची माफी मागितली. सगळ्यांच्याच चेहऱ्यावर आश्चर्याचे भाव प्रकट झाले. कारण ह्या मुलांना तर सवय होती, आलेले पाहुणे त्यांची कणव येऊन काही बोलायचे. त्यांचे कौतुक करायचे व असे वागा, तसे वागा असे उपदेश करून निघून जायचे. मात्र ह्या आजी तर उशीर झाल्याबद्दल माफी मागून कृष्ण कसा तुमचा मित्र, सखा आहे हे सांगत आहेत. त्याची भक्ती कशी सोप्या पद्धतीने करता येईल हे सांगत आहेत हे बघून त्यांना अतिशय आश्चर्य वाटले. ताईंनी त्या मुलांना, संस्थेला आणि तिथल्या कार्यक्षम कर्मचाऱ्यांना आशीर्वाद, प्रसाद देऊन, दररोज संध्याकाळी जेवायच्या आधी एकवीस वेळा 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हा जप करायला सांगितले आणि त्या मुलांनी स्वत: केलेला कृत्रिम फुलांचा गुच्छ स्वीकारून तो वर्षभर मी अगदी जपून ठेवेन असे वचन दिले. त्या विकलांग मुलांच्या चेहऱ्यावरचे फुललेले हास्य, आनंद बघून कृष्णाच्या वचनाची आठवण झाली, 'जेथे मी तेथे आनंद असणारच.'

सगळ्या केंद्रांचे एक स्नेहसंमेलन कलाप्रसाद मंगल कार्यालय येथे आयोजित केले होते. जवळ जवळ ३००/३२५ भक्त कार्यक्रमाला होते. सर्व पुणेकर भक्तांच्यावतीने श्री. वैद्यकाका व सौ. वैद्यकाकू ह्यांनी स्वहस्ते केलेला हार घालून कृष्णाचे स्वागत केले. कृष्णाने तो हार सर्वांच्या प्रेमाचे प्रतीक म्हणून स्वीकारल्याचे सांगून, एका भक्ताला तो वर्षभर सांभाळून ठेवायला सांगितला.

कृष्णाने तेव्हा सांगितले, ''ह्या वर्षापासून केंद्राबाबत मी दोन नवे नियम केले. ते तुम्ही माझ्यावर न रागावता पाळल्यामुळे मला फार आनंद झाला. मी कृष्णभक्तांच्या प्रेमावर जगत आहे. तुमच्यातील ॐकाराची जागृती होण्याची फार आवश्यकता आहे.

हे ध्यानाचे वर्ष आहे. २००० ते २००५ साल हा फार कठीण काळ आहे. त्यावरचा उपाय म्हणजे केवळ माझ्यावर श्रद्धा आणि विश्वास ठेवून केलेली दिव्य मंत्राची आराधना. तो मंत्र म्हणजे 'ॐ नमो भगवते वासुदेवाय'.''

तीन दिवसांचा हा पुण्यातला कार्यक्रम आटोपून ताई आणि काही कृष्णभक्त सोलापूर, पंढरपूर, तुळजापूर, अक्कलकोट आणि गाणगापूरला गेले. ध्यानात कृष्णाने ताईंना सांगितले होते, ''ताई, ही माझी ध्यानयात्रा सर्व कृष्णभक्तांसाठी व सर्व कृष्णभक्तांच्या वतीने केलेली ध्यानयात्रा आहे. त्यामुळे तुला मी घरून काही घेऊ दिले नाही. अगदी पर्समध्ये ठेवायला लवंग किंवा वेलदोडासुद्धा नको म्हणून सांगितले. त्याचप्रमाणे ह्या यात्रेहून परत येताना प्रसादाच्या म्हणून काही वस्तू, पदार्थ हे पण घ्यायचे नाही असे निक्षून सांगितले. सर्व भक्तांसाठी जे ध्यान करशील ते ध्यान, तो आशीर्वाद हाच या यात्रेचा खरा प्रसाद.''

पंढरपूरच्या मंदिरामध्ये विश्वशांतीसाठी एक यज्ञ चालला होता. तेथील पुजाऱ्यांनी हे सांगताच कृष्ण तेथे जायला लगेच तयार झाला. यज्ञवेदीजवळ बसून ध्यान केले. तेथील गुरुजींना आशीर्वाद दिला आणि सांगितले, ''तुम्ही चांगले काम करत आहात. तुम्हाला अभिषेकासाठी म्हणून एक मूर्ती पाठवीन.'' त्याप्रमाणे पुढे मूर्ती पाठविली.

अक्कलकोटला गुरुमंदिरात ताई गेल्या होत्या. तेथे समर्थांच्या चरणपादुका आहेत. तिथल्या मठाच्या लोकांनी त्या पेटीतून काढून ताईंच्या हातात दिल्या. त्यांनी त्या पादुकांवर हळुवारपणे मायेने हात फिरविला आणि म्हणू लागल्या 'आम्हा संतांना किती रे कष्ट सहन करावे लागतात? त्यासाठीच आमचा जन्म असतो नं.' बरोबरची मंडळी अवाक् होऊन ते उद्गार ऐकत राहिली. पूर्णपणे प्रसिद्धी परांङ्मुख असलेल्या ताईंच्या तोंडून आम्ही संत असा उल्लेख येणे म्हणजे प्रत्यक्ष परब्रह्मानेच आपल्या दोनही भक्तांचे केलेले कौतुकच म्हणायला पाहिजे.

तुळजापूरला जाताना कृष्णाने सांगितले, ''अगं, माझ्या पायावर स्वस्तिक काढ आणि मला नाम लाव हं.'' त्यावर ताईंच्या रूपातली महानशक्ती म्हणाली की, ''कृष्णा, आज माझ्याकडे येतोस नं. मग नामाचा गोल टिळा लाव नं.'' त्यावर कृष्ण म्हणाला, ''नाही बाबा, मी तर योगेश्वर आहे. मी माझ्यासारखेच नाम लावणार. मला छानसं उभं नाम लाव हं.''

तुळजापूरची प्रथा म्हणजे येथे दह्या-दुधाचा एकत्र अभिषेक करतात. पण कृष्णाने मात्र सांगितले की तीन लिटर दुधाचा अभिषेक करायचा. देवीची मूर्ती ही चल आहे. अभिषेकाच्या वेळेत गाभाऱ्यात ताई, पाचसहा कृष्णभक्त आणि पुजारी ह्याव्यतिरिक्त

कोणीही नव्हते. दुधाच्या शुभ्र धारेमुळे काळ्या पाषाणमूर्तीचे सारे रूप रेष अन् रेष खुलून आले. कृष्ण पण आनंदून म्हणाला, ''भवानीमाते, काय हे तुझे रूप!'' पुजारी देवीच्या अलंकाराचे, आयुधांचे वर्णन करून सांगत होते.

गाभाऱ्याच्या बाहेर एक छोटेसे शिवमंदिर आहे. आत एक पुजारी बसले होते. गाभारा अगदी छोटासा. ते ताईकडे बघून बोलले, 'आईसाहेब आपण आत या.' ताईंनीही घाईघाईने आत जाऊन त्या पिंडीला अगदी गळाभेट जशी घेतो तशी मिठी मारून शिवाची भेट घेतली. ताई बाहेर पडत असताना पुजाऱ्याने पिंडीवरचे एक टपोरे गुलाबाचे फूल ताईंना दिले. त्यावर त्या म्हणाल्या, 'हा बघा महानशक्तीचा प्रसाद!'

यात्रेवरून आल्यानंतर 'मावंदे' म्हणून भक्तांना सत्यनारायणाची पूजा करायला सांगितली. प्रसाद स्वत: ताईंनी केला होता आणि ह्या पूजेचे वैशिष्ट्य म्हणजे दुसऱ्या दिवशी उत्तरपूजा झाल्यावर कृष्णाने सांगितले, ''पूजेचे र्निमाल्य माझ्या कृष्णकुटीरच्या बागेत पसरून टाका.'' अजिबात कचऱ्यात जाता कामा नये. ह्या सगळ्याचा काय अर्थ ते त्याचे त्यालाच माहीत.

***

# ॐ

श्रीकृष्णाच्या, ताईंच्या प्रेरणेतून काही काही ठिकाणी मंदिराची उभारणी झाली आहे. त्यापैकी एक म्हणजे नाशिकचे गोवर्धनमंदिर! ह्याची निर्मिती आणि स्थापना ठाण्याच्या श्री. व सौ. विजय रानडे यांचेकडून २३ डिसेंबर २०००ला कृष्णाने करून घेतली. रानडे काका अगदी प्रथम जेव्हा बदलापूरला गेले होते तेव्हा कृष्णाने प्रसाद म्हणून त्यांना एक बासरी दिली आणि सांगितले की मी नेहमीच तुझ्याकडे येतो. पण तुला ते माहीत नाही. त्यावर काकांनी विचारले, 'कृष्णा बरेचदा मला स्वप्नात विष्णू आलेले दिसतात, त्याचा काय अर्थ आहे?' त्यावर ताई म्हणाल्या, 'तुम्हाला छानसे मंदिर बांधायचे आहे. आणि ते मी तुमच्याकडून करवून घेईन'असं कृष्ण सांगत आहे.

पुढे मंदिराच्या कामाला सुरुवात करताना, कृष्णाने आपल्या भांडारातले पैसे देऊन सांगितले, ''मंदिर छोटे असले तरी चालेल, त्यासाठी कोणाकडूनही पैसे घ्यायचे नाहीत. अथवा त्याचा ट्रस्ट पण करायचा नाही. तुला झेपेल एवढेच करायचे. त्या मंदिरासाठी मूर्ती माझा एक भक्त देईल हे लक्षात ठेव. मूर्ती ३॥ ते ३॥। फूट उंचीची, संगमरवरी आण. मुंबईतूनच घे. कृष्णाचे बजेट रुपये ४०,०००/- आहे.''

त्याप्रमाणे त्यांनी मूर्तीचा शोध घ्यायला सुरुवात केली. ३॥ फुटाच्या मूर्तीची किंमत साधारणपणे ८२ ते ८४ हजारापर्यंत जात होती. कृष्णाचे बजेट तर रु. ४०,००० होते. आता कसे करायचं असं वाटून त्यांनी विचार केला की वरचे पैसे आम्ही देऊ का असे कृष्णाला विचारू. त्याप्रमाणे फोन केला. ताईंनी सांगितले की काका कृष्ण सांगतो, मूर्तीची किंमत ४०,००० रु. वर एक रुपयापण नाही. तुम्ही तुमचे पैसे पण द्यायचे नाहीत. 'बरं ताई!' काकांनी सांगितले. आता मूर्ती जिथे घडवतात त्या कारखाान्यात चौकशीसाठी ते गेले. तेथे मूर्तीचे वर्णन करून फोटो दाखवला व अशी मूर्ती घडवून मिळेल का? किंमत किती? अशी चौकशी केली. उत्तर मिळाले, 'मूर्ती घडवायला १५ दिवस लागतील. किंमत ८२००० पर्यंत जाईल.' त्यांना प्रश्न पडला आता काय करायचे? कृष्णाच्या शब्दाबाहेर तर जाता येत नाही. मग कसं करायचं? त्यांनी कृष्णाला प्रार्थना केली आणि मालकाला

सांगितले. 'आपण सांगता ते बरोबर आहे. एवढ्या उंचीच्या मूर्तीची किंमत अशीच आहे. आमच्या गुरूंनी, मूर्तीची किंमत सांगितली रु. ४०,०००, जास्त नाही की कमी नाही. त्याच्यावर आम्हाला एक रुपयाही खर्च करण्याची परवानगी नाही. त्याचप्रमाणे मूर्तीच्या आकारात, उंचीत पण काहीही फरक करायचा नाही. आता कसं काय करायचे?'

ते मालक स्तब्धच झाले. वातावरण गंभीर झाले. त्यांनी डोळे मिटले. पाच मिनिटे गेली. काकांना कळत नव्हतं काय करावं ते. थोड्या वेळानी मालकांनी डोळे उघडले, प्रसन्नपणे हसले आणि सांगू लागले, 'तुमची तुमच्या गुरूंवरची श्रद्धा बघून खूप आनंद झाला. त्यांनी सांगितल्याप्रमाणे तुम्ही फक्त रु. ४०,०००च द्या. तुम्हाला हवी तशी सुंदर मूर्ती घडवून देतो.'

त्यांचा त्यांच्या कानावर विश्वास बसेना. आजच्या जमान्यात, एक व्यावसायिक कारखानदार रु. ८२,०००ची वस्तू, रु. ४०,०००त द्यायला तयार झाला. कृष्णाची किमया, बुद्धिदाता मी आहे ह्या कृष्णवचनाची प्रचिती! पण त्याचबरोबर त्या दुकानदाराला पण कौतुक वाटले की रु. ४२,००० कमी घेऊन करोडोमोलांचे कृष्ण आशीर्वाद पदरात पाडून घेतले. यासाठीसुद्धा पूर्वपुण्याईच लागत असावी.

स्थापनेच्या दिवशी संदेश देताना श्रीकृष्णाने सांगितले, ''सामुदायिक प्रार्थना हे ह्या कृष्णमंदिराचे ध्येय आहे. कारण सामुदायिक प्रार्थनेमुळे मिळणारे जे बळ, जी ऊर्जा आहे ती तुमच्यासाठी, तुमच्या कुटुंबासाठी त्याचप्रमाणे भावी पिढ्यांसाठी, भारतासाठी आणि विश्वासाठी मिळत असते. त्यामुळे सामुदायिकपणे केलेल्या प्रार्थनेचे बळ हे वैयक्तिक प्रार्थनेपेक्षा शंभर पटीने जास्त असते. तशी प्रार्थना करता यावी म्हणून ठिकठिकाणी मी जशी मंदिरे स्थापन करतो त्याचप्रमाणे श्रीकृष्णलीला केंद्राची पण स्थापना करतो. त्याचा लाभ माझ्या सर्व भक्तांनी जरूर जरूर घ्यावा, हेही पुन्हा पुन्हा सांगू इच्छितो.''

सतत छोटे-मोठे प्रवास, नवीन नवीन ठिकाणी श्रीकृष्णलीलाकेंद्राची स्थापना, त्याचबरोबर सर्व कृष्णभक्तांसाठी, यंग जनरेशन, विश्वकल्याण आणि विश्वशांतीसाठी सतत ध्यानधारणा चालू होती. ताई स्वत:च्या तब्येतीची पर्वा न करता प्रत्येक गोष्ट फार पूर्वी कृष्णाला वचन दिल्याप्रमाणे तंतोतंत पाळत होत्या. का, कसे, कशाला असे प्रश्न त्यांना कधीही पडत नसत. त्या नेहमी सांगत, ''एखादी गोष्ट ही कृष्णाने सांगितली आहे एवढेच पुरेसे आहे. ती तशी करायचीच हा अलिखित नियमच

आहे.'' माझ्यावर पूर्णपणे भार सोपवून निश्चिंत राहा. या वचनाचे जितेजागते उदाहरण म्हणजे गुरुमाउली ताई.

दरवर्षीप्रमाणे यंदाही ३१ डिसेंबर २०००ला कृष्णाने नववर्षासाठी संदेश दिला. ''२००१ साल हे माझे भारतभ्रमण करून कार्य करण्याचे वर्ष आहे. युवाशक्ती व भारताच्या हिताच्या दृष्टीने कार्य करणाऱ्या व्यक्ती यांच्या पाठीशी मी उभा राहणार. त्यांना मानसिक ताकद देणार व संपूर्ण भारत फिरून कार्य करणार.

साहजिकच ताई बदलापूरला बरेचदा नसणार. माझ्या भक्तांना प्रश्न पडेल की अडचणीच्या वेळेला काय करायचे? कोणाकडून मार्गदर्शन घ्यायचे? त्यासाठीच आता घराघरात माझे जे स्थान आहे ते जागृत करण्याची आवश्यकता आहे. ह्यासाठी माझी आराधना करा. आराधना, 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' ह्या मंत्राने करा. मला श्रद्धेने, हृदयापासून हाक मारा. मी तुमच्यासाठी धावून येणारच याची खात्री बाळगा.

मी तुम्हाला लहान मुलांप्रमाणे पाहतो. लहान मुले जशी आईवर पूर्ण भार सोपवून निश्चिंत असतात, निर्भर राहतात त्या वृत्तीने तुम्ही तुमचा भार माझ्यावर टाकून निश्चिंत व्हा, निर्भर व्हा.

ज्या वेळेस तुम्हाला तुमच्या साधनेच्या बाबतीत, आराधनेच्या बाबतीत शंका येईल तेव्हा पाच मिनिटे डोळे मिटून चिंतन करा. तुमच्या मनातील शंकेचे मळभ दूर होईल. जे घडते ते तुमच्या भल्यासाठीच आहे, याची खात्री बाळगा.

तुमच्या मनात क्षणभरही असा विचार आला, 'अरे असे का झाले? कृष्णाने हे माझ्यासाठी का केले नाही? किंवा मला हे का दिले नाही?' तर मात्र तुमच्या माझ्यात दरी पडेल (अंतर पडेल). मी पंधरा वर्षे तुमच्याकडे येऊ शकणार नाही. म्हणूनच लहान मुलांसारखी निरागस वृत्ती ठेवून 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' ह्या मंत्रजपाने माझी आराधना करा व मला आपलासा करून घ्या.''

ताईंच्या ध्यानाची वेळ आता वाढली. कृष्णाने त्याच्या यंग जनरेशनसाठी, भावी पिढ्यांसाठी काही योजना आखल्या होत्या. त्या योजनेचा एक भाग म्हणून पहिले युवा केंद्र ता. ३ जानेवारी २००१ रोजी ठाण्याला करण्याचे ठरविले होते. त्यासाठी एक तारखेला माझ्या यंग जनरेशनसाठी दिवसभर मौन पाळून ध्यान कर, असे ताईंना सांागितले होते.

तीन जानेवारीला संध्याकाळी पाच वाजता केंद्राची स्थापना होणार होती. त्याआधी ताईंना सकाळी एके ठिकाणी ध्यानासाठी जायचे होते. तिकडून येऊन, केंद्रात पोचायला ताईंना साडेसहा वाजले होते. ताईची-कृष्णाची वाट बघत खूप मुलं आणि मोठी माणसं थांबली होती. जराही न थांबता, ताई लगेचच बोलायला उभ्या राहिल्या.

'भगवान श्रीकृष्णाची प्रत्येक गोष्ट, प्रत्येक शब्द आणि प्रत्येक कृती यामधून तो सगळ्यांना मार्गदर्शन करत असतो. आयुष्यामध्ये मानवाला वाट ही पाहावीच लागते. धीर धरला तर तुमचं जीवन तुम्ही यशस्वी करू शकता. त्यासाठी श्रद्धेची गरज असते. मनाची चलबिचल थांबविण्याचं सर्वांत मोठं साधन कोणतं, तर ते म्हणजे श्रद्धा. अशी श्रद्धा तुम्ही योगेश्वर कृष्णावर ठेवा.

कृष्णाचं जीवन जर आपण पाहिलं, थोडा विचार केला तर असं लक्षात येईल, की कृष्ण सर्वांमध्ये सामावलेला आहे. तो जन्मला एकीकडे, वाढला एकीकडे, गुरुगृहीपण सर्वसामान्यांप्रमाणेच राहिला. द्वारकेचा राजा होईपर्यंतचा त्याचा जीवनप्रवास, सुदामा- भेटीचा प्रसंग, त्या मैत्रीचा केलेला सन्मान इत्यादी गोष्टी त्याच्या चरित्रात सामावल्या आहेत. म्हणून योगेश्वराला आदर्श मानून त्याच्यावर पूर्ण श्रद्धा ठेवा.

मुलांनो, तुम्हाला मी देवभोळे बना, तासनतास बसून देवपूजा करा; यज्ञयाग करा असं काहीही सांगत नाही. कारण,' "काळाप्रमाणे मीही बदलतो. आज खरी गरज आहे ती कर्तव्याची. प्रत्येकाने आपले कर्तव्य योग्य प्रकारे, योग्य त्या ठिकाणी, योग्य तितकं जर केलं, तर त्यांच्यासाठी मी, योगेश्वर सतत उभा असतो."

विद्यार्थिदशेत तुम्ही तुमचा अभ्यास, स्वाध्याय अत्यंत चोख करणे हेच तुमचे कर्तव्य आहे. म्हणून तुम्ही ते कर्तव्य जास्तीत जास्त निष्ठेने, प्रामाणिकपणे करा. रोज रात्री झोपताना, एकदाच मला हाक मारा, 'कृष्णा, ये रे!' अशी अगदी बालिश साद रोज रात्री झोपताना एकदा तरी घालाच. आणि 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हा मंत्र दोन तीन वेळा म्हणा, एवढं पुरेसे आहे. असं केल्याने काय होतं? तुमच्यामधला आत्मा आहे, तो जागृत होतो आणि त्याचं तुम्हाला कळत नकळत मार्गदर्शन होते.

तुम्ही अभ्यास करून, दिवसभराचं काम करून दमलेले असाल, त्याच वेळेला मला हाक मारा अगदी हृदयापासून. ती मला पोहोचणार आणि मी तुमच्यासाठी उभा राहणार, हे माझे या यंग जनरेशनला दिलेले वचन आहे.

श्रीमद्‌भगवतगीता ही माझी वाङ्मयीन मूर्ती आहे. हा ग्रंथ म्हणजे आपल्या भारताचा पाया आहे. गीता सांगणारा योगेश्वर श्रीकृष्ण आणि तुमच्यात जागणारा ॐकार म्हणजे माझेच रूप! त्यामुळे तुम्ही त्या दिव्य तारकमंत्राचा जेव्हा जप करता, उच्चार करता, तेव्हा तुमच्यामध्ये सामावलेला मी आणि अणूरेणूंमध्ये भरून राहिलेला मी, या सगळ्याला एकाच वेळेला तुमचा नमस्कार पोचतो.

म्हणून मी परत परत सांगतो की श्रद्धास्थान असावंच. ते एकच ठेवा. जीवनामध्ये आपल्याला कुठेतरी, कोणाचीतरी वाट पाहावी लागते. आणि ती वाट पाहत असताना माझ्यावर श्रद्धा ठेवून ती वाट पाहिली तर मी तुम्हाला योग्य मार्गदर्शन करीन. हे तुम्हाला आज दिलेलं वचन आहे.''

अशा रीतीने अत्यंत उत्साहात यंग जनरेशनच्या सान्निध्यात २००१ची सुरवात झाली. चार तारखेला ताई एका कृष्णभक्तांकडे ध्यानाला जायच्या होत्या. तो पौष महिना होता. त्यांच्याकडे पौष महिन्यात देवीचा जोगवा मागायची पद्धत होती. त्या निमित्ताने त्यांच्या मनात आले, आज अनायसे योगेश्वर कृष्ण साक्षात महानशक्तीबरोबर आपल्या घरी येणार आहे तर छान पंचामृती पूजा करावी. त्याप्रमाणे त्यांनी सगळी तयारी करून ठेवली. सकाळी ताई आल्या. चहापाणी झाल्यावर त्यांनी ताईंना विचारले, 'कृष्णा, आज पाद्यपूजा पंचामृती करावीशी वाटतेय, तर करू या का?' ''हो. जरूर.''

ताई आसनस्थ झाल्या. नाम लावून, पायावर स्वस्तिक काढून पाद्यपूजेला सुरुवात आणि पहिले उपचार झाल्यावर योगेश्वरीचे कवच म्हणत म्हणत पाच सुवासिनींच्या हस्ते कृष्णाच्या हातावर पंचामृताचा अभिषेक केला. प्रसाद अर्पण केला आणि नमस्कार केला. तो कृष्ण आशीर्वाद देताना म्हणाला, ''स्वीकारते गं सगळं! आज बोडणच झालं. तुमची एक बोडणपूजा राहिली होती, ती आता करायची आवश्यकता नाही.'' सगळं छान करवून घेतलं आणि स्वीकारलं.

ज्यांच्या घरी पूजा होती त्यांना भावनावेग आवरेना. खरोखरच त्यांची ती पूजा करायची राहिली होती. ज्या भक्ताची मनापासून सेवा करायची इच्छा असते, त्यांच्याकडून भगवंत आणि महानशक्तीपण ती कशा प्रकारे प्रेरणा देत करून घेतात आणि त्याचा स्वीकार करून भरभरून आशीर्वादही देतात, त्याचा उत्कट अनुभव त्या दिवशी आला.

केंद्रस्थापनेसाठी कृष्णाने ताईंसह यावे या भक्तांच्या प्रार्थनेला कृष्णाने होकार दिला.ताई ५ ते १३ जाने २००१ अशा नऊ दिवस पुण्यात राहतील असे कृष्णाने सांगितले.

ठरल्याप्रमाणे पाच तारखेला ध्यानाला सुरुवात झाली. तसे पुणेकर शिस्तीचे (कृष्णाने केलेले कौतुक) कोणीही तेथे न जाता, न फोन करता, मनावर संयम ठेवून जणू त्या ध्यानाला साथच दिली.

श्री. प्रधानकाका यांच्या, कृष्णावर केलेल्या भावोत्कट अनुभव देणाऱ्या कवितांच्या संग्रहाचे प्रकाशन ताईंच्या हस्ते झाले. कौतुकाचाच सोहळा होता तो. कृष्णाने भरभरून आशीर्वाद देऊन काकांचे, त्यांच्या भावनेचे आणि कृष्णप्रेमाचे खूपच कौतुक केले.

कोथरूड भागातील श्रीराम सोसायटीतल्या लोकांनी सोसायटीत सर्व लोकांसाठी काढलेल्या वैशिष्ट्यपूर्ण अशा केंद्राची स्थापना ताईंच्या हस्ते झाली. त्या प्रसंगी कृष्णाने त्या कल्पनेचे केलेले कौतुक आणि ह्यातूनच मोठ्या कुटुंबातल्या सदस्यांसारखे तुमचे नाते तयार होईल असे आश्वासन दिले.

हृदयापासून जो हाक मारतो त्याच्याजवळ मी सतत असतो, याचे प्रत्यंतर देणारा एक प्रसंग. आदल्या दिवशी एका कृष्णभक्ताकडे ताईंचा मुक्काम होता. तेव्हा त्यांची केलेली सर्व व्यवस्था आणि त्यांच्याबरोबर साधलेला संवाद हे सगळं आठवून ती अतिशय हळवी झाली होती. भावुक झाली होती. ताईंचा मुक्काम आज दुसऱ्या एका भक्ताकडे होता. हिला ताई दुसऱ्या दिवशी सकाळीच भेटणार होत्या.

झोपायला जायच्या वेळेस मात्र तिला इतकी कृष्णाची-ताईंची आठवण यायला लागली की, शेवटी तिने कृष्णासाठी अंथरूण तयार केले, त्यावर आदल्या दिवशी ताईंनी वापरलेल्या सपाता ठेवल्या. त्या जणू तेथे आहेत असे समजून त्यांची सेवा केली, पाय चेपले, मंदसा फॅन लावला, पांघरूण घातले आणि गुडनाईट करून समोरच्या बेडवर आपण झोपली. दुसऱ्या दिवशी सकाळी त्या दिवसाच्या कार्यक्रमासंदर्भात ताईंना फोन केला. ताईंचा पहिला प्रश्न, ''अगं किती माझी आठवण काढीत होतीस? मी का कुठे गेलो होतो? तुझ्याच तर जवळ होतो. अंतरातल्या मला जागवायला शीक.'' त्यामुळे तिचं मन भरून पावले. सद्गदित अंतकरणाने तिने फक्त एक हुंदका दिला. ती फक्त एवढेच म्हणू शकली, 'कृष्णा इथूनच मनापासून नमस्कार करते आणि लवकरच तेथे येते.' भाव तेथे देव हेच खरे.

सर्वजण आळंदीला समाधिस्थानी पोहोचले. ताईंच्या हातून माऊलींची पूजा झाली आणि ताई तेथेच थोडा वेळ ध्यानस्थ बसल्या. त्यांचे ध्यान झाल्यावर उठून बाहेरच्या हॉलमध्ये आल्या. तेथे काही साधक ज्ञानेश्वरीच्या पारायणाला बसले होते. त्यातल्या एका आजींकडे बोट दाखवून कृष्णाने त्यांना प्रसाद द्यायला सांगितला. तेथे जाऊन त्या आजींना प्रसाद दिला. त्यांनीही अत्यंत मनोभावे ताईंना नमस्कार केला आणि आपले पारायण पुढे चालू ठेवले. आता आश्चर्यचकित व्हायची वेळ बरोबरच्या भक्तांची होती. त्या आजींनी डोळे मिटले होते आणि त्यांचे बोट मात्र ज्ञानेश्वरीतील पानातील अक्षरांवरून फिरत होते. हे असे कसे पारायण कोणाला काही समजेना. मंदिरातील व्यवस्थापकांपैकी एकजण सांगू लागले, 'अहो ह्या आजींना लिहिता-वाचता येत नाही. पण त्या गेले कित्येक वर्षे असेच पारायण करतात. त्यांचे म्हणणे, 'मी अडाणी, निरक्षर म्हणून काय मी पारायण करायचेच नाही का? मी आपली माऊलींना प्रार्थना करते की ज्या अक्षरांवरून, शब्दावरून माझे बोट फिरेल ते ते अक्षर आणि शब्द मी वाचलेच आहेत, असं समजून माझी ही सेवा तुम्ही स्वीकारा.' धन्य ती आणि धन्य तिचा तो भाव. तोच तिला माऊलींपर्यंत पोहोचवत होता. इतक्या माणसांतून 'त्या' आजींना प्रसाद देऊन कृष्णाने याचीच साक्ष दिली की, 'मी' निष्काम आणि नि:सीम भक्तीचाच भुकेला आहे. नंतर व्यवस्थापकांकडे ताईंनी पैसे देऊन पारायण करणाऱ्या सर्व भक्तांना कृष्णाच्या वतीने चहा द्यायला सांगितलं.

आळंदीहून परत येताना साईबाबांचे दर्शन घेऊन सर्वजण शिधये गायत्रीमंदिरावर आले. प.पू. काकाजी शिधये आणि त्यांचे धाकटे बंधू श्री रामदासस्वामी कृपांकित संजयकाका, दोघेही वाट बघत होते. मंदिराचे काम अजून चालू होते. गर्भगृहाचे काम पूर्ण होत आले होते. देवीसमोर ताई आसनस्थ झाल्या. समोरच्या बाजूला काकाजी बसले. दोघांनी एकमेकांना नमस्कार केला आणि काय आश्चर्य? दोघेही ध्यानस्थ झाले. मुद्रा अत्यंत तेजस्वी, प्रसन्न दिसत होत्या. थोड्या वेळाने त्या अवस्थेतून बाहेर आल्यावर प.पू. काकाजींनी त्यांच्याकडे वंशपरंपरागत असलेल्या गायत्रीमातेच्या उपासनेचे महत्त्व सांगितले. त्यांचे गुरू प.पू. स्वामी स्वरूपानंद पावस, ह्यांच्या प्रेरणेतून हे मंदिर कसे उभे राहिले हेही कथन केले. भावी योजनांची माहिती देऊन त्यासाठी कृष्णाचे आशीर्वाद मिळावेत अशी प्रार्थना केली. त्यानंतर ताईंनीपण लहानपणापासून श्रीकृष्ण आणि आदिशक्ती नवदुर्गा यांनी त्यांच्या पाठीशी उभे राहून त्यांना कसे घडवले हे

सांगितले. आता विश्वजननीची प्रतिष्ठापना करण्यासाठी काय काय योजना आहेत त्याची माहितीही दिली.

ह्या संवादाच्या आधी ध्यानात जो त्या दोघांचा 'शब्देविण संवादू' झाला, त्याची कल्पना मात्र बरोबरच्या लोकांना आली नाही हेच खरे.

आता सगळ्यांना संध्याकाळच्या युवा केंद्राच्या उद्‌घाटनाचे वेध लागले होते. सगळी कामे, सेवा आज युवकवर्ग करणार होता. त्यांचा तसा आग्रहच होता. खास आमच्यासाठी कृष्ण येतोय. आम्हीच सर्व काही करतो. आईवडिलांनी पण त्यांना पूर्ण मोकळिक दिली होती. अगदी ताईंना आणायला कोण जाणार, स्वागत कसं करणार, सजावट कशी करणार आणि प्रसादसुद्धा काय करणार ते ह्या मुलांनीच ठरवले होते. त्याचबरोबर सगळ्यांची अशी भावना होती की, आम्हाला कृष्णाला काहीतरी द्यायचे आहे. मात्र ते अगदी खास पाहिजे. मग एक एक कल्पना सुचायला लागल्या. त्यातल्या दोन सगळ्यांनीच उचलून धरल्या.

१) कृष्णाला फोन करून आम्ही काय आणू असे विचारणे.

२) नेहमीच कृष्ण ताईमार्फत आमच्यासाठी खूप काही करत असतो. आता आपण आपल्या आयुष्यात ताईंसाठी - कृष्णासाठी ठोस कार्य आणि सेवा करायचे वचन देऊ या. हे कार्य वा सेवा काय असेल हे प्रत्येकाने निश्चित करून लेखी द्यावे. ती सारी मनोगते आपण कृष्णाला अर्पण करू यात.

दोनही गोष्टी ठरल्या. कृष्णाला फोन केल्यावर ताईंनी सांगितले, 'कृष्ण म्हणतो माझ्यासाठी चपला आणा. मला तुमच्यासाठी सतत फिरून ती झिजवायला लागणार आहे.'

लिहिलेल्या चिठ्ठ्यांचा जो ढीग जमा झाला त्या कृष्णाला अर्पण केल्यावर ताईंनी सांगितले, 'आता ह्या सगळ्यांना वाचून दाखवा.' त्याप्रमाणे नंतरच्या केंद्रात अनुभवांच्या वेळात त्यातील महत्त्वाचा भाग वाचून दाखविला.

ह्या चिठ्ठ्यातून मुलांच्या मनातील अनेक प्रश्नांचे आणि त्यांच्या गोंधळलेल्या मन:स्थितीचे दर्शन झाले. कारण त्यांच्यामध्ये मानवी नातेसंबंध, जीवघेणी स्पर्धा, पैशाला आलेले अवास्तव महत्त्व तसेच व्यावहारिक जीवनात असलेली अत्यंत अस्थिरता याचा उल्लेख होता. त्यात आपला निभाव कसा लागणार, आपण आपल्या कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे पेलू शकणार का अशा अनेक चिंता त्या चिठ्ठ्यांमधून

डोकावल्या. पण त्याचबरोबर, कृष्ण म्हणा किंवा ती जी 'सुप्रिम पॉवर' आहे तिच्यापर्यंत पोहोचायचे असेल तर कृष्णावरचा विश्वास, त्याच्यावरचे निखळ प्रेम आणि मानवतेबाबतची प्रेमभावना यांचाच हात धरला पाहिजे, असा विश्वासही जाणवला!

केंद्र स्थापनेच्या वेळेस ताई बोलायला उभ्या राहिल्या. त्या सांगू लागल्या, 'आजच सकाळी आळंदीत जाण्यामागे ही कृष्णाची योजना होती. तो मला वेळोवेळी वेगवेगळ्या पद्धतीने सांगत असे, ''तुझ्या हातून जे कार्य मी उभे करत आहे त्या कार्यासाठी हरीबरोबरच हराची उपासना जशी हवी तशीच आदिशक्तीचीही उपासना असणे आता गरजेचे आहे. या तिघांच्या कृपाशीर्वादाशिवाय पुढचे पाऊल टाकायचे नाही'', असेही तो बजावत असे. म्हणूनच ह्या युवाकेंद्राची स्थापना करण्यापूर्वी मी आळंदीच्या माऊलींचा आशीर्वाद घेऊन आले. तसाच गायत्री देवी मंदिरातील आदिशक्तीचाही आशीर्वाद घेतला. आता कृष्णाच्या हस्ते, त्याच्याही आशीर्वादाने आपण हे केंद्र सुरू करत आहोत.' ''माझी या यंग जनरेशनवर अतिशय भिस्त आहे. 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' ह्या मंत्रात तुमच्यातील मी म्हणजे ॐकार म्हणजेच चैतन्य जागृत होण्याची शक्ती आहे. त्यामुळे तुम्ही कोणताही वेगळा योग किंवा तप करायची जरूरी नाही. मात्र तुम्ही तुमची कर्तव्ये माझ्यावर निस्सीम भक्ती ठेवून करा. पूर्ण श्रद्धा ठेवून करा. ती मी माझी सेवाच मानतो आणि तुमच्यासाठी सतत उभा राहतो.

तुम्ही आज जे मला वचन दिले आहे की, जी काही कर्तव्ये तुम्ही कराल ती प्रेमाने कराल. त्या वचनामुळे आज मी खूप सुखावलो आहे. मला अतिशय समाधान मिळाले आहे. माझ्या तुमच्याकडून खूप काही अपेक्षा आहेत त्यामुळे तुम्हाला मी काय म्हणतोय, काय सांगतोय हे बरोबर कळतेय असं जाणवून मला अत्यानंद होतोय. असेच राहा. मला तुमच्या हृदयात स्थान द्या. माझा हा दिव्य मंत्र, तो मात्र दिवसातून एकदा तरी अत्यंत श्रद्धेने म्हणा. मला हाक मारा, कृष्णा, ये रे!

आज मी तुमच्याकडून चप्पल मुद्दाम मागून घेतली कारण मलाही तुमच्यासाठी वेळोवेळी अत्यंत तातडीने धावावे लागणार आहे. मी सतत तुमच्याबरोबर आहे हे अजिबात विसरू नका.''

हडपसरच्या केंद्रस्थापनेच्या वेळेस कृष्णाने सांगितले, ''मी काळाप्रमाणे बदलतो. ह्या काळाला 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' ह्या दिव्य मंत्राच्या जपाची अत्यंत आवश्यकता आहे. तो श्रद्धेने करा. कर्मकांडात गुंतू नका. श्रद्धा आणि विश्वासाने माझ्याजवळ या आणि मला भावनेचे फूल अर्पण करा.'' ताईंनी मानसपूजेचे महत्त्व ह्यावेळी सांगितले. ह्या मानसपूजेसारखाच एक प्रसंग बदलापूरला घडला होता. एकदा कृष्णाने एका ठराविक दिवशी बरोबर अकरा वाजता त्याच्या पायावर अत्तराचे स्वस्तिक काढायला सर्व भक्तांना सांगितले होते. मंदिरात ही गोष्ट ताई सर्वांना सांगत होत्या. तेथे काही नोकरी करणाऱ्या कृष्णभक्त पण हजर होत्या. कृष्णाने सांगितलेला दिवस म्हणजे ऑफिसचा दिवस होता. साहजिकच एकीने विचारले. 'कृष्णा, अरे तो ऑफिसचा दिवस. आम्ही ऑफिसमध्ये असणार नं! मग आम्ही कसे करणार?' बँकेत काउंटरवर, अत्तर वगैरे काढून कसं स्वस्तिक काढणार, समोर माणसे असतात नं!' ''असं म्हणतेस? हे बघ, तुमच्या ऑफिसमध्ये रेस्टरुम आहे का? नाहीतर कोठेही एखादा निवांत कोपरा असेल तेथे जा. फोटो, गीता, अत्तर काहीही सोबत घ्यायची गरज नाही. फक्त थोडेसे पाणी घे, डाव्या हातावर उजव्या हाताने पाण्याचे स्वस्तिक काढ, पण वेळ मात्र पाळ! आणि मला प्रार्थना कर, की तू सांगितल्याप्रमाणे आज, तुझ्या वेळेत हे स्वस्तिक काढत आहे. त्याचा तू तुझ्या पायावर अत्तराने काढलेले स्वस्तिक म्हणून स्वीकार कर. हे तरी जमेल का? का अजूनही काही अडचण वाटतेय? एक लक्षात घे, तुमच्या प्रत्येक कृतीमागची मी भावना फक्त बघतो. मी भावाचा भुकेला आहे. वेळ मात्र कसोशीने पाळ.''

कृष्ण जे नेहमी सांगतो की दोन हात आणि एक मस्तक घेऊन या, त्याचाच अर्थ जणू त्याने उलगडून दाखवला.

हडपसरजवळच मांजरी येथे एका नर्सरीत आज केंद्र स्थापन होणार होते. ह्यावेळेस कृष्णाने सांगितले, ''आज हे केंद्र स्थापन केले ते माझे गुप्त केंद्र आहे. म्हणजे काय 'कांदा, मुळा, भाजी, अवघी विठाबाई माझी।' ह्या उक्तीप्रमाणे तुम्ही कामातच परमेश्वर बघून, काम करता करता माझे स्मरण करा. तुमच्या ह्या केंद्रासाठी ठराविक वेळ, ठराविक जागा, तसंच फोटो, समई, बैठक कशाकशाची आवश्यकता नाही. दिवसाच्या कोणत्याही वेळी तुम्ही जेव्हा कामाला सुरुवात कराल, तुम्ही जेव्हा एकत्र याल तेव्हा क्षणभर डोळे मिटा, माझी आठवण करून 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' ह्या मंत्राने मला साद घाला आणि आपले काम करू लागा. हाताने काम

आणि मुखाने नाम! असं करता करताच तुम्ही माझ्या जवळ याल. माझे कृपांकित व्हाल. हे आज तुम्हाला दिलेले माझे वचन आहे.''

सगळी तेथली काम करणारी मंडळी ताईंचा सहजभाव, विलक्षण साधेपणा, त्यातून येणारा आपलेपणा अनुभवून अतिशय सुखावली. त्यांच्याबरोबर फिरून त्यांनी त्यांच्या नर्सरीचा सर्व परिसर बघितला. जाता जाता, जवळ असलेल्या फुलांचा अभिषेक करत नजर फिरवून त्यांचे ध्यान चालू होते.

इकडे धन्वंतरी सभागृहात सर्व केंद्रांच्या संमेलनाची तयारी चालली होती. ताईंनी आज सांगितले होते, 'आज बाकी कोणताही विशेष कार्यक्रम ठरवू नका. आज जे जे भक्त येतील त्या सर्वांना मी भेटणार आहे. कोणाच्या काही शंका असतील, तर त्याचे समाधान करण्याचा प्रयत्न करणार आहे.'

इथेही खूप गर्दी झाली. कारण जुन्या भक्तांनी नवीन केंद्राच्या उद्घाटनाला येऊ नये, असे सांगितल्याने गेले चार-पाच दिवस ताई पुण्यात असूनही त्यांची भेट झाली नव्हती, ती आज होऊ शकणार होती.

ताईंनी आज बोलताना जागोजागी, पेठांमध्ये केंद्र असण्याची कशी आवश्यकता आहे; त्याचप्रमाणे भावी पिढीच्या कल्याणासाठी ह्या उपासनेची काय गरज आहे हे विशद केले. तसेच भावी पिढीला उपासनेची गोडी लागावी ही जबाबदारी प्रत्येक पालकाने घ्यावी हे निक्षून सांगीतले. नियमित उपासनेमुळे शांती, समाधान आणि युवा पिढीचा विकास होणार आहे याचे महत्त्व विस्ताराने सांगितले. कृष्णाने तीन वर्षांपूर्वी केंद्ररूपी रोप लावले आहे. त्याला तुम्ही प्रत्येकजण आपल्या भक्तीने, उपासनेचे जे पाणी घालत आहात, त्याने ते चांगलेच तरारले आहे. लवकरच त्याचा वृक्ष होईल ह्यात शंकाच नाही. त्यामुळे आज मी जाहीरपणे सांगतो, ज्याला आपल्या घरी केंद्र करण्याची इच्छा आहे, त्यांनी जरूर आपली नावे आज देऊन ठेवावीत.''

त्याप्रमाणे दहा-बारा लोकांनी इच्छा प्रदर्शित केली. पुढे यथावकाश त्यांच्याकडे केंद्राची स्थापनाही झाली. आता ह्या मुक्कामातले शेवटच्या सातव्या केंद्रस्थापनेचा दिवस उजाडला. हे दांपत्य भावी पिढी घडविण्याचे काम अत्यंत निष्ठेने करत होते, कोचिंग क्लास हा व्यवसाय न मानता आपले कर्तव्य मानून विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी अहोरात्र धडपडत होते, त्यांच्याकडे जणू त्या त्यांच्या कामाला गती देण्यासाठीच ह्या केंद्राची स्थापना झाली.

पुण्यातले हे मंतरलेले दिवस कृष्णभक्तीचा, कृष्णप्रेमाचा मळा फुलवूनच ताईंनी हरिहरेश्वरासाठी प्रस्थान ठेवले. कृष्णाने तेथे तीन दिवस ताईंना सर्व भक्तांसाठी, युवाशक्तीसाठी आणि भारतासाठी हे ध्यान कर असा आदेश दिला होता. हरिहरेश्वर हे ताईंचे कुलदैवत. त्याच्या सान्निध्यात, समुद्राच्या साक्षीने, निसर्गाने नटलेल्या परिसरात ध्यानाला जाणे ताईंना फारच आवडायचे. ह्या हरिहरेश्वराच्या ध्यानात कृष्णाने काही महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या.

● ''२००२ साली विश्वजननीची प्रतिष्ठापना झालीच पाहिजे. तिचे मूर्त स्वरूप कसे असेल ते ताई, तुला श्रीशैल्यम् येथील माझ्या आराधनेत सांगेन.'' ह्या आराधनेच्या वेळेस कोण कोण भक्त बरोबर असतील त्यांची नावे सांगून, तिकिटे, राहण्याची सोय वगैरेची व्यवस्था करण्यासंबंधीच्या सूचना दिल्या.

● 'श्रीकृष्णलीलावली' ह्या पुस्तकाबरोबरच 'कृष्णाई' या कॅसेटची निर्मिती करायला परवानगी दिली. त्यात ताईंच्या आवाजातील कृष्णसंदेश असेल. त्याबरोबर काही गजर आणि कृष्ण सांगेल ते गीतेतले श्लोक अर्थासहित असे साधारण तिचे स्वरूप असेल. ती करण्याची जबाबदारी श्री. संजय पंडित ह्या कृष्णभक्तांवर कृष्णाने सोपवली आहे. त्या कामासाठी म्हणून दोन दिवस ताई पुण्यात येईल, असेही सांगितले.

● तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'श्रीकृष्णलीलावली' व 'कृष्णाई' कॅसेटचा पुणे येथे जाहीर प्रकाशन समारंभ करण्यासाठी परवानगी दिली. त्या कार्यक्रमाची सर्व जबाबदारी पुणेकर भक्तांवर सोपवली.

संधी देणाराही तोच आणि त्या संधीचे सोने करून दाखविणाराही तोच हेच खरे.

***

# ॐ

श्रीशैल्यमूला जाण्याआधी कृष्णाने ताईंना दीड महिना घराचा उंबरठाही न ओलांडता ध्यान करायचे असा आदेश दिला. जणू पुढील शक्तिस्थापनेच्या कार्यासाठी लागणारी ऊर्जा ह्या ध्यानातून कृष्णाने ताईंना दिली.

हैदराबादला जाताना ताईंचे गाडीत सतत ध्यान चालू होते. कधी सभोवती नजर फिरवून, तर कधी डोळे मिटून असे ध्यान करत होत्या. बरोबरच्या सर्व भक्तांनी मात्र त्यांचे नेहमीचे सर्व व्यवहार, हास्यविनोद हे चालूच ठेवावे असे ताईंनी आवर्जून सांगितले होते.

श्रीशैल्यमूला देवदर्शन करून सगळेजण रूमवर आल्यावर ताईंनी सांगितले की आता मला कृष्णाने ध्यान करायला सांगितले आहे. तुम्ही सर्वजण जेवून आलात तरी चालेल. कोणी मला उठवू नका. मी ध्यान झाल्यावरच जेवण घेईन. तुम्ही रूमला कुलूप लावून गेलात तरी चालेल.

एक कृष्णभक्त ताईंच्या बरोबर रूमवर थांबल्या व बाकी सर्वजण जेवायला गेले. ताईंना अगदी चित्रासारखे ध्यान करायचे होते. त्यासाठी कवळी काढून ठेव असे कृष्णाने सांगितले होते. ताईंचे ध्यान सुरू झाले. थोड्या वेळाने त्या रूममध्ये अचानक अगदी खर्जातले ॐकाराचे स्वर घुमू लागले. ताई बेडवर पडून ध्यानातच होत्या. बहुधा त्यांच्या मुखातूनच ते ॐकाराचे स्वर बाहेर पडत होते आणि त्यांचे दोनही पाय अगदी ताठ, पण बेडला समांतर असे. (बेडपासून) जवळ जवळ हातभर उंचावर अधांतरी होते. ही मुद्रा बराच वेळ होती. ध्यान जेव्हा संपत आले तेव्हा ताईंचा वर्ण लालसर, तांबूस झाला होता. एक अनोखे तेज त्यांच्या चेहऱ्यावर, अंगकांतीवर आले होते. चेहरा अत्यंत तेजस्वी दिसत होता. हळूहळू ॐकाराचा नाद कमी झाला आणि पायही खाली आल्याचा धपकन् आवाज आला. ताई ध्यानातून बाहेर आल्या. भांड भर पाणी पिऊन सांगू लागल्या, 'आज कृष्णाने ह्या ध्यानात, मला विश्वजननीच्या संदर्भात महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या.'

- विश्वजननी म्हणजे सर्व जगताची माता. माझ्या एका महान भक्ताची आत्यंतिक इच्छा होती की, विश्वजननीचे मंदिर अमेरिकेत, लॉस एंजेलीसमध्ये स्थापन करावे.

तिच्या पूर्ततेची वेळ आता आली आहे. म्हणून विश्वजननीची प्रतिष्ठापना ७ ऑक्टोबर २००२ ह्या दिवशी लॉस ऐंजेलीस, अमेरिका येथे ताईंनी करावी.

- गोव्यातल्या मडकई येथील नवदुर्गा देवीचे भक्तवत्सल रूप आहे. किंचित वाकडी मान करून भक्ताला होकार देणारी तिची प्रतिमा विश्वजननी म्हणून स्थापन करायची.
- पहिली विश्वजननी लॉस एंजेलिसला, दुसरी भारतात दिल्ली येथे कॅन्टोंमेंट भागात आणि उरलेल्या सात कृष्ण सांगेल तेथे अशा विश्वजननीच्या एकंदर नऊ एकसारख्या मूर्तींची स्थापना करायची आहे.

ह्या ध्यानात श्रीकृष्णाने ताईंना मूर्तिस्थापनेबद्दलच्या सर्व महत्त्वाच्या गोष्टींची कल्पना दिली. कृष्णाची सर्व योजना आधीच झालेली असते, ह्या गोष्टीचा अनुभव आत्ताही आला.

ताई बदलापूरला आल्यानंतर थोड्याच दिवसात गोव्याचे एक कृष्णभक्त अचानक बदलापूरला आले आणि सांगू लागले, 'ताई का माहीत नाही, पण मला तुमची, कृष्णाची इतकी ओढ वाटू लागली की मला इथे आल्यावाचून राहवेच ना. सरळ उठलो आणि इकडे निघून आलो.'

''अरे निघून आलो नाही, मीच तुला बोलावून घेतले. बुद्धिदाता मी आहे नं!'' मला विश्वजननीची स्थापना करायची आहे, त्यासाठी मडकईच्या नवदुर्गेसारखी मूर्ती घडवून घेण्याचे काम तुला करायचे आहे, म्हणून तुला बोलावून घेतले आहे. कर्नाटकातील कारकल ह्या गावी शिल्पकार भेटेल. त्याला तू मडकईच्या देवीच्या देवळात घेऊन जा. तशी अखंड काळ्याभोर पाषाणातील साधारण साडेतीन फूट उंचीची, मान किंचित् कलती असलेली, सर्व आयुधे आणि आभूषणांनी युक्त अशी मूर्ती त्याला घडवून देण्यास सांगायचे आहे. पुढे अशा अजून आठ मूर्ती घडवून घ्यायच्या आहेत.''

कृष्णाने आपल्यावर त्याच्या कामाची जबाबदारी सोपविली आहे ह्या जाणिवेने त्यांचे हृदय भरून आले. कृष्णाला साष्टांग नमस्कार घातला आणि सांगू लागले, 'कृष्णा, मी अत्यंत निष्ठेने, तत्परतेने हे काम पूर्ण करायचा जिवापाड प्रयत्न करेन. कर्ताकरविता सर्व काही तूच आहेस. तू ते माझ्याकडून करवून घे, ही नम्र प्रार्थना.' ताईंनी प्रसन्न चित्ताने आशीर्वाद दिला, ''यशस्वी भव!'' कृष्ण आणि असा भाव असणारे यांचे भक्त यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.

एके दिवशी पंडितांचा फोन वाजला, 'संजय, तुम्हाला कॅसेटच्या कामासाठी म्हणून दोन दिवस मी येईन सांगितले होते नं, ह्या दोन आठवड्यात तुम्हाला कधी वेळ

आहे ते मला कळवा.' संजय एकदम आश्चर्यचकित. ताईंसारख्या व्यक्तीचा काय हा साधेपणा. दुसऱ्याच्या वेळेची कदर करण्याची वृत्ती! त्यांनी ताईंच्या सोयीप्रमाणे दिवस ठरवले आणि त्याप्रमाणे ताई पुण्यात आल्या. ताई निव्वळ या कामासाठी येत आहेत त्यामुळे इतर कोणीही त्यांना भेटायला येऊ नये अथवा फोनही करू नये असा कृष्णाचा निरोप होता.

कधीकधी वाटतं ही भक्तांचीपण परीक्षा असते. तुम्ही कृष्णाचा आणि गुरूचा शब्द कसा पाळता यासाठी घेतलेली. तरी देखील काही अज्ञानी भक्तांचा आग्रह होताच की, ताईंनी थोडा वेळ तरी आमच्याकडे यावे. निदान आम्हाला भेट द्यावी. नाहीतर फोनवर तरी बोलावे. ताईंना तो आग्रह पाहून वाईट वाटले. त्या म्हणाल्या, 'आपण कृष्णाकडे नेहमी जाणारे, बऱ्याच वर्षांपासून जाणारे. स्वत:ला कृष्णाच्या अगदी जवळचे भक्त समजणारे; मग कृष्णाने घातलेले हे साधे बंधनही पाळू शकत नाही? गुरूच्या आज्ञेचे तंतोतंत पालन ही गुरुसेवा नव्हे काय? त्याच्या आज्ञेचा मान न ठेवणे म्हणजे गुरुसेवेची हाती आलेली संधी तुम्ही गमवत आहात असे नाही का? श्रद्धेबरोबर सबुरीची पण अत्यंत आवश्यकता आहे.' ताईंनी समोर बसवून फारच क्वचित् प्रवचन केले आहे, पण त्या सहज जाता येता अनेक प्रसंगातून मात्र भक्तांना घडविण्याचे काम सतत करत होत्या. त्याचा फायदा जो तो आपापल्या तयारीप्रमाणे घेत होता.

ताईंनी लिहिलेल्या प्रार्थनेचे ध्वनिमुद्रण चालू होते. ते करताना असे लक्षात आले की, गेयतेच्या दृष्टीने काही शब्द बदलण्याची गरज पडणार आहे. पण ताईंसारख्या विभूतींना असं सांगणे हे म्हणजे त्या कलाकारांना धर्मसंकटच वाटले. काय करावे यासाठी साधक-बाधक चर्चा झाली. शेवटी ही सर्व परिस्थिती ताईंच्या कानावर घालून त्या म्हणतील तसे करावे असे सर्वानुमते ठरले. ताईंना विचारले. ताई म्हणाल्या, 'अहो, तुम्हाला इतके अवघडल्यासारखे का वाटते आहे? गेयतेसाठी काही शब्द पुढेमागे करणे, बदलणे असे आवश्यक असेल तर जरूर करा. फक्त अर्थाकडे लक्ष असू देत. संजय, कॅसेटबाबत सर्व काही कृष्णाने तुमच्यावर सोपविले आहे. मला खात्री आहे तुम्ही आणि तुमचे सर्व सहकारी ही जबाबदारी उत्तम रीतीने पार पाडाल.' सर्वच अत्यंत आश्चर्यचकित झाले. कारण कलेच्या प्रांतातही छोट्या-मोठ्या कलावंताचे किती आग्रह असतात. त्याचा ते सर्व अनुभव घेतच होते. अशात ताईंसारख्या थोर विभूतीने, कोणतीही हरकत न घेता त्या बदलाला सहज दिलेला होकार, त्यांची विनम्रता, त्यांना बरंच काही सांगून, समजावून गेली.

'श्रीकृष्णलीलावली' ह्या पुस्तकाचे आणि कृष्णाई कॅसेटचे काम अंतिम टप्प्यात आले. कृष्णाने उद्घाटन समारंभाची तारीख दिली ६ जून २००१.

पुण्यामध्ये मनोहर मंगल कार्यालयात, फुलगावचे स्वामी स्वरूपानंद यांच्या हस्ते 'श्रीकृष्णलीलावली' हे पुस्तक आणि 'कृष्णाई' ह्या कॅसेटचे प्रकाशन हजारो कृष्णभक्तांच्या साक्षीने झाले.

त्या वेळेस बोलताना ताई म्हणाल्या, 'ह्या काळामध्ये कृष्ण प्रत्येक भक्ताच्या हाकेला कसा धावतो त्याचे वर्णन ह्या पुस्तकात आहे. कृष्णाचे अस्तित्व तुमच्या श्रद्धेमुळे कसे जागृत झालेले आहे, त्याचे व्यवहारी रूपातही कसे दर्शन घडले, हे या पुस्तकाच्या वाचनातून कळेल. हे पुस्तक म्हणजे आपण कृष्णाजवळ कसे आलात व कृष्ण आपल्याजवळ कसा आला त्याचेच प्रतीक आहे.'

प्रकाशनाच्यावेळी काढलेल्या हजार प्रती पहिल्या पंधरा दिवसातच संपल्या. नंतर आजपर्यंत सात वेळा ह्या पुस्तकाचे पुर्नमुद्रण झालेले आहे. ताईंनी देह ठेवल्यानंतरसुद्धा अनेक भक्त हे पुस्तक वाचून त्यातून प्रेरणा घेऊन श्रीकृष्णलीलाकेंद्रामध्ये जाऊन कृष्णकृपेचा लाभ घेत आहेत.

***

ॐ

जून महिन्यापासून कृष्णाने सांगायला सुरुवात केली की हे सहाही महिने माझे सतत फिरून कार्य करण्याचे आहेत. भारतात ठिकठिकाणी केंद्र स्थापन करणे. त्याचप्रमाणे भारताच्या चतु:सीमांवर प्रत्यक्ष जाऊन ध्यान करायचे आहे. ताईंचा विश्वास होता की ज्याअर्थी कृष्ण सांगतोय, त्याप्रमाणे त्या त्या गोष्टी घडणारच. त्याच्यासाठी कोणाकडून, कशा पद्धतीने सेवा स्वीकारायची त्याबाबत कृष्णाची सर्व योजना तयार असणारच. त्या त्या व्यक्ती योग्य वेळी पुढे येतील.

जुलै महिन्यात कृष्णाने सांगितले की लोणावळ्याजवळ दुर्गा परमेश्वरीचे मंदिर आहे. तेथे मला ध्यानाला जायचे आहे आणि त्यानंतर गणपतिपुळ्याला जाऊन ध्यान करायचे आहे.

काल्र्याचे दुर्गा परमेश्वरी मंदिर हे गौड सारस्वत समाजाच्या पीठाचे आहे. त्या समाजातील एका कृष्णभक्तांनी तेथील ट्रस्टींशी बोलून ताईंची माहिती देऊन तेथे ध्यान करायची सारी व्यवस्था केली. त्याप्रमाणे ता. १९ जुलै २००१ ह्या दिवशी ताई मंदिरात जाऊन ध्यान करून आल्या. तेथून त्या लोणावळ्याला एका कृष्णभक्तांकडे रात्री राहिल्या. तेथे पाद्यपूजा झाली. तेथे एक बाई स्वयंपाकात मदत करण्यासाठी म्हणून आल्या होत्या. ताईंच्या समोरून त्या दोनतीन वेळा गेल्या. शेवटी ताईंनी तिला जवळ बोलावले आणि विचारू लागल्या, ‘अगं, तू काही अडचणीत आहेस का?’ तिच्या डोळ्यात पाणी उभे राहिले. तिने नमस्कार करून तिच्या सर्व अडचणी आणि समस्या कृष्णाला सांगितल्या. कृष्णाने तिला मार्गदर्शन करून प्रसाद, तुळशीचे पान दिले आणि काही उपासना करायला सांगितली. कृष्णाची कृपा कोणावर कधी होईल, कोठे होईल हे त्यालाच माहीत. कृष्ण नेहमी सांगतो, ‘‘तुम्ही तुमचे काम व्यवस्थित नेकीने करा. त्याचाही मी सेवा म्हणून स्वीकार करतो.’’ त्याचेच हे उदाहरण!

गणपतिपुळ्याला जाऊन गणेशमंदिरात ध्यान आणि पुढे सात केंद्रांची स्थापना तेथेच जवळपासच्या भागात करणे आणि शेवटी हरिहरेश्वरला जाऊन ध्यान करून बदलापूरला परत येणे असा पुढचा कार्यक्रम ठरला.

गणपतिपुळ्याचे ध्यान हे विश्वशांतीसाठीचे ध्यान होते. कार्याचा श्रीगणेशा गणेशपूजनानेच होतो. त्याप्रमाणे विश्वशांती, विश्वकल्याण ह्यासाठी जगज्जननीची प्रतिष्ठापना हे जे काही कृष्णाला करावयाचे होते, त्याची सुरुवात ह्या गणेशपूजनाने होणार होती. तिकडे जाण्यापूर्वीच्या ध्यानात गणेशाने योगेश्वराला सांगितले होते, ''योगेश्वरा, तू माझ्या भेटीला येतो आहेस. तुझे मी भव्य स्वागत करतो.'' त्याचा प्रत्यय या ध्यानयात्रेत खरोखरच आला.

गणपतिपुळ्याच्या मंदिराची पद्धत अशी की गर्भगृहात जायचे असेल तर नऊवारी साडी आणि सोवळे नेसल्याशिवाय आत कोणालाच प्रवेश मिळत नाही. मात्र गुरुजींनी ताईंना गर्भगृहात गणपतीसमोर बसून ध्यान करायची परवानगी दिली. ताईंचे ध्यान होताना गणपतीने सांगितले, ''योगेश्वरा, तू आलास मला फारच आनंद झाला. त्याचे प्रतीक म्हणून माझ्या डोक्यावरचे पांढरे फूल देतो.'' हे बोलणे होते तोपर्यंत गुरुजींनी गणपतीच्या डोक्यावरचे पांढरे फूल ताईंना प्रसादाचे म्हणून दिले आणि ओंजळभर मोदक पण दिले.

नंतर बरोबर असलेल्या भक्तांनी गुरुजींना विचारले, 'मंदिराची प्रथा मोडून तुम्ही ताईंना आत कसे जाऊ दिले?' ते म्हणाले, 'आमच्याकडे समर्थांची उपासना चालते, आईसाहेबांना बघताक्षणीच मला जाणवले की हे काही वेगळेच रूप आहे. त्या आमच्या घरी आशीर्वाद द्यायला येतील का?'

त्यानंतर हे सर्व जण कृष्णभक्त प्रकाश कोल्हाळकरांच्या अभिषेक रिसॉर्टमध्ये राहण्यासाठी गेले. कृष्णाच्या स्वागतासाठी तो पूर्ण रिसॉर्ट फुलापानांनी सजवून फुलांच्या पाकळ्यांच्या पायघड्या घातल्या होत्या. कृष्णाच्या स्वागताला सर्व स्टाफ जातीने हजर होता. त्या सर्व तयारीसाठी दोन कृष्णभक्त खास कोल्हापूरहून रिसॉर्टमध्ये येऊन थांबल्या होत्या. त्यावर ताईंचे सांगणे, की प्रकाशची माझं स्वागत करण्याची इच्छा होती! त्यासाठी ही कृष्णाची रचना. ''मी एका भक्ताला दुसऱ्या भक्ताच्या मदतीला जाण्याची बुद्धी देऊन भक्तांच्या इच्छांची पूर्तता करतो. हे माझे भक्तासाठी धावत येणे होय. तुमच्याच नजरेतून पाहीन, तुमच्याच हातून काम करून घेईन,'' असे कृष्ण सांगत असतो ना त्याची ही प्रचिती.

कृष्णाने अभिषेक रिसॉर्टमध्ये केंद्र करताना सांगितले, ''केंद्र स्थापन करण्याची वेळ तीन ते चार जरी असली, तरी तुमच्या केंद्राला वेळेचं बंधन नाही. तुम्ही हॉटेलमध्ये काम करणाऱ्यांनी आपली कामं संपवल्यावर केंद्र केले तरी चालेल. अगदी रात्री दहा

वाजता बसलात तरी चालेल. फक्त एक वार निश्चित ठेवा. 'कर्तव्यात मला पाहा.' या कृष्ण वचनाची ही प्रचिती!

पुढे जांभरी, हरवंडे, वेळंब, सावर्डे आणि रत्नागिरी अशा पाच केंद्रांची स्थापना झाली. रत्नागिरी सोडता बाकी चारही केंद्रे अगदी अंतर्भागात आहेत. छोट्या छोट्या वाड्या असाव्यात अशी ती गावे. प्रत्येक ठिकाणी केंद्र करताना कृष्णाच्या संदेश सांगण्याच्या पद्धतीत, केंद्राची माहिती सांगण्याच्या पद्धतीत त्या त्या ठिकाणच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थितीनुसार फरक होत होता. आशय एक असला तरी शब्दांची मांडणी वेगळी असे. त्या त्या ठिकाणच्या लोकांना समजतील, रुचतील, भावतील असे ते शब्द होते.

ह्या ध्यानयात्रेत ताईंनी काही काही गोष्टींचा खुलासा केला. एकदा त्यांना एकाने प्रश्न विचारला होता, 'ताई, तुम्ही कधी झोपता?'

ताईंनी सांगितले, 'माझी झोप त्याच्या मर्जीवर असते, कारण कधी झोपलेली असताना तो उठवतो आणि एखादे तातडीचे काम सांगतो. कधी तातडीने ध्यान करायला सांगतो. कधी कधी रात्रभरही ध्यान चालते.'

'अशा वेळेस तुम्ही दमत नाही? झोपावेसे वाटत नाही?'

'दमायला मी कोठे काय करते? तो करवून घेतो. ताकदही तोच देतो. सगळी व्यवस्था अगदी चोख असते हो त्याची. उत्तम मॅनेजमेंट त्याच्याकडूनच शिकावी.'

ताईंच्या स्वरातून आणि डोळ्यातून पूर्ण भक्तिभाव ओसंडत होता.

'ताई, ध्यान संपले की तुम्ही तीन घोट पाणी पिता. त्याच्या मागचे कारण काय?'

'घरी असताना माझे ध्यान संपले की शिवलिंगावर पाण्याचा अभिषेक करायचा, असे मला सांगितले आहे. प्रवासात ते शिवलिंग बरोबर घेऊन फिरता येत नाही. त्यामुळे तीन घोट पाणी पिऊन, अंतरंगातल्या शिवावर तो अभिषेक करायचा, असे कृष्णाने सांगितले आहे.'

खूपदा माणूस जप-जाप्य, कर्मकांड ह्यात फारच गुंततो. मात्र कृष्णाचे स्पष्ट सांगणे आहे, 'माणुसकीला बाजूला ठेवून केलेले जपतप, कर्मकांड ही माझी सेवा किंवा साधना नव्हेच. नेहमी दिलेले काम मनापासून सर्वार्थाने करणे हीच माझी खरी साधना आहे.'

'ताई, कृष्ण म्हणतो प्रत्येक व्यक्तीत मला पाहा म्हणजे काय?'

''ह्याचा अर्थ फारच मर्यादित घेतला जातो. प्रत्येकजण माझाच अंश आहे. पण हे मानून माणसं एकमेकांशी वागत नाहीत. ताईकडे-माझ्याकडे येताना जो स्निग्ध भाव, लीनपणा, प्रेम, भक्तिभाव मनात असतो तोच भाव एकमेकांशी वागताना नसतो. ज्या भावानी ताईला, मला पाहता त्याच भावाने सर्वांना पाहा. तसेच सर्वांशी वागा हीच चोवीस तासांची साधना आहे. दिवसभरात जी जी व्यक्ती समोर येईल ती मीच आहे असं समजून वागायचे.

जपजाप्य, नामस्मरण ह्यातून सात्विकता जागी होते. आत्ता जो चोवीस तास साधनेचा मार्ग सांगितला तो ही सात्त्विकता जागवण्यासाठी जास्त प्रभावी मार्ग आहे.

मी प्रत्येकाच्या अंतरात आहे. तेथून मी योग्य, अयोग्य सर्व काही सांगत असतो. मात्र तुम्ही सर्वजण इतर गोष्टीत इतके गुरफटता की आतला आवाज तुम्ही ऐकतच नाही. तो ऐकायला शिका. तुमच्या अंतरात मी आहे. मला जागवा. माझी जाणीव करून घ्या.''

आत्तापर्यंत कृष्ण सांगत होता, केंद्रातला कृष्ण जागवा. मग घराघरातले माझे स्थान जागृत करा आणि आता त्यानंतर अंतरातल्या मला पाहा, मला जागवा. जणू हे सर्व सांगून कृष्ण आम्हाला भक्तिमार्गावरच्या एक एक पायऱ्यांची ओळख करून देत होता.

'ताई, तुमच्या संपर्कात अनेक माणसे येतात. काही चित्र-विचित्रपण वागत असतील. अशी माणसं सहन करताना तुम्हाला त्यांचा राग नाही का येत?'

'नाही,' कृष्ण म्हणतो, ''त्यांच्यावर मुळीसुद्धा रागवायचं नाही. कारण प्रत्येक माणूस आपल्या पूर्वकर्मानुसार प्रारब्ध घेऊन येतो, त्यानुसारच तो वागतो, हे जेव्हा समजते तेव्हा राग न येता उलट अशा लोकांची कणवच येते. आपल्याशी कोणी वाईट वागले तर त्याच ंआणि आपलं प्रारब्ध म्हणून सोडून द्यायचं. मात्र उगाचच बावळटपणानीही वागायचं नाही. टोल्याला प्रतिटोलाही द्यायलाच हवा.''

असं सर्वार्थाने प्रबोधन करत कृष्णाची-ताईंची ही ध्यानयात्रा हरिहरेश्वरमार्गे बदलापूरला येऊन पूर्ण झाली.

जुलैपासून होणाऱ्या भारतभ्रमणासाठी कृष्णाने प्रथम केरळला जाण्याचा आदेश दिला. त्याप्रमाणे २७ जुलै ते ९ ऑगस्ट २००१मध्ये तीस ते बत्तीस कृष्णभक्तांसह ताई

केरळच्या ध्यानयात्रेला निघाल्या. केरळ हे आद्यशंकराचार्यांचे जन्मस्थान. अत्यंत पवित्र भूमी. इथूनच त्यांनी दळणवळणाची कोणतीही साधने नसताना, पदयात्रा काढून सनातन धर्माची पताका पूर्व-पश्चिम, दक्षिणोत्तर अशी नेली आणि चार-चार ठिकाणी धर्मपीठांची स्थापना करून सनातन धर्माचे पुनरुज्जीवन केले.

सनातन धर्म म्हणजे मानवताधर्म. विश्वकल्याणासाठीच्या विश्वकार्याची ही सुरुवात आहे. हे कार्य धर्मातीत आहे. त्यात सर्व धर्मीयांचा समावेश आहे.

त्या विश्वकार्यासाठी, सर्व भक्तांसाठी, युवापिढीसाठी आणि भारतासाठी कृष्ण सांगेल त्याप्रमाणे ताई सतत ध्यान करत होत्या. कधी सभोवती नजर फिरवून, कधी डोळे मिटून तर कधी समुद्रकिनारी जाऊन सागराच्या अथांगपणावर.

केरळयात्रेत सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तीन ऑगस्टला नारळीपौर्णिमेच्या दिवशी कृष्णाने विश्वकलशाची स्थापना केली व संदेश देताना सांगितले-,

● माझ्या इच्छेशिवाय झाडाचे पानसुद्धा हलत नाही. आज जे भक्त माझ्याबरोबर विश्वकार्यासाठी आलेले आहेत व ज्यांनी मला पाठिंबा दिला आहे, त्यांना मी वचन देतो की,

अनन्याश्चिंतयंतो मां ये जना: पर्युपासते।

तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥२२॥ (भगवतगीता,अध्याय ९वा)

तुमच्या जन्मापासून ते अंतापर्यंत तुमची सर्व जबाबदारी माझी. हे मी तुम्हाला दिलेले वचन आहे आणि मी वचनाचा पक्का आहे.

मात्र तुमच्यावरही तेवढीच जबाबदारी आहे. तुमची श्रद्धा, तुमचा विश्वास आज जेवढा उत्कट आहे, प्रामाणिक आहे, तो तेवढा तसाच ठेवा. तरच मला तुमच्यासाठी उभे राहता येईल. आज जे भक्त इथे येऊ शकले नाहीत पण जे मनाने येथे आलेत त्यांनाही मी वचन देतो, की मी सदैव त्यांच्या पाठीशी आहे व राहीन. मात्र मनात संदेह येऊ देऊ नका. मन विचलित होऊ देऊ नका.

● मी माझ्या भक्ताला दिलेले वचन कधीच विसरत नाही, अगदी तो मला विसरला तरीसुद्धा. मात्र त्या वचनाची पूर्तता झाल्यावर पुन्हा मला त्याच्या पाठीशी उभे राहता येत नाही, कारण तो मला विसरलेला असतो किंवा त्याची श्रद्धा डळमळीत झालेली असते.

● आजच्या युगात माझ्या प्रत्येक भक्तावर लक्ष्मीचाही वरदहस्त असण्याची आवश्यकता आहे. त्यासाठीच्या उपासनेचा मंत्र आणि विधी असा,

लक्ष्मीदेवि महामाये देहि मे अनुग्रहम् ।

तथा च संपत्तिधनम् आयुरारोग्यम् संपदाम् ॥

दर शुक्रवारी संध्याकाळी सात ते आठ किंवा नऊ ते दहा ह्या वेळामध्ये हा मंत्र अकरा वेळा म्हणून आपल्या कुलस्वामिनीला सांगावे की, योगेश्वराच्या सांगण्याप्रमाणे हा दूधसाखरेचा नेवैद्य तुला अर्पण करत आहे, त्याचा स्वीकार कर. नंतर कुटुंबातल्या सर्वांनी तो प्रसाद घ्यावा.

कृष्णाने विश्वकलशाची स्थापना १० ऑगस्ट २००१ रोजी कृष्णकुटीरमध्ये करावयास सांगितली. हा कलश सर्वांचे सहकार्य व एकी ह्यांचे प्रतीक म्हणून कृष्णकुटीरमध्ये कायम राहील. त्यावर पाच वेळा ॐ कोरलेला आहे. त्याचप्रमाणे 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' व 'ॐ महान शक्ती देवताय नम:' हे मंत्र आणि केरळयात्रेत ताईंच्या सोबत असलेल्या कृष्णभक्तांच्या आडनावाची आद्याक्षरे कोरलेली आहेत.

ठरल्याप्रमाणे बदलापूरला बऱ्याच भक्तांच्या उपस्थितीत कृष्णाला फुलांचा, अत्तराचा अभिषेक करून ह्या कलशाची प्रतिष्ठापना झाली.

***

ॐ

कृष्णाचे केंद्र स्थापनेचे काम जोरात चालू होते. सांगली, कोल्हापूर ह्या भागात चार केंद्रांची स्थापना, पुण्यात तीन केंद्रांची स्थापना असा सात दिवसांचा (१७ ते २५ ऑगस्ट २००१) कार्यक्रम ठरला.

तेव्हाच पुण्यातल्या प्रसिद्ध दगडूशेठ गणपती मंडळातर्फे होणाऱ्या ऋषिपंचमीच्या सामुदायिक अथर्वशीर्ष पठणाच्या कार्यक्रमात ताईंना प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रण होते. खरं तर सामुदायिक कार्यक्रमांना हजर राहणे कृष्णाला पसंत नसे, मात्र या मंडळाच्या विनंतीस कृष्णाने होकार दिल्याने ताईंनी ते निमंत्रण स्वीकारले होते.

'हाडाच्या शिक्षिका' असा शद्बप्रयोग सार्थ ठरवणाऱ्या एका कृष्णभक्ताकडे सांगलीचे एक केंद्रस्थापन झाले. केंद्र स्थापनेच्या वेळेस त्यांचे सर्व विद्यार्थी, पालकवर्ग व परिचित असे बरेचजण जमलेले पाहून कृष्णाने अत्यंत समाधान व्यक्त केले. सांगितले की, ''तुम्ही जे भावी पिढीला घडवण्याचे कार्य अत्यंत निरपेक्षपणे करत आहात त्यासाठी मी तुमचे कौतुक करतो. माझ्या यंग जनरेशनच्या कल्याणासाठी जो धडपडतो, उभा राहतो, त्यांना मी बांधला गेलो आहे. तुमच्या पाठीशी मी सतत उभा आहे, असे आज वचन देतो.''

तेथून दुसऱ्या कृष्णभक्तांकडे जेव्हा ताई गेल्या तेव्हा घरात शिरताच बाहेर कोठेही न थांबता ताई सरळ आतल्या बाजूला जाऊन एका खोलीत भिंतीपाशी उभ्या राहून सांगू लागल्या, 'तुमच्या घरातले माझे स्थान इथे आहे.' त्या सगळ्यांनाच आश्चर्य वाटले. कारण पूर्वी यांचे गुरू त्यांच्याकडे आले होते, त्यावेळेस त्या जागेवरच त्यांची पाद्यपूजा केली होती. शेवटी गुरुतत्त्व एकच असते हेच खरे. केशवं प्रतिगच्छति!

तेथून ताई पुण्याला आल्या. दुसऱ्या दिवशी पहाटे साडेपाच वाजता सामुदायिक अथर्वशीर्षपठणाचा कार्यक्रम दगडूशेठ गणपती मंदिरात होता. ताई आणि काही कृष्णभक्त सव्वापाच वाजताच तेथे पोहोचले. मंडळाच्या लोकांनी ताईंना, वर मंदिरात येऊन आरती करण्याचा आग्रह केला. बरोबरची मंडळी आता काय होते ते उत्सुकतेने बघू लागली. त्यावर कृष्णाने सांगितले, ''त्याने मला बोलावले, म्हणून

ताईला आरती करायला देतो.'' असे म्हणून ताईंनी आरती केली. चौदा ते पंधरा हजार महिला जमल्या होत्या. अगदी पारंपरिक वेशात! अगदी सुश्राव्य आणि देखणा कार्यक्रम झाला. नंतर मंडळातर्फे ताईंचा सत्कार झाला. त्याला उत्तर देताना ताई म्हणाल्या, 'तुम्ही सर्व जणी इतक्या मोठ्या संख्येने, इतक्या सकाळी येथे उपस्थित राहिलात त्याबद्दल प्रथम तुमचे कौतुक करते. आजच्या काळाची जी सामूहिक उपासनेची गरज आहे, त्याची पूर्तता तुमच्याकडून होते आहे, ह्याबद्दल कृष्ण तुमचे कौतुक करत आहे. कृष्णाचे सांगणे असे की तुम्ही जी काही साधना, उपासना, आपली नित्यकर्मे अत्यंत प्रामाणिकपणे करता त्याच्या जोडीला 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' ह्या मंत्राचा उच्चार निदान एकदा तरी करा.' ''कितीदा करा, मोजा असे मी अजिबात सांगत नाही. हा मंत्र केल्याने तुमच्या माझ्यातले बंध दृढ होतील. तुमच्या सेवेचा मी स्वीकार करू शकेन व माझे, परब्रह्माचे मदतीचे हात तुमच्यापर्यंत पोहोचू शकतील.''

'आज समाजात, घरात स्त्रीचा मान किंवा तिची योग्यता कमी लेखली जाते. ते अजिबात बरोबर नाही. समाज सुधारायचा असेल तर प्रत्येक घर, प्रत्येक माणूस सुसंस्कृत झाला पाहिजे. त्यात स्त्रीचे योगदान खूपच मोठे असते. यशस्वी कुटुंबामागे, सुसंस्कृत भावी पिढीमागे घरातील कर्तृत्ववान स्त्रियांचा वाटा खूपच असतो. तिच्या यशाची, मानाची, त्यागाची जाणीव आणि दाद देण्यासाठीच वडिलांच्या आधी आईला नमस्कार केला पाहिजे, हे शास्त्राने सांगून ठेवले आहे. म्हणून समाज सुसंस्कृत व्हावा असं वाटत असेल तर स्त्रियांचा योग्य तो सन्मान झाला पाहिजे. मातृदेवो भव!'

''तुम्ही मला काय देता हे मी पहात नाही. त्यामागची भावना, प्रेम, भक्ती, श्रद्धा हे सर्व मला पोहोचते. माझ्या दृष्टीने तेच महत्त्वाचे असते.

आता मानवताधर्माची जगाला गरज आहे. माणूस म्हणून वागा. माणुसकीने व्यवहार करा. हा मानवताधर्मच श्रेष्ठ आहे. त्याचा प्रसार व्हायला हवा.

रोज झोपण्यापूर्वी 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हा मंत्र श्रद्धेने आणि विश्वासाने म्हणा. तुमच्यामध्ये असलेला ॐकार आणि मी यामध्ये ह्या मंत्राचा पूल आहे. त्याचा उपयोग करून मला आपलासा करा. तुमच्यातला ॐकार जागृत करा. हीच काळाची गरज आहे.''

असे मार्गदर्शन करून ताईंनी एका भक्ताकडे, कृष्णासाठी 'पवमान अभिषेक' करावयाचा ठरवले होते. त्या सेवेचा स्वीकार कृष्णाने केला. जमलेल्या सर्व भक्तांना

भरभरून कृपाआशीर्वाद दिला.

२३ ऑगस्ट २००१ या दिवशी एका भक्ताकडे केंद्रस्थापना होती. तेव्हा ताईंनी अचानक एका गृहस्थांना सांगितले, 'तुम्ही मला भेटल्याशिवाय जाऊ नका हं! कृष्णाचे काही काम आहे तुमच्याकडे.' त्या गृहस्थांना अत्यंत आश्चर्य वाटले. ते बहिणीच्या सांगण्यावरून ह्या कार्यक्रमाला आले होते. त्यांना ताई, ताईंचे कार्य याबद्दलची विशेष माहिती नव्हती.

केंद्रस्थापनेचा कार्यक्रम अतिशय उत्साहात, आनंदात पार पडला. ताईंनी त्या गृहस्थांना जवळ बोलावले आणि बोलू लागल्या, 'तुम्ही कोठे आणि काय काम करता? कृष्ण म्हणतो मला त्याच्या ओरिसाच्या ऑफिसमध्ये जाऊन ध्यान करायचे आहे.' हे गृहस्थ एकदम गांगरून जाऊन ताईंकडे आश्चर्याने पाहू लागले आणि म्हणाले, 'मी भारत सरकारच्या सेवेत शास्त्रज्ञ म्हणून काम करतो. इतके दिवस मी ओरिसात बालासोरला जो मोठा मिसाईल टेस्टींगचा प्लँट आहे तेथे काम करत होतो. आत्ता नुकतीच माझी बदली पुण्याला झाली आहे.'

त्यावर कृष्णाने सांगितले, ''अरे, तू सांगशील तो दिवस आणि देशील ती वेळ. त्या वेळेस तेथे जाऊन मला ध्यान करायचे आहे, तू विचार करून मला सांग.''

त्यानंतर अजून एका केंद्राची स्थापना करून ताई बदलापूरला परत गेल्या. ताईंच्या ह्या ध्यानयात्रेत कोल्हापूरला एक युवाकेंद्र स्थापन झाले. सांगलीहून कोल्हापूरला जाताना, अष्टा गावाच्या अलीकडे एका मंदिरात ताईंचा सत्संग होता. छोटेसे गाव होते. त्या गावातल्या लोकांची फार इच्छा होती की ताईंनी आपल्या गावात येऊन कृष्णाच्या गोष्टी, त्याचे कार्य ह्याची माहिती द्यावी. त्यास कृष्णाने होकार दिला होता. त्या मंदिराच्या अलीकडे एक छोटेसे शेत होते. त्या लोकांनी अगदी भीतभीत विचारले, 'माऊली, आमच्या गरीबाच्या झोपडीत येणार का?' कृष्णाने ताबडतोब सांगितले, ''येणार का म्हणजे काय, अरे येणारच! मी जातो तो माझा राजवाडाच असतो. मी तुमचा भाव बघतो आणि त्याला मी भुलतो.'' असं म्हणून ताई त्या माणसामागोमाग जाऊ लागल्या. बरोबरची मंडळी पण गेली. त्या उजाड माळरानावर त्याची छोटीशी झोपडी होती. आत त्या माणसाची म्हातारी आई, बायको आणि छोटे मूल होते. त्या दोघीही स्वागतासाठी बाहेर आल्या आणि आदराने ताईंना आत घेऊन गेल्या. बसायला पटकूर घातले व संकोचाने म्हणाल्या, 'माऊली, इथे बसाया चालेल का?' ताई आनंदाने तेथे बसल्या. त्यांनी दिलेला

लालसर गोड चहा अत्यंत प्रेमाने घेतला. कोरड्या भुईमूगाच्या शेंगाचा फुफाट्यात भाजलेला वानवळा प्रेमाने खाल्ला. प्रसन्न चित्ताने सर्व काही स्वीकारले असे त्यांना सांगून सर्वांना भरपूर प्रसाद, फळे, कृष्णाचा फोटो, चांदीचे तुळशीचे पान देऊन तुमचे सर्व काही चांगले होईल, मी तुमच्या पाठीशी आहे, तुमचा बाळ छान मोठा होईल असा आशीर्वाद देऊन बाहेर पडल्या.

कृष्णाच्या दृष्टीने खरा भाव ठेवून भजणारे ते सर्वच भक्त! त्यांची परिस्थिती, सामाजिक स्थान, पैसा, मानमरातब ह्याला त्याच्या लेखी काहीच किंमत नसते.

इकडे पुण्यात काय झाले, कृष्णाने ओरिसा येथील ध्यानाची जबाबदारी ज्यांच्यावर सोपविली होती त्यांना अचानक एके दिवशी एका ट्रेनिंग कोर्सची ऑर्डर आली. तो कोर्स बालासोरला होता. त्यामुळे ऑक्टोबरमध्ये त्यांना ऑफिसतर्फे आठवडाभर तेथे जाणे आवश्यक होते. त्यांना त्या योगायोगाचे आश्चर्यच वाटले आणि त्यांनी ताईंना फोन केला, 'आपण ऑक्टोबरमध्ये बालासोरला जाऊ शकू. माझे ट्रेनिंग झाल्यावर आपणासाठी मी अजून दोन-तीन दिवस तेथे राहू शकेन.' 'तर मग सगळा प्रोग्रॅम तूच ठरव,' ताईंनी सांगितले.

कितीतरी दिवस कलकत्त्यातले कृष्णभक्त ताई तिकडे येण्याची वाट बघत होते. आठदहा लोकांनी आमच्याकडे केंद्र करावे अशी ताईंना विनंती पण केली होती. त्याप्रमाणे प्रथम कलकत्त्याला एक आठवडा राहून केंद्रांची स्थापना आणि तेथून पुढे बालासोरला जाऊन कृष्ण सांगेल तेथे ध्यान करणे असा प्रोग्रॅम ठरला. १ ते १३ ऑक्टोबर २००१च्या दरम्यान पहिल्या सहा दिवसात नऊ केंद्रांची स्थापना कलकत्ता आणि तेथील उपनगरात झाली.

आठ तारखेला पुण्याहून काही कृष्णभक्त पुढे बालासोरला जाण्यासाठी कलकत्त्यात पोहोचले. तेथून ताईंबरोबर सर्वजण बालासोरला संध्याकाळी पोहोचले. तेथे ते पुण्यातले शास्त्रज्ञ स्टेशनवर आले होते. त्यांच्याबरोबर सगळेजण हॉटेलवर गेले. थोड्या वेळाने ते गृहस्थ व त्यांचा एक मित्र ताईंना भेटायला आले. दोघांचेही चेहरे गंभीर होते. म्हणून बरोबरच्या भक्तांनी चौकशी केली. ते सांगायला लागले, की परवानगी मिळू शकली नाही. 'ताई, तुम्ही इतक्या लांब आलात. मात्र मी काहीच करू शकलो नाही. मला क्षमा करा.' ताई म्हणाल्या, 'थांबा, हा तुमचा मित्र आहे. तो हे काम करेल. अरे, तू दोनतीन वर्षांपूर्वी काही चांगले काम केले होतेस! त्याचीच आज पावती देण्यासाठी तुझी-माझी भेट झाली. तू परवानगी काढायला जा. ते काम होईल, असं कृष्ण सांगतोय.'

ते विचार करू लागले. त्यांना आठवले तीन वर्षापूर्वी चंडीपूर मिसाईल टेस्टींग सेंटरच्या मेसचा चार्ज त्यांच्याकडे आला. त्यांनी चार्ज घेण्यापूर्वी मेसमधील जेवणाचा दर्जा अत्यंत निकृष्ट होता. जेवणारे सर्व घरापासून दूर एकेकटे राहणारे होते. त्यामुळे त्यांचे जेवणाचे फार हाल व्हायचे. हे सारे जाणून त्यांनी प्रथम जेवणाचा दर्जा सुधारला. रुचकर, पौष्टिक जेवण देण्याचीच पद्धत पाडली. त्यांची शिस्तही सर्वांनी पाळली. अर्थातच उत्तम जेवणाने सारे सुखावले. सर्वांचे समाधान हेच त्यांच्यासाठी पुण्यकर्म होते. कृष्णही त्यांच्या याच सेवेचा स्वीकार केल्याचे सांगत होता. ते दुसऱ्या दिवशी तेथल्या अधिकाऱ्यांना भेटले. कृष्णाने सांगितल्याप्रमाणे त्यांना परवानगी मिळाली. प्रत्यक्ष शास्त्रज्ञ जिथे काम करतात तेथे जाऊन ध्यान करण्याची ताईंची इच्छा पूर्ण झाली.

ताईंना बालासोर शहरात देखील नजर फिरवून ध्यान करायचे होते. त्याप्रमाणे सर्व शहरभर फिरून ध्यान केले. कृष्णाने सांगितले, बालासोरची भरभराट होईल. पीक-पाणी चांगले येईल. नवीन कारखाने निघून नोकरीच्या संधी वाढतील. माझा ह्या भूमीला आशीर्वाद आहे.

चंडीपूर समुद्र किनाऱ्यावरून मिसाईल टेस्टींग सेंटरच्या दिशेने कृष्णाने नजर फिरवून ध्यान केले.

नंतर दुसऱ्या दिवशी धामरा येथे जाऊन सर्व महत्त्वाच्या ठिकाणी थांबून, नजर फिरवून ध्यान केले. अनेक ड्यूटी ऑफिसर, शास्त्रज्ञ यांना आशीर्वाद, प्रसाद दिला.

तेथील डिफेन्स कॉलनीच्या कम्युनिटी हॉलमध्ये ताईंचा एक सत्संग पण झाला. ताईंनी कृष्णकुटीर, त्यांचे चाललेले कृष्णकार्य, सध्याच्या काळाला अनुरूप असणारी जी साधना कृष्ण सांगतो ती त्यांना समजावून सांगितली आणि कृष्णानुभव सांगितले.

त्या कम्युनिटी हॉलच्या वॉचमनला कृष्णाने पुढे बोलावून एक फोटो दिला आणि सांगितले की, ''तुझ्या घरात माझे सगळे व्यवस्थित होते. त्या सेवेचा मी स्वीकार करतो.'' हे वॉचमन कुटुंब अत्यंत भाविक असून कॉलनीतील मंदिरातील पूजा-अर्चा करतात.

इथे एकांनी प्रश्न विचारला, 'ताई, ध्यान कसे करायचे?' ताईंनी स्वत:च्या डोक्यावर मध्यभागी हात ठेवून सांगितले, 'इधरसे कॉन्सन्ट्रेट करके एनर्जी रिसिव्ह करना. इसका मतलब ध्यान ही है।'

ह्या तीन दिवसापैकी एके दिवशी सकाळी अकरा वाजेपर्यंत माझे ध्यान आहे. कोणी भेटायला येणार असेल तर त्यांना त्यानंतर बोलवा, असे कृष्णाने सांगितले. त्यांच्याबरोबरचे कृष्णभक्त सकाळी ताईंच्या खोलीत नमस्कारासाठी गेले तर त्यांनी इथेच नाष्टा करू या म्हणून सांगितले. त्यावेळेस ताई त्यांच्या लहानपणच्या अनेक आठवणी सांगत होत्या. त्यांच्या आयुष्यात कित्येक लोकांनी वेळोवेळी कशी मदत केली ते सांगत होत्या. असं करता करता साडेदहा-पावणेअकरा कधी वाजले कळलंच नाही. एकजण म्हणाले, 'ताई, कृष्णाचे ध्यान होते नं आज! आमच्या लक्षातच आले नाही. आम्ही पण आपले गप्पा मारत बसलो.' त्यावर कृष्णाने तत्काळ सांगितले, ''अरे आपल्यासाठी ज्यांनी मदत केली त्यांची आठवण काढणे, त्यांनी केलेल्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हेही माझे ध्यानच आहे. आज ह्या वेळेला ताईंनी ज्यांची ज्यांची आठवण काढली त्या सगळ्यांना ते जेथे जेथे असतील, तेथे त्यांना चांगली गती मिळेल.'' कृष्णाने ध्यानाचा एक नवाच अर्थ उलगडून दाखविला.

ताई तेथून पुढे दिल्लीला गेल्या व बरोबरची भक्त मंडळी पुण्याला परतली. ताई दिल्लीहून लेह-लडाखला जाणार होत्या. ती फ्लाईट दिल्ली-श्रीनगर-लेह आणि परत येताना थेट दिल्ली अशी होती. मात्र ती दिवसाआड होती.

ज्यांनी ताईंची लेह-लडाखमधील व्यवस्था केली होती ते दिल्लीतच होते. ते ताईंना भेटायला हॉटेलवर आले आणि सांगू लागले, 'माँजी मौसम बहोत खराब है। मै हर पंधरह मिनट बाद जानकारी ले रहा हूँ। खराब मौसम की वजहसे ये फ्लाईट कॅन्सल भी हो सकती है।' त्यावर कृष्ण म्हणाला, ''आप चिंता मत करो। कल फ्लाईट उडान लेगी ही। वेदर की जिम्मेदारी मेरी है। आप चिंता नही करना।'' ते एकदम आश्चर्यचकित झाले. हवामानाच्या बाबतीत इतका ठाम विश्वास देणारी व्यक्ती त्यांनी, त्यांच्या पूर्ण नोकरीच्या कालावधीमध्ये पाहिली नव्हती. कृष्ण हवामानाची जबाबदारी घेतो असे जेव्हा म्हणतो तेव्हा काय घडू शकते हे सांगणारे काही अनुभव त्यांना सांगितले. त्यावर त्यांनी फक्त प्रश्नांकित चेहरा केला आणि ताईंना नमस्कार करून ते निघाले.

दुसऱ्या दिवशी सकाळी हवामान एकदम छान होते. स्वच्छ सूर्यप्रकाश सगळीकडे पसरला होता. ताई ठरलेल्या वेळेत दोनतीन कृष्णभक्तांबरोबर लेह-लडाखला जायला निघाल्या. वेळेत ते लेहला पोहोचले. तेथील दृष्य विलोभनीय

होते. आईसकॅप घातलेले उत्तुंग पर्वत एका बाजूला, तर दुसऱ्या बाजूला पूर्ण ओसाड वालुकामय पर्वतरांगा ज्यांच्यावर नजर ठरत नव्हती. दिल्ली विमानतळावर आल्यापासूनच कृष्णाचे सतत ध्यान चालू होते. लेहला विमान उतरत असताना कारण नसताना खडाड खडाड असा काहीसा आवाज आलेला होता.

सर्वजण हॉटेलवर पोहोचले. ताई ध्यानातच होत्या. तेथे पोचल्यावर थोड्या वेळाने ताईंनी सांगितले, 'कृष्ण म्हणतो, मला हॉटेलच्या टेरेसवर जाऊन ध्यान करायचे आहे.' निघाल्यापासून कृष्णाचे अखंड ध्यान चालूच होते. मध्यरात्री कृष्णाने ताईंना सांगितले की, ''ताई, माझे इथले ध्यान झाले. उद्या सकाळी आपण परत जाऊ.'' ताई म्हणाल्या, 'बरं कृष्णा!'

त्यांनी सकाळी बरोबरच्या भक्तांना कृष्णाचा निरोप सांगितला. सगळ्यानां प्रश्न पडला, आजच परत कसे निघणार? परत जाण्यासाठी फ्लाईट तर उद्या आहे. हरकत नाही. चौकशी तर करू, असे ठरवून ते विमानतळावर चौकशीला गेले असता कळले की, आज दिल्लीला जाणारी फ्लाईट आहे. त्यात आश्चर्य करण्यासारखे काय? जशी कृष्णाची इच्छा! काल उतरत असताना जो खडाड असा आवाज झाला होता त्यामागे कृष्णाचीच योजना होती असे म्हणावे लागेल. त्या आवाजामुळे तर श्रीनगरहून टेक्निशियनला बोलवावे लागले आणि लगेच परतणारे विमान रद्द झाले. म्हणून दुसऱ्या दिवशी वेळापत्रकात नसतानाही ताईंसह हे विमान दिल्लीला रवाना झाले. कृष्णाला हवे तसे लडाखचे ध्यान झाले.

त्यानंतर ताई लगेचच जम्मूला गेल्या. प्रथम त्या एअरफोर्स स्टेशनला ध्यानासाठी जाणार होत्या आणि तेथून आर्मी एरियावर नजर फिरवून ध्यान करणार होत्या.

भारतीय जवान किंवा कोणच्याही विंगचे ऑफिसर्स, असे कोणी दिसले की ताईंचा अविर्भाव एकदम बदलायचा. त्या एकदम उल्हासित, प्रफुलित दिसायच्या आणि कडक सॅल्यूट मारूनच त्यांच्या स्वागताचा स्वीकार करायच्या.

ह्या सर्व लोकांना आशीर्वाद द्यायला, खास 'कृष्णऊर्जा' द्यायलाच ताई स्वत: ठिकठिकाणी जात होत्या. त्यातपण वैशिष्ट्य असे की, सर्व ठिकाणचा खर्च, जाणे, येणे, राहणे ताई स्वत:चा स्वत: करायच्या. हिशोबात कोणतीही चालढकल, उन्नीसबीस केलेले त्यांना चालायचे नाही. कृष्ण ताबडतोब समज देऊन योग्य ते पैसे त्या व्यक्तीला द्यायला लावायचा.

जम्मूचे जे स्टेशनकमांडर होते, ते स्वामी योगानंदांचे अनुगृहीत होते. त्यांनी ताईंना आपल्या घरी जेवायला बोलावले होते. गोड म्हणून दूधपाक केला होता. त्या दूधपाकावर हाताने लिहिल्यासारखा ॐ आलेला बघून ते अत्यंत चकित झाले. त्यांना हे सर्व अनुभवून फारच आनंद झाला. या वयात स्वखर्चाने ताई इतक्या लांब, केवळ कृष्णाज्ञा म्हणून तिन्ही दलांच्या जवानांना आशीर्वाद देण्यासाठी कोणतीही अपेक्षा न ठेवता आल्या, याची त्यांना फारच अपूर्वाई वाटली.

दुसऱ्या दिवशी ताई आर्मीच्या लोकांबरोबर महत्त्वाच्या ठिकाणी जाऊन ध्यान करून आल्या. नंतर त्या मुंबईला आल्या. ह्या वेळेस जम्मूत दोन केंद्रं स्थापन झाली.

***

ॐ

ताई बदलापूरला आल्यानंतर कल्याणला आणि ठाण्याला एकेका केंद्राची स्थापना झाली. कृष्णाने आता १ ते ३ नोव्हेंबर २००१ श्रीवर्धन, दिवेआगर आणि हरिहरेश्वर येथे ध्यानासाठी आणि केंद्रस्थापनेसाठी जायचे असा आदेश दिला. भारतभ्रमण करण्याचे वर्ष म्हणजे काय त्याचा अनुभव येत होता. ताई कुठेही जाऊन आल्या की जेमतेम दोनतीन दिवस बदलापूरमध्ये थांबत. तेव्हापण जवळपास केंद्रस्थापनेचा कार्यक्रम असे. नाहीतर गाढ ध्यान किंवा कृष्ण मार्गदर्शन करत असे. ताईंचे सतत ध्यान, केंद्रस्थापना आणि ठिकठिकाणी ध्यानयात्रा असं चालू होते. आपल्या जिवाची पर्वा न करता ताई, कृष्णाज्ञेचे पालन करत होत्या. गुरूची सेवा करणे म्हणजे सर्वार्थाने समर्पण असते, याचा वस्तुपाठच त्या सगळ्या भक्तांना देत होत्या. 'ताई पंधरा वर्षांनंतर तुला कृष्णकुटीर सोडावे लागणार. तुझा आणि कृष्णकुटीरचा आता संबंध राहिला नाही,' ह्या सर्व कृष्णवचनांचा अर्थ आता समजू लागला होता.

ठरल्याप्रमाणे श्रीवर्धनमध्ये तीन ठिकाणी केंद्राची स्थापना झाली. बदलापूरहून निघाल्यापासून ताई अखंड ध्यानातच होत्या. श्रीवर्धन आणि आसपासची सर्व गावे ही समुद्राला लागूनच आहेत. मोठी मोठी घरे, नारळीपोफळीच्या बागा, वाड्या, परसदार ओलांडले की समुद्रकिनारा ताईंना अगदी गोव्यात आल्यासारखे वाटत होते. समुद्राकडे नजर लावून त्यांचे सतत ध्यान चालू होते.

बदलापूरहून निघताना कृष्णाने सांगितले होते, की शेटवाडीला ध्यानाला जायचे आहे. शेटवाडी म्हणजे मार्च ९३मधील बॉम्बस्फोटांमध्ये जे आरडीएक्स वापरले गेले होते ते ह्या किनाऱ्यावर उतरवले गेले होते. इथला कोळीसमाज अत्यंत गरीब. इथे नेहमीच जकात चुकवलेला, स्मगल्ड माल ह्या खडकाळ किनाऱ्यावर उतरवला जातो. ह्या लोकांना आपण आरडीएक्स उतरवून घेत आहोत याची कल्पनाच नव्हती. ह्या किनाऱ्यावर मोठी भिंत बांधलेली आहे. आजूबाजूला अत्यंत खडकाळ भाग आहे. आम्ही गेलो तेव्हा ओहोटी होती. पाणी खूपच आतवर गेले होते. बघता बघता ताई आवेशाने पुढे गेल्या. आतपर्यंत जाऊन तेथे उभे राहून ताईंनी ध्यान केले.

दांडाकोळीवस्तीच्या जवळच्या शंभर वर्षांपूर्वीच्या नारायणाच्या मंदिरात ताई गेल्या. तेथे खरंतर गाभाऱ्यात कोणालाच जाऊ देत नाहीत. कसे कोण जाणे त्या गुरुजीनी ताईंना मात्र सांगितले, 'आईसाहेब, आपण आत आलात तरी चालेल.' त्याप्रमाणे ताई आत जाऊन ध्यान करून आल्या आणि सर्व कृष्णभक्तांतर्फे दुसऱ्या दिवशी त्या गुरुजीना पवमान अभिषेक करायला सांगितला. तेथून सरळ हरिहरेश्वरला जाऊन दर्शन घेऊन थोडा वेळ ध्यान, अभिषेक करून ताई बदलापूरला आल्या.

तेथून आल्याआल्या अंबरनाथला दोन केंद्रांची स्थापना करून ताई पुढे रत्नागिरी, कुडाळ आणि गोव्याला केंद्रस्थापनेसाठी, ध्यानासाठी आणि मडकईला नवदुर्गेच्या आणि मंगेशाच्या दर्शनासाठी गेल्या.

त्यावेळेस ताईंनी विचार केला की विश्वजननीची मूर्ती घडवणाऱ्या मूर्तिकाराला भेटून यावे. कशी घडवतो आहे मूर्ती ते बघून यावे. त्याप्रमाणे ताई गोव्यात पोहोचल्यावर जेव्हा ध्यान करत होत्या तेव्हा कृष्णाला त्यांनी विचारले, 'कृष्णा, आपण उद्या कारकोलला जाऊन त्या मूर्तिकाराला भेटून येऊ या नं?' ''अग ताई, तुला त्यातलं काय कळतंय. मूर्तिकार मूर्ती घडवतो आहे. ते बघण्याची जबाबदारी माझ्या एका भक्तावर मी दिली आहे, असं असताना तू तेथे जायची गरजच काय? तू कशाला लुडबुड करतेस?'' ताई सांगत होत्या, 'ह्यावर मी काय बोलणार?' म्हणून पुढे मूर्तिकाराकडे जायचा प्रोग्रॅम रद्दच केला. अशा होत्या ताई, कृष्णाच्या अर्ध्या वचनात राहणाऱ्या! त्याचे आदेश सतत पाळणाऱ्या. एकदा त्याने नाही सांगितल्यावर तेथेच थांबणाऱ्या.

ताई शांतपणे मंगेशीच्या देवळात आणि नवदुर्गेच्या देवळात जाऊन कृष्णाने सांगितल्याप्रमाणे पूजाअर्चा आणि ध्यान करून बदलापूरला परतल्या.

कृष्णाने आता बडोद्याला एक केंद्र करून पुढे द्वारका, सोमनाथ असे ध्यानाला जाऊन यायचे असे सांगितले. ताई आणि बत्तीस-तेहेतीस भक्त असे ह्या ध्यानयात्रेला निघाले. कृष्णाने ह्यावेळेस मी साक्षात तुमच्या सर्वांच्या बरोबर असणार; आणि त्याची प्रचिती तुम्हास येणार असे सांगितले होते.

बडोद्याच्या केंद्रस्थापनेनंतर डाकोरनाथाचे दर्शन आणि प्रभासपट्टण येथे असलेले भालकातीर्थ, जेथे कृष्णाने आपला देह ठेवला ते पाहून सर्वजण सोमनाथला पोहोचले. दुसऱ्या दिवशी सर्वांतर्फे अभिषेक, पूजा करणार होते. तेव्हा ताईंनी पूजेचा संकल्प करताना भारत देशाची भरभराट, युवापिढीचे तेजोवर्धन आणि सर्व कृष्णभक्तांच्या कल्याणाचा संकल्प कृष्णाज्ञेनुसार केला. गुरुजींनी गोत्र विचारताच 'कृष्णभक्त' असे

सांगितले. प्रथम तीन दांपत्ये आणि ताई अशा सात जणांनी अभिषेक केला. नंतर ताई मंदिरात एके ठिकाणी ध्यानस्थ झाल्या. आज कृष्णाने त्यांना कर्पूर होम करत ध्यान करायला सांगितले होते.

द्वारकेला द्वारकाधीशाच्या मंदिरातील पादुकापूजनाचा सोहळा तर वर्णनातीत झाला. हातभर लांबीच्या सुवर्ण पादुका मंदिराच्या प्रांगणात भरजरी वस्त्रावर ठेवण्यात आल्या होत्या. त्यावर समंत्रक १००८ चांदीच्या तुळशीपत्रांचा अभिषेक करून ताज्या तुळशीचा हार अर्पण केला होता. तेथे कृष्णाने त्याचा आवडता आणि इच्छापूर्ती करणारा आम्ररस प्रसाद म्हणून वाटण्यास सांगितले. मंदिरात आलेल्या प्रत्येकाला पूजा अभिषेक करता आला आणि प्रसादाचा लाभ घेता आला. ज्या चांदीच्या तुळशीपत्रांनी अभिषेक केला होता, ती चांदीची तुळशीपत्रे अमेरिकेतील विश्वजननी प्रतिष्ठापना सोहळ्यासाठी ताई घेऊन जाणार होत्या.

त्याच मंदिराच्या प्रांगणात ताईंची डाळ तांदूळाने तुला करण्यात आली. कृष्णाने ताईंची तुला करायला परवानगी देऊन सर्व कृष्णभक्तांच्या इच्छेचा जणू गौरवच केला. सर्व कृष्णभक्तांसाठी, यंग जनरेशनसाठी आणि भारताच्या कल्याणासाठी असा संकल्प तेव्हा केला होता. तेथे काही कृष्णभक्तांना ताईंच्या डोक्यामागे जवळ जवळ हातभर रुंद अशा तेजोवलयाचे दर्शन झाले.

बेट द्वारकेचे दर्शन घेऊन सर्व मंडळी राजकोटकडे निघाली. ताई राजकोटला उतरून पुढे लखनौ, जयपूर, जैसलमेर अशा जाणार होत्या व बाकी मंडळी अहमदाबाद-मार्गे पुण्याला परतणार होती.

ताई मथुरा, अलाहाबाद येथे ध्यान करून लखनौला गेल्या. तेथे त्यांना युवाशक्तीसाठी लखनौच्या आयआयएमच्या परिसरात जाऊन ध्यान करायचे होते. त्याप्रमाणे आयआयएमच्या परिसरात त्यांचे ध्यान झाले. तेथून सर्वजण जयपूरमध्ये आले. तेथेही ठिकठिकाणी ताईंचे नजर फिरवून ध्यान चालू होते. तेथून पुढे जैसलमेरमध्ये जाऊन भारतीय हद्दीतील जे शेवटचे गाव 'तनोद' येथेही ध्यान करायचे होते.

जैसलमेर - किशनगढ - तनोद असा सुमारे तीस ते चाळीस किमीचा अतिशय सरळ सरळ रस्ता. पूर्ण वालुकामय प्रदेश. जेथे जेथे आर्मीचे बेस कॅम्प होते, तेथे तेथे नजर फिरवून ताईंनी ध्यान केले. जाताना वाटेत पोखरण लागले. तेथेही ध्यान झाले. ठिकठिकाणी कृष्ण सांगेल तेथे थांबून ताई कधी उभ्याने, तर कधी बसून ध्यान करत होत्या. पोखरणवरून ताई थोड्याशा पुढे गेल्या, अचानक गाडीचे टायर वाळूत फसले

आणि गाडी पुढे जाईचना. ड्रायव्हरने बराच प्रयत्न केला, पण काही उपयोग झाला नाही. शेवटी कृष्णाने ड्रायव्हरला सांगितले की तू आता इथेच थांब, आम्ही पायी पायी दहा-पंधरा मिनिटे आजूबाजूला फिरून येतो. तेथे नजर फिरवून कृष्णाने ध्यान केले. परत आल्या व ड्रायव्हरला सांगितले, आता परत गाडी चालू करण्याचा प्रयत्न कर. काय आश्चर्य! गाडी थोड्याच वेळात चालू होऊन पुढे निघाली. ताईंचे दिवसरात्र ध्यान चालू होते. चेहरा अत्यंत तेजस्वी झालेला होता. त्या सर्व परिसरात, डाव्या उजव्या बाजूला आर्मी, एअर फोर्सच्या जवानांचे कवायती, ट्रायल्स असे सतत काहीतरी चाललेले दिसत होते. युद्धापूर्वीच्या फिटनेस योजनांची आखणी चाललेली असावी. कृष्ण म्हणाला, ''हे सगळे जरी करावे लागत असले, तरी युद्ध मात्र होणार नाही. त्याचप्रमाणे पुढे घडले.''

असे करत करत ताई आणि बरोबरचे भक्त तनोद गावापर्यंत पोहोचले. हे बॉर्डरवरचे शेवटचे गाव. बॉर्डरला असलेले तारेच्या गुंडाळीचे कुंपण दिसत होते. त्याच्या पलीकडे No Man's Land आणि त्यापुढे पाकिस्तानची बॉर्डर. तेथे त्या टोकापर्यंत (आपल्या हद्दीत) जाऊन ताईंना ध्यान करायचे होते. त्याप्रमाणे ताई पुढे गेल्या. तेथे बॉर्डरनजीक एक देवीचे देऊळ आहे. आपली जशी सप्तश्रृंगी आहे, तसेच काहीसे रूप असलेल्या देवीचे मंदिर. तेथील पुजारी सांगत होते, ही देवी ह्या परिसराची रक्षणकर्ती आहे. १९४७ पासून ह्या गावावर कितीदातरी बॉम्ब फेकले गेले. मशिनगनच्या फैरी झडलेल्या आहेत. प्रचंड नुकसान झाले आहे, पण ह्या मंदिराचे मात्र कधीही कसलेही नुकसान झालेले नाही. दुरुस्तीची गरज कधी भासली नाही. करावी लागलीच तर फक्त रंगरंगोटी करतो.

त्या मंदिराच्या गर्भगृहात ताई ध्यानासाठी बसल्या. ताई सांगत होत्या, ध्यानात देवी आणि कृष्ण यांचा संवाद चालू होता. देवी सांगत होती, ''कृष्णा, तू आलास खूप आनंद झाला. आज मला तुझं काहीतरी वस्त्र दे नं.'' तेथे देण्याजोगे वस्त्र म्हणजे, यंग जनरेशनसाठी ताईंना सतत गळ्यात बांधायला सांगितलेला स्कार्फ तेवढा होता. पण तो कसा देणार? ताईंनी गळ्यात घातलेला स्कार्फ पुजारी देवीला कसा घालणार? ताईंचा काही धीर होत नव्हता. शेवटी मनाचा हिय्या करून ताईंनी आपल्या गळ्यातला स्कार्फ काढून त्या पुजाऱ्याकडे देऊन त्यांना विचारले की 'आपण हा देवीला अर्पण कराल का?' पुजाऱ्यांनी क्षणभर ताईंकडे पाहिले. स्कार्फ हातात घेऊन देवीच्या गळ्याभोवती घातला. जणू ताईंच्या रूपात त्यांना देवीने दर्शन देऊन संकेत दिला, की तो माझ्या गळ्यात घाल.

डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात अहमदाबादचे केंद्र स्थापन करायचे असे कृष्णाने सांगितले. बडोद्याच्या केंद्राच्या वेळेस अहमदाबादच्या अनिरुद्ध मावळणकर यांना कृष्णाने विचारले, ''तुझ्याकडे केंद्र काढायचे आहे. चालेल का?'' त्यांना ताई, त्यांचे कार्य याबद्दल काहीच माहिती नव्हती. त्यामुळे त्यांनी काहीच उत्तर दिले नाही. ते नमस्कारासाठी वाकले. ताईंच्या पायावर डोके ठेवताक्षणी विजेसारखी एक लहर सर्व अंगात चमकून गेल्याची जाणीव मात्र त्यांना झाली. घरी गेल्यावर, त्यांनी घरातल्यांशी चर्चा करून ताईंना 'केंद्र करू या' म्हणून कळवले. कोणाकडून कशी सेवा करून घ्यायची हे कृष्णच ठरवतो हेच खरे. कारण काहींच्या बाबतीत दोनदोन वर्षे मागणी करूनसुद्धा त्यांना केंद्र करायला कृष्णाने परवानगी दिलेली नाही असंही झाले आहे.

त्यांना चोवीस तारखेच्या दत्तजयंतीच्या दिवशी केंद्र स्थापन व्हावे असे वाटत होते. परंतु कृष्णाने तारीख दिली होती २७ डिसेंबर. चोवीस-पंचवीसच्या रात्री त्यांना एक विलक्षण अनुभव आला. ते झोपले की ॐच्या आकारात संपूर्ण ब्रह्मांड डोळ्यासमोर येत असे. त्यातून एकदा ॐ आणि एकदा श्री असे थ्रीडीमध्ये सतत फिरत होते. थांबायलाच तयार नाहीत. शेवटी ते थकले आणि प्रार्थना केली, 'कृपा करून हे सर्व काही थांबवा.' तेव्हा ते थांबले. केंद्रस्थापनेनंतर जेव्हा ही गोष्ट ताईंना सांगितली तेव्हा त्या हसल्या आणि त्यांच्या एका हातावर असलेला ॐकार आणि दुसऱ्या हातावर असलेली श्री दाखविली.

तेथून ताई मुंबईला येऊन माहीमला एक केंद्र स्थापन करून बदलापूरला परत आल्या.

एकतीस डिसेंबर वर्षाचा अखेरचा दिवस. हे पूर्ण वर्ष ताईंचे सतत ध्यान आणि अविश्रांत भ्रमंती चालू होती. आपल्या भक्तांसाठी, युवापिढीसाठी, भारतासाठी, विश्वकल्याण आणि विश्वशांतीसाठी त्यांची ही दगदग चालू होती.

कृष्णाने आजपण नवीन वर्षासाठी म्हणून संदेश दिला.

- प्रत्येकाने केंद्रात जाणे आवश्यक आहे. स्वत:साठी, कुटुंबासाठी, भारतासाठी आणि विश्वासाठी.
- केंद्रात येणाऱ्या प्रत्येक भक्ताचा भार मी वाहतो, काळजी घेतो. केंद्रात जे जातात त्यांनाच मी मार्गदर्शन करेन. केंद्रात जाणे ही माझी सेवा म्हणून करा.

- येणाऱ्या २००२ साली 'अकरा' ह्या आकड्याला फारच महत्त्व आहे. प्रसाद कोणताही असावा, तो अकराच्या संख्येत असावा. फळ, पदार्थ एकच असेल तरी चालेल, पण त्याचे अकरा भाग करा व ते मला अर्पण करा.
- पुन्हा एकदा सांगतो, केंद्रात येणाऱ्या माझ्या सर्व भक्तांची सर्व जबाबदारी माझीच. त्यांना कधीही कशाचाही पश्चाताप करावा लागणार नाही. सर्वांच्या बरोबर मी वावरतो, मात्र त्यासाठी माझ्यावर पूर्ण श्रद्धा ठेवा.

आता कृष्णाला कोचीनला नेव्हीच्या बेस कॅंपवर जाऊन ध्यान करायचे होते. ताई ध्यानासाठी ज्यांच्याकडे गेल्या होत्या ते एकदम नास्तिक गृहस्थ होते. देव वगैरे न मानणारे. साधू, साधक ह्यांच्यावर अजिबात विश्वास नसलेले. ताई तेथे गेल्यावर त्यांनी त्यांच्या अनेक शंका-कुशंका ताईंना विचारल्या. तुमचा इथे येण्याचा उद्देश काय? असाही त्यांचा प्रश्न होता. 'काहीही नाही. कृष्णाने सांगितले. मी आले. या परिसराची सकारात्मक ऊर्जा वाढावी म्हणून मी आशीर्वाद द्यायला आले.' ताईंचे काहीही आडपडदा न ठेवता इतके सरळ दिलेले उत्तर ऐकून त्या गृहस्थांना हा प्रकार काही वेगळा आहे हे जाणवते. त्यांनी पुढे विचारले, 'तुमच्या मते देवाची पूजा-सेवा कशी करावी?' ''अरे, तू जे काम करतोस, तेच नेकीने, पूर्ण एकचित्त होऊन करणे हीच माझी खरी पूजा आहे. त्याचाच मी सेवा म्हणून स्वीकार करतो. त्यासाठी तासन्तास नाक धरून माझ्यासमोर बसण्याची किंवा न झेपणारी व्रतवैकल्ये करण्याची गरज नाही. भुकेल्याला दोन घास अन्न देणे, दुसऱ्याच्या आनंदात आनंद मानणे, समोर येणाऱ्या प्रत्येकाशी माणुसकीने वागणे हीच खरी देवपूजा आहे. माणुसकीचा धर्म हाच खरा धर्म. त्यातूनच विश्वशांती आणि विश्वकल्याण साधेल.''

हे सगळे ऐकल्यावर ताईंच्या शुद्ध निर्मळ हेतूविषयी त्यांची खात्री पटली. ते स्वत: परवानगी काढून ताईंना महत्त्वाच्या ठिकाणी ध्यानासाठी घेऊन गेले. त्यांच्या शिपवर जाऊनदेखील ताई ध्यान करून आल्या. ह्या बेसकॅंपमध्ये खूप बदल होतील आणि भविष्यकाळात ह्या कॅंपचे महत्त्व खूप वाढणार, असेही त्यांनी सांगितले.

इथेच असताना ध्यानात ताईंच्या मस्तकावर खोलवर खड्ड्यासारखा भाग तयार झाला होता. त्यावर गुलाबपाण्याचा अभिषेक करण्यास कृष्णाने सांगितले. ते अभिषेकाचे दोन पेले पाणी त्या खड्ड्यात सहज जिरले. एवढासुद्धा ओघळ ताईंच्या मानेवर आला नाही.

नंतर बेंगलोर येथे दोन-तीन भक्तांकडे ध्यानाला जाऊन, हुबळीला एका केंद्राची स्थापना करून ताई बदलापूरला आल्या.

कृष्णाने एका भक्ताला सांगितले, ''मला तीन दिवस अज्ञात ठिकाणी ध्यानासाठी जायचे आहे. ठिकाण तूच शोध, पण मला जनसंपर्क नको आहे. ध्यान करता येईल अशी जागा ठरव आणि तुझे मात्र सगळे कुटुंब बरोबर असू देत. ताई आणि ते कुटुंब २८ ते ३० एप्रिल २००२ कोकणात समुद्रकिनारी 'कर्दे' ह्या गावी ध्यानासाठी गेले. कृष्णानी जातानाच सांगितले होते, ''ताई, माझ्या एका भक्तासाठी सप्तशतीचा पाठ करायला हवा आहे. तू ध्यान कर आणि बरोबर असलेल्या भक्ताला पाठ करायला सांग.'' त्याप्रमाणे तेथे ताईंचे सतत ध्यान चालू होते आणि सप्तशतीचा पाठ पण केला.

ताईंनी बरोबर भगवद्‌गीता नेली होती. त्यावर फुलांचा अभिषेक करायच्या आणि बाहेर फिरून ध्यान करताना ही अभिषेकाची फुले जेथे तेथे टाकायच्या.

हुबळीला सिद्धारूढस्वामींची समाधी आहे. तेथे ताई दर्शनाला गेल्या होत्या. समाधिजवळ गेल्यावर कृष्ण ताईंना म्हणाला, ''ताई, तुझे पण असेच होणार.'' बरोबरचे भक्त म्हणू लागले की, 'कृष्णा काय हे, असं काय म्हणतोस? आत्ता तर जगज्जननीच्या कामाची सुरुवात होतेय!' त्यावर ताई नुसतंच हसल्या आणि नेहमीप्रमाणे स्वत:च्या डोक्यावरून हात फिरवला.

''ताई, भक्त प्रल्हादाचा ह्या युगातला अवतार असे राघवेंद्रस्वामी. त्यांच्या दर्शनाला जायचे आहे,'' असे कृष्णाने सांगितले. स्वामी आणि ताई, काहीतरी अतूट सबंध आहे. दोघेही नारायणभक्त हे तर आहेच. कृष्णकुटीरच्या भूमिपूजनाच्या वेळेस पण स्वामींच्या समाधीवर चांदीची तुळशीपत्रे लावून आणून त्याने तेथले भूमिपूजन केले होते. विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर हे सकल संतकोश तयार करत होते. बदलापूरला दर्शनाला आले होते. कृष्णाने तेव्हा सर्व कृष्णभक्तांतर्फे पैसे देऊन राघवेंद्रस्वामींची माहिती त्या कोशात घालायला सांगितली होती. जगज्जननीच्या प्रतिष्ठापनेच्या आधी कृष्ण ताईंना राघवेंद्रस्वामींच्या भेटीला जायला सांगत होता. त्याप्रमाणे काही कृष्णभक्त आणि ताई मंत्रालयाला पोहोचले. तेथील वातावरण म्हणजे एकदम कानडी वळणाचे. अत्यंत कर्मठ, कडक सोवळे-ओवळे, सर्वच कडक धार्मिक आचार पाळणारे.

तेथे स्वामींचे मंदिर आणि आत समाधीचे वृंदावन आहे. तेथपर्यंत कोणीच जाऊ शकत नाहीत. बायका तर अजिबातच नाही. तेथे गेल्यावर सकाळी कृष्णाने

सांगितले, ‘‘आपण आधी नाष्टा करू आणि मग दर्शनाला जाऊ.’’ बरोबरीच्या भक्तांना वाटले असे कसे जायचे. उशीर होईल. मंदिर पण बंद करतात. पण कृष्णच म्हणतोय म्हणून सर्वजण नाष्टा करायला गेले. तेथून आले तर मंदिर बंद झाले होते. तेवढ्यात कृष्ण म्हणाला, ‘‘परत नका जाऊ, एक प्रदक्षिणा घाला.’’ म्हणून ही सर्व मंडळी प्रदक्षिणा (बाहेरून) घालू लागली. तेवढ्यात मंदिरातला एक माणूस ताईंच्या भक्तगणांमधील एका व्यक्तीस (ज्याच्याशी त्यांची थोडी ओळख होती) म्हणाला, ‘काका, तुम्ही लोक येथे काय करता?’ ‘प्रदक्षिणा घालतो. मंदिर बंद झाले नं।’ जरा वैतागूनच त्या गृहस्थांनी सांगितले ‘असं करा, ह्या दाराने आत या’ असं म्हणून त्या गृहस्थांनी कमरेच्या चावीने दरवाजा उघडला, या सर्वांना आत घेतले व समाधीसमोर बसवले. आता कृष्ण म्हणाला, ‘‘मला समाधीजवळ जाऊन ध्यान करायचे आहे आणि ही तुळशीपत्रे पण समाधीला लावून आणायची आहेत.’’ ते काका अतिशय अस्वस्थ झाले, कारण एखाद्या स्त्रीला वृंदावनाजवळ जायला मिळणे केवळ अशक्य. तसा विचारही मनात आणणे पाप समजतात. मात्र कृष्णाचे हे वाक्य पुरे व्हायच्या आत ते पुजारी आले आणि ताईंना म्हणू लागले, ‘आईसाहेब, तुम्ही अशा आत जाऊन बसा. तेथे ध्यान केलेत तरी चालेल.’ आता बाकी सर्व मंडळी आश्चर्यचकित झाली. पण कृष्णाचे काम झाले होते. ताईंचे ध्यान झाले. तुळशीपत्रे पण समाधीला लावून आणली गेली. एकतर बुद्धिदाता मी आहे हे कृष्णाचं वचन आणि ताईंच्या रूपात साक्षात नारायण वावरतात. त्यांचीच ओळख पटून त्या पुजाऱ्याने ताईंना आत समाधीजवळ नेले असावे. पुजाऱ्याचे भाग्य थोर!

***

# ॐ

आता ताईंचे सर्व लक्ष विश्वजननीच्या होणाऱ्या प्रतिष्ठापनेकडे लागले होते. अजून लॉस ऐंजेलिसमध्ये मंदिराच्या जागेचे काहीही ठरत नव्हते. त्याच्यासाठी सतत तिकडच्या लोकांचे फोन येत होते. अनेकजण देवीसाठी नेण्याच्या वस्तू आणून देऊ इच्छित होते. त्यांचेही सतत फोन चालू होते. ध्यानाच्या वेळा पण वाढल्या होत्या. ताई सतत ध्यानात असत. तेव्हा विश्वजननीची स्थापना होणे अत्यंत गरजेचे का आहे, हे कृष्णाने सांगितले.

''आजपर्यंत योगेश्वराची प्रार्थना झाली. आता त्याच्या जोडीला शक्तीची आराधना होणे हे अत्यंत आवश्यक आहे. संपूर्ण विश्वकार्यासाठी, विश्वशांतीसाठी, अर्थात साऱ्या विश्वाचा सांभाळ करण्यासाठी शिव आणि शक्ती ह्या दोघांचीही आराधना होणे अत्यंत आवश्यक आहे. आजच्या काळात ऋषिमुनींप्रमाणे कठोर तपश्चर्या करणे कोणासही शक्य नाही. म्हणून विश्वजननीची मूर्ती स्थापन करणे आणि तिची भरपूर आराधना करणे हे तपश्चर्येसारखेच महत्त्वाचे आहे.

शिवशक्तीच्या आराधनेची ही जी गरज आज निर्माण झाली आहे त्या गरजेलाच मी 'विश्वजननी' असे मानतो. आराधना म्हणजे तरी काय? तुमच्यात असलेल्या ॐकाराला आणि शक्तीला जागृत करणे. त्यासाठी मी विश्वजननीमंदिराची योजना केली.

आपल्या ऋषिमुनींनी मानवकल्याणासाठी जी तपश्चर्या केली, काम केले ते काळाच्या ओघात तेथेच थांबले. आत्ताच्या काळाला अनुसरून ते काम चालू करावे लागणार. यालाच कार्य म्हणतात. ह्या कार्याचाच एक भाग म्हणून विश्वजननीची प्रतिष्ठापना करायची असे माझ्या एका भक्ताला फार वाटत होते. तेव्हा त्याची ती इच्छा पूर्ण झाली नाही. म्हणून त्याच्या इच्छापूर्ततेसाठी पहिली स्थापना अमेरिकेत लॉस ऐंजेलीस येथे करण्याचे ठरविले.''

त्यासाठी देवीला प्रार्थना करण्यासाठी ताई मडकईला गेल्या होत्या. गुरुजींनी देवीला पाकळी लावून कौल मागितला. कौल होता नऊ ठिकाणी देवीस्थापनेसाठीचा. किती वेळ झाला कौल काही मिळेना. सगळेच अस्वस्थ झाले. ताई, गुरुजी, मनापासून देवीची आळवणी करत होते. पण काही उपयोग होत नव्हता. अचानक ताई कृष्णभावात

जाऊन पुढे गेल्या आणि सांगू लागल्या, ''अरे, तिला नका विचारू. मी सांगतो. प्रथम एलएला स्थापना करायची ती तारीख ७ ऑक्टोबर २००२ आणि दुसरी भारतात दिल्लीला करायची. तीसुद्धा मिलिटरी एरियातच. बाकीच्यांचे नंतर सांगेन.'' या दोन स्थापनानंतर कृष्णाची काही वेगळीच योजना होती.

त्यानंतर कारकोळ येथील प्रख्यात मूर्तिकार श्री. राधा माधव शेणवी ह्यांना मूर्ती घडविण्यासाठी सांगितले. मडकईला येऊन मंदिरात देवीची प्रार्थना करून तिचे रूप सर्व बारकाव्यासहित डोळ्यात साठवून त्यांनी कामाला सुरुवात केली.

ताई जुलैमध्ये अमेरिकेला गेल्या. तोपर्यंत मूर्ती कोणत्या मंदिरात, कोठे स्थापन करायची हे अजिबात ठरत नव्हते. तेथील भक्तांचा जागेचा शोध चालू होता. आता प्रत्यक्ष ताई तेथे आल्याने ह्या कामाला गती आली. काही भक्तांनी आमच्या घरी मूर्ती बसविली तरी चालेल असे ताईंना सांगितले. पण त्यावर ताई म्हणाल्या, 'कृष्ण म्हणतो' असे नाही होणार, कारण मला ते मंदिरासारखेच व्हायला पाहिजे आहे. कधीही कोणीही तेथे दर्शनाला, आराधनेला येऊ शकेल अशीच जागा पाहिजे. हे घरी होणार नाही. त्यामुळे एखादे मंदिरच बघा.''

लॉस एंजेलिसमध्ये श्री. उनियाळ यांच्या आउटहाऊसमध्ये श्री दुर्गादेवीचे मंदिर होते. ते देवीचे उपासक होते. त्यांच्या मंदिरात गणपती, दुर्गादेवी आणि श्रीयंत्राची प्रतिष्ठापना केलेली होती. ते त्याची शास्त्रोक्त पद्धतीने पूजा अर्चा करत असत. त्यांना विश्वजननीची तेथे स्थापना करू शकू का असे विचारायचे ठरले. त्याप्रमाणे काही भक्त जाऊन त्यांना भेटले. त्यांना ताईंचे कार्य, कृष्णकार्य ह्या सर्वांची कल्पना दिली. आता कृष्णाने विश्वजननीची प्रतिष्ठापना करायला सांगितले आहे व त्यासाठी आम्ही जागा शोधत असल्याचे सांगितले. त्यांनी स्वत:बद्दल माहिती सांगून इथे देवीची स्थापना केलीत तरी चालेल असे सांगितले. आम्ही ह्या देवीचीदेखील पूर्जा-अर्चा, आराधना सर्व काही शास्त्रोक्त पद्धतीने करू असे आश्वासनही दिले.

ताईंना ही गोष्ट कळविल्यावर दोन दिवसांसाठी ताई न्यूयॉर्कहून 'लॉस एंजेलिसला' येऊन उनीयाळ यांना भेटल्या. ताईंनी ह्या जागेसाठी कृष्णाची संमती आहे व तुम्ही सर्वजण आता सात ऑक्टोबरच्या कार्यक्रमाच्या तयारीला लागा असे सांगितले.

उनीयाळ जेव्हा अठरा वर्षापूर्वी भारतात आले होते तेव्हा त्यांनी आपल्या गुरूंना अमेरिकेत येण्याची प्रार्थना केली होती. तेव्हा त्या म्हणाल्या होत्या, 'अरे, मला नाही येता येणार. मात्र १८ वर्षानंतर भारतातून एक संत स्वरूप महिला तुझ्याकडे येणार

आहेत. ताईंना भेटल्यावर उनीयाळ यांना हा संवाद आठवला. दुसऱ्या दिवशी उनीयाळ सांगत होते, 'तुम्ही भेटून गेल्यावर मला रात्री स्वप्न पडले. त्यात एक परकर पोलके घातलेली मुलगी माझ्याकडे आली आणि मला अठरा वर्षांपूर्वीचा माझा आणि माझ्या गुरूंचा संवाद आठवला. मला त्या संवादाची खूणगाठ पटली की, त्या संतस्वरूप महिला म्हणजेच प. पू. ताई. म्हणून मी लगेच विश्वजननीच्या मूर्तिस्थापनेस होकार दिला. मात्र आता माझी एकच प्रार्थना आहे की नवरात्रीचे नऊही दिवस प. पू. ताईंनी मंदिरात आराधनेसाठी यायला हवे.' बहुधा त्यांना पण कृष्णाच्या-ताईच्या सहवासाचा मोह सोडवत नव्हता हेच खरं.

विश्वजननीच्या स्थापनेकरिता भारतातील कृष्णभक्तांना काही ना काही सहभाग हवा होता. प्रत्येकाने आपापल्या परीने वस्तू वा सेवा देऊ केली होती. मंगळसूत्र, तुलसीहार, चाफ्याची वेणी, मखर, छत्र, बांगड्या, पैजण, कमरपट्टा, नथ, नऊही दिवसांसाठी गर्भरेशमी अशा वेगवेगळ्या रंगाच्या साड्या. प्रसादासाठी अनेक कोरड्या वस्तू, निरनिराळी अत्तरे, अष्टगंध, धूप, दिवे असे पूजासाहित्य. त्याचप्रमाणे आलेल्या भक्तांना प्रसाद म्हणून द्यायच्या नवदुर्गेच्या प्रतिमा, लॉकेट्स, फोटो अशा असंख्य वस्तू गोळा झाल्या होत्या. द्वारकाधीशाच्या पायावर घालून आणलेली आणि राघवेंद्रस्वामींच्या समाधीवर ठेवून आणलेली बाराशे चांदीची तुळशीपत्रे अशी सर्व जय्यत तयारी झाली. मूर्तिकारांचा निरोप पण आला, की माझे काम पूर्ण झाले आहे. तुम्ही मूर्ती न्यायला कधीही येऊ शकता. तेथून मूर्ती मुंबईत आणून अमेरिकेला पाठवायची होती.

मूर्ती पाठवायची कशी? विमानाने पाठवायची तर ते फारच खर्चिक काम. मूर्ती काळ्या पाषाणाची आणि साडेतीन फूट उंचीची असल्याने वजन भरपूर होते. का जहाजातून पाठवायची? कृष्णभक्तांची पै अन् पै अत्यंत योग्य जागी खर्च व्हायला पाहिजे. भक्तांनी मला प्रेमाने दिलेली कोणतीच गोष्ट वाया जाता कामा नये असा कृष्णाचा कटाक्ष होता आणि ताई तो जिवापलीकडे सांभाळत. त्यामुळे मूर्ती समुद्रमार्गेच पाठवावी असं ठरलं. कृष्णाचा आदेश आला, ''माझे भक्तसुद्धा विमानाने येतात तर साक्षात विश्वजननीला समुद्रमार्गे इतका प्रवास का करायला लावता. तिला विमानानेच घेऊन या.''

गोव्याहून मूर्ती घेऊन गायतोंडेकाका मुंबईला निघाले. गाडीत मागच्या सीटवर मूर्तीचा लंबाचौडा लाकडी बॉक्स ठेवला होता. ठाण्याच्या क्रीक ब्रीज येथे पोहोचेपर्यंत रात्र झाली होती. तेथे होते चेक पोस्ट. तेथे गाड्या थांबवून चेकिंग चालले होते. त्यावेळी त्यांच्या लक्षात आले की, आपण मूर्ती तर घेऊन निघालो, मात्र तिचे बिल,

तयार केल्याचे सर्टीफिकेट हे काहीच आणले नाही. आणि त्यांना ब्रह्मांड आठवले. जवळ काहीच कागदपत्रे नसताना तो बॉक्स सहीसलामत चेक पोस्टवरून बाहेर काढणे अवघडच वाटत होते. शेवटी त्यांनी कृष्णाला प्रार्थना केली, 'अरे तुझेच काम आहे. तूच आता सांभाळ. मूर्तीसंबंधी कोणतीच कागदपत्रे न घेता निघालो, चूकच झाली. माफ कर आणि सांभाळून घे.' असे म्हणे म्हणेपर्यंत गाडी चेक पोस्टपर्यंत आली. चेकींगसाठी थांबवली. त्या माणसाने गाडीत टॉर्च मारला आणि म्हणाला, 'जाने दो,' बॉक्स कसला, किती वजनाचा, आत काय आहे काहीसुद्धा चौकशी नाही की कागदपत्राची मागणी नाही. जणू त्याला तो दिसलाच नाही. कृष्णकृपाच ही!

मुंबईहून गोव्यात परतल्यावर मात्र मूर्तीसंबंधी सर्व कागदपत्रे ताबडतोब नारकरकाकांकडे पाठवून दिली.

कृष्णाकडून मूर्ती विमानाने पाठवायला परवानगी मिळाल्यावर, काका कृष्णाला प्रार्थना करून एका एजंटाला भेटायला गेले. जाताना बरोबर 'श्रीकृष्णलीलावली' पुस्तकाची एक प्रत घेऊन गेले. त्या माणसाला ताईंबद्दलची सगळी माहिती सांगून, श्रीकृष्णलीलावली पुस्तक दिले. आता कृष्णाच्या आदेशाप्रमाणे विश्वजननीच्या या मूर्तीची स्थापना 'लॉस ऐंजेलिस' होणार असल्याचे सांगितले. त्यावर तो म्हणाला, 'तुम्ही दोन दिवसांनी या म्हणजे कधी पाठवता येईल, एअर फ्रेट किती होईल ते सर्व सांगतो. पुढे फक्त एक वाक्य बोलला की हे सर्व मी सेवा म्हणून करेन.'

काकांनी दोन दिवसांनी फोन केला. त्याने जे काही सांगितले, त्यावर काकांचा विश्वास बसेना. आपण काही चुकीचे तर ऐकत नाही ना असेच त्यांना वाटले. समुद्रमार्गे मूर्ती पाठविली असती तर जो खर्च आला असता, त्याहीपेक्षा कमी खर्चाची आकारणी त्याने केली होती. तो माणूस 'मी सेवा म्हणून करेन' हे जे वाक्य बोलला होता. त्याचा आत्ता खुलासा झाला. कृष्णकृपाच!

अशा रीतीने मूर्ती तर 'लॉस ऐंजेलिस' आली. मात्र मंदिराची जागा निश्चित झालेली नव्हती. त्यामुळे सध्या मूर्ती विमानतळावरून आणून कोठे ठेवायची याबाबत भक्तांचे एकमत न झाल्याने, मूर्ती तशीच एअरलाईन्सच्या गोडाउनमध्येच राहिली. अखेर उनीयाळ यांची जागा निश्चित झाल्यावर ती गोडाउनमधून आणायला गेले तेव्हा मात्र मूर्ती ठराविक दिवसात नेली नाही म्हणून डीमरेज चार्जेस खूपच भरायला लागले. कृष्णाला ही गोष्ट अजिबातच आवडली नाही. कृष्णाने ताईंना सांगितले, ''ताई, असे डीमरेज भरून माझ्या भक्तांचे पैसे वाया गेलेले मला अजिबात आवडलेले नाही. ही

चूकच झाली आहे व त्याची किंमत तुला द्यायला लागणार.'' त्यावर ताई म्हणाल्या, 'कृष्णा, तू इतका दयाळू आहेस आणि त्यातून ह्या सर्व प्रकारात माझी चूक काय आणि किती हे सर्व काही तू जाणतोसच! त्यामुळे तू म्हणशील ती शिक्षा मला मान्य! शिक्षा सुनवणारा पण तूच आणि ती भोगायला बळ देणारा पण तूच.' केवढी ही शरणागती!

उनीयाळांच्या मनात हे मंदिर पुढे मागे शक्य होईल तेव्हा अजून मोठ्या जागेत हलवायचे असे होते. त्यामुळे ताईंनी सांगितले की सध्यातरी ती मूर्ती चलस्वरूपात आपण ठेवू या. म्हणून एक मोठा लाकडी फ्लॅटफॉर्म तयार करवून घेऊन त्याला मधोमध मूर्तीच्या आकाराची खाच ठेवली. म्हणजे मूर्ती बरोब्बर त्यात बसेल.

ताईंनी मूर्ती मंदिरात आणण्यासाठी दुपारची वेळ दिली होती. मूर्ती उतरवताना खरी पंचाईत होती. मूर्ती उचलू शकणारे सातआठ जणच होते. खरीखुरी परीक्षेची वेळ होती. मूर्ती खूप वजनदार असल्यामुळे गोडाऊनहून आणून गाडीत चढवणे हे फारच कष्टाचे झाले. गाडीतून उतरवून पुढे वीस-पंचवीस पावले चालून मूर्ती मंदिरात आणून ठेवायची होती. मोठे मुश्कील काम. आसपास मदत करण्याजोगे कोणीही दिसेनात. ताई शांतपणे सर्वांची धडपड बघत होत्या. शेवटी थोड्या वेळाने म्हणाल्या, 'अरे कृष्णाला हाक मारा, प्रार्थना करा, 'ॐ नमो भगवते वासुदेवाय'चा जप सुरू करा आणि देवीला उचला बरं.' आश्चर्य वाटेल, पण थोड्या वेळाने त्या भक्तांनी मूर्ती उचलून चौथऱ्यापर्यंत आणून ठेवली. पॅकींग काढून मूर्ती बाहेर काढली तर मूर्ती अगदी व्यवस्थित होती.

उनीयाळांची उत्सुकता अजून वेगळीच होती. त्यांना ती किती उंच आहे, त्यांच्या दुर्गा माँ पेक्षा उंच तर नाही नं, अशी काळजी वाटत होती. मूर्ती उभी केल्यावर त्यांनी पाहिले तो दोन्ही मूर्तींची उंची मिळतीजुळती अशी होती. ते म्हणाले की फार पूर्वीपासून त्यांना असं वाटायचं की ह्या मंदिरात अजून एक देवी येणार. त्याचप्रमाणे झाले. दुर्गा माँबरोबर काली माँ देखील आली.

ताईंचे शांतपणे बोलणे, कृष्णावरचा त्यांचा ठाम विश्वास, त्यांच्यातील जाणवणारी दैवी शक्ती ह्या सर्वांमुळे उनीयाळ अतिशय प्रभावित झाले होते. उनीयाळ ह्यांनी ही जागा देताना एका पैशाचीही अपेक्षा ठेवली नव्हती. त्यांचे म्हणणे असे की माँ दुर्गाकडे तिची बहीण काली आली आहे, तर मी कसले पैसे घेणार. उलट ही माझी सेवाच आहे आणि त्या दोघींच्या चरणी ती रुजू होऊ देत.

अखेर तो दिवस उजाडला. ७ ऑक्टोबर २००२ नवरात्रीची पहिली माळ. विश्वजननीच्या स्थापनेचा सोहळा संपन्न झाला. योगेश्वराच्या वैभवाला साजेसा झाला. ताईंना फार समाधान वाटले.

ताईंनी त्या दिवशी संदेश देताना सांगितले 'सध्याच्या काळात विश्वजननीच्या आराधनेची अत्यंत गरज आहे. ह्या गरजेची पूर्तता मी माझ्या भक्तांतर्फेच करत असते. मी एक साधीसुधी, सामान्य बाई! कृष्णाने मला आपली ताई म्हटले. म्हणून आज इथे उभी राहून मी बोलू शकत आहे.'

इतके दिवस कृष्ण सांगत होता, ''ताई, तू आता ताई राहिलेली नाहीस. कृष्णकुटीरचा आणि तुझा काही संबंध नाही. आता हे विश्वचि माझे घर ह्या भावनेने तू राहायला, वावरायला पाहिजेस. विश्व माझे आणि मी विश्वाची अशी भावना राखत तू विश्वजननी व्हायला हवीस.'' काल रात्रीच्या ध्यानात सांगितले, ''तू आता विश्वजननी झालीस. आता मी तुला ताई म्हणणार नाही. ह्याच्यापुढे मी तुला माझी साथीच समजणार.'' जणू कृष्णाने संकेत दिला की ताईंची आध्यात्मिक तयारी उच्च कोटीची आहे.

पुढे त्या सांगू लागल्या, 'कृष्णाने नेहमीचा संदेश दिला-,' ''माझ्या ज्ञात आणि अज्ञात अशा सर्व भक्तांसाठी, यंग जनरेशनसाठी, भारतासाठी आणि विश्वासाठीही वेळप्रसंगी मला धावावे लागणार. त्यांच्या पाठीशी उभे राहावे लागणार. त्यासाठी ज्या ऊर्जेची गरज आहे ती कशातून मिळेल, तर ती तुमच्या सामुदायिक प्रार्थनेतून मिळू शकते. म्हणून मी ठिकठिकाणी श्रीकृष्णलीलाकेंद्राची स्थापना केली. दर आठवड्याला केंद्रात उपस्थित राहून नियमित उपासना करा. तेथे येऊन मला फक्त भावनेची फुले वाहा आणि भक्तीचा प्रसाद दाखवा. तुम्ही घरोघर जे काही खाता तो माझाच प्रसाद आहे. विश्वजननी आणि विश्वसखा त्यांचे ॐकार रूप, म्हणून 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हा जप पंधरा मिनिटे आणि 'ॐ महान शक्ती देवताय नमः' हा जप पाच मिनिटे करा.

सर्व कृष्णभक्तांच्या प्रेमाने ही विश्वजननी स्थापित झाली आहे. सर्व भक्तांना कृपाछत्र देण्यासाठी उभी ठाकली आहे. सर्व भक्तांनी इथे यावे, आराधना करावी. आराधनेचे महत्त्व ज्याने त्याने आपल्या परीने जाणून घ्यायचे आहे.''

पुढे विश्वजननीने, आपल्या आणि भक्ताच्या नात्यातले बंध उलगडून सांगितले. ''काळाप्रमाणे ओटी ह्या शब्दाचा अर्थ पण बदलला आहे . पूर्वीच्या पद्धतीप्रमाणे ओटी म्हटले की साडी, चोळी, नारळ, पाच फळे असे सर्व ओटीचे ताट आपल्या डोळ्यासमोर येते. आता ते आणण्याची काहीही गरज नाही. मला ओटी म्हणून एखादे फळ वाहा आणि ते प्रसाद म्हणून घरी घेऊन जा. येताना तुम्ही पूर्ण भावनेने तुमचे दोन हात आणि एक मस्तक एवढेच घेऊन या. मीही भावाची भुकेली आहे. परंतु एक लक्षात ठेवा, मी योगेश्वरासारखी दयाळू मात्र नाही. जो ज्या भावनेने माझ्याकडे पाहील, शरण येईल

त्याच्याकडे त्याप्रमाणे मी धावत जाईन. परंतु अपराधाला मात्र माझ्याकडे कृष्णासारखी-योगेश्वरासारखी क्षमा नाही. ज्याच्या त्याच्या भावनेप्रमाणेच मला वागावे लागेल. नाहीतर त्यांची चूक त्यांना कधीच न कळल्याने त्यांच्यात नम्रतेची भावना येणार नाही. तसेच त्यांच्या जीवनात सुधारणा पण होणार नाही. त्यांच्याच चांगल्यासाठी मला हे सर्व करावे लागणार आहे. त्यांना वाईट वाटले तरी चालेल. योगेश्वराने माझ्याकडे जे कार्य सोपवले आहे ते उत्तम रीतीने करण्यासाठी हे सर्व नियम पाळावेच लागतील. त्यामुळे सर्वांना आपल्या कर्तव्याची जाणीव होईल. भक्ती म्हणजे काय हेही त्यांना कळेल. ते कळवून देणे हेही माझे काम आहे.'' एवढे बोलून ताईंनी नवदुर्गेची प्रार्थना केली.

नवदुर्गेमाते, आई, अगाध तुझी माया,

भक्तांसाठी तू, देतेस छाया.

मायेचे पांघरूण घालूनी,

लाज राखतेस तू अमुची.

क्षणाक्षणाला जाणवते, आठवूनी रोमांच उठती.

स्पष्ट बोलुनी, चुका तू आम्हा दाखविसी.

क्षमायाचना करता, मायेचा

कृपेचा हात फिरविसी.

माते एकच मागणे तुजपाशी, माते एकच मागणे तुजपाशी

बुद्धी चांगली दे तव भक्तासी तव भक्तासी.

ॐ नमो भगवते वासुदेवाय.

ॐ महानशक्ती देवताय नम:

उनीयाळांनी विनंती केल्याप्रमाणे ताई नऊही दिवस दररोज मंदिरात जाऊन योगेश्वर जसे काय सांगेल तसा जप, ध्यान, पूजा करून देवीची आराधना करत होत्या.

- त्या नऊ दिवसात कृष्णाने सांगितले होते की, हे मंदिर होण्यासाठी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे ज्यांनी मदत केली त्या प्रत्येकासाठी तू ध्यान कर.

- कुलदेवतेची आराधना कर.
- ह्या आराधनेसाठी कृष्णाने खालील मंत्रांचा जप करत आराधना करा असे सांगितले व तेथे असलेल्या भक्तांकडून जपही करून घेतला. ते मंत्र खालीलप्रमाणे

अ) लक्ष्मीदेवि महामाये, देहि मे अनुग्रहम्।

तथा च संपत्तिधनम्, आयुरारोग्यमसंपदाम् ॥

ब) ॐ नमो भगवते वासुदेवाय

क) सर्वमङ्गलमांङ्गल्ये, शिवे सर्वार्थसाधिके

शरण्ये त्र्यम्बके गौरि, नारायणि नमोऽस्तु ते

ड) ॐ महान शक्ती देवताय नम:

इ) शरणागतदीनार्तपरित्राणपरायणे

सर्वस्यार्तिहरे देवि नारायणि नमोऽस्तु ते

उ) विश्वजननि नमोऽस्तु ते, विश्वजननि नमोऽस्तु ते

अशी आराधना झाल्यावर, तेथे हजर असलेल्या भक्तांना कृष्णाने ओंजळ ओंजळभर फुले देऊन सांगितले, ''ही फुले तुम्ही तुमच्या देवघरात देवाजवळ जपून ठेवा. मी तीन वर्षांनी पुन्हा येईन, तेव्हा ती मागून घेईन. मात्र दररोज त्यांना नमस्कार करा.''

***

ॐ

या स्थापनेच्या वेळी कृष्णाने सांगितले, ‘‘इथे जसा उत्सव झाला नं तसाच उत्सव कृष्णकुटीरमध्ये करायचा आहे. माझ्या ज्या भक्तांना यायचे आहे, त्या सगळ्यांनी बदलापूरला अवश्य यावे. सकाळ-संध्याकाळ महाप्रसाद असेल, तोही काय करायचा ते पण भगवंताने सांगितले.’’

तो उत्सव फारच उत्साहात अनेक भक्तांच्या उपस्थितीत साजरा झाला. गावोगावचे कृष्णभक्त हजेरी लावून गेले. ताई, नव्हे साक्षात विश्वजननीच्या हस्ते विश्वजननीच्या प्रतिष्ठापनेचा प्रसाद, फोटो, आशीर्वाद असं सर्व काही भरभरून घेऊन गेले. सर्वत्र अगदी आनंदीआनंद झाला.

पुण्याचे काही भक्त ह्या उत्सवासाठी गेले होते. नेहमीप्रमाणे ताई, कृष्णाच्या काही लीला सांगत होत्या. सांगता सांगता त्या म्हणाल्या, ‘कृष्णाने मला सांगितले आहे की ह्या माझ्या ओट्यावर तुझा फोटो ठेवणार!’ असं म्हटलं आणि लगबगीने त्यांनी स्वत:च्या डोक्यावरून हात फिरवला आणि त्या स्वगत बोलल्या, -थांबते हं कृष्णा.- तो म्हणतोय आता नको सांगू.’ असं म्हणत म्हणत, परत एकदा स्वत:च्या डोक्यावरून हात फिरवला. नंतर अत्यंत मायेने कृष्णाच्या पायावरून हात फिरवून त्याच्याकडे नजर लावून त्या ध्यानात गेल्या.

कोणालाच क्षणभर काही कळलेच नाही. कित्येकदा कृष्ण त्यांना असे थांब म्हणून सांगत असे. या वेळेस त्याची माया वेगळीच होती. हॉलमध्ये पस्तीस-चाळीस माणसे तरी होती. इतक्या सगळ्यांनी ‘तुझा फोटो इथे ठेवणार’ हे वाक्य ऐकले. मात्र त्याचा मथितार्थ एकाच्याही ध्यानात येऊ नये? तो अर्थ उलगडायला १० फेब्रूवारी २००३ उजाडायला लागली. त्या बायका सांगत होत्या, अशी काही शंकाही आमच्या कोणाच्याच मनात आली नाही. अजबच हो कृष्णाची माया! भक्ताच्या दु:खाचीही काळजी तोच वाहतो.

कृष्णाने ताईंना आता तू जगज्जननी झालीस असे सांगितले होते. असे असूनसुद्धा ताई स्वत:च्या वागणुकीतून अनन्यभक्ती किंवा समर्पण कसे असावे, हेच जणू दाखवून देत होत्या, असं दर्शवणारी एक घटना घडली-

फुलवाल्या मावशी दररोज संध्याकाळी थोडा वेळ येऊन दर्शन घेऊन, ताईशी बोलून जायच्या. हा उत्सव चालू असताना एके दिवशी त्या आल्या. जरा गर्दी कमी होती म्हणून ताईंबरोबर बोलत बसल्या. त्यांनी तिसऱ्यांदा सोळा सोमवार केले होते. त्याचे डिसेंबरमध्ये उद्यापन करायचे होते. त्या म्हणत होत्या, ह्या वेळेस सोळा जोड्यांना साडीचोळी, धोतराचे पान असं सर्व काही करून उद्यापन करायचा विचार आहे. त्यावर ताई बोलून गेल्या, 'मावशी, खर्चाच्या दृष्टीने हे बरेच होईल नाही का? बघा कसं जमतं ते.'

सगळी आवराआवर झाली. ताई ध्यानाला बसल्या. कृष्णाचं आपलं एकच सांगणं सुरू झालं, ''मला नाही बाबा कोणाच्यात बोललेलं आवडत.'' ताई आठवायला लागल्या, आज आपण कोणाला काही अनाहूतपणे बोललो का? कृष्णाचा ताईंसाठी अगदी कडक नियम होता. अगदी तीनही मुलांच्यासकट कोणाच्याही बाबतीत कोणताही सल्ला ताईंनी विचारल्याशिवाय द्यायचा नाही. त्या आठवू लागल्या, आपण कोणाशी काय बोललो. त्यांना तसे पण काही आठवेना. पण कृष्ण त्याचे म्हणणे काही सोडेना. असे रात्रभर चालले होते. पहाटेच्या ध्यानात ताई म्हणाल्या, 'नाही रे राजा मला समजत मी काय बोलले ते.' त्यावर त्याने पटकन सांगितले, ''काल संध्याकाळी तू मावशीला म्हणालीस नं की 'खर्चाच्या दृष्टीने हे फार होईल नाही का?' ते मला अजिबात आवडले नाही. माझा नियम तू मोडलास. आता काय करायचे? चुकीची शिक्षा हवीच! एक काम कर, आता सकाळपासून माझे भक्त येतील. तू अनुभव सांगतेस नं, तेव्हा सगळ्यांच्या समोर उभे राहून तुझ्या हातून ही चूक कशी झाली ते सांगून माझी माफी मागायची. हे रोज सकाळ - संध्याकाळ मी सांगेन तोपर्यंत करायचे.''

सकाळपासून ताईंनी हा प्रसंग सांगून आणि त्यांच्या हातून अजूनही कशा चुका घडतात, मला घडवण्यासाठी अजूनही परब्रह्माला कसे कष्ट पडतात, ते सांगत होत्या व माफी मागत होत्या.

केवढे हे समर्पण! केवढी ही नम्रता! विश्वजननीपदाची मानकरी होऊनसुद्धा सर्व भक्तांसमोर माफी मागणे म्हणजेच गुर्वाज्ञा तंतोतंत कशी पाळावी ह्याचा आदर्शच त्यांनी घालून दिला. नाहीतर आपण स्वत:च्या समजुती, विचार ह्यावर ठाम असतो. आपला अहम् आपल्यासाठी महत्त्वाचा असतो, याचा आपण अंर्तमुख होऊन विचार करावयास पाहिजे.अशा अनेक छोट्यामोठ्या घटनातून कृष्ण स्पष्टपणे दाखवून देत होता की त्याच्या भक्ताने कसे वागणे, कसा विचार करणे त्याला अपेक्षित आहे.

बडोद्याच्या महाजनकाकांनी बडोद्यास शंकर अभ्यंकरांची व्याख्यानमाला आयोजित केली होती. महाजनकाका जेव्हा उत्सवाच्या वेळेस आले होते, तेव्हा कृष्णाने स्वत:च्या गळ्यातला एक फुलांचा हार काढला, त्यांच्या अंगावर टाकला आणि सांगितले, ''अरे, त्या व्याख्यानमालेच्या इथे हा हार मला घाल हं! आणि सातही दिवस तो तसाच ठेव बरं का?'' आता फुलांचा हार एक तर बदलापूर ते बडोदा प्रवास करणार आणि मग सात दिवस तो तेथे कृष्णमूर्तीवर राहणार! कृष्णाचे काय हिशोब असतात ते त्यालाच माहीत हेच खरे. आपण आपली कृष्णाज्ञा पाळावी हे बरे.

तेव्हा कृष्णाने दोन स्त्री भक्तांना प्रसादाच्या म्हणून साड्या द्यायला सांगितल्या. दुपार झाली होती. मंदिरातली वर्दळ आता पूर्ण थांबली होती. ताईंनी साड्या, नारळ काढून आणले. त्याबरोबर फूल द्यायला बघू लागल्या तर कृष्णाच्या पायाशी सुटी फुले नव्हती. एकजण म्हणाली, 'ताई, चाफ्याचा हार घातलेला आहे गळ्यात, त्याची दोन फुले सोडवून घेऊ का?' 'नको नको' असं म्हणून ताई परत आत गेल्या, थोड्या वेळाने परत बाहेर आल्या. असे दोन-तीनदा झाले. चौथ्या वेळेस कृष्णाजवळ येऊन बघतात, तर दोन टपोरी ताजी फुले कृष्णाच्या पायाशी! ताईंना इतका आनंद झाला. त्या भक्त विचारू लागल्या, 'ताई, अहो आम्ही तर इथेच आहोत. मंदिरात कोणीही आले नाही. मग ही फुले आली तरी कोठून?' ताई म्हणाल्या, 'अहो, कृष्णाची किमया! ते राहू दे, आता प्रथम ही प्रसादाची ओटी घ्या.' असं म्हणत त्यानीं फुलासकट दोघींना ओटी दिली. तो दिव्य प्रसाद अजूनही त्यांनी जपून ठेवला आहे.

उत्सव झाला आता कृष्णाला ध्यानासाठी ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंडला निघायचे होते त्यानंतर अंदमान, मद्रास यात्रेने २००२च्या ध्यानयात्रांची सांगता होणार होती.

एका कृष्णभक्त कुटुंबाला कृष्णाने सातआठ वर्षापूर्वी सांगितले होते की आपल्याला ऑस्ट्रेलियाला जायचे आहे; तेव्हा काही कारणाने ते जमले नाही. ह्या वर्षी मात्र कृष्णाने सांगितले, 'कोणत्याही परिस्थितीत यंदा मात्र आपण जायचेच आहे.' त्याप्रमाणे ते डिसेंबर २००२ला ऑस्ट्रेलियामध्ये पोहोचले.

तिथे एकदा ताई रूमवर ध्यान करत होत्या. बाहेर अगणित फुले फुललेली होती. त्या कृष्णभक्ताची मुलगी ताईंबरोबर रूममध्ये होती. तिला ताई म्हणाल्या, 'मी आता ध्यानात समोरच्या फुलांचा अभिषेक करणार आहे. थोड्यावेळाने माझ्या

कपाळावर तुला काय दिसते ते बघ!' तिने बघितले तर काय, अगदी कोरून काढल्यासारखा ॐ त्यांच्या कपाळावर आला होता. ताईंनी नंतर तिला सांगितले, 'अशी संधी (हा ॐ पाहण्याची) फारच थोड्या लोकांना मिळते. कृष्णाची कृपा आहे तुझ्यावर.'

तेथे ऑस्ट्रेलियात चार ठिकाणी आणि न्यूझीलंडमध्ये एके ठिकाणी कृष्णाने केंद्रांची स्थापना केली. ताईंनी तेथे खूप ठिकाणी नजर फिरवून ध्यान केले. हॉट एअर बलूनमध्ये बसूनही ध्यान करून आल्या.

न्यूझीलंडहून आल्या आल्या लगेच दुसऱ्या दिवशी ताई अंदमानला जाण्यासाठी मद्रासला निघाल्या. आपल्यासारख्यांना जेट लॅग, प्रवासाचा शीण वगैरे गोष्टी असतात. ताईंचा या साऱ्याशी काही संबंधच नव्हता. त्यांना फक्त आणि फक्त कृष्णकार्य, तो सांगेल तेथे जाणे, सांगेल तसे ध्यान करणे, केंद्रस्थापना करणे एवढेच डोळ्यासमोर दिसत होते. जणू काही प्रत्येक गोष्टींची अतिशय तातडी आहे असेच वाटत होते.

ताई मद्रासला पोहोचल्या त्या दिवशी होती गीताजयंती. कृष्णाने पाद्यपूजेला परवानगी दिली. नारकरकाकांना सांगितले, ''रमेश, तू माझ्या सर्व भक्तांच्या वतीने पाद्यपूजा कर. मी त्याचा स्वीकार करतो.'' बरोबर गेलेल्या भक्तांकडे वळून म्हणाल्या, ''रमेश म्हणजे माझा उद्धव आहे.''

तसेच सीएमईतील एक ऑफिसर बरोबर होते. त्यांना सांगितले, ''भारततर्फे तू पाद्यपूजा कर. मी तिचा स्वीकार करतो.'' आणि बरोबर दोन कृष्णभक्त मुली होत्या त्यांना सांगितले, ''तुम्ही सर्व यंग जनरेशनतर्फे माझी पूजा करा. त्याचा मी स्वीकार करतो. आज तुम्हाला मी वचन देतो. आत्ता जे अराजक माजले आहे, ही परिस्थिती माझी तरुण पिढीच बदलू शकेल. त्यासाठी मी त्यांच्या पाठीशी उभा राहीन आणि त्यांना ऊर्जा, ताकद आणि बुद्धीही देईन. माझा यंग जनरेशनवर खूपच विश्वास आहे.''

पायावर अत्तर आणि अष्टगंधाचे स्वस्तिक काढून, सुंदर हार घालून, अकरा दिव्यांनी औक्षण करून छान पाद्यपूजा झाली. त्यावेळेस सगळ्यांनाच स्वामी विवेकानंदांची आठवण झाली. त्यांच्या कार्याची सुरुवात पण मद्रासहून झाली होती.

अंदमानला जाताना मात्र ताई सतत ध्यानात होत्या. भारताच्या त्या बाजूचा संपूर्ण सागरी किनारा तसेच अंदमान व निकोबार ह्यासाठी ध्यान चालू होते. कधी डोळे मिटून, कधी आराधनेच्या शिवलिंगावर अत्तराचा अभिषेक करून तर कधी बरोबर

आणलेल्या गीतेच्या पुस्तकावर फुलांचा अभिषेक करून. कधी फिरून, समुद्रकिनारी पाण्यात उभे राहून ठिकठिकाणी नजर फिरवून ध्यान करणे चालू होते. बाहेर जाताना जेव्हा ही गीता ताईच्या पर्समध्ये असायची तेव्हा कृष्ण पर्सची चेन लावू द्यायचा नाही. एकदा ती चुकून लावली गेली, तर कृष्ण म्हणाला, ''ताई पहिली पर्सची चेन उघड. माझी घुसमट होतेय. (गीता ही माझी वाङ्मयीन मूर्ती आहे, त्याचीच प्रचिती!).''

सेल्यूलर जेलमध्ये संध्याकाळी प्रकाश आणि ध्वनी या कार्यक्रमास गेल्या असताना कृष्ण म्हणाला, ''सावरकरांसारख्या अनेक देशभक्तांनी केलेला स्वार्थत्याग, बलिदान ह्या पायावर भारताचे स्वातंत्र्य उभे आहे. मात्र आजची परिस्थिती काय भयानक आहे! स्वार्थ, लोभ, चढाओढ, सामाजिक अस्वस्थता यांनी ग्रासली आहे. हे सर्व काही बदलायलाच हवे. तो बदल करण्यासाठी लागणारी ताकद माझ्या तरुण पिढीकडेच आहे. मला त्यांच्या पाठीशी सतत उभे राहावे लागणार.'' सगळेच जण अतिशय भारावलेल्या अवस्थेत स्वातंत्र्यवीरांना वंदन करून तेथून बाहेर पडले.

दुसऱ्या दिवशी सकाळी एका मंदिरात ताई गेल्या होत्या. तिथे सर्व देवदेवतांच्या मूर्ती होत्या. बरोबरच्या भक्तांनी ताईंचे कृष्णाचे कार्य ह्याबद्दल माहिती सांगितली. नंतर ताईंनी मंदिरातल्या गुरुजींच्या काही प्रश्नांची उत्तरे दिली. ह्या काळाची गरज म्हणून त्यांनाही 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' ह्या मंत्राचा जप करायला सांगितला. कृष्णाचा फोटो व कृष्णाई कॅसेट दिली आणि त्यांना विचारले, 'ही कॅसेट मंदिरात दररोज लावाल का?' ते म्हणाले, 'निश्चित लावेन. दररोज सकाळी आणि संध्याकाळी आरतीनंतर लावत जाईन. आईसाहेब, आपण इतक्या लांबून मुंबईहून केवळ कृष्णाची आज्ञा म्हणून ह्या भूमीला, येथील लोकांना आशीर्वाद देण्यासाठी आलात. ही खूप कौतुकाची बाब आहे.' असं म्हणत त्यांनी ताईंना साष्टांग नमस्कार घातला. पुढे सांगू लागले, 'आमच्या मंदिरात अनेक संत, मोठे साधक येत असतात. आपापल्या पंथांची माहिती स्वतःच्या नावागावासकट सांगत असतात. मात्र आईसाहेब, तुमची गोष्टच वेगळी आहे. आल्यापासून तुम्ही आम्हाला फक्त कृष्णाने असे केले, कृष्णाने असे सांगितले, असे ध्यान करायला सांगितले, कृष्णाने हा मंत्र दिला आहे; असेच सांगत आहात. कृष्णाशिवाय तुमच्या तोंडून दुसरे काहीच बाहेर पडत नाहीये. मी इतके दिवस या मंदिरात आहे, आजतागायत

अशी व्यक्ती मी बघितलेली नाही.आम्हाला निदान तुमचे नाव, पत्ता तरी सांगा' अशी विनंती करून त्यांनी लगेचच कृष्णाई कॅसेट लावली.

कृष्णाला तेथील महत्त्वाची बेटे, बंदरे आणि जेट्टींवर जाऊन ध्यान करायचे होते. त्याप्रमाणे तेथे तेथे जाऊन ध्यान झाले. काही जेट्टींवर फुलांचा अभिषेक करत ध्यान झाले. एका गस्त घालणाऱ्या जहाजावर जाऊन ध्यान झाले. एकंदरीत सगळ्या व्यवस्थांवर कृष्ण खूश होता. ताईंचेही मनासारखे ध्यान होत होते.

ताईंना निकोबारला जाऊन ध्यान करायचे होते. त्यासाठी जाण्याची काही सोय होते का ते बघणे चालू होते. कारण समुद्रमार्गे तेथे पोचायला तीन दिवस लागतात. येण्याजाण्यात सहा दिवस घालवणे शक्य नव्हते. हेलिकॉप्टर सेवा होती पण ती फक्त रसद पुरविण्यासाठी! त्यातून जरी ताईंना जाता आले तरी चालेल असं वाटून त्यासाठी प्रयत्न चालू होते. अचानक रात्री कृष्णाने सांगितले, ''उद्या माझे सात तासांचे सलग ध्यान आहे. मी सकाळपासून ध्यानात असेन. तुम्ही बाहेर निसर्गसौंदर्य बघण्यास गेलात तरी चालेल.''

शेवटी एकजण ताईंबरोबर हॉटेलवर थांबेल व बाकी सर्वजण फिरायला जातील असे ठरले. बरोबर गेलेल्या भक्तांपैकी एक भक्त रेकीमास्टर होती. तिची ताईंना-कृष्णाला निघाल्यापासून प्रार्थना चालली होती, 'कृष्णा, रेकीची सेवा स्वीकारशील ना?' तिची भाबडी काळजी होती, की ताईंना वयाच्या ६८व्या वर्षी हा एवढा प्रवास आणि कृष्णकार्याची धडपड यामुळे थकायला होत असेल. आपण रेकी केल्याने त्यांना जरा आराम पडेल. आपली थोडी सेवा रुजू होईल. कृष्ण-ताई भक्ताच्या भावनेचा नेहमीच स्वीकार करतात आणि मोठ्या मनाने त्यांची अशीही भाबडी आणि प्रामाणिक सेवा स्वीकारून भक्तांच्या भावनेला दाद देतात.

तिला सकाळी कृष्णाने-ताईंनी सांगितले, ''आता मी ध्यानासाठी पडणार आहे. आज तुझी रेकीची सेवा स्वीकारतो. देतेस नं.'' 'कृष्णा, आलेच' असं म्हणून ती ताईंच्या बेडपाशी गेली. ताईंनी सांगितले 'हिची रेकी देऊन झाली की तुम्ही बाहेर फिरायला जा. मला आता इतक्यात काहीही लागणार नाही. बरोबर थांबणार होती तिला सांगितले, की तुझी जेवणाची वेळ झाली की तूही जेवून घे. मी ध्यान झाल्यावरच जेवेन. मला काही लागले तर मी सांगेन. तोपर्यंत मला कोणीही उठवू नका. मी पडून ध्यान करते आणि तू रेकीची सेवा द्यायला सुरुवात कर,' असे म्हणून ताईंनी ध्यानाला सुरुवात केली.

ही रेकीमास्टर नंतर आपला अनुभव सांगत होत्या-

'मी कृष्णाला, ताईंना आणि रेकीशक्तीला नमस्कार करून प्रार्थना केली आणि प्रथम डोळ्यांवर हात ठेवून रेकीला सुरुवात करावी म्हणून ताईंच्या डोक्याच्या बाजूने बसले. रेकीला आवाहन करून डोळ्यांवर हात ठेवले आणि थोड्याच वेळात रेकीचा इतका अद्‌भुत प्रवाह सुरू झाला आणि माझे भानच हरपले. माझ्या डोळ्यांसमोर भारताचा पूर्ण नकाशा साकारला. उजवीकडे खालच्या बाजूला अंदमान निकोबार बेटासकट तो साकारला, (आजही जर कोणी हाताने काढायला सांगितला, तर इतक्या बारकाव्यासहित मला काढता येईल का नाही शंकाच आहे).

भारताच्या उत्तरेकडच्या पाकिस्तान बॉर्डरपासून सुरुवात करून रेकी शक्ती (कॉस्मिक शक्ती) अत्यंत वेगाने उजव्या बाजूने पुढे सरकू लागली. प्रत्येक बॉर्डरवर फिरून झपझप खालच्या कन्याकुमारीच्या टोकापर्यंत पोहचली. तेथून पुढे पुन्हा किनाऱ्यांवरून सौराष्ट्र, पाकिस्तान बॉर्डर करून पुन्हा जेथून निघाली तेथे आली. तिचा वेग आणि प्रवाह खूप प्रचंड होता. अशी तीनदा ती भारताच्या सर्व बॉर्डरवरून फिरली म्हणजेच रेकीत एक सीलिंग प्रोसेस आहे ती तिने पूर्ण केली. अर्थात भारताला सर्व बाजूंनी त्या शक्तीने सील केले. तेथून ती आली दिल्लीत. मला दिल्लीचे लोकेशन बरोबर जाणवले. दिल्लीत प्रथम पंतप्रधान वाजपेयी, अडवाणी आणि तिसरी एक व्यक्ती (ती कळली नाही) ह्यांना सीलिंग केले. नंतर तीनही फोर्सेसचे चीफ जे स्पष्टपणे जाणवले, त्यांनाही सीलिंग केले. कलकत्ता, आसाम हा भाग पूर्णपणे सील केला. तीनतीनदा रेकीची आवर्तने करून तेथून खाली मद्रासला आली. तेथे तीन आवर्तने सीलींगची झाली. पुढे अंदमान-निकोबारला तीनदा पूर्ण सीलिंग करून पुन्हा एकदा संपूर्ण भारताला सीलिंग झाल्यावर तो रेकीचा प्रवाह हळूहळू शांत झाला. मीही भानावर आले. तिघांचे आभार मानून हात उचलले आणि बाजूला झाले. घड्याळाकडे बघितले तर बरोबर पंचवीस मिनिटे झालेली होती. मला तर सर्व काही निमिषार्धात घडल्यासारखे वाटत होते. आनंदाने माझे डोळे भरून येत होते. माझं मलाच कळलं नव्हते, आपण अनुभवलं ते काय? का माझ्याच मनाचे खेळ. त्यामुळे मी ठरवून टाकलं, की ताईंकडून ह्याबद्दलची जोपर्यंत खात्री होत नाही तोपर्यंत कोणाशी काही बोलायचं नाही.

ठरल्याप्रमाणे आम्ही फिरायला जाऊन दुपारी चार साडेचारला हॉटेलवर आलो. बघतो तर ताईंचे पण ध्यान झालेले होते. लगेचच सर्वजण फ्रेश होऊन ताईंच्या खोलीवर गेलो. आम्ही तेथे जाताक्षणीच ताई प्रसन्न हसून म्हणाल्या,

'कृष्णाला हवे तसे छान ध्यान झाले. आता निकोबारला जायची काहीही आवश्यकता नाही. तसं त्यांना कळवून टाका.' आणि त्या वळून म्हणाल्या, 'काय? कृष्णाने तुझी रेकीची सेवा स्वीकारत ध्यानाचा अनुभव दिला नं!' मी आनंदाने अक्षरश: उड्याच मारायची बाकी राहिले होते. केवढी मोठी अनुभूती आज मिळाली होती. तो संभ्रम किंवा माझ्या मनाचे ते खेळ नव्हतेच! ताई देशासाठी ध्यान करतात, म्हणजे काय करतात ह्याचीच प्रचीती आज कृष्णाने दिली-

ताईंबरोबर जी कृष्णभक्त थांबली होती ती पण सांगत होती, 'ताईंचे ध्यान निश्चल चालले होते. फक्त ओंकाराचा नाद मात्र अत्यंत मंद स्वरात ऐकू येत होता. प्रथम मला कळलेच नाही, पण लक्षपूर्वक ऐकल्यावर लक्षात आले तो ताईंच्याच मुखातून येत होता. तसंच ताईचे पाय गादीपासून जवळजवळ फूटभर अंतरावर हवेत अधांतरी कितीतरी वेळ होते. ताईंचे ध्यान संपल्यावर त्यांनी एक भांडंभर पाणी द्यायला सांगितलं, आणि म्हणाल्या, 'माझ्या दोन्ही तळव्यांवरून बोटाच्या बाजूंनी टाचेपर्यंत असा सात वेळा हात फिरव हं!'

ह्या सगळ्या मुद्रांचा अर्थ तो भगवंतच जाणे.

ताईंचा चेहरा अत्यंत तेजस्वी, प्रसन्न असा दिसत होता. सर्वांनी त्यांना नमस्कार केला.

अशा रीतीने ताईची २००२ मधील शेवटची ध्यानयात्रा कृष्णाने त्याला हवी तशी पूर्ण करून घेतली. त्याबाबत श्रीकृष्णाने स्वत:च्या डायरीत मनोगत लिहून ठेवले, ''मी ताईमार्फत जेथे जेथे जातो तेथे आनंद निर्माण झाला नाही असे कधीच होणार नाही. कारण माझे अस्तित्व म्हणजेच आनंद! सुखशांती, समाधानाबरोबर मी विश्वजननीचे अस्तित्वही जागृत करतो. कारण तिच्या अस्तित्वाची आज फारच गरज आहे. त्या गरजेपोटीच मला तेथे जाऊन ध्यान करण्याची आवश्यकता भासते. विश्वाचा भार आणि भक्तांची भिस्त माझ्यावर असल्यामुळेच मी हे करतो. ह्यामुळेच मला २००५ सालपर्यंत कुठेच एका ठिकाणी थांबता येणार नाही. सर्वांचे छत्र मी आहे. सर्वांचा आधार मी आहे. त्याकरताच त्यांची योग्य ती तरतूद करण्यासाठी मी सतत योजना करत असतो. त्या योजनेची संपूर्ण जबाबदारी माझी आणि माझीच आहे. याचा अर्थही तुम्हाला कळणे कठीण आहे. कारण या अंतर्गत घडामोडी साध्या नजरेने पाहता येतील असेही नाही. हे विश्वाचे गूढ आहे. तुम्हाला त्या गूढाचा शोध लागणे फार कठीण आहे. त्याचा जाणता मी एकटाच आहे. योग्य वेळी मी ते स्पष्ट करून

तुम्हाला सांगेन. हे गूढ तत्त्व मला माझ्याकडेच ठेवावे लागते. या तत्त्वांचा कर्ता करविता मीच असल्यामुळे मी तुम्हाला हेही सांगू शकतो की 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हे त्यातलेच महान् तत्त्व आहे. तो मंत्र जपणे हा, ते गूढ जाणून घेण्याचा सोपा मार्ग आहे. म्हणूनच मी तुम्हाला परत परत सांगतो की 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हा मंत्र करा. ह्या मंत्राने मला हाक मारा. ही तुमची हाक हा तुमच्यामाझ्यातला दुवा आहे. फक्त हाच दुवा तुम्हाला आणि मला एकत्र आणू शकतो. हा मंत्र हीच आपली होडी आणि हाच आपला नावाडी! सुखाचे आगर आणि प्रेमाचा सागर! कौतुकाचा मेरू आणि आपल्या जीवनाचा गाभा. या मंत्रामुळेच आपण एकत्र येणार. आनंदाने भवसागर पार करणार. आणि अंतिम ध्येयाला पोहोचणार. हेच आपले ध्येय आणि हेच आपले सौख्य. हा मंत्र हेच आपल्या होडीचे, शीड आणि तोच नावाडी. 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हा मंत्रच आपला आधार आणि हे सारे सांगायची हीच वेळ.'' खाली होती कृष्णाची स्वाक्षरी 'ॐ' .

हे श्रीकृष्णाचे मनोगत व्यक्त झाल्यावर ताई म्हणतात, कृष्णाचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. कौतुक करायला शब्दही अपुरेच पडतात. देवा, भक्तांसाठी तू काय काय करतोस ते तुझे तुलाच माहीत. 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हे तुझे तत्त्व, हा तुझा मंत्र, ही तुझी शक्ती. ही तुझी माया, ही तुझी कृपा. हेच तुझ्या भक्तांचे वैभव. 'ॐ महानशक्ति देवताय नम:' '|| ॐ नमो भगवते वासुदेवाय ||'

अंदमानहून ताई मुंबईला पंचवीस तारखेला आल्या. मुंबईत दोनतीन ठिकाणी ध्यानाला जायचे होते तेथे जाऊन त्या बदलापूरला परत आल्या. श्रीकृष्णाच्या सांगण्याप्रमाणे एकतीस डिसेंबरला दिवसभर सर्व भक्तांसाठी ध्यान केले आणि ताईंनी नवीन वर्षासाठी संदेश दिला.

''२००२ साल हे फार कष्टाचे व कटकटीचे साल होते. त्यासाठी ठिकठिकाणी केंद्रस्थापना केली असून सर्वांना हेच सांगणे आहे की माझ्यावर श्रद्धा व विश्वास ठेवून जे केंद्रात नियमित जातील त्यांची संपूर्ण जबाबदारी माझी राहील.''

२००२ साली अकरा ह्या आकड्याला फार महत्त्व होते. आता २००३ सालासाठी दुसरा आदेश देत आहे.

● ह्या वर्षापासून सात वेगवेगळ्या रंगाची फुले वाहावी (त्यात एका रंगाची २ चालतील). तसेच अकरा अख्खे तांदूळ 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' ह्या मंत्राचा जप करत श्रद्धेने वाहावेत.

● अडचणीच्या वेळेला दररोज दोन निळी फुले वाहून आपली अडचण सांगून प्रार्थना करावी.

● सर्वात महत्त्वाचे म्हणजे फुले वाहणे, तांदूळ वाहाणे हे करत असताना मी सतत आपल्याजवळ उभा आहे, या पूर्ण श्रद्धेने व भावनेने ते सर्व मला अर्पण करावे.

● ज्या दिवशी मनापासून मला नैवेद्य दाखवावा असे वाटेल तेव्हा दहीभाताचा दाखवावा व तो घरातल्या सर्वांनी खावा.

● हे सर्व ज्याच्याकडून पूर्ण श्रद्धेने केले जाईल, त्यांच्यासाठी मी सतत उभा राहीन. त्याचप्रमाणे तुम्ही मला जशी हाक माराल, त्याप्रमाणे मी तुमच्यासाठी धावत येईन. हे माझे तुम्हाला दिलेले वचन आहे.

'मी तुमचा आणि तुम्ही माझे' हे नाते जोडले जाते ते श्रद्धा आणि विश्वास ह्या दोन नाजूक धाग्यांनी. एकदा बांधले गेले की ते कधीही तोडले जात नाही, हे माझ्या सर्व भक्तांनी लक्षात ठेवावे. म्हणजेच 'मी तुमचा आणि तुम्ही माझे' हे नाते विसरू नका.''

***

ॐ

आज एक तारीख. वर्षाची सुरुवात. कृष्णाने आज ताईंना सांगितले, ‘‘ताई, आज बारा वाजेपर्यंत तू अजिबात बसायचे नाही. सर्व व्यवहार उभ्यानेच कर.’’ ताईंना प्रश्न पडण्याचा प्रश्नच नव्हता. सगळ्या गोष्टी उभ्याने करणे चालू होते. इतक्यात फोनची बेल वाजली. फोन ताईंसाठीच होता. त्यांनी फोन घेतला आणि बोलता बोलता त्या शेजारच्या टेबलावर टेकल्या. त्या क्षणी झटका बसावा तसे झाले. त्या उठल्या. घाईघाईने उभ्या राहिल्या. फोनवरचे बोलणे पूर्ण होताच कृष्णाने सांगितले, ‘‘ताई, तू खाली टेकलीस. बसायचे नाही म्हणून सांगितले होते.’’ चूकच झाली, त्याची शिक्षा म्हणून आता बाराऐवजी एकपर्यंत तुला बसता येणार नाही.’’ नंतर ताईंनी कृष्णाज्ञेचे तंतोतंत पालन केले. ताईंना कृष्णाचे खूप नियम पाळावे लागत. आणि त्या ते किती कसोशीने पाळायच्या त्याचेच हे उदाहरण. त्यावर ताई म्हणत, ‘बघा, कृष्णाला अजूनही माझ्यासाठी किती कष्ट घ्यावे लागतात. यावरून आपण हे जाणले पाहिजे की ताई योगिनीस्वरूप असूनही कृष्णाप्रति किती निकोप, निर्मळ समर्पणभाव शेवटपर्यंत ठेवून होत्या.

कृष्णाने दुसऱ्या विश्वजननीच्या प्रतिष्ठापनेची तारीख सांगितली होती ८ फेब्रुवारी २००३. तीसुद्धा दिल्लीला मिलिटरी एरिआत करायची असं सांगितलं होतं. तसेच एखाद्या अस्तित्वात असलेल्या मंदिरातच प्रतिष्ठापना करायची. त्यासाठी नवे मंदिर बांधायचे नाही. त्याप्रमाणे मंदिराचा शोध घेणे चालू होते.

कृष्णाने ८ फेब्रुवारी स्थापनेची तारीख दिल्याने, त्या दृष्टीने तयारीला सुरुवात झाली. ह्या स्थापनेत थोड्याच भक्तांनी यावे असे कृष्णाने सांगितले आणि असे कारण दिले की, आर्मीच्या जागेत प्रतिष्ठापना असल्याने कमी लोकच आलेले बरे. तेथले कायदेकानू आपणांस पाळायला हवेत. त्यासाठी इतर गावच्या भक्तांनी आत्ता येथे येऊ नये.

जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात एक कृष्णभक्त बदलापूरला दर्शनाला आल्या होत्या. बोलत असताना ताई त्यांना म्हणाल्या, ‘अहो, मला कृष्ण म्हणत होता की, आता तुला ध्यानासाठी अज्ञात स्थळी नेणार आहे. आता कोठे नेणार काय माहीत.’ असं म्हणत म्हणत त्यांनी डोक्यावरून हात फिरविला. बरेचदा कृष्ण त्यांना त्यांच्या

डोक्यावरून हात फिरवायला सांगत असे. त्यामागे कृष्णाची योजना असे की, त्या तेव्हा जे बोलल्या ते त्यांच्या स्मरणात राहू नये. अज्ञात स्थळ म्हणजे महानिर्वाणाचेच असे कृष्ण त्यांना सुचवत असावा. ताईंना फेब्रुवारीत काय घडणार ह्याची आधीपासूनच कल्पना असावी. म्हणून आपल्या भक्तांच्या काळजीपोटीच कोणाला शंकासुद्धा न येऊ देता त्या दिल्लीला जायच्या आधी निरवानिरव करत होत्या.

ह्या वेळेस कृष्णाने नंदा, संतोष (मुन्ना) आणि वैभवी या तिघांनाही सहकुटुंब दिल्लीला आलेच पाहिजे असं सांगितलं होतं. त्याचप्रमाणे काही कृष्णभक्तांनाही दिल्लीस येण्याचा आग्रह केला होता. त्या साऱ्यांची रिझर्व्हेशन करायला सांगितली होती.

मूर्तिकाराचाही निरोप आला की, मूर्ती वीसबावीस जानेवारीपर्यंत पूर्ण तयार होईल. त्यानंतर तुम्ही ती कधीही नेऊ शकता. मूर्ती आधी मुंबईत आणून मग दिल्लीत न्यायचे ठरले.

इतक्यात अचानक नारकरकाकांना त्रास व्हायला लागला. निदान होऊन बायपास करणे आवश्यक आहे असे डॉक्टरांनी सांगितले. कृष्णाने पण होकार दिला. त्यामुळे १८ जानेवारीला काकांची बायपास सर्जरी ठरली. त्यासाठी ताईसुद्धा आता मुंबईतच आल्या. अजूनपर्यंत दिल्लीची जागा निश्चित झाली नव्हती. त्यासाठी दिल्लीत काही भक्त धावपळ करत होते. शेवटी कृष्णाला जशी मिलिटरी एरियात जागा हवी होती तशी मिळाली. तेथे राधाकृष्णाचे मंदिर होतेच. त्या मंदिरात विश्वजननीच्या स्थापनेला मंदिराच्या कार्यकारी मंडळाने परवानगी दिली.

देवीची मूर्ती पंचवीस तारखेला मुंबईत येणार होती आणि चार तारखेला पुढे दिल्लीला जाणार असं ठरलं. मूर्ती माहीमला तोनसे यांचे घरी आणण्याचे ठरले. सकाळी दहाच्या सुमारास मूर्ती येईल असा अंदाज होता. श्रीकृष्णाने ताईंना देवीच्या स्वागतासाठी, आपण तोनसे यांचेकडे जाऊ या असे सांगितले. बरोबर देवीला देण्यासाठी सुंदरसा लाल गुलाब घेण्यास सांगितले.

ताई दहा वाजताच येऊन थांबल्या. बोरिवली बसने मूर्ती येणार होती. मूर्ती माहीम येथे उतरवण्यास बसचालकाने होकार दिला होता. मात्र तसे न घडल्याने मूर्ती तोनसे यांचे घरी पोहोचेपर्यंत साडेचार वाजले.

प्रसादाच्या जेवणाची सगळी तयारी केलेली होती. उशीर होतोय असं पाहून सर्व भक्तांनी प्रसाद घ्यावा असं ठरलं. त्याप्रमाणे नेवैद्य दाखवला. प्रसादाची बर्फी सगळ्यांना दिली तशी ताईंनापण दिली. ताईंनी ती खाण्यासाठी म्हणून तोंडापर्यंत नेली.

अचानक त्यांचा हात खेचला गेला. आवाज आला, ''कृष्णा, तू मला सोडून प्रसाद खाणार? माझी वाट नाही बघणार?'' ताईंनी ताबडतोब हातातला प्रसाद खाली ठेवला आणि मी विश्वजननी आल्यावर घेईन असं सांगितलं.

इकडे हॉस्पिटलमध्ये नारकरकाकांची रक्तातली साखर कमी होऊन ते बेशुद्ध झाले. काकींचा घाबरून फोन आला. ताईपण हे ऐकून अस्वस्थ झाल्या. म्हणाल्या, 'मी थोडावेळ ध्यान करते.' थोड्या वेळाने त्या ध्यानातून बाहेर आल्यावर त्यांनी सांगितले, 'माझ्या हातावर साखर दे. साखर खातो. काकांची साखर कमी झाली होती. आता ते ठीक आहेत.' असं ताई सांगत असतानाच नारकरकाकींचा फोन आला, 'काका आता शुद्धीवर आले आहेत. डॉक्टरांनी काळजीचे काही कारण नाही म्हणून सांगितले आहे. ताईंनी येण्याची घाई करू नये.' देवी साडेचारला आली. कृष्णाने आणलेले लाल फूल, प्रसाद देऊन तिची पूजा आणि स्वागत केले. त्या दिवशी देवीने प्रसाद ताईंच्या तोंडून खाल्ला.

कृष्ण नेहमी दहावी बारावीच्या मुलांना परीक्षेसाठी पेन द्यायचा. तेव्हा तोनसे यांची मुलगी दहावीत होती. पंचवीस तारखेला परत जायच्या आधी ताईंनी तिला जवळ बोलावले व परीक्षेसाठी तिला पेन दिला. सगळ्यांना कळेना की परीक्षेला इतका अवकाश असताना कृष्ण घाईघाईने आजच पेन का देतोय?

त्या दिवशीच ताईंनी तोनसे यांचेकडे काही भक्तांना फोन करून सांगून बोलावून घेतले. खरं तर असं ताई स्वत: कधीच कोणाला बोलवून घेत नसत. त्या सर्वांशी ताई बोलल्या आणि म्हणाल्या, 'सतत 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' म्हणत राहा. हेच तुमचे कवच आहे. आताचा काळ असा आहे की याच मंत्राची फार आवश्यकता आहे. सर्वांवर नजर फिरवून म्हणाल्या, 'कायम ह्या मंत्राच्या छत्रछायेत राहण्याचा प्रयत्न करा. तोच तुमचा तारणहार आहे.' कळत नकळत ताई सर्वांचा निरोप घेत होत्या का?

नारकरकाका हॉस्पिटलमध्ये असताना वैभवी त्यांना भेटायला गेली. तेव्हा ताई तेथेच होत्या. त्या वेळेस ताईंनी वैभवीला सांगितले, 'वैभवी, कृष्ण म्हणतो,' ''मला तुझ्याकडून एक वस्तू पाहिजे.'' वैभवीला अगदी आनंद झाला कारण गेले कैक दिवसांपूर्वी कृष्णाने वैभवीस सांगितले होते की, ''मी सांगेपर्यंत तुम्ही उभयतांनी काही आणायचे नाही.'' आणि आज कृष्णच काहीतरी मागत होता. 'कृष्णा, काय आणू तुझ्यासाठी? सांग तरी.' ''ऐक, ताईसाठी एक अगदी पांढरेशुभ्र वस्त्र आणून दे.'' तेथे जवळच दिनेश बसले होते, ते पटकन् म्हणाले, 'कृष्णा, नुसत्या पांढऱ्यापेक्षा

काही सेल्फ प्रिंट असलेली आणायची का?' कृष्णाने अत्यंत गंभीर स्वरात सांगितले, ''दिनेश, तसं नाही चालणार. वैभवी, अगदी पूर्ण पांढरी अशीच आण.'' त्याप्रमाणे त्याच दिवशी वैभवीने अगदी मऊसूत अशी पूर्ण पांढरी साडी आणून कृष्णाला अर्पण केली.

त्यानंतर थोडे दिवसांनी, वैभवीला असे स्वप्न पडले की एक मोठी मिरवणूक आहे. ताईंना सरकारी प्रथेप्रमाणे ध्वजात लपेटले होते. अगदी लष्करी प्रथेप्रमाणे सगळे चालले होते. वैभवी खूपच अस्वस्थ झाली. तातडीने तिने आईला फोन केला व स्वप्न सांगितले. ताईंनी तिला हसत हसतच उडवून लावले आणि म्हणाल्या, 'अगं, अशी स्वप्नं काय खरी असतात? उलट स्वप्नात एखादे माणूस गेलेले दिसले, तर त्याचे आयुष्य वाढतेच.' असं सांगून तिची समजूत काढली.

काकांच्या ऑपरेशनसाठी ताई १५ जानेवारी ते २ फेब्रुवारी पर्यंत मुंबईतच होत्या. ठराविक भक्तांशिवाय याची कोणालाच कल्पना नव्हती. सगळ्यांची अशी समजूत होती की कृष्णाने विश्वजननीच्या स्थापनेच्या आधी ताईंना ध्यानासाठी कोठेतरी जायला सांगितले असावे.

त्यामुळे तीन तारखेला ताई बदलापूरला आल्या आहेत हे कळताच, मंदिरात ताईंना भेटायला येणाऱ्यांची खूप गर्दी झाली. त्यातच मुंबईप्रमाणे इथेही ताईंनी काही भक्तांना निरोप पाठवून बोलावून घेतले होते. त्यांना पण आश्चर्यच वाटले होते. भेटायला या असा निरोप कधीच ताईंकडून येत नाही. ह्यावेळेस हे काय वेगळे?

बदलापूरला घरात मुलांना व नेहमी सेवेसाठी येणाऱ्या भक्तांनापण ताईंच्या वागण्यातले वेगळेपण जाणवत होते. मात्र हेच ते वेगळेपण असं काही दाखवता येत नव्हते. ताईंनी दिल्लीची बॅग भरली. आठवणीने वैभवीकडून मागून घेतलेली पांढरी साडी त्या बॅगेत ठेवायला लावली. सगळ्यांना सांगत होत्या, 'माझे अत्यंत महत्त्वाचे ध्यानाचे वस्त्र आहे. कोणी बघायला बाहेर काढले तर आठवणीने आत ठेवा बरं का!'

ताईंनी स्वत:चे कपाट सर्व खाली केले. कितीतरी भक्तांना प्रसादाची वस्त्रे दिली. काहींना वस्तू दिल्या. सर्वांना वाटत होते, विश्वजननीच्या स्थापनेसाठी जाताहेत म्हणूनच हे सर्व चालले आहे. ताईंना खोकला वाटत होता. आवाज तर अगदी बसल्यासारखा झाला होता. बोलताना त्रास होत होता.

ताई त्या दिवशी वरती रेशमाकडे (सून) जाऊन पूर्ण घर फिरून आल्या. तसंच खाली बागेतपण चौफेर फिरून आल्या. कित्येक झाडे, त्यांनी आणि बाबांनी लावलेली

होती. जणू त्या वास्तूच्या कणाकणाचा निरोप घेत होत्या. मुलांना बोलावून सांगितले, 'कोणाची काही बिले द्यायची राहिली असतील, तर ती देऊन टाका. दूधवाला, पेपरवाला, फोनबिल, लाईटबिल, वाणी, काम करणाऱ्या बायका प्रत्येकाचे पैसे आठवणीने देऊन झाले. इतकेच काय पण म्युनिसिपालिटीचे बिल भरले आहे का याची देखील त्यांनी खात्री करून घेतली. कोणी कोणी विचारले देखील 'ताई हे काय?' 'नाही हो. कृष्णाने सांगितले आहे, कोणाचे काहीही देण्याचे ठेवायचे नाही.' म्हणून मुद्दाम आज पुन्हा बँकेतून पैसे काढायला लावले, पेन्शन अकांउटमधून!

असं करता करता ताईंचा मुंबईला जायचा दिवस उजाडला. त्या दिवशी सकाळपासूनच ताईंचा मूड वेगळाच वाटत होता. सर्व येणाऱ्या भक्तांना 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' ह्या मंत्राच्या कृपेखाली राहा. एकमेव कृष्णच आहे आपल्या जीवनात, ही गोष्ट कधीच विसरू नका.' असं सांगत होत्या. अधूनमधून सारख्या डोक्यावरून हात फिरवत होत्या. पुन्हा एकदा सगळ्या खोल्यांमधून फिरून आल्या. स्वयंपाकाच्या मावशींना बोलावले. त्यांना मुन्नाच्या जेवणाची काळजी घ्यायला सांगितली. कृष्णाजवळ गेल्या, बाबांच्या फोटोशी जाऊन कृष्णाला नमस्कार करून, मंगेशाचे आशीर्वाद घेऊन, पुन्हा डोक्यावरून हात फिरविला आणि क्षणार्धात घराबाहेर पडल्या. त्या थेट गाडीत जाऊन बसल्या!

आता ह्या सगळ्या घटना आठवल्या की वाटते दहा तारखेला काय घडणार आहे ह्याची त्यांना पूर्ण कल्पना होतीच. मात्र त्यांनी कोणाच्या मनात तशी शंकासुद्धा येऊ दिली नव्हती. परब्रह्माची मायाच ती.

***

ॐ

ताई मुंबईत पोहोचल्या. नारकरकाकांना भेटून पुढे वैभवीकडे गेल्या. वैभवी सांगत होती की, 'आईला दिल्लीला जाण्यासाठी स्टेशनवर सोडायला संतोष जाणार होते, पण आईचा आग्रह होता, वैभवी तूपण मला पोहोचवायला चल. अवंती शाळेत गेलेली होती. तिला आणायला तसं दुसरं कोणीच नव्हतं. त्यामुळे अतिशय नाईलाजाने मला येता येत नाहीये, असं आईला सांगावं लागलं. त्यावर मात्र मग ती काही म्हणाली नाही. हे आईचं वागणं मात्र चांगलंच गोंधळात टाकणारं होतं. आई असा आग्रह कधीच करत नसे. मला नवलच वाटलं कारण आम्ही लगेचच दुसऱ्या दिवशी दिल्लीसाठी निघणार होतो. तिला मग त्याची आठवण दिली.'

ताई व इतर भक्तगण सात फेब्रुवारीला दिल्लीत पोहोचले. सात तारखेला संध्याकाळी आदल्या दिवशीचा जो पूजाविधी करायचा असतो तो करून झाला आणि सर्व मंडळी हॉटेलवर परतली.

सकाळी शास्त्रोक्त पद्धतीने सर्व विधी आणि पूजा करून विश्वजननीची प्रतिष्ठापना झाली. ताईंनी विश्वजननीला, राधाकृष्णांना फुले वाहिली आणि मग सर्व भक्तांनी 'ॐ नमो भगवते वासुदेवाय'च्या गजरात ताईंच्या डोक्यावर गुलाबाच्या पाकळ्यांचा अभिषेक केला. ही पूजा स्वीकारल्यानंतर ताई बोलू लागल्या, कृष्णाचा संदेश देऊ लागल्या.

'कृष्ण म्हणतो पहिल्या विश्वजननीची लॉस ऐंजेलिस स्थापना झाल्यावर, मला दुसरी विश्वजननी दिल्लीतच आणि तीही मिलिटरी एरियातच स्थापन व्हावी असं वाटत होतं. आपल्या भारताच्या रक्षणासाठी जे जवान सतत उभे असतात त्यांच्यासाठी आणि युवा पिढीसाठी मला आता उभे राहावे लागणार, म्हणून दिल्ली आणि मिलिटरी एरिया आवश्यक आहे.'

''माझा भक्त मला माझ्या प्राणापेक्षा प्रिय आहे. त्याने हृदयापासून मारलेल्या हाकेला मी धावत जातोच, थांबूच शकत नाही. हे जे काही कार्य चालते ते सर्व भक्तांच्या आराधनेनेच पार पडते. हे एकट्या दुकट्याचे कामच नाही. त्यासाठी सामुदायिक प्रार्थनेचीच गरज आहे. माझ्या सर्व ज्ञात आणि अज्ञात भक्तांच्या, भारताच्या, युवापिढीच्या तसंच विश्वाच्या उत्कर्षासाठी श्रीकृष्णलीलाकेंद्रात नियमित जाणे गरजेचे आहे.''

'आपल्या सगळ्या भक्तांचे प्रेम, भक्ती, श्रीकृष्णाचा मोह आणि विश्वजननीच्या मायेमुळेच ह्या मूर्तीची स्थापना होत आहे. स्थापनेनंतर विश्वजननीने मला सांगितले, ''योगेश्वरा, तू जे माझ्यावर कार्य सोपवले आहेस ते मी शंभर टक्के पुरे करेनच. जो भक्त माझी श्रद्धेने, भक्तीने आराधना करेल त्याच्यासाठी मी त्वरित धावत जाईन. मला जागृत करण्याची शक्ती तुमच्यात आहे. तुमच्या भक्तीमुळे, प्रेमामुळेच मला जागृती मिळेल. भगवान् श्रीकृष्ण आपले आहेत आणि आपण श्रीकृष्णाचे आहोत हे कधीही विसरू नका.'' भगवंत म्हणतात, ''मी एखाद्याच्या सेवेचा स्वीकार करतो तो अत्यंत पारखूनच करतो. आता अजून सात ठिकाणी विश्वजननीची स्थापना होणार. त्यातील सातवी दोह्यात स्थापन करणार.''

भगवान श्रीकृष्ण आणि विश्वजननी तुमच्यासाठीच उभे आहेत. श्रद्धा आणि विश्वासाने तुम्ही त्यांना साद घाला, आराधना करा. त्यांची कृपा सदैव तुमच्यावर राहो; हीच मी त्यांच्या चरणी प्रार्थना करते.' असं सर्वात शेवटी ताई म्हणाल्या. नंतर एका कृष्णभक्ताला कृष्णाने त्याची सोन्याची बासरी प्रसाद म्हणून दिली. नंतर महाप्रसाद झाला.

त्या महाप्रसादाची ज्या केटररला ऑर्डर दिली होती तो, ताईंचा विलक्षण साधेपणा, चेहऱ्यावरचे अलौकिक तेज व त्यांचा संदेश ऐकून इतका भारावून गेला की, तो त्या पूर्ण प्रसादभोजनाचे काही पैसेच घेईना. ताईंना म्हणू लागला, 'मेरी तरफसे कृष्णभगवान और माताजी को मैंने भोग चढाया है।' ताईंनी त्याला हरप्रकारे सांगूनही तो तयारच होत नव्हता. तेव्हा ताई म्हणाल्या, 'यह सिर्फ पैसा नहीं, यह श्रीकृष्ण भगवानका आशीर्वाद है। क्योंकि यह उनके भांडारसे दिया है। भगवान की तरफसे जो मिलता है उसे ना नही कहते। इसीलिये आपको यह लेना ही पडेगा।' असे म्हटल्यावर त्याने ते अत्यंत नाईलाजाने घेतले.

नंतर त्या दिवशी श्रीकृष्णाने सांगितल्याप्रमाणे ताईंनी ध्यान केले.

नऊ तारखेला सकाळी विश्वजननीला अभिषेक करायचा होता. त्यानंतर कर्नल शर्मांच्याकडे श्रीकृष्णलीलाकेंद्राची स्थापना होणार होती. दुपारी तीन वाजता कँटोन्मेंट एरियामधील हनुमान मंदिरात जायचे आणि नंतर ध्यान करायचे असा भरगच्च कार्यक्रम होता.

सकाळी साडेआठलाच ताई विश्वजननी मंदिरात जाण्यासाठी बाहेर पडल्या. अनेक कृष्णभक्तांच्या मोठमोठ्या शानदार गाड्या होत्या. प्रत्येकालाच ताईंना आपल्या गाडीतून न्यायचे होते. कृष्ण कोणाच्या गाडीतून जाणार याची सर्वांनाच उत्सुकता होती.

एका भक्ताकडे मारुती ८००चे जुने मॉडेल होते. तो संकोचून लांब उभा होता. ताई जेव्हा पायऱ्या उतरून खाली आल्या, तेव्हा त्यांनी नेमके त्यालाच विचारले, 'अरे, तू गाडी आणली आहेस का?' तो एकदम गडबडून गेला, म्हणू लागला, 'हो आणली आहे. पण माझी जुनी छोटी गाडी आहे.' ताई म्हणाल्या, 'अरे कोणतीही चालेल. कृष्णाला तुझ्या गाडीतूनच यायचे आहे.' त्याचा आनंद गगनात मावेना. ते गाडी आणण्यासाठी अक्षरश: धावत सुटले. निखळ आनंद द्यावा तो कृष्णानेच!

विश्वजननीचा अभिषेक झाला. ताईंनी वैभवीला बोलावले व कृष्णाने तिला एक कलश दिला. वैभवी म्हणाली, 'कृष्णा, आता का मला कलश देतोस? आई, माझ्या वास्तुशांतीला तू येशील तेव्हाच कलश दे नं! तूच माझ्या नवीन घराची वास्तुशांत करणार नं. तेव्हाच तो मी घेईन, आत्ता मला नको.' त्यावर मात्र कधी नव्हे ते कृष्णाने वैभवीला रागावून सांगितले, ''वैभवी, मी काय सांगतो ते ऐक, हा कलश आत्ताच तुला देतोय, तो घे.'' आणि तिला तो घ्यायला लावला.

ताई दोनतीन भक्तांना घेऊन शर्मांकडे केंद्रस्थापनेसाठी गेल्या. केंद्र स्थापन झाले. बाकीच्या भक्तांचे जेवण तेथेच झाले. कृष्णाने ताईंना तेथे जेवू दिले नाही.

ताई हॉटेलवर आल्या. वेळ थोडाच होता. तेव्हा जावयाने विचारले, 'उद्या दहा तारखेला माझ्या आई-वडिलांच्या लग्नाचा वाढदिवस आहे. अनायसे तुम्हीपण बरोबर आहात. आपण सर्वच इथे एकत्र आहोत. तेव्हा उद्या सकाळचे जेवण आमच्यातर्फे देऊन आम्ही तो साजरा करू का?' त्यावर ताईंनी, नुसतंच 'संतोष, ते काही जमेलसं वाटत नाही.' असं उत्तर दिलं होतं. संतोषना आश्चर्य वाटले. कारण कृष्णाचा दुसरा काही प्रोग्रॅम ठरलेला नव्हता. तरीही आई जमेलसं वाटत नाही असं का म्हणत आहेत बरं? त्यांना जरा वाईटही वाटलं होतं.

ताई हनुमान मंदिरात ध्यानास गेल्या. त्या मंदिरातून जेव्हा हॉटेलवर परत आल्या तेव्हा खूपच थकवा चेहऱ्यावर जाणवत होता. संथ पावलांनी ताई खोलीत आल्या. दार बंद झाले आणि थोड्या वेळाने ताईंचा निरोप आला. तुम्हाला कोणाला बाहेर जाऊन यायचे असेल तर जाऊन या. माझे आठ वाजेपर्यंत ध्यान आहे. मला कोणी उठवू नका. सकाळपासून ताईंनी थोडासा डोसा व ज्यूस याव्यतिरिक्त काही घेतले नव्हते. त्यात त्यांनी इन्शुलीनचा डोस पण घेतलेला. प्रवास, ध्यान याची दगदग. या विचाराने बरोबरच्या भक्तांना फार काळजी वाटू लागली. एकदा डॉक्टरांना दाखवून घेऊ या, असा विचारही त्यांनी केला. ते आता आठ वाजण्याची वाट पाहू लागले.

ध्यान झाल्यावर ताई बाहेर आल्या. चेहरा छान हसरा, एकदम ताजा तवाना झालेला. सगळ्यांनीच सुटकेचा निःश्वास सोडला. सगळ्यांनाच खूप आनंद झाला. तरीपण धीर करून आपण डॉक्टरांना बोलवू या का? असं ताईंना विचारलं. ताई प्रसन्न हसल्या आणि म्हणाल्या, 'हे बघा, डॉक्टरांना आणायच्या भानगडीत पडू नका. जेव्हा अशी स्थापना होते त्यावेळी कृष्ण मला तीन दिवस ध्यान करायला सांगतो. त्यामुळे तुम्ही घाबरून जाऊ नका. जरूर वाटली तर मी सांगेन डॉक्टरांना आणायला.'

नंतर संतोषकडे वळून म्हणाल्या, 'संतोष, कृष्ण म्हणतो, ''आज तुम्ही माझ्यासाठी लस्सी मागवा,'' तर मी लस्सी घेते.'

असं म्हणून ताईंनी सगळ्यांना जेवायला पाठवून दिले. लस्सीचे पण तीनच घोट घेऊन त्या ध्यानासाठी उठल्या व ध्यान करू लागल्या. त्या आधी सगळ्यांसाठी निरोप दिला, 'माझे उद्या सकाळी नऊ वाजेपर्यंत ध्यान आहे. मला कोणी उठवू नका.'

दहा तारीख उजाडली. ताईंनी सांगून ठेवल्याप्रमाणे कोणी सकाळी त्यांच्याकडे नमस्कारालासुद्धा गेले नव्हते. त्यांच्या रूममध्ये दोघीजणी कृष्णभक्त होत्या. त्यांनीही हळूहळू आवाज न करता आपले आवरून घेतले होते.

नऊच्या सुमारास ताईंना नमस्कार करायला वैभवी आली. जवळ जाऊन बघते तर ताईच्या अंगावर तिच्याकडून मागून घेतलेली पांढरी साडी होती. एक हात आशीर्वाद दिल्यासारखा वर होता. तिने जवळ जाऊन आईला हाक मारली, 'आई, असा हात ठेवून का ध्यान करते आहेस?' असे म्हणत तिने पायाला हात लावून नमस्कार केला. नमस्कार केल्यावर तिला पाय गार वाटले. तिने ताईंना हलवून जागे करायचा प्रयत्न केला. त्या काहीच प्रतिसाद देत नाहीत असे बघून तिने घाईघाईने, मोठ्यांने हाका मारून इतर भक्तांना बोलावले आणि सांगू लागली, 'कोणीतरी लवकर डॉक्टरांना बोलवा. आई उठत नाहीये.'

कोणालाच काय झाले आहे हे कळेना. एकजण डॉक्टरांना आणायला धावले. सगळ्यांनाच खात्री होती की ताईंनी स्वतः सांगितले होते माझे ध्यान आहे तर त्या ध्यानातच असणार. ह्यातून त्या निश्चित बाहेर येतील. सगळे घाबरून 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हा जप करायला लागले.

थोड्या वेळाने डॉक्टर आले. त्यांनी ताईंना तपासले. एका दमात ते म्हणाले 'नो होपस्!' कोणीच त्यावर विश्वास ठेवायला तयार नव्हते. कितीदातरी ताईंचे अगदी

मेल्यासारखे गाढ ध्यान असायचे. तसेच आजपण आहे, अशीच सगळ्यांची खात्री होती. तरीसुद्धा ताईंना अपोलो हॉस्पिटलमध्ये न्यायचे ठरले.

अपोलो हॉस्पिटलमध्ये आयसीयूमध्ये नेले. तेथे सर्व प्रकारचे प्रयत्न आणि तपासण्या करून झाल्या आणि शेवटी डॉक्टरांनी सांगितले, 'त्या आता नाहीत.' त्यांचे हे शब्द ऐकताच बरोबरच्या लोकांना पुन्हा पुन्हा वाटत होते की डॉक्टरांचे काहीतरी चुकते आहे. कितीतरी संतांच्या चरित्रात असे दाखले आहेत की ते जेव्हा गाढ ध्यानात असत, तेव्हा जिवंतपणाचे कोणतेही लक्षणे जाणवत नसे. तसंच आमच्या गुरुमाउलींचे पण असणार हो! पण शेवटी सर्वांनाच सत्य परिस्थितीला सामोरे जावेच लागले. काहीजण पुढच्या तयारीला लागले. पुढची कार्यवाही पार पाडून लवकरात लवकर ताईंसह सर्व जण बदलापूरला जाण्याच्या व्यवस्थेला लागले. हॉटेलवर जाऊन सगळ्यांना निरोप देऊन ताबडतोब सामान आवरून ठेवा. कधीही निघायला लागेल असे सांगितले.

सर्व सोपस्कर होऊन, सर्वजण सव्वासहा वाजता विमानात चढले व विमान सुटले.

सकाळीच ही दु:खद बातमी मुंबईत नारकराकाका, नंदा, मुन्ना ह्यांना कळवली. कोणाचाच विश्वास बसत नव्हता. त्यांनी सर्व कृष्णभक्तांना ही बातमी कळविण्यास सांगितले. ताईंनी समाधी घेतली, ही बातमी वाऱ्याच्या वेगाने सर्वदूर पसरली आणि मग सतत फोन वाजू लागले. परदेशातून, परप्रांतातून आणि पुणेमुंबईसह महाराष्ट्रातील अनेक गावांमधून विचारणा होऊ लागली. बहुतेकांचे म्हणणे असेच होते की हेही ताईंचे मेल्यासारखे ध्यानच आहे. पुढील गोष्टी करण्याआधी खात्री करून घ्या. पण ह्यावेळेस मात्र हा वेडा विश्वास ठरला.

लोकांच्या झुंडीच्या झुंडी मुंबई विमानतळावर आणि बदलापूरला येऊ लागल्या.

अकरा तारखेला दुपारी बदलापूरच्या स्मशानभूमीत ब्रह्मवृंदांनी केलेल्या वेदांच्या घोषात ताईंच्या दोनही मुलांनी ताईंना मंत्राग्नी दिला. 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' आणि 'ॐ महान शक्ती देवताय नम:' ह्या मंत्रघोषात प.पू. ताई अनंतात विलीन झाल्या.

दहाव्या दिवशी तिलांजलीसाठी बरेच भक्त आले होते. तेथील सर्व विधी जुन्या परंपरेने चालले होते. पिंडाला होणारा काकस्पर्श बघण्याची इच्छा सर्वांनाच होती. त्यावेळेसही ताईंचे विश्वजननीपद सार्थ ठरावे असेच दृश्य पाहावयास मिळाले. पिंड ठेवल्यावर एक कावळा आपल्या पिल्लांसह तेथे येऊन बसला. त्याने पिंडातला भात आपल्या चोचीत घेऊन प्रथम पिल्लांना भरवला. त्यावर एकजण म्हणाले, 'ताई म्हणजे

साक्षात् विश्वजननी, साऱ्यांचीच माऊली होती. मग कावळा तरी पिल्लाला घास दिल्याशिवाय खाईलच कसा?'

विश्वजननीच्या प्रतिष्ठापनेनंतर कृष्णाने जे जाहीर केले होते की, ''आजपासून तू विश्वजननी झालीस ताई! आता मी तुला ताई नाही म्हणणार, तू माझी साथीच झालीस,'' त्याप्रमाणे कृष्णाने ताईंना साथी बनवून स्वत:तच विलीन करून घेतले.

ताईंचे हे अगदी अकल्पित समाधिस्थ होणे सर्वांच्याच हृदयाला चटका लावून गेले. अनेकांना जबरदस्त मानसिक धक्काच बसला. ताईंच्या कुटुंबियांप्रमाणेच कृष्णभक्तांवरही हा मोठाच आघात होता.

ताईंनी समाधी घेऊन आज एक तपाहूनही अधिक काळ लोटला आहे. दिल्लीच्या विश्वजननीस्थापनेनंतर, कर्नाटकात हलदीपूर, बदलापूर, मुंबई, पुणे, रत्नागिरी आणि रांची अशी एकंदर आठ ठिकाणी स्थापना झाली आहे. पुढील स्थापना दोह्यामध्ये व्हायची आहे. श्रीकृष्ण- इच्छेने ती पण योग्यवेळी घडून येईल.

ताईंच्या प्रेरणेतून आज देश-परदेशात जवळजवळ ४९० श्रीकृष्णलीलाकेंद्रे व इतर देवतांच्या स्थापन झालेल्या मंदिरात सामुदायिक उपासना चालू आहे. त्यातून प्रेरणा घेऊन अनेक भक्त आपली आध्यात्मिक प्रगती करून घेण्याच्या मार्गावर आहेत. त्यायोगे 'ॐ नमो भगवते वासुदेवाय।' 'ॐ महानशक्ती देवताय नम:।' हा मंत्रघोष आसमंतात निनादत राहिला आहे. निनादत राहील, अनंत काळ!!

***

ॐ

ताईंकडे येणारी माणसे 'कृष्ण बोलतो' म्हणजे काय या उत्सुकतेपोटी किंवा आपल्या व्यावहारिक, प्रापंचिक, आध्यात्मिक अडचणींवर उपाय विचारण्यासाठी येत असत. त्यांच्या येण्याचा उद्देश जरी वेगवेगळा असला तरी एकदा का ती मंडळी यायला लागली की हळूहळू त्यांच्याही नकळत तीही कृष्णप्रेमाकडे, कृष्णभक्तीकडे वळत. मग कृष्णाचे आकर्षण, प्रेम, वात्सल्य ह्याचा अनुभव घेण्यासाठी ती मंडळी सतत बदलापूरला येत व ताईंच्या संपर्कात राहण्यासाठी धडपडत असतं. तसेच अनेकजण आपल्या मनात येणाऱ्या असंख्य शंकाचे निरसन ताईंना प्रश्न विचारून करून घेत असत. कृष्णही मोठ्या प्रेमाने त्यांचे समाधान करत असे. अशी काही प्रश्नोत्तरे :

१. ताई, कृष्ण तुमच्याशी बोलतो, आदेश देतो, तुमच्यामार्फत वावरतो तर ह्या सगळ्यासाठी तुम्ही किती वर्षे तपस्या आणि उपासना केलीत?

उत्तर : खरं सांगू का, हे म्हणजे आई-मुलांच्या नात्यासारखं आहे. आई आपल्या मुलाला, त्याने काही करो न करो, तरी त्याला परत परत कुशीत घेऊन माया करत असते. तसं माझं नवदुर्गा (महानशक्ती) आणि कृष्ण यांच्याशी नातं आहे. त्यासाठी ह्या जन्मात तरी मी काहीही वाचन, ध्यान, तपश्चर्या केलेली नाही. मात्र ह्या दोघांनीही मला त्यांच्या जवळ, अगदी ओढून जवळ घेतले आहे. हा त्यांच्या कृपेचाच भाग आहे.

(प.पू. ताईंचा जन्म हा ईश्वरी संकेतानुसार झालेला होता. तसा दृष्टांत त्यांच्या आईला त्यांच्या जन्माच्या आधीच झालेला होता. तपश्चर्या म्हणाल तर ताईंचे जीवन म्हणजेच एक तपश्चर्या होती. कारण त्यांचे ध्येय होते कृष्णाचा शब्द तंतोतंत पाळणे. त्यासाठी सर्वस्वाची आहुती देऊन त्यांनी तो सदैव जपला.)

२. कृष्णा, तू हा पाकळ्यांचा अभिषेक का करतोस?

उत्तर: मी माझ्या हजारो भक्तांची जबाबदारी घेतो. त्यांच्या पाठीशी उभे राहीन, असे वचन देतो. त्याचं प्रतीक म्हणून मी हा असा पाकळ्यांचा अभिषेक करतो. तुम्ही फक्त एकच लक्षात ठेवा. तुमच्या माझ्यावरच्या श्रद्धेला कधीही तडा जाऊ देऊ नका. मी तुमच्यासाठी सतत उभा राहिलो होतो, उभा राहिलेला आहे आणि पुढेही तसाच उभा राहणार आहे. हे माझं तुम्हाला दिलेलं वचन आहे.

३. कृष्णा, जीवन म्हणजे नुसते आयुष्य का? ते सफल होण्यासाठी काय करावे?

उत्तर : नुसते आयुष्य, म्हणजे जीवन नव्हे. तसं पाहिलं तर मुक्या जनावरांनासुद्धा भरपूर आयुष्य असते. पण त्याला 'जीवन' म्हणता येणार नाही. आयुष्यात येणारी सर्व सुखदु:खे, कष्ट, जबाबदाऱ्या पेलताना होणारी जिवाची घालमेल म्हणजेच जीवन.

असे जीवन जगताना व्यवहार करताना खरे, खोटे बोलावे लागते. एखाद्याचे मन दुखवावे लागते. स्वत:च्या इच्छा, मन मारावे लागते. प्रत्येकाला हे करावेच लागते. जरूर असं वागा. पण झोपताना एकदा तरी माझे मनापासून स्मरण करून हे सर्व 'श्रीकृष्णार्पणमस्तु' असे म्हणून, दिवसभरातली सर्व कर्मे मला अर्पण करा. स्वकर्म मला अर्पण करणे तेवढे सोपे मात्र नाही. कारण काही चांगले झाले तर ते मी केले हा अहंकार आड येतो; आणि वाईट घडलेले मला जरी अर्पण केले, तरी ज्याच्यामुळे वाईट घडलेले असते त्याच्यावरचा राग आणि द्वेष मनातून जात नाही.

सर्व चांगल्याचेसुद्धा कर्तृत्व माझ्याकडे द्या. माझ्या इच्छेने सर्व भोग भोगा. असे प्रत्येक कर्म मला अर्पण करत टक्केटोणपे खात आयुष्य जगा. माझा आधार घ्या. माझ्या छत्राखाली राहा. सारे संत पण माझ्याकडे सहज येऊ शकत नाहीत. ते आयुष्यभर जननिंदा, अवहेलना, अवमान, बहिष्कार वगैरे सोसत आपले जीवन शांतपणे जगतात. माझ्यावर त्यांचा दृढ विश्वास आणि पूर्ण श्रद्धा असते. हे संत म्हणजे माझी रूपेच आहेत. त्यांच्या कष्टात मी त्यांना हात दिला, त्यांना बांधला गेलो तो केवळ त्यांचा भोळा भक्तिभाव पाहून. माझ्यासाठी ह्या संतांनी सर्वस्व अर्पण केले होते. अशा भोळ्या भक्तांचा मी दास होतो. सखा होतो, पण अशी भोळी भाबडी भक्ती करायला वाटते तेवढी सोपी नाही. अशा भक्तीत संपूर्ण शरणागती आहे. अहंकार सोडून जिवाभावाने माझे होऊन राहणे आहे. माझ्यात समरसून जाणे आहे.

(अक्कलकोटच्या गुरुमंदिरात तेथील सेवेकरींनी स्वामींच्या चर्मपादुका ताईंच्या हाती ठेवल्या, तेव्हा अत्यंत प्रेमाने, हळुवारपणे, वात्सल्याने त्यांच्यावर हात फिरवत ताई एक वाक्य बोलून गेल्या, ''आम्हा संतांना किती गं ते कष्ट सहन करावे लागतात! पण त्यासाठीच त्यांचा जन्म असतो नं,'' त्याची इथे आठवण होते.)

४. कुलदेवी म्हणजे काय?

उत्तर : ''अरे, कुलदेवी म्हणजे काय हे मला विचारतोस? घरी तुझे आई, बाबा कोणी वडिलधारे असतील नं, त्यांना विचार. तिची माहिती घे. तिचे चिंतन कर, ध्यान

कर, सेवा कर आणि मग मला प्रश्न विचारायला ये,'' कृष्णाने परखडपणे सांगितले.

''असं बघ, की आपलं जे कुलदैवत असते ते आपल्या घराचा, कुळाचा सगळा भार घेत असते. ते आपले रक्षण करत असते. त्यामुळे कुलदेवतेची सेवा न करता माझी सेवा केली, तर अशी सेवा मला पोहोचत नाही. मला त्याचा स्वीकार करता येत नाही. तुमचे आद्य कर्तव्य म्हणजे, तुमच्या घराण्याचा अभिमान बाळगणारी जी कुलदेवता आहे तिची सेवा करणे.''

५. ताई, मी देवाचे खूप करतो. पण माझा त्रास, कष्ट, भोग काहीही कमी होत नाहीत. माझे भोग पाहणाऱ्यालाही दया येते. पण देवाला येत नाही. असे का?

उत्तर : ह्यावर कृष्णाने उत्तर दिले, ''तुझ्या भयंकर भोगाची तुलना ऋषिमुनींच्या कष्टांशी, त्यांच्या खडतर तपश्चर्येशी करून पाहा म्हणजे कळेल तुला 'भोग' म्हणजे काय ते! ही तक्रार पुष्कळजणांची असते. पण आपण नेहमी आपल्यापेक्षा खालच्या परिस्थितीतल्या लोकांकडे पाहावे. वरच्या लोकांकडे पाहू नये. म्हणजे आपला त्रास फारच कमी आहे; नव्हे, आपण तसे फारच सुखात आहोत हे तुम्हाला पटेल. पायी चालणाऱ्याने मोटारीत बसलेल्याकडे न बघता, अनवाणी चालणाऱ्याकडे पाहावे.

आपण पुनर्जन्मावर विश्वास ठेवलाच पाहिजे. जन्माला येताना प्रत्येक जीव आपले पूर्वजन्मातले संस्कार, आपले पूर्वकर्म व घराण्याचा वारसा घेऊनच जन्माला येतो. आत्ता तुम्ही जे कर्म करता, त्याचा उपयोग पूर्वजन्मातले दोष घालविण्यासाठी होतो. एक लक्षात ठेवा. मी नेहमी सत्याच्या बाजूने असतो. कोणावरही अन्याय होऊ देत नाही. मला तुमची तीनही पाने (भूत, भविष्य आणि वर्तमान) वाचता येतात. त्या अनुसार मी योग्य वेळी, योग्य फळ देतो. माझ्यावर विश्वास ठेवा.

६. एका साधना करणाऱ्या बाईंनी ताईंना प्रश्न विचारला, 'ताई कितीही जप, ध्यान केले तरी मनातले द्वैत संपत नाही. चराचरात रामकृष्ण दिसावेत, अशी माझी इच्छा आहे. त्यासाठी काय करू?'

उत्तर : 'तुम्ही तुमच्या गुरूंनी दिलेले नाम घेता. त्याचा जप करता. त्यांनी दिलेली साधना करता. त्याने तुमच्या मधील ॐकाराची जागृती होईल, पण त्या गुरुमंत्राबरोबर आत्ताच्या काळाला आवश्यक असा मंत्र 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' ह्याचाही जप करा, म्हणजे तुमच्यातला ॐकार त्वरित जागृत व्हायला मदत होईल. ॐकार जागृत झाला, की मग तुम्हाला सर्वत्र रामकृष्ण दिसायला लागतील.

७. ताई, कृष्णाने प्रसाद स्वीकारला का?

उत्तर : माझे रूप ॐकार, म्हणून प्रसादाचा स्वीकार केल्यावर तेथे तो उमटतो.

हा काही चमत्कार नव्हे.

८. ताई, कृष्ण तीनच घास का खातो?

उत्तर : खरं म्हणजे परब्रह्माला काहीच लागत नाही. तो फक्त वासाचा धनी आहे. तरीही तो तीन घास खातो. का? त्याने खाल्लं की भक्तांना फार आनंद होतो; आणि तीनच घास का तर एक घास भक्तांसाठी, दुसरा जे ताईला ओळखत नाहीत अशा अज्ञात भक्तांसाठी आणि तिसरा परब्रह्मासाठी. सृष्टीतील त्रिगुणात्मक तत्त्व म्हणजे सत्त्व, रज आणि तम; ब्रह्मा, विष्णू, महेश; सत्यम्ः, शिवम्ः, सुंदरम्; स्वर्ग, मृत्यू, पाताळ इत्यादीं तत्त्वांचा पालनकर्ता म्हणजे परब्रह्मच.

९. ताई, तुम्ही मला मी आणलेलाच प्रसाद दिलात?

उत्तर : 'म्हणजे? तो तू मला दिला नव्हतास का? एकदा दिला म्हणजे दिला. ती अर्पण केलेली वस्तू तुझ्या डोळ्यादेखत चोरीला गेली. तरी ती देवाची वस्तू गेली, तुमची नव्हे, हे लक्षात ठेवा.

१०. ईश्वरदर्शन कसे होते?

उत्तर : ईश्वर स्वत: प्रगट होऊन कधीच दर्शन देत नाही. तू माणसामाणसातला ईश्वर पाहा. स्वत:च्या कृतीत ईश्वर पाहा. तू कृष्णाला सुरेख हार आणलास. त्याचे सौंदर्य व सुगंध दोन दिवस टिकले. त्याचे कौतुकही सर्वांनी केले. तुलाही अत्यानंद झाला. हेच ईश्वरदर्शन!

११. ताई, मुक्ती म्हणजे काय?

उत्तर : मुक्ती म्हणजे तुम्ही सर्वार्थाने माझ्याकडे येणे. तेथेच तुम्हाला अखंड समाधान आणि नित्यानंद मिळतो. तीच खरी मुक्ती.

ह्या कलियुगात मनुष्य वावरतो. श्रद्धा ठेवून गुरूची सेवा करतो. ती करताना कर्तव्यदक्ष राहून, योग्य प्रयत्न केल्यानंतर जे घडेल ते परब्रह्माच्या इच्छेने घडते असं मानून मिळेल त्या फळाचा स्वीकार केला की त्यातून अखंड समाधान आणि नित्यानंद मिळतो.

म्हणून सांगतो की, 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' ह्या मंत्राची आराधना हा मुक्तीचा, शांतीचा, अध्यात्माचा, परब्रह्माकडे येणाऱ्या पूर्णावताराला साकारण्याचा एकच मार्ग आहे. लक्षात ठेवा, 'ॐ नमो भगवते वासुदेवाय.'

१२. ताई, कृष्ण सांगतो तू सर्व काही माझ्यावर सोडायला शीक. ह्याचा काय अर्थ?

उत्तर : माझ्या इच्छेशिवाय झाडाचे एक पानदेखील हलत नाही. मी जगन्नियंता आहे. सर्व गोष्टींचा सूत्रधार मी आहे. व्यवहारात जर बघितलं तर तुम्ही म्हणता, दाने

दाने पर लिखा है खानेवाला का नाम। जेव्हा तुम्ही एखादी गोष्ट कोणासाठी तरी करता. तेव्हा प्रत्यक्षात मात्र ती दुसराच कोणीतरी खाऊन जातो, तर हे कसे घडते?

तसंच तुम्ही अनेकदा असंही बघता की झाडाची इतकी छान निगा राखली. पण तरीदेखील झाड मेलं. ते का? ते कोणालाच माहीत नसतं. प्रत्येक जिवाचा किती श्वास हे ठरलेलं असतं. तुम्ही कितीही निगा राखा, काहीही करा, पण श्वास संपले की ते झाडही मरते. म्हणून कोणीही कोणतीही गोष्ट माझ्यामुळे (स्वत:) झाली असे मानून त्याचा अभिमान मानू नये; किंवा झाड गेले, त्याचे दु:खही करू नये. आनंद मानायचा झालाच तर हा आनंद मला परब्रह्मामुळे मिळाला असं मानलं, की त्या आनंदास अवीट गोडी येईल. उलट माझ्यामुळे झालं असं मानलं तर कधी ना कधी त्याचा शेवट येईल. त्यामुळे सुख, दु:ख सर्व काही तुम्ही माझ्यावर सोडा. कृष्णाची इच्छा असेल तसे घडेल, असं जेव्हा तुम्ही म्हणता तेव्हा त्या गोष्टीचा संपूर्ण भार माझ्यावर येतो आणि तो मी घेतो. परंतु मानवी जीवनात असं मानणं ही काही साधी, सहज गोष्ट नाही. मी तुम्हाला सांगत असतो की हे साध्य करण्यासाठी 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हा मंत्र जपा. मला ज्याच्याकडून जे करवून घ्यायचे असेल, त्याच्याकडून ते मी करवून घेईन. ज्याचे मला स्वीकारायचे नसेल, ते घेणार नाही. म्हणजे स्वीकारायचे नाही असं नाही. मात्र तुमच्या प्रारब्धात जेवढे असेल तेवढेच मी देतो व तेवढेच मी घेतो. कारण नियतीच्या बाहेर मी कधीही जाऊ शकत नाही. मीच केलेले नियम मी कधीच मोडत नाही. मी फुकट कोणाला काही देत नाही आणि फुकट कोणाकडून काही घेतही नाही. म्हणून मला योगेश्वर म्हणतात.

ईश्वर ह्याचा अर्थच असा की नश्वर गोष्टींमध्ये राहूनही, जो त्यांच्यात मिसळत नाही तो ईश्वर. म्हणून मला म्हणतात, योगेश्वर!

तुमच्या हृदयमंदिरात योगेश्वराची स्थापना करा. सर्व काही त्याच्यावर सोपवा म्हणजे सगळं व्यवस्थित होईल.

१३. घरातल्यांची साधना वेगळी असेल, तर स्त्रियांनी आपल्याला आवडणारी साधना कशी करावी?

उत्तर : घरातल्यांच्या विरुद्ध वागू नये. आपली मते, आपली साधना कशाच्या आड येऊ देऊ नये. करता येत असेल तर इतरांच्या नकळत करावी किंवा रात्री झोपण्यापूर्वी सगळी कामं पूर्ण झाल्यावर करावी. पण करावी मात्र नक्की. त्या साधनेमुळे घरातले वातावरण बिघडवण्याची गरज नाही.

१४. ताई टी.व्ही. मुळे मुले बिघडत आहेत. सुखसोयीमुळे तर ती फारच ऐदी, आळशी, बेफिकिर बनत आहेत. यावर उपाय काय?

उत्तर : घरात आपण थोडी शिस्त पाळली तर टीव्ही वाईट नाही. कितीतरी चांगल्या गोष्टी पाहायला मिळतात. सारे जग टीव्ही, फोन, वाहतुकीची साधने याने जवळ आले आहे. यामागे प्रगत विज्ञान आहे. अशी वैज्ञानिक प्रगती होत राहणारच. कालगतीचे चक्र फिरत राहणारच. त्यामुळे आपल्या परिस्थितीत होणाऱ्या बदलाशी आपणही आपल्या स्वभावात, आचारविचारात बदल करून जुळवून घेतले पाहिजे. असे करत असताना शिस्तही पाळली पाहिजे. आपल्याबरोबर मुलांनाही शिस्त पाळायला सांगितलं पाहिजे. तरच समाजात शिस्त राहून तो सुरळित चालेल. आपल्या श्रद्धा जपताना इतरांच्या श्रद्धांचाही आदर करायला शिकले पाहिजे.

प्रचलित होत असलेल्या वाईट वृत्तीचे वाईट परिणाम मुलांना समजावून सांगा. आपल्या आर्थिक कुवतीची जाणीव मुलांना द्या. सिनेमात क्षणात मिळणाऱ्या बंगला, गाड्या इ. सुखसोयी प्रत्यक्षात मिळवायला आयुष्य वेचावे लागते. हे त्यांना पटवून द्या. समाजाकडे, सामाजिक संस्थांकडे डोळसपणे पाहायला शिकवा. साधुसंतांवर, देवावर, आईवडिलांवर विश्वास ठेवायला शिकवा.

१५. डाव्या हाताने जपमाळ ओढली तर काय होईल?

उत्तर : डावा काय किंवा उजवा काय, हात तर दोनही आपलेच आहेत नं? सारी कामे आपल्याला उजव्या हाताने करायची सवय असते. चांगल्या कामासाठी डावा हात निषिद्धही मानला जातो. पण आपले हृदय तर डाव्या बाजूला असून ते डाव्या हाताच्या जास्त जवळ आहे. म्हणून दोनही हाताने काम करावे. जप पण जरूर करावा.

१६. सत्पात्री दान म्हणजे काय?

उत्तर : सत्पात्री दान ह्या शब्दाचा अर्थच असा की, ज्याला जितकी योग्य ती गरज असेल, ते देणे, म्हणजे असे दान. उदा. एखादा खूप श्रीमंत मनुष्य आहे. खूप भुकेलेला आहे. जवळपास कोठेही हॉटेल नाही. बरोबर पण काही शिदोरी नाही. त्याच्या 'त्या' श्रीमंतीचा, पैशाचा त्याला भूक भागवण्यासाठी काहीही उपयोग नाही. अशा वेळेस कोणी त्याला खायला दिले तर ते होईल सत्पात्री दान. ज्याला ज्या गोष्टीची गरज नाही, किंमत नाही, केवळ घ्यायचे म्हणून घेतो तेथे काही देणे म्हणजे ते सत्पात्री दान नव्हेच. भुकेल्याला अन्नदान हे सर्वात मोठे दान. कारण भुकेल्याला दिलेल्या अन्नाने त्याचा आत्मा तृप्त होतो. जेवल्यावर तो जेव्हा ढेकर देतो तेव्हा तुमच्या दृष्टीने ते पोट भरण्याचे लक्षण आहे; पण माझ्या दृष्टीने मात्र तो समाधानाचा, संतोषाचा ओंकार आहे.

अनेक संस्थाना, वृद्धाश्रमांना, अनाथालयांना जेव्हा तुम्ही दान देता तेव्हा त्या संस्थेला त्याची आवश्यकता आहे का ते बघा. कारण तुम्ही दिलेल्या दानाने तेथे आनंद निर्माण झाला पाहिजे. जेथे आनंद निर्माण होणार नाही ते सत्पात्री दान म्हणता येणार नाही.

१७. ताई, महाशिवरात्रीला वगैरे लोक घागरीघागरी दूध अभिषेकासाठी वापरतात आणि नंतर ते वाया घालवतात. दुसरीकडे गरीब लोक दूध घेणे परवडत नाही, म्हणून हळहळत असतात तेव्हा आपण काय करावे?

उत्तर : अशा वेळेस एकतर बरेचजण दूध आणतात त्यातले अभिषेकासाठी थोडे काढून उरलेले त्यांना प्रसाद म्हणून परत देऊन टाकावे किंवा अभिषेकाचे सर्व दूध गोळा करून तापवून सर्व लोकांना प्रसाद म्हणून वाटून टाकावे. कोणत्याही प्रकारे वाया गेलेले मात्र कधीच चांगले नाही. हे लक्षात ठेवावे.

१८. मग भांडंभर दुधाचा अभिषेक केला तर नाही का चालणार?

उत्तर : का नाही चालणार? तुला खुलभर दुधाची कहाणी माहीत आहे नं. पण तू हे दुसऱ्यांना सांगून त्यांना पटणे अवघडच! एकदा एकाने तीन लिटर दुधाचा अभिषेक केला; आणि त्यावरच नंतर अत्तराचा पण अभिषेक केला. आणि मग विचारू लागला, कृष्णा, अभिषेक पोचला का? मी तत्काळ सांगितले की मला त्याचा स्वीकार करता येणार नाही. तो नाही पोचला मला. कारण असे अत्तरमिश्रित दूध कोणीही पिऊ शकणार नाही. म्हणून दूध आणि अत्तर असा एकत्र अभिषेक कधीही करू नये. दूध बाजूला काढून मग पाणी घालून नंतर अत्तराचा करावा. अनेक प्रकारच्या कर्मकांडांचे, वेगवेगळ्या कल्पनांचे सध्या फारच स्तोम माजले आहे. मात्र सर्वांनी हे लक्षात ठेवावे की फुकट काहीही जाता कामा नये. माझ्या भक्ताने अत्यंत श्रद्धेने जे मला अर्पण केलेले आहे, त्यातला काहीही भाग वाया जाता कामा नये.

१९. ताई, गेली एकवीस वर्षे, मी दर पौर्णिमेला सत्यनारायणाची पूजा करत आहे. आता वयोमानाप्रमाणे होत नाही म्हणून वाटते की एका मांडवात १०८ सत्यनारायणाच्या पूजा करून त्याचे उद्यापन करावे का?

उत्तर : तू मी सांगतो ते ऐकणार, का तुझे गुरूजी (ब्राह्मण) सांगतात ते ऐकणार? 'कृष्णा, अर्थातच तू सांगणार तेच.' मग ऐक, एका मांडवात १०८ पूजा मांडून कशा चालतील? मी एकच आहे नं. मग पूजा एकच करायची. तीसुद्धा तूच करायची. (त्या भक्त विधवा होत्या) आणि १०८ मेहुणं प्रसादाला बोलव. म्हणजे सर्व यथासांग होऊन मला त्याचा स्वीकार करता येईल.

२०. ताई, कितीतरी पंथात खाण्यापिण्याची बंधनं घातलेली असतात. प्रत्येकाला ती सोसवतीलच असे नाही. उपासतापासाचा त्रास होतो तर काय करावे?

उत्तर : 'मला बंधने कोणचीच आवडत नाहीत. खाण्यापिण्याची तर अजिबात नाहीत.  तुम्ही मला जे काही प्रसाद म्हणून देता, ते मी वासाच्या रूपानेच स्वीकारतो. कारण सुगंध हेच माझे स्वरूप आहे. म्हणून कोणी काही खाल्ले, तरी माझा त्याच्याशी काहीही संबंध नाही. मनापासून, 'कृष्णा ये रे' ह्या म्हणण्यातच मी आहे. हे मोठे गूढ आहे, सत्य आहे. हे असं पाच मिनिटात कळणारं नाही.

तुम्ही लक्षात ठेवावं, की मला कोणतही बंधन नाही. मी बंधनमुक्त आहे. भक्तांच्या हृदयाच्या हाकेला धावणे एवढंच माझं काम आहे; आणि मला त्यांनी हृदयापासून हाक मारणे हे माझ्या भक्तांचे काम. ह्याच दोन गोष्टी महत्त्वाच्या. त्या गोष्टी तुम्ही आणि मी पाळल्या, तर तुमच्या माझ्यातलं बंधन हे कधीही तुटणार नाही.

२१. कृष्णा, मला तुझ्याशिवाय कोणालाही नमस्कार करायला आवडत नाही. तू गुरुस्थानी असताना बाकी इतर कशाला?

उत्तर : असं काय म्हणतेस? प्रत्येकात मी जगतो आहे, वसतो आहे, हे तुला माहीत आहे नं! मग कोठेही नमस्कार केलास तरी तेथल्या मलाच तू नमस्कार करते आहेस हे लक्षात ठेव आणि तो कृष्णार्पण म्हणून मलाच अर्पण कर म्हणजे झालं नं! फार तर असं म्हण, कृष्णा, आज ह्या रूपात तू माझ्यासमोर आहेस. तुला माझा नमस्कार!

तुला ती रामकृष्ण परमहंसांची गोष्ट माहिती आहे ना? एकदा एक वेश्या त्यांची परीक्षा घ्यायला म्हणून नटून-थटून रात्रीच्या वेळी त्यांच्या खोलीत आली. तिच्याकडे पाहाताच, आई, आज तू ह्या रूपात आलीस. तुला माझा नमस्कार असो, असं म्हणत ते समाधिमग्न झाले. ती बाई लज्जित होऊन तेथून बाहेर पडली.

असा भाव हवा. मी भावाचा भुकेला आहे.

२२. कृष्णा, अमेरिकेत असल्यामुळे तिथी कळत नाही. साहित्य नसते, गुरुजी नसतात. त्यामुळे आमच्या हातून पूर्वजांचे श्राद्धकर्म वगैरे होत नाही. मग त्याचे पाप आम्हाला लागते का?

उत्तर : ज्या वेळेस तुम्हाला असं वाटेल की, माझी तर ह्या पूर्वजांसाठी काही करायची मनापासून इच्छा आहे. मात्र इथल्या अडचणींमुळे ते शक्य होत नाहीये. अशा वेळेस तुम्हाला मनापासून प्रार्थना तर करता येते? पूर्ण भावनेने मला, कृष्णाला सांगावे, की कृष्णा पूर्ण जगत् तुझ्यात सामावलेले आहे. म्हणून आज जे मला शक्य आहे ते कर्म

तुला अर्पण करते. त्यांना (पूर्वजांना) सद्गती मिळू दे. अशा वेळेस त्या सर्वांची जबाबदारी माझ्यावर येते. त्याच्यासाठी दुसरे काहीही करायला नको.

कोणत्याही गोष्टींचे अवडंबर माजवू नका. प्रत्येकाने आपले वर्चस्व दाखविण्यासाठी काही नियम केले, काही बंधने घातली; पण मी निर्विकार, निर्विकल्प, निराकार आहे. मला कोणाची, काहीही बंधनं नकोत. श्रद्धा आणि विश्वास ह्या दोनच गोष्टी प्रत्येकजण प्रत्येक वेळी मला देऊ शकता. त्याच्या, त्या भावनेचा मी स्वीकारही करू शकतो आणि ही ताकद भावनेने केलेल्या प्रार्थनेत आहे.

२३. कृष्णा, कोणी पंचक नक्षत्रात गेल्यावर गुरुजी सांगतात काही पूजा, विधी करावेत. नाही तर घरात मृत्यू संभवतो. हे खरे आहे का?

उत्तर : ते नाही केले तरी चालेल, पण शंकराला अभिषेक करून अभिषेकाचे तीर्थ घरातल्या सगळ्यांनी घ्या म्हणजे दोष नाही.

२४. मृत्यू झाल्यानंतर, आपण कोठे जातो? किती काळासाठी तेथे असतो?

उत्तर : तसं सांगताच येणार नाही. कारण ते त्या त्या व्यक्तीवर, त्याच्या संस्कारांवर अवलंबून असते. परंतु खरा जो आत्मा असतो, तो मात्र माझ्याकडेच येणार असतो. आत्मा हा कधीही नष्ट होत नाही. आत्मा ह्या शब्दाचा अर्थच ॐकार! त्याच्या त्याच्या कर्माप्रमाणे गती मिळते आणि एक ना एक दिवस तो माझ्याकडे येतो.

२५. कोणी जर आत्महत्या केली असेल, तर त्यासाठी मी काही करू शकेन का?

उत्तर : नाही. तुम्ही काही करू शकणार नाही. तो जो आत्मा आहे, तो अनेक जन्म घेत घेत, त्याच्या गतीने सुधारतो आणि शेवटी मला येऊन मिळतो.

२६. माझ्याकडे आध्यात्मिक धार्मिक भरपूर पुस्तके आहेत ती मी वाचावीत की नको?

**उत्तर :** वाचनात आनंद वाटत असेल तर वाच. वाचलंच पाहिजे असं नाही. जे करताना आनंद मिळतो ते ठिकाण आपलंच आहे. असं समजावं आणि ते करावं. आनंद मिळवावा आणि तो टिकवावा देखील. तो टिकविण्यासाठी जी शक्ती लागते ती माझ्याकडून मिळवा. प्रत्येकाला वेगवेगळ्या कार्यात आनंद वाटतो. कोणाला वाचनात, कोणाला मंत्र जपण्यात तर कोणाला सेवा करण्यात. ज्या प्रकारे आपल्याला आनंद घ्यावा असं वाटेल, तोच मार्ग आपण अनुसरावा, खरा आनंद मिळवावा. त्या आनंदातूनच माझी प्राप्ती होते.

२७. कृष्णा, तुला काय आवडते? प्रसाद म्हणून काय देऊ?

उत्तर : काहीही. तू जे खाणार ते प्रेमाने मला दे. तोच माझा प्रसाद.

२८. कृष्णा, तू आता चहा घेतोस? तुझ्या वेळेला चहा होता का?

उत्तर : माझ्या वेळेस चहा नव्हता. पण आत्ताच्या काळात जे माझे अनेक गरीब भक्त आहेत त्यांना दूध देणे शक्य नाही, परवडत नाही म्हणून ते मला चहा देतात व तो मी आनंदाने स्वीकारतोही.

कृष्ण आत्तासुद्धा झोपडीत राहणाऱ्या भक्ताकडे जातो. तेव्हा जर तो भक्त, 'कृष्णा, तू आलास, पण माझ्याकडे तुला देण्याजोगे काहीही नाही रे' असे म्हणू लागला तर कृष्ण म्हणतो, ''अरे, तुझ्याकडे थोडी कणीक आहे का? ती आण. त्यात थोडीशी साखर किंवा गूळ असेल ते घाल आणि किंचित पाणी घालून त्याचा लाडू वळून मला प्रेमाने दे. तो मी स्वीकारतो. माझ्याकडे द्यायला काही नाही, असे म्हणू नकोस! मी प्रेमाचा भुकेला आहे. प्रेमाने तुम्ही मला काहीही अर्पण केलेत तर त्याचा मी स्वीकार करतो.''

२९. कृष्णा, तू काळा सावळा आहेस का रे?

उत्तर : छे! मी तेज:पुंज आहे. जणू तेजाचा गोळाच. मी ज्योतिर्मय आहे.

३०. कृष्णा, कधी कधी तुझ्या-ताईंच्या इतकी जवळ असलेली माणसे, अचानक तुमच्यापासून बाजूला होतात, असे का घडते?

उत्तर : मी तुम्हाला नेहमी सांगत असतो, की कर्तव्यात मला पाहा. ती प्रेमाने करा. कारण अशा प्रकारे कर्तव्य करत असताना, तुमच्यातील यौगिक शक्तीत वृद्धी होत असते. ती पण फक्त ह्या जन्मापुरती नाही, तर ती ऊर्जा तुमच्या पुढच्या जन्मात देखील तुमच्याबरोबर असते. तुमची ही शक्ती जेव्हा संपते तेव्हा तुमचे तुम्हीच माझ्यापासून दूर होता. तुम्हाला तशीच बुद्धी होते. म्हणून कृष्ण सतत सांगत असतो, 'तुम्ही तुमची कर्तव्ये प्रेमाने, सेवाभावनेने, श्रद्धेने करणे हीच तुमची आद्य भूमिका आहे. बाकी उपास-तापास, पूजा-पाठ वगैरे करण्याची काहीही गरज नाही. फक्त कर्तव्याला जागा!

३१. ताई, गृहस्थाश्रमी लोकांना काय उपदेश कराल?

उत्तर : भगवंताविषयी ओतप्रोत प्रेम आपल्या मनात असणे अत्यंत आवश्यक आहे. त्या प्रेमाची महती आपण जाणलीच पाहिजे. आई आपल्या सगळ्याच मुलांवर प्रेम करत असते. पण ज्या मुलाचे आपल्या आईवर अनन्य प्रेम असते. त्याच्यावर मात्र

आईच्या प्रेमाचा वरदहस्त सतत असतोच. तसंच भगवंताचेही असते. भगवंतांनी वचनच दिलेले आहे की ते त्यांच्या भक्तांच्या मागे उभे असतातच. जे भक्त परब्रह्माला आपले प्रेमानिधान मानतात त्यांच्याजवळ परमेश्वर सतत वास करत असतात. परमेश्वरावरचे प्रेम ही आपल्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे, ह्याचे सतत भान ठेवणे आवश्यक आहे.

३२. या आधुनिक काळात माणसाची आयुर्मर्यादा वाढते आहे. जेष्ठ नागरिकांची संख्याही वाढत आहे. तुम्ही त्यांना काय सांगाल?

उत्तर : आपण परब्रह्मासाठी आणि त्याची भक्ती करण्यासाठी अगदी लहानपणापासून वेळ काढलाच पाहिजे. देवावर श्रद्धा आणि विश्वास ठेवलाच पाहिजे. जेष्ठ नागरिकांनी हे लक्षात ठेवायला हवे की जीवनात चढउतार हे येणारच. आपण आपला आनंद दुसऱ्यावर अवलंबून ठेवण्यापेक्षा परब्रह्मावर श्रद्धा ठेवावी आणि आपल्या कर्तव्यास चुकू नये. कर्तव्य करताना फळाची अपेक्षा करू नका. ते योग्य वेळी आणि योग्य तेच निश्चित मिळेल ही खात्री बाळगावी. परमेश्वर कोणावरही अन्याय होऊ देत नाही. ह्या त्याच्या वचनावर दृढ श्रद्धा ठेवून वागावे. एक काळ असा येईल की परब्रह्माचे अस्तित्व सगळीकडे जाणवेल आणि आनंदाची, सुखाची अनुभूती येईल.

३३. ताई, तुमचे वृद्धाश्रमांच्याबाबत काय मत आहे?

उत्तर : जेव्हा आपली मुलं आणि समाज ज्येष्ठ नागरिकांसाठी पाहिजे तसा वेळ आणि प्रेम देऊ शकत नाहीत, तेव्हा अशा आश्रमांची गरज भासते. तेथे हे जेष्ठ नागरिक एकमेकांच्या सहवासात प्रेमाने रमू शकतात. सद्य:स्थितीत वृद्धाश्रमांची संख्या वाढतेय हे निश्चित. कालाय तस्मै नम: हेच खरे. हा काळाचा महिमा आहे.

३४. मुलांच्या संगोपनाबाबत आपण पालकांना काय सांगणार?

उत्तर : पालक आणि मुलांच्यातील संघर्ष ही ह्या आधुनिक काळाची जणू खूणच आहे. पालकांनी मुलांना फक्त मार्गदर्शन करावे. कोणत्याही प्रकारे त्यांच्यावर सक्ती करू नये. त्या सक्तीचा विपरीत परिणाम होण्याचीच शक्यता जास्त आहे.

***

ॐ

## गीता

श्रीकृष्णाने ठिकठिकाणी ताईंमार्फत गीतेच्या संदर्भात कितीतरी गोष्टी सांगितल्या आहेत. त्या येथे संकलित करायचा प्रयत्न केला आहे.

१. भगवान श्रीकृष्ण सांगतात, गीता ही माझी वाङ्मयीन मूर्ती आहे. मोहग्रस्त अर्जुनाचे निमित्त करून, सर्व मानव जातीच्या कल्याणासाठी ती मी सांगितली. वेगवेगळ्या धर्मांच्या नावाखाली चालणाऱ्या शाब्दिक फाफट पसाऱ्याच्या गैरसमजुतींना थारा देऊ नका. मानवता धर्म, हाच माझा गीतेत सांगितलेला खरा धर्म आहे. त्याला देश, काळ, समाज, सांप्रदाय, भौगोलिक परिस्थिती अथवा परंपरा यांची काहीही आडकाठी येणार नाही. माणुसकी हाच मानवी मनाचा सर्वात मोठा अलंकार आहे. माझ्यावरील श्रद्धेतूनच तो जतन होईल. तुमची मानसिक स्थिती जेव्हा अर्जुनासारखी संभ्रमित होते, तेव्हा ही गीताच तुम्हाला योग्य मार्ग दाखविते.

२. गीता नुसती तोंडपाठ म्हणू नका. ती आचरणात आणण्याचा प्रयत्न करा. कुटुंबातील व्यक्तींच्या रूपात मलाच पहा. वडील माणसांची सेवा करा. निष्काम सेवेची सुरुवात स्वत:च्या घरापासून करा. ती सर्व सेवा मला निश्चित पोहोचते.

३. श्रीमद्‌भगवतगीता हा ग्रंथ म्हणजे आपल्या भारताचा अगदी ‘पाया’ आहे. ही गीता सांगणारा योगेश्वर श्रीकृष्ण आणि आज तुमच्यातर्फे वावरणारा श्रीकृष्ण काही वेगळा नाही.

४. प्रत्येक जीवात्मा म्हणजे अर्जुन आहे. कोणतेही काम करताना हे करू का ते करू असे जीवात्म्याला वाटत असते. त्यांच्यातला अर्जुन जागा होतो. त्याचवेळी त्यांच्या अंत:करणात ॐकार रूपाने मी, परमात्मा जागृत असतो. जीवात्म्याला योग्य बुद्धी देऊन मीच त्याच्याकडून कार्य करून घेत असतो. म्हणजेच योग्य कर्म घडते.

५. गीतेतले श्लोक म्हणजे माझी वचने आहेत. माझ्या वचनांवर विश्वास ठेवा. त्याप्रमाणे कार्य करा. कर्तव्यातच मला पहा.

६. गीता वाचा, असं मी सगळ्यांना सांगत असे, पण सद्यपरिस्थितीत संस्कृत भाषा कोणाला नीट येत नाही. वाचता पण येत नाही तसंच वाचलेले बरोबर का चूक, अशी शंका निर्माण होते. म्हणून लक्षात ठेवा, शंकेला कोठेही थारा देऊ नका. अध्यात्म मार्गामध्ये शंका ही अतिशय निसरडी वाट आहे. म्हणून प्रत्येकाने जे करायचे ते प्रेमाने, श्रद्धेने करा, म्हणजे ते कृष्णाला पोहोचेलच. अशी भावना ठेवून करा. गीता वाचता येत नसेल तर ती न वाचता 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' ह्या तारक मंत्राचा जप करा.

७. तुम्ही गीतेचा एक अध्याय, एक श्लोक जरी वाचलात तरी, त्यानंतर सात श्लोकी गीतामहात्म्य वाचायला मात्र कधीही विसरू नका.

८. कोणत्याही शारीरिक, मानसिक आजारातून बाहेर पडण्यासाठी कृष्णाला तशी प्रार्थना करून, श्रीभगवद्‌गीतेतील अकराव्या अध्यायातील छत्तीसाव्या श्लोकाची कमीतकमी एक माळ (१०८ वेळा) जप करावा. दुखण्याला निश्चित उतार पडेल. (स्थाने ऋषीकेश.... अ.११ श्लोक ३६) अनेक कृष्णभक्तांनी याचा अनुभव घेतला आहे.

स्थाने हृषीकेश तव प्रकीर्त्या जगत्प्रहृष्यत्यनुरज्यते च।

रक्षांसि भीतानि दिशो द्रवन्ति

सर्वे नमस्यन्ति च सिद्धसङ्घाः।।३६।।

९. ज्यांना शक्य असेल त्यांनी दर सोमवारी दुपारी तीन ते सहा, या वेळात शक्य तेवढी गीता वाचावी व त्यानंतर सात श्लोकी गीतामहात्म्यही (गीताशात्रामिदं पुण्यं...) वाचावे.

गीताशास्तमिदं पुण्यं यः पठेत्प्रयतः पुमान्।

विष्णोः पदमवाप्नोति भयशोकादिवर्जितः।।१।।

गीताध्ययनशीलस्य प्राणायामपरस्य च।

नैव सन्ति हि पापानि पूर्वजन्मकृतानि च।।२।।

मलनिर्मोचनं पुंसां जलस्नानं दिने दिने।

सकृद्‌गीताम्भसि स्नानं संसारमलनाशनम्।।३।।

गीता सुगीता कर्तव्या किमन्यैः शास्त्रविस्तरैः।
या स्वयं पद्मनाभस्य मुखपद्माद्विनिःसृता॥४॥
भारतामृतसर्वस्वं विष्णोर्वक्त्राद्विनिः सृतम्।
गीतागङ्गोदकं पीत्वा पुनर्जन्म न विद्यते॥५॥
सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनन्दनः।
पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत्॥६॥
एकं शास्त्रं देवकीपुत्रगीतमेको देवो देवकीपुत्र एव।
एको मन्त्रस्तस्य नामानि यानि कर्माप्येकं तस्य देवस्य सेवा॥७॥

***

# ॐ

प. पू. ताईंनी सर्व कृष्णभक्तांना तारक मंत्र दिला तो म्हणजे 'ॐ नमो भगवते वासुदेवाय.' ह्याचा अर्थ आणि त्याचे महत्त्व त्यांच्याच शब्दात पाहू.

आपल्या प्रत्येक दिवसाची सुरुवात 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' या मंत्रानेच करा. या मंत्रात हरी, शिव आणि शक्ती ह्या तिघांनाही नमस्कार आहे. ॐ म्हणजे शिवाला नमस्कार, भगवते म्हणजे भगवती शक्तीला आणि वासुदेवाय म्हणजे कृष्णाला (परब्रह्माला) नमस्कार! यापुढे मी शिवशक्तीला बरोबर घेऊन कार्य करणार आहे म्हणून आम्हा तिघांना नमस्कार करून आपल्या दिवसाची सुरुवात केलीत तर आम्हा तिघांचीही तुम्हाला मदत मिळेल.

'ॐ' हे माझे रूप. त्याच रूपात मी प्रत्येकात वास करून आहे. भक्ताला अनुभूती देणारे हेच माझे रूप. ह्या रूपावर अक्षरावरच मी साऱ्या ब्रह्मांडाला पेलून धरले आहे. त्या रूपाला नमो म्हणजे नमस्कार असो.

नमो ह्या शब्दाची कृती आपण बघितली तर, तुमचे दोन्ही हात जुळतात. माझ्याबद्दलचे प्रेम, नम्रता आणि आपुलकी व्यक्त होते. श्रद्धाशक्तीचे प्रतीक प्रगट होत असताना डोळे मिटले जातात. श्वास रोखून धरला जातो. डोके नम्रतेने वाकले जाते व हात जुळलेले असून, हृदयाकडे धरले जातात. माझे तुमच्या हृदयातील स्थान जागृत करण्यासाठी ही कृती अगदी नकळत होऊन जाते. शिवाय न म्हणजे नाही. मद, मत्सर, मोह, माया हे सर्व नाहीसे होऊन देवा तुझ्या रूपाकडे मी नम्र होतो म्हणजेच नमो.

भगवते वासुदेवाय म्हणजे शक्ती आणि शिव. ह्या शिवशक्तीच्या ताकदीवरच सर्व विश्वाची उत्पत्ती अवलंबून आहे आणि त्याचे रूप म्हणजे ॐ. ॐ म्हणजे शिव शक्तीच्या मीलनातून निर्माण होणार ओंकार. ॐ म्हणजे शक्ती, उत्साह, प्रेम, धैर्य, कर्म ह्याची जागृती. अणूरेणूत भरून राहिलेला तो मी ॐकार, त्याला माझा नमस्कार असो. तो नमस्कार मी ज्या चराचरामध्ये भरून राहिलो आहे तेथे तेथे मी स्वीकारतो. गीतेच्या तोलाचा तुमच्या जीवनाला ताकद देणारा, तुमच्या जीवनात स्थैर्य निर्माण करणारा, तुमची मन:शक्ती वाढवणारा, असा हा मंत्र आहे.

आपले जीवन म्हणजे सुखदु:खाचे मिश्रण. हे शब्दच मुळी तुलनात्मक आहेत. सुख किंवा दु:ख हे आपल्या मानण्यावर आहे. असे हे तुलनात्मक शब्द झेलण्यासाठी जी मनाची ताकद आपल्याला पाहिजे ती ह्याच मंत्रामुळे मिळणार आहे. त्यामुळे आजच्या काळात ह्या मंत्राच्या जपाची अत्यंत गरज आहे. म्हणून प्रत्येकाने दिवसाचे काही क्षण तरी चालताना, बोलताना, फिरताना ह्या मंत्राचा जप करा, म्हणजे मी तुमच्याबरोबर सतत वावरत राहीन, असं श्रीकृष्ण परत परत सांगत असतो आणि आपल्या भक्तांना तसा अनुभवही देत असतो.

तुम्ही माझ्यावर पूर्ण श्रद्धा ठेवून मला आपलासा करून घेण्यासाठी, ज्या मंत्राने मला हाक मारणार तो म्हणजे 'ॐ नमो भगवते वासुदेवाय'. हाच मंत्र जपा असा मी आग्रह धरतो. कारण ह्या काळाची गरज ह्या मंत्राने पुरविली जाणार आहे. ह्या मंत्रानेच मला हाक मारा, माझी उपासना करा. मला बोलवा आणि मला आपलासाही करून घ्या. ह्यातच सर्व जीवनाचे तथ्य आहे. हे तथ्य व पथ्य पाळून जीवनाला लागणारी ताकद वाढवा. मला आपलं करून आपली कार्यक्षमता वाढवण्यास माझी मदत घ्या. जीवनाचे ध्येय हेच आहे. ते गाठा.

तुमच्यामध्ये असलेला ॐकार आणि मी यांना साधणारा हा मंत्राचा पूल आहे. त्याचा उपयोग करा. मला आपलासा करा. तुमच्यातला ॐकार जागृत करा. ही काळाची गरज आहे.

या मंत्रामुळे जीवनात चैतन्य निर्माण होईल. मला तुम्हाला व्यवहाराचे योग्य मार्गदर्शन देता येईल. व्यवहारातील अडीअडचणींना सामोरे जाण्यासाठी तुम्हाला मानसिक बल देता येईल. तसंच या महान मंत्रजपाने अध्यात्ममार्गावरची वाटचाल सरळ होईल. जलद होईल आणि जीवनात शांती मिळून आपला जीवनपथ सुकर होईल.

।। ॐ नमो भगवते वासुदेवाय ।।

***

ॐ

कृष्णाने मी भक्त कोणाला म्हणतो, त्यांचे प्रकार कसे असतात, त्यांच्याकडून माझी काय अपेक्षा आहे हे ताईमार्फत लिहून दिले ते असे :-

'अनन्य' भक्तिभावाने जे मला भजतात त्यांचा संपूर्ण भार मी वाहतो. परंतु अनन्य या शब्दाचा अर्थ मात्र अथांग आहे. वरवर पाहता हा तीन अक्षरी शब्द पण ह्यात त्रैलोक्य भरलेले आहे. आपल्या जीवनात अनंत अडचणी वरचेवर आपल्या भेडसावीत असतात. अशा वेळेस आपल्याला कोणाच्या तरी आधाराची गरज असते. आपण भावनाविवश झालेले असतो. त्या स्थितीत आपण येऊन थांबतो दैवापाशी किंवा देवापाशी. ह्या दोन शब्दांत खूपच साम्य आहे. बुद्धिवादी लोक थांबतील ते दैवापाशी आणि श्रद्धावादी लोक थांबतील देवापाशी. एकंदरीत अज्ञात अशीच ही स्थाने. दोनही शब्दांचा अर्थ आत्तापर्यंत ठाम शब्दात न मिळालेला असेच हे शब्द.

आता माझ्या श्रद्धावान भक्तांचे प्रकार पाहू. पहिला प्रकार म्हणजे केवळ अडचणींच्याच वेळी परब्रह्माला साद घालणारे. दुसरा प्रकार म्हणजे सतत माझे स्मरण करणारे. आपल्या दैनंदिन कार्यात मग्न राहूनही मला न विसरणारे. सतत माझी आठवण ठेवणारे आणि तिसरा प्रकार म्हणजे आपला दैनंदिन व्यवहार माझ्याच इच्छेने घडतो आहे, घडणार आहे असे मनोमन मानून पूर्ण श्रद्धा माझ्यावर ठेवून वागणारे माझे भक्त. यामध्ये प्रत्येकाच्या बाबतीत वरील शब्दाचा अर्थ प्रत्येकाला किती प्रमाणात, कशा प्रकारे लागू पडतो व मी कोणाच्या बाबत किती बांधला जाऊ शकतो हे तुम्हीच ठरवू शकाल. ह्या तीन प्रकारात आपण कोठे बसतो हे ज्याचे त्याने ठरवावे. म्हणजे मी कोणासाठी किती धावू शकतो हे ज्याचे त्याला कळेल. अर्थात हे सर्व एका क्षणात घडेल अशी अपेक्षा नसावी. या गोष्टींचा विचार केला तर आपल्या निदर्शनास येईल की व्यवहार आणि मी ह्यांची सांगड सहज घालता येईल. जेवढी ओढ तुमच्याबद्दल समोरच्याला वाटते, तेवढीच ओढ तुम्हालाही त्याच्याबद्दल वाटते. कारण प्रत्येकात माझाच अंश असतो.

या तीनही प्रकारात आपल्याला आपले वर्गीकरण करता येईल का? मी काही तुमच्यापासून वेगळा नाही, तुमच्यामध्येच मी वावरतो आहे. म्हणून तुमच्या मनातील आचारविचार मी जाणू शकतो. पण ते केव्हा? मी तुमच्यामध्ये जागतो आहे ही जागृती तुमच्यामध्ये आली तरच हे होऊ शकते. ही जागृती येण्यासाठी आपली आपल्यावर श्रद्धा असली पाहिजे. आपली आपल्यावर श्रद्धा म्हणजे नेमके काय? ते पण सांगतो.

तुम्ही व्यवहारी भाषेत बोलताना म्हणता, प्रत्येक कृतीला मन साक्ष असते. लोकांना फसवता येते, पण मनाला फसवता येत नाही. मनाला साक्षी ठेवून केलेली कृती म्हणजेच स्वत:वरची श्रद्धा. स्वत:वर ठेवलेली श्रद्धा आपणास मन:शांती देते. इतर कोणतीही गोष्ट तुम्ही विकत घेऊ शकाल. पण मन:शांती ही एकच गोष्ट अशी आहे जी तुमची तुमच्यावर नितांत श्रद्धा असल्याशिवाय मिळू शकत नाही. ती मिळविण्यासाठी काय करावे हे सांगतो.

आत्तापर्यंत जे माझे भक्त होऊन गेले, त्यांच्यातला 'मी' संपुष्टात आला होता. मी, माझे, मला हे विसरण्याचे अत्यंत कठीण व्रत ह्या माझ्या भक्तांनी अंगीकारलेले आणि पारही पाडलेले असते. त्यांच्या प्रत्येक श्वासात नाद घुमतो तो माझ्या नामाचा, प्रत्येक कृतीत उतरत असते ते माझे अस्तित्व, असे तो मानतो आणि प्रत्येक क्षणाक्षणाला जे घडते ते माझ्या इच्छेने असेही मानतो. मनाला अशा प्रकारे तयार करण्यासाठी अनेक प्रकारची सुखदु:खे, टक्केटोणपे, व्यवहारी जीवनातील धक्केबुक्के खावे लागतात. त्यात अनेक वर्षांचा कालावधी जावा लागतो. बऱ्याच अनुभवांच्या वळकट्या बांधाव्या लागतात. सखेसोयरे दुरावतात किंवा लांब करावे लागतात. ह्यालाच व्यवहारी भाषेत ऋणानुबंध असे म्हटले जाते आणि हे सर्व माझ्या इच्छेने घडते. ह्याची जाणीव प्रत्येक क्षणाला ठेवणे ही अत्यंत कठीण गोष्ट आहे. त्यासाठी मानवाला माझ्या मदतीची अत्यंत गरज असते. मानव जीवन जगत असतो तो तीन तत्त्वांचा मेळ घालून. एक म्हणजे पिढीजात मिळालेला वारसा, दोन म्हणजे गेल्या जन्मीचे बरे-वाईट कर्म आणि तिसरे म्हणजे ह्या जन्मीची त्याची बरी-वाईट वर्तणूक. ह्यापैकी पहिल्या व दुसऱ्याच्या बाबत आपणास विश्वासच ठेवावा लागतो आणि तिसरे म्हणजे वर्तमान काळ. तो आरशासारखा आहे. आरशात आपला हसरा चेहरा पाहिला तर तो हसराच दिसतो आणि रडका बघितला तर रडकाच दिसतो. थोडक्यात पेराल तसे उगवेल हाच न्याय असतो.

त्यामुळेच असे म्हणावेसे वाटते की, माझ्यावर विश्वास ठेवून आपण आपली वाटचाल करू लागलात की घडणारी प्रत्येक गोष्ट ही माझ्याच इच्छेनेच घडते, मी नेहमी सत्याच्या बाजूचाच असतो आणि तुमच्या प्रत्येक कृतीचे योग्य ते फळ योग्य वेळी तुम्हाला देतच असतो, ही तुमची खात्री पटली आणि तुम्ही तसे वागू लागलात, की मन:शांती तुमच्यापासून लांब नाही. तसे वागायला शिकणे हीच तुमची आयुष्यभराची साधना आहे.''

***

ॐ

श्रीकृष्णाने सामुदायिक उपासनेसाठी अनेक ठिकाणी श्रीकृष्णलीला केंद्रांची स्थापना केली. त्या केंद्रासंबंधी कृष्णाने काय सांगितले ते आता पाहू.

पूर्वीच्या काळी ऋषी-मुनींनी घोर तपश्चर्या, यज्ञ, याग, जप, तप करून दैवी स्पंदनांची निर्मित केली व त्या त्या वेळी आलेल्या नैसर्गिक, सामाजिक आपत्तींना तोंड दिले. त्यांचा सामना केला. पण आत्ताच्या काळात एवढी तपश्चर्या, यज्ञयाग, जप, तप करायला कोणाला सवडच नाही. मग त्यासाठी काय करायचे? तर श्रीकृष्णाचे सांगणे असे की सामुदायिक उपासनेतून, आराधनेतून हे बळ, ही शक्ती तुम्ही निश्चित मिळवू शकता. अशी ही सामुदायिक उपासना कोणाची, कोठे, किती वेळ करायची? तर त्यासाठी श्रीकृष्णाने योजना केली ती श्रीकृष्णलीलाकेंद्र स्थापनेची! केंद्राचा कार्यक्रम, वेळ ठरवून दिली.

श्रीकृष्णाचे सांगणे असे की ही अर्ध्या तासाची आराधना तुम्ही केलीत तर त्याचा उपयोग तुमच्यासाठी, तुमच्या तरुण पिढीसाठी, तुमच्या भावी पिढ्यांसाठी व विश्वकल्याणासाठी होणार आहे. ही एक प्रकारची तपश्चर्याच आहे.

केंद्राच्या अर्धा तासाच्या वेळेत मी तेथे जागृत असतो. येणाऱ्या प्रत्येक भक्तावरून माझी कृपादृष्टी फिरत असते. नियमित आणि श्रद्धेने येणाऱ्या सर्व भक्तांची जबाबदारी मी स्वीकारतो आणि त्यांना माझ्या कृपाछत्राखाली घेतो.

ह्या केंद्रातून भक्तिप्रेमाची गंगा वाहत राहील. आत्ता लहानलहान वाटणारी ही केंद्रे उद्याची मार्गदर्शक ठरतील. तेथे येणाऱ्या प्रत्येकात खऱ्या आनंदाची आणि प्रेमाची जागृती होऊन, जीवनाचा सुगंध लुटता येईल.

ह्या केंद्रासाठीचे काही नियम सांगितले, ते पुढीलप्रमाणे :

१. ज्यांचे घरी केंद्र सुरू होणार तो केंद्रप्रमुख. त्याने सर्वांच्या सोयीप्रमाणे केंद्राचा वार व वेळ ठरवावी.

२. केंद्र हे अर्धा तासच असावे.

पहिली पंधरा मिनिटे : 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' ह्या मंत्राचा जप.

पुढील पाच मिनिटे 'ॐ महानशक्ती देवताय नम:'

पाच मिनिटे अनुभव कथन किंवा गीतावाचन.

पाच मिनिटे गजर किंवा भजन.

असा अर्ध्या तासाचाच कार्यक्रम.

३. ही उपासना असून त्यात पूर्णपणे एकाग्रता असावी.

४. केंद्रात पूजासाहित्य, प्रसाद, सजावट असे कोणत्याही प्रकारचे अवडंबर असू नये. अत्यंत साधेपणाने आणि पूर्ण समर्पणभावाने केंद्र करावे.

५. प्रसाद शक्यतो एकच असावा. सर्वांतर्फे तो अर्पण करून केंद्र संपल्यावर प्रत्येकाने आपल्या हाताने तो घ्यावा.

६. केंद्र संपल्यावर तेथे न रेंगाळता, अधिक वेळ गप्पाटप्पा न करता सर्व भक्तांनी कृष्णप्रेमाचा ठेवा घेऊन तत्काळ आपापल्या घरी जावे. ह्याने कृष्णभक्तीचे बीज त्या त्या कुटुंबात रुजेल.

७. नियमित केंद्रात येणाऱ्या एखाद्या भक्ताला हे केंद्र आपल्या घरी करावे असे वाटल्यास, पूर्वसूचना देऊन तीन बैठकीसाठी केंद्र स्थलांतरित करता येईल. मात्र त्या घरी तीन आठवडे तरी केंद्र घेणे आवश्यक आहे.

८. केंद्रप्रमुखास श्रीकृष्णाचा फोटो आणि समई देण्यात येईल. त्या फोटोसमोर समई लावून उपासना करावी.

९. केंद्रात येण्यासाठी कोणालाही वारंवार आग्रह करू नये. केंद्राचा वर्धापन-दिवस अत्यंत साधेपणाने साजरा करावा. सर्वांच्यातर्फे सत्यनारायणाचा प्रसाद करावा.

१०. केंद्रात कोणत्याही प्रकारचे निधिसंकलन, व्यावसायिक देणी-घेणी, इतर आर्थिक बाबी, देणीघेणी करू नयेत किंवा त्यांची चर्चाही करू नये.

११. ज्यांना नवीन केंद्र सुरू करायचे आहे, त्यांनी कृष्णकुटीरमध्ये संपर्क साधावा. तेथून त्यांना केंद्राचा फोटो, समई आणि केंद्र क्रमांक दिला जाईल.

अहमदाबादला कृष्णकेंद्राची स्थापना झाल्यावर काही लोक प्रश्न विचारून आपल्या शंकांचे समाधान करून घेत होते. एका भक्ताने विचारले, 'कृष्णा, अर्ध्या तासाचा केंद्राचा कार्यक्रम झाल्यावर आम्ही पुढे काही सत्संगासारखे केले तर चालेल

का?' केंद्राची माहिती सांगताना, वारंवार अर्धा तासच केंद्र का करायचे हे सांगूनही हा प्रश्न विचारल्यावर मात्र कृष्णाने स्पष्टपणे सांगितले, ''अरे, मी तेथे फक्त अर्धा तासच असणार आहे. तो कालावधी संपताक्षणी माझ्या सहवासाचा आनंद, प्रेमभाव बरोबर घेऊन तुम्ही प्रत्येकाने आपापल्या घरी जाऊन कृष्णभक्तीचे बीज आपल्या कुटुंबात रुजवावे असे मला वाटते.

केंद्रात येताना तुमचा उद्देश श्रीकृष्णाच्या प्रेमासाठी एकत्र येणे आणि श्रीकृष्णभक्तीचं प्रेम लुटतलुटत घरी जाणं हाच असावा असं मला निक्षून सांगायचं आहे. ह्यातच आता तुम्ही काय करावे आणि काय करू नये, ते समजून घ्या.''

काही केंद्रं खास युवापिढीसाठी म्हणून सुरू केली आहेत. तेथे संदेश देताना श्रीकृष्णाने सांगितले, ''मुलांनो, आयुष्यामध्ये मानवाला कुठे न कुठे थोडी वाट पाहावी लागते आणि ती वाट पाहिली, धीर धरला तर तुमचं जीवन तुम्ही अगदी यशस्वी करू शकता. ते करण्यासाठी माझी तुम्हाला गरज आहे. आजच्या काळात तुम्ही देवभोळे बना, असं तुम्हाला मी सांगणार नाही. आज खरी गरज आहे ती कर्तव्याची. प्रत्येकाने आपले कर्तव्य योग्य त्या प्रकारे पार पाडले तर त्याला मी माझी सेवाच मानतो आणि त्यांच्यासाठी मी सतत उभा राहीन असं तुम्हाला वचन देतो.

विद्याध्ययनाच्या काळात तुमचे कर्तव्य म्हणजे अभ्यास करणे. तो मनापासून करावा, तीच माझी पूजा असं मी मानतो. आणि दिवसभरात कर्तव्य पूर्ण झालं की झोपायच्या आधी 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हा मंत्र म्हणा आणि एकदाच मला हाक मारा, 'कृष्णा, ये रे'. मंत्र किती वेळा म्हणा हे काही मी सांगत नाही. मात्र हे करून मला आपलासा करून घ्या. माझी मदत मिळवा. कृष्ण तुमचा आणि तुम्ही कृष्णाचे, हे ध्यानात ठेवा.''

